
छात्र
प्रबोधन
दीपावली
विशेषांक
आम्ही प्रसन्न पुष्पांच्या
उमलत्या पाकळ्या
आम्ही आहोत देवाच्या
धाकुल्या किरण कळ्या
ज्ञान प्रबोधिनीचे कुमारांसाठी
अभिनव मासिक !

वर्ष ६, अंक ४
सौर कार्तिक, शके १९१८

**दीपावली विशेषांक**

# छात्र प्रबोधन

लागोपाठ तीन वर्षे उत्कृष्ट दिवाळी अंकाचा पुरस्कार मिळालेले मासिक!

ॐ



**इवली शल्ये रुपती खुपती,**
**मात करूदे त्यांच्यावरती**
**प्रगल्भतेचे पंख देऊनी**
**ने ज्योतिर्जगतात।**

**संपादक, प्रकाशक, मुद्रक**
महेन्द्र सेठिया
**संपादक मंडळ**
महेन्द्र सेठिया B.E., M.Ed.
विवेक पोंक्षे M.Sc., B.Ed.
अनघा लवळेकर M.A., B.Ed.
शैलजा देशमुख M.A., M.Ed.
**संपादन साहाय्य :** दत्ता श्री. टोळ, वर्षा कुलकर्णी, स्वाती ढेकणे
**मुखपृष्ठ पारदर्शिका :** डॉ. प्रकाश जोगळेकर
**मुखपृष्ठ सजावट :** सुनील बलकवडे
**आतील सजावट :** सतीश देशपांडे
**आतील चित्रे :** भास्कर सगर
**अक्षर जुळणी :** प्रिंट लिंक, पुणे.
**संपर्क पत्ता**
**'छात्र प्रबोधन'**
ज्ञान प्रबोधिनी
५१० सदाशिव पेठ, पुणे - ४११०३०
☎ ०२१२-४७७६९१, ४७८०९५
**नोंदणी क्रमांक**
PHM/22/VIII/1997, छात्र प्रबोधन PNCW/349
**प्रकाशन दिनांक**
राष्ट्रीय सौर १ कार्तिक, शके १९१९.
२३ ऑक्टोबर १९९७.
**वर्गणी**
**वार्षिक-**रु. १२५/-**द्वैवार्षिक** रु. २४०/-
**त्रैवार्षिक-**रु. ३५०/-**आजीवन** रु. २०००-
**भारताबाहेर : वार्षिक-** ३० डॉलर
**या अंकाची किंमत : रु. ४०/-**

*प्रिय प्रबोधक मित्रमैत्रिणींनो,*

*छात्र प्रबोधनचा हा दीपावली विशेषांक तुमच्यापर्यंत पोहोचवताना मनापासून आनंद होतोय. यावर्षी अनेक मान्यवर साहित्यिकांनी छात्र प्रबोधनासाठी विविधांगी लेखन केलंय. ते तुम्ही वाचालच. **'मी असा घडलो'** हा यावेळचा विशेष लेख ! आठ अष्टपैलू व्यक्तिमत्त्व, आपल्या जडणघडणीचा आलेख त्यामध्ये रेखाटत आहेत, स्वत:च्याच शब्दात! किशोर वयात घेतलेले उत्कट अनुभव, जाणीवपूर्वक केलेले कष्ट, मिळविलेले ज्ञान व कौशल्य याचा पुढे कसा उपयोग होतो हे या सर्वांच्या लेखनातून प्रकट झालं आहे. आपणही त्या सर्वांपासून काही प्रेरणा घेऊ या !*

*या अंकासोबत एक वैज्ञानिक खेळणे आपल्याला भेट दिले आहे. त्याचा वापर करताना गंमत तर येईलच पण त्यावर तुम्ही काही प्रयोग करावेत व या खेळण्याच्या निमित्ताने, तुमच्यातली प्रयोगशील वृत्ती वाढावी ही अपेक्षा! त्यासाठी काही गृहिते मांडावी लागतात, ती तपासून बघण्यासाठी प्रयोग रचावे व करावे लागतात, त्या प्रयोगांची अचूक निरीक्षणे नोंदवावी लागतात, त्यातून निष्कर्ष काढावे लागतात, आलेले निष्कर्ष स्वीकारण्याची तयारी असावी लागते, प्रयोगाशी निगडित ज्ञान मिळवून त्याचा योग्य उपयोग करावा लागतो, अनेकांचे अनुभव समजून घ्यावे लागतात, त्यातून निष्कर्षांचा योग्य अर्थ लावावा लागतो, स्वत:चे समज (गैरसमज) बदलण्याची, नवीन शिकण्याची, समजून घेण्याची मनाची तयारी असायला लागते. दुसऱ्यांच्या मतांचा योग्य आदर राखायला शिकावं लागतं... ही प्रक्रिया तुमच्यामध्ये सुरू व्हावी म्हणून तर हे खेळणं! **या दिवाळीच्या (अन् खेळण्याच्या) निमित्ताने तुमच्या प्रत्येकातील वैज्ञानिक जागा होवो हीच सदिच्छा!***

*छात्र प्रबोधन आता निव्वळ मासिक न राहता ती तुमच्यासारखा धडपड्या विद्यार्थ्यांच्या विकासाची एक चळवळ म्हणून आकार घेऊ लागली आहे. तुमच्याबरोबरच तुमचे आई-बाबा, ताई-दादा, शिक्षक यांनाही या चळवळीत सहभागी व्हायला तुम्ही सांगाल ना? सर्वांचे सहकार्य अन् सहभागातूनच ही चळवळ गतिमान होणार आहे. तशी ती होईल असा विश्वास बाळगून आहोत.*

***तुम्हाला, तुमच्या कुटुंबियांना, शिक्षकांना अन् मित्रमैत्रिणींना ही दिवाळी व येणारे नूतन वर्ष उत्साहाचे, चैतन्याचे जावो;** तुम्हा सर्वांच्या शरीराची सुदृढता व निरोगीपणा, मनाची प्रसन्नता व मोकळेपणा, बुद्धीची तीक्ष्णता व व्यापकता अन् भावनांची कोमलता व समतोल वाढविणारे जावो **यासाठी आम्हा सर्वांच्या खूप खूप शुभेच्छा!***

**सस्नेह तुमचा,**

**(महेन्द्र सेठिया)**

**या दीपावली विशेषांकासोबतची भेट (विज्ञान खेळणे) आपण घेतली ना!**
ही भेट ए.व्ही. भट हौसिंग कं. यांनी प्रायोजित केलेली आहे.
त्याच्या वापराबाबत अधिक तपशील पान १७ वर पाहा.

# अंतरंग

## कथा


- सायनॉस्पिफायर - मुकुंद जोगळेकर ७
- नंदूची पत्रे - हरिहर आठलेकर २५
- प्रभुराम एकटे नाहीत - म. वि. कोल्हटकर ४१
- शुद्ध सारंगाची किमया (चित्रकथा)
  कथा : निनाद बेडेकर, चित्र : चंद्रशेखर जोशी ५२
- एका कोळियाची कथा - लीला दीक्षित ७१
- कबुतरांचे जग - अनुराधा औरंगाबादकर ८७
- तात्पर्य कथा - बाळ गाडगीळ १०७
- डमी - अश्विनी धोंगडे १२३
- रूपक कथा - मल्हार अरणकल्ले १३७
- मुका मंदार - शैलजा राजे १४१
- प्रतिघटना - संजय ढोले १६३


## कविता


- ते मोराचे पीस निळे - अरुणा ढेरे ९९
- पर्व ये नवे - शांता ज. शेळके
- शब्द जपावे - कल्याण इनामदार १००
- आम्ही - गंगाधर महाम्बरे
- पाखरांची चिवचिव ! - वि. म. कुलकर्णी १०१
- जे जे करतो - दत्ता हलसगीकर
- काजव्यांच्या या प्रदेशी - राजलक्ष्मी देशपांडे १०२
- अभ्राप - सुहासिनी देशपांडे
- निसर्गगीत - दासू वैद्य १०३
- दीपदेवते - संजीवनी मराठे
- नव दीपावली - रवींद्र भट १०४
- देश माझा - किशोर पाठक
- आनंदाच्या रंगीत डोही - प्रवीण दवणे १०५


## ज्ञान-विज्ञान


- नवे ग्रह नव्या ग्रहमाला - जयंत नारळीकर १५
- जिम्नॅस्टिक्स : खेळांची जननी - मोरेश्वर गुर्जर ३१
- गुंतवणुकीचा श्रीगणेशा - वसंत पटवर्धन ४७
- फुलांची भाषा - कांचनगंगा गंधे १११
- भूतकाळाचा आरसा - प्र. के. घाणेकर १३३
- चांदोबा भागलास तर? - प्रकाश तुपे १३९


## विशेष लेख


- आपण सूर्यफूल व्हावं ! - व. दि. कुलकर्णी ३
- मी असा घडलो ! - विविध क्षेत्रातील, उत्तुंग यश मिळविणाऱ्या, ख्यातनाम व्यक्तींच्या जडणघडणीचा आलेख - त्यांच्याच शब्दात!
  नारायण सुर्वे, रोहिणी भाटे, निळू फुले, भय्यासाहेब ओंकार, चंदू बोर्डे, अशोक वागळे, विश्वास कचरे, राम डिंबळे ५७
- हे मैत्र जीवाचे - आनंद नाडकर्णी १४५
- जीवनाची ओढ असणारा यात्रेकरू- आचार्य अत्रे शैलजा देशमुख १५३


## ललित


- डोनाल्ड डकचा उसना आवाज - विजय देवधर १९
- लिहिण्याला पर्याय नाही - मंगला गोडबोले ३७
- वाचलेच पाहिजे
  'बोक्या सातबंडे'-वर्षा कुलकर्णी ४५
- मोरगिरीचा शोध - आनंद पाळंदे ९१
- लुई अगासी - वीणा गवाणकर ११७
- आणि मी लेखक झालो - मधु मंगेश कर्णिक १२९


## कृति-कौशल्य



- घरच्या घरी आकाशकंदील - द. वि. नवाथे ११
- जरा डोके चालवा - वा. ना. दांडेकर १३
- घर्षणविरहित चकती - विज्ञान प्रयोग १७
- करून तर पाहा - रेखा जोशी ५१
- कोड्यांच्या अंतरंगात - सुरेश करंदीकर ८१
- गुरुत्वाकर्षणाचा स्थिरांक - सौ. के. देसाई ८३
- आकर्षक शुभेच्छापत्रे - नीला कवडे ९५
- जुन्यातून नवे- विद्या नारळकर १५०
- रंगमंचीय खेळ - देवदत्त पाठक १५१


## स्फुट


- विनोद, शब्दकोडे, सेल्युलरचे कार्य, नवीन खेळ खेळू या, चित्रकोडे, गुप्तनिधी कलश, प्रथमोपचार, जरा विचार करा, इ.


(जागेअभावी, डॉ. ऋजुता विनोद, विवेक घळसासी, हेमंत टाकळकर, सुभाष देशपांडे, मधुकर गोगटे, रवींद्र पिंगे इ. चे साहित्य यांचे लेख या अंकात छापू शकलो नाही, त्याबद्दल क्षमस्व! ते साहित्य पुढील अंकांमध्ये येईल.)

**‘तमसो मा ज्योतिर्गमय’ हा आपल्या पूर्वजांनी दिलेला मंत्र! त्या मंत्राची उजळणी करत, तेजाची आरती करत जगणं म्हणजे ‘सूर्यफूल’ होणं. – डॉ. व. दि. कुलकर्णी हे संतसाहित्याचे गाढे अभ्यासक आणि प्रसिद्ध समीक्षक. ज्ञानेश्वरांपासून ते कुसुमाग्रजापर्यंत अनेक प्रतिभावंत कवींनी या तेजाची पूजा कशी केली आहे याचं काव्यमय विवेचन करीत आपल्याला सूर्यफूल होण्याचा वसा ते देत आहेत.**



# आपण सूर्यफूल व्हावं!

डॉ. व. दि. कुलकर्णी

***झा**डीतूनी हे उडुनी प्रभाती*
*पक्षी कसे मंजुळ शब्द गाती ।*
*येईल आता उदया रवी तो*
*या कारणे मोद तयासी होतो ।।*

बालपणी पाठ्यपुस्तकातल्या पाठ केलेल्या कवितेचं हे पहिलं कडवं. ही कविता पाठ करावी लागली नाही; ती आपोआप पाठ झाली होती. ती सबंध कविता आम्हाला आवडायची. आनंदानं भरलेली ही कविता. हा आनंद कशाचा आहे? तर सूर्योदयाचा! प्रकाशाच्या पावलांची चाहूल लागताच पक्षी झाडीतून बाहेर पडतात आणि थव्याथव्यानं आकाशात भिरभिरू लागतात; गोड किलबिलाट सुरू होतो त्यांचा. मग झाडांना जाग येते. त्यांचे शेंडे सोनप्रकाशात न्हाऊन निघतात. तेवढ्यात घरं जागी होतात. घराघरांवर सोन्याच्या पताका झळकू लागतात. सर्व जग जागं होऊ लागतं अखेर सर्वात शेवटी जागा होतो माणूस. पुष्कळदा त्याला जागं करावं लागतं; त्याची झोप घालवावी लागते. माणूस जागा झाला तरी पाखरासारखा त्याला आनंद होतो का? झाडासारखं तो वस्त्र लपेटून घेतो का? माणूस आपला घरातच हालचाल करीत राहतो.

*वरी बिंब ते लाल आले विशाळ*
*जणू तापलेला दिसे लोहगोल*

असे उद्गार त्याच्या मुखातून बाहेर पडत नाहीत. एखादं कविहृदयच तेवढं पक्षी होऊन सूर्याचं स्तोत्र गाऊ लागतं.

तेजाची पूजा प्राचीन ऋषिमुनींनी केली, ज्ञानेश्वरादी संत कविश्रेष्ठांनी केली, केशवसुत–कुसुमाग्रजादी कविकुल–पुरुषांनी केली. तेज आणि सौंदर्य पाहून आनंदानं मोहरून जाणारं मन महान योग्याचं असतं; विश्वमानवाचं असतं! त्याचं घर आकाशाचं असतं आणि या आकाशाला प्रकाशाची दारं असतात!

ऋषिमुनीचं नातं सूर्याशी, सूर्यकुलाशी असतं! त्याचं नातं त्या ज्योतिर्मय चैतन्यरूपाशी असतं. आजचे आपले कविमुनिवर्य कुसुमाग्रज याचं नातं थेट सूर्यकुळाशीच आहे.

**“सूर्य लाडका माझा**
**लखलखणारा किरीट माझ्या**
**विश्वघराचा,**
**प्रकाशदाता, जीवनदाता,**
**चिर सांगाती या एकाकी**
**मुशाफिराचा!”**

ज्ञानेश्वरांनी ‘हे विश्वचि माझे घर’ असं म्हटलं आहे. विश्व हे त्यामुळं चैतन्याचं, त्या आदिशक्तीचं घर आहे. त्या विश्वघराचा निर्माता तो विश्वात्मक आदिपुरूष, त्याचा तेजस्वी, झळाळणारा असा मुकुट म्हणून कुसुमाग्रज सूर्याकडे पाहतात. मुकुट हे ऐश्वर्याचे प्रतीक आहे;ते सत्तेचं, अधिकाराचं, सामर्थ्याचं प्रतीक आहे.

**सूर्याच्या प्रखर प्रभेत न मुळी नक्षत्र नेत्रा दिसे । जाणे चित्त परंतु नित्य गगनी अस्तित्व त्याचे दिसे**

तसंच औदार्याचं, दातृत्वाचं, दयेचं-क्षमेचं प्रतीक आहे. ते सौदर्याचं मूर्तरूप आहे. सूर्य हा केवळ तेजोनिधी नाही,तो ‘ज्योतिषां ज्योति:’-सर्व ज्योतीची मूळ ज्योत आहे;तो ‘विश्वत:चक्षु’ म्हणजे विश्वाचा नेत्र आहे; सूर्य हे सर्व आहे शिवाय तो सुंदर आहे, उदार आहे.तो जीवनदाता आहे. तेजाची पूजा म्हणजे अशा शक्तीची आणि सद्‌गुणांची एकत्रित पूजा होय.

कुसुमाग्रज म्हणतात,

***‘‘रात्र मला ज्या तळ्यात टाकुन***
***नग्नपणाने निघून गेली***
***त्यातुन वरती,***
***तटावरी आणून तयाने***
***पुन्हा दिले मज दिगंत माझे,***
***माझी धरती!’’***

‘‘अंधाराच्या तळ्यात, तळ्यातल्या गाळात माणूस बुडून, रुतून पडलेला असतो, सूर्य त्याला वर काढतो, उघड्या प्रकाशात आणून सोडतो आणि मग त्या माणसाला हरवलेली पृथ्वी सापडते; दाही दिशा दिसू लागतात; क्षितिजाची अनंत वर्तुळकड दृष्टीच्या टप्प्यात येऊ लागते’’ सूर्य नवी दृष्टी देतो; दृष्टीला नवी शक्ती देतो; बुद्धीला तेजस्वी करतो; माणूस डबक्यातून बाहेर पडतो घराच्या भिंती ओलांडतो; जगाच्या सीमा ओलांडून विश्वव्यापक बनतो.सूर्य हे ज्ञान देतो. सूर्य हा ज्ञानाचा सर्वश्रेष्ठ दाता आहे. त्या ज्ञानसूर्याला आपण नित्य वंदन करतो, त्याची प्रार्थना करतो‘हे बुद्धीचं तेज मला दे’म्हणून त्याचं स्तवन करतो.‘गायत्री मंत्र हा काय आहे?

***‘ॐ भू: भुव:स्व:!***
***ॐ तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि।***
***धियो यो न: प्रचोदयात् !!’***

‘‘सूर्यदेवाचं जे सर्वश्रेष्ठ असं तेज आहे. त्या तेजाची आम्ही उपासना करतो आणि आमच्या बुद्धीला त्या सूर्यदेवानं सामर्थ्य द्यावं; सध्दर्माचरणाला प्रवृत्त करावं’’अशा आशयाची प्रार्थना आहे. उगवत्या सौम्य- सुंदर तेजोमंडळाला, मध्यान्हीच्या तळपत्या तेजोरूपाला आणि अस्तास चाललेल्या शांत-प्रसन्न प्रकाशबिंबाला केलेली ही प्रार्थना आहे.

***‘तमसो मा ज्योतिर्गमय’***

‘अंधारातून प्रकाशाकडे आम्हाला घेऊन चल’, ही सर्वधर्माची सर्वकालची अंतिम प्रार्थना आहे.

***'Lead, Kindly Light'***

ही सर्वधर्माची खरी आर्त आहे.’

***‘वेढून टाकता हे, औदास्य भोवताली***
***गृह दूर राहिलेले, घनघोर रात्र काळी***
***तेजोनिधे! दयाळा! दाखीव मार्ग माते***
***जावोत ना पदे ही, सोडून सत्पथाते.’***

हे प्रार्थनागीत नानांचे आहे. बालांचे आणि थोरांचे थोर वडिलधारे गोपीनाथ तळवलकर यांचे आहे. देशोदेशीचे धर्मदीप या तेजाची पखरण करीत आले आहेत.

हा तेजाचा विलास पाहायला कुठं लांब जावं लागत नाही. हे तेज, हा प्रकाश आपल्याभोवती पसरलेला असतो. प्रकाशाच्या दुनियेतच आपण राहात असतो. फुलं फुलतात ती या प्रकाशस्पर्शानं; ती लावण्य धारण करतात तेही या प्रकाशकान्तीनं. फुलाफुलावर प्रकाशाचा सुंदर विलास चालू असतो, आकाशात काळ्या मेघांच्या पडद्यावर प्रकाशाची सप्तरंगी कमान खुलत असते; आपण त्याला इंद्रधनुष्य म्हणतो. तिथे पांढरा प्रकाश सप्तरूपांतून प्रकटतो.अमावास्येच्या दाट काळोखातही तारकांची प्रकाशफुलं फुलतच राहतात. ‘घनतमी शुक्र राज्य करतो.’ प्रकाशाचा एक किरण अंधाराच्या अनंत राशीला भेदून जाऊ शकतो. विजेची रेषा किती बारीक आणि किती चंचल असते; पण ती सर्व आकाश-मंडळाला आणि पृथ्वीला दिपवून टाकते, प्रकाश हे सत्यस्वरूप आहे; अंधार हे असत्यस्वरूप आहे. अंधाराला स्वत:च अस्तित्व नाही. प्रकाशाचा अभाव म्हणजे अंधार. (अंधार ही प्रकाशाची सावली आहे, असं वाटलं तर म्हणावं; पण प्रकाशाला सावली असूच शकत नाही) प्रकाश हा सदैव प्रकाशरूपच असतो, सूर्य हा सदैव सूर्यच असतो;अंधार त्याला गिळू शकत नाही,(अंधार सूर्याला भेटूच शकत नाही) अंधार सूर्यापुढं क्षणभरही उभा राहू शकत नाही. सूर्याची आणि अंधाराची भेट कधीही होऊ शकत नाही. जिथं ज्ञान आहे,तिथं अज्ञानाला कणभरही जागा नसते. तेजाची उपासना ही विशुद्ध ज्ञानाची उपासना आहे. ऋषिमुनींनी उष:सूक्त गाइली; सूर्यसूक्तं गाइली;ती तेजाची प्राप्ती व्हावी यासाठी! प्रकाशपूजन हा आपल्या धर्मजीवनाचा प्राण आहे.

आपल्याला एकच सूर्य लाभला आहे. पण असे अनंत सूर्य अंतराळात आहेत.अनेक आकाशगंगा तेजोगोल आहेत. आपल्या विज्ञानकक्षेत येणारं विश्व आणि त्यापलीकडचं विश्व म्हणजे तेजाचा पूर्ण महासागर होय! विश्वात अंधार कमी आहे; प्रकाशच अधिक आहे. (‘तम अल्प, द्युतिबहु’ खरं तर,

तेजाशिवाय, प्रकाशाशिवाय दुसरं काही नाही. आपण आपल्या मनानं सुखाची दु:खाची; प्रकाशाची आणि अंधाराची निर्मिती करीत असतो. अंतरीची ज्ञानज्योत अखंड प्रकाशात राहिली म्हणजे सर्वत्र प्रकाश आणि आनंद भरून राहिल्याचा अनुभव येतो.

**'अंतरिचा ज्ञानदिवा मालवू नको रे।'**

असं संत सोहिरोबानाथ म्हणतात. हा मूळ दैवी प्रकाश पाहायचा असेल,तर आपली अहंभावाची मेणबत्ती विझविली पाहिजे. आपल्या अहंकाराची पणती जळत ठेवल्यानं आपण आपल्या पलीकडचं काही पाहू शकत नाही. 'मी' आणि 'माझं' यालाच आपण सर्वस्व अर्पण करतो. 'मी' म्हटलं की 'तू' येतोच. मग स्पर्धा, हेवा, मत्सर, स्वार्थ, लबाडी, भांडण खोटं-नाटं येतच. माणूस माणुसकीला मुकतो आणि पशुत्वाकडे ओढला जातो. म्हणून अहंतेचा दिवा मालविला पाहिजे आणि संतधर्माचा नंदादीप प्रज्ज्वलित केला पाहिजे.

***"The best way to see Divine Light is to put out thine own candle.'***

असं झालं म्हणजे आपल्या मनाची दारं उघडतात आणि दशदिशांतून प्रकाश आपल्या घरा-मनात प्रवेश करतो; भरून राहतो. दाही दिशांतून ऋषिमुनींनी प्रकाश आपल्यामध्ये घेतला आणि म्हणूनच त्यांची वाणी मंत्रवाणी झाली. त्यांची ऋग्वेदातली प्रार्थना पाहा-

'आ नो भद्रा: ऋतवो यन्तु विश्वत:'

***'Let noble thoughts come to us from every side.'***

ज्ञानप्रकाशाचा पूर सर्व बाजूंनी आत येऊ द्या; ज्ञानसागर अखंड भरलेला असू द्या.ज्ञानसागरात माणूस कधीही बुडत नाही; तो तरतो आणि तारतो.

हे 'ज्ञान म्हणजे मूळ तेजाचं, मूळ चैतन्याचं, मूळ आनंदतत्त्वाचं ज्ञान. यालाच 'आत्मबोध' म्हणतात. हा आत्मबोध झाल्यावर जगात भेदभाव राहात नाही. सर्वत्र समबुद्धी नांदते. आपल्या मनाच्या मळ्याला, बुद्धीच्या क्षेत्रात मर्यादा पडत नाहीत.

*''जिकडे जावे तिकडे*
*माझी भावंडे आहेत,*
*सर्वत्र खुणा माझ्या घरच्या*
*मजला दिसताहेत:*
*कोठेही जा- पायांखाली*
*तृणावृता भू दिसते;*
*कोठेही जा- डोईवरते*
*दिसते नीलांबर ते!*
*सावलीत गोजिरी मुले,*
*उन्हात दिसती गोड फुले,*
*बघता मन हर्षून डुले;*
*ती माझी मी त्यांचा*
*एक ओघ अम्हांतुनि वाहे''*

असा केशसुतांना साक्षात्कार होतो.'लहान- मोठं' 'जवळ-दूर', 'सज्जन दुर्जन' असा भेदभाव अंत:करणात उरत नाही.

*''सर्वच मोठे साधू- जवळ*
*त्या सकली मी भरूनी राहे''*


हा ज्ञानप्रत्यय त्यांना येतो. मनाची, बुद्धीची धारणा सर्व विश्वाचं मंगळ करणारी असते. यातून खऱ्या अर्थानं शांतीचं साम्राज्य प्रस्थापित होतं

अहंकाराचा अंधार नाहीसा झाला आणि आत्मबोधाचा प्रकाश मन-बुद्धी चित्तामध्ये पडला की, तो पुरूष सर्व विश्वाचा होतो;विश्व त्याचं होतं तिथं शत्रु- मित्र असा भेदभाव निर्माण होत नाही. घरातल्या लोकांना आपण उजेड द्यावा आणि बाहेरच्यांना अंधार पडावा असं दिव्यांच्या ज्योतीला कधी वाटतं का? ज्यानं झाड लावलं आणि पाणी घालून त्याला वाढवलं, त्याला जी सावली ते झाड देत असतं, तीच सावली कुऱ्हाडीनं त्यास पाडू लागलेल्या लाकूडतोड्यासही ते देतं. (तिथं शत्रू- मित्र हा फरक नाही.) उन्हाळा, पावसाळा, हिवाळा कोणताही ऋतू असो, आकाश हे स्वत: निर्लेप असतं. तसा पुरुष अखंड सात्त्विक साधुभावात असतो.

*हे विश्वचि माझे घर।*
*ऐसी मति जयाची स्थिर।*
*किंबहुना चराचर।*
*आपण जाला।।*

असा तो विश्वात्मक देव होतो, श्री ज्ञानेश्वर महाराजांनी अशा पुरुषाचं हृदय भरभरून वर्णन ज्ञानेश्वरीच्या बाराव्या अध्यायात केलं आहे.

आपण अखंड द्वैतभावात जगत असतो. सावलीचं सुख कळायला आपणास उन्हातून यावं लागतं, प्रकाश समजण्यासाठी अंधार आधी पाहावा लागतो. आपलं ज्ञान, आपले अनुभव



असे द्वंद्वसापेक्ष असतात. निखळ आनंद, निखळ प्रकाश आपणास अनुभवता येत नाही. आपण 'सबंध' सूर्य अनुभवतच नाही. तुकड्यातुकड्यांनी तो अनुभवतो. उन्हाचे कवडसे आपण मोजत नसतो; तो गोळा करून, एकत्र बांधून 'संपूर्ण' सुर्य अनुभवला असं कवडशांचं गाठोडं म्हणजे 'सूर्य' नव्हे.

''हजारो कवडसे पडले तरी आकाशातील ज्वलंत घटना अनोळखीच राहाते!''

असं कुसुमाग्रज सांगतात. मुळात माणसाचं नातं सूर्याशी आहे.

***''कोणाला शंका असेल***
***पण मला निश्चित माहीत आहे,***
***की माझे नाते***
***नऊ नक्षत्रांच्या मध्यावर***
***त्यांना आधार देत असलेल्या***
***त्या वैश्विक जाळाशी–***
***सूर्याशी आहे''***

असं बाहू उभारून कुसुम्राग्रज साऱ्या जगाला सांगत आहेत; पण ते विराट नातं आपण विसरतो आणि...

***''अमावस्या पीत बसलेल्या***
***विहिरीप्रमाणे,***
***उबवीत बसतो अंत:करणात***
***द्वेष– मत्सराच्या हिरव्या सर्पाची***
***चिकट लगदाळी.''***

म्हणून आपण 'आपण सूर्यपुत्र आहोत' हे अखंड मनात बाळगलं पाहिजे; म्हणजे अज्ञानाचा अंधार, दुरितांचं म्हणजे पापाचं तिमीर होऊन अंतर्यामी स्वधर्मसूर्याची पहाट होईल आणि जिवाचं परस्पर मैत्र घडेल. सूर्यास्त झाला म्हणजे सूर्य कायमचा नष्ट झाला असं नसतं तो अखंड प्रकाशमान असतो आपण मात्र अंधाराचे पुत्र होऊन आपले असलेले डोळे घालवून बसतो.आपण सदैव सूर्यमुखी असायला पाहिजे; म्हणजे सूर्यफुलासारखं सूर्याकडे सदैव तोंड करून, त्याला सतत पाहात, त्याचं तेज प्राशन करत, ते अंगांगात मुरवत राहिलं पाहिजे. दिवसभर असा सूर्य देहा–मनात मुरवून घेतला म्हणजे सूर्यास्ताचे चार किरण आपण खुडून घेतले व सांभाळले तरी पुरेसे आहेत. कुसुमाग्रज सांगतात, सूर्याचे ते चार किरण जरी प्रकाशझोत देणारे नसतील, दिवे प्रज्वलित करणारे नसतील, तरी

***''ते जागृत ठेवतील***
***उद्याचा सूर्योदय***
***तुझ्या आणि माझ्या***
***मनातला!''***

हा सूर्योदय अखंड जागता ठेवणं हा आपला परमधर्म आहे. ते मंगलाचं मंगल कर्म आहे. सूर्याशी द्रोह करणं हे महत्तम पातक आहे.सूर्यफूल होऊन सूर्याची उपासना करणं, याहून श्रेष्ठ अन्य धर्म नाही. आपण सूर्यसन्मुख असावं. 'तमसो मा ज्योतिर्गमय'या प्रार्थनेचं हे प्राणतत्त्व आहे.

●●●

**डॉ. व. दि. कुलकर्णी**
१७, महावीर अपार्टमेंट, रामबाग,
पौड रोड, कोथरूड, पुणे २

**उजेडाचा वसा**


**या**
**बसा**
**रडणं तर नेहमीचंच**
**पण थोडं तरी**
**हसा**
**काळोखाचं कीर्तन**
**थोडा वेळ विसरा**
**काळजामध्ये जपा**
**उजेडाचा वसा**
**तुमच्या–माझ्या जगण्याचा**
**परात्परस्वामी**
**त्या विश्वेश्वर सूर्याचा**
**आदेश आहे**
**असा !**

**– कुसुमाग्रज**

## काय करू इच्छिता?

| | | |
|---|---|---|
| बोलू इच्छिता | = | तर गोड बोला. |
| घेऊ इच्छिता | = | तर सद्गुण घ्या. |
| टाकू इच्छिता | = | तर दुर्गुण टाका. |
| मिळवू इच्छिता | = | तर यश मिळवा. |
| गिळू इच्छिता | = | तर क्रोध गिळा. |
| सोडू इच्छिता | = | तर दुर्व्यसने सोडा. |
| करू इच्छिता | = | तर खरे प्रेम करा. |

**– संग्राहक**
**नितिन जंगम, दापोली**



# ‘सायनॅस्पिफायर’

मुकुंद जोगळेकर

**सगळ्यांच्या परीक्षा नुकत्याच संपल्या असतील. परीक्षेचा अभ्यास करत असताना, पेपर सोडवत असताना आपली स्मरणशक्ती, आकलनशक्ती आणखी चांगली असती तर...! असे विचार वारंवार आपल्या मनात येत असतात. तेव्हा असंही वाटून जातं की आपली स्मरणशक्ती पट्कन वाढवून देणारं एखादं यंत्र असतं तर...!**
**आपल्या अजयला असंच एक यंत्र सापडलंय. मग वाढली का त्याची स्मरणशक्ती? चला वाचूया मुकुंद जोगळेकरांच्या ‘सायनॅस्पिफायर’ या कथेत.**

अजयने अनिच्छेनेच बुटाचे बंद बांधले. शाळेचं दप्तर पाठीवर चढवताना त्याने डाव्या हाताने कपाळावरचा घाम पुसला.

‘‘आई, मी आज शाळेत गेलो नाही तर चालेल?’’ आईकडे बघत मोठ्या कष्टाने मरगळलेल्या स्वरात त्याने विचारले.

अजयच्या आईचं त्याच्याकडे बऱ्याच वेळेपासून बारीक लक्ष होतं. तो कसल्यातरी दडपणाखाली असल्याचं तिला जाणवलं. कसली तरी भीती वाटत होती त्याला. त्याचा प्रश्न ऐकून ती लगबगीने त्याच्याजवळ गेली.

‘‘अजय, बेटा तुला काही होतंय का? तू आधीच का नाही सांगितलंस? सगळी तयारी केल्यावर आता एकदम जायचं नाही का म्हणतोयस?

तिने त्याच्या पाठीवरचं दप्तर काढलं. त्याला सोफ्यावर बसवत ती त्याच्या डोक्यावर हलकेच हात फिरवू लागली.

‘‘आई, प्लीज फक्त आजचा दिवस मी घरी अभ्यास करीन सगळा.’’ असे म्हणत अजय आईच्या कुशीत शिरला.

तिने काळजीने अजयच्या कोमेजलेल्या चेहेऱ्याकडे पाहिलं. अजयचा चेहरा घामाने थबथबलेला होता. त्याच्या अंगाला किंचित थरकाप सुटला होता. अलीकडे हे नेहेमीचंच झालं होतं.

अजय देशमुख हा मुळात हुशार, चुणचुणीत मुलगा. वर्गात तो नेहमी पहिल्या तीन नंबरात असे. गेल्या वर्षी

शाळा बदलल्यापासून मात्र त्याचं काहीतरी बिनसलं होतं. अजयचे वडील विश्वासराव देशमुख एका आंतरराष्ट्रीय ट्रॅव्हल कंपनीत अधिकारी होते. त्यांची दोन वर्षांकरिता कंपनीच्या लंडन येथील हेड ऑफिसमध्ये बदली झाली होती. लंडनला जाण्यापूर्वी मुंबईजवळच्या पनवेल येथील आपलं बिऱ्हाड बदलून मध्यमुंबईत एका उच्चभ्रू वस्तीत त्यांनी फ्लॅट घेतला होता. अजयच्या पुढच्या शिक्षणाच्या दृष्टीने या भागातील नावाजलेल्या शाळेची त्यांनी निवड केली होती. शिवाय देशमुखांच्या मेव्हण्याचं प्रशांत देवस्थळीचं सरकारी निवासस्थान या भागातच होतं. त्यामुळे दोन वर्षांकरता बायको आणि मुलाला एकटं सोडून जाताना देशमुखसाहेब निश्चिंत होते.

अजयचा हा आवडता आणि हुशार प्रशांतमामा भारत सरकारच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाच्या संगणक शाखेचा प्रमुख होता. मिसेस देशमुखांना या भावाचा मोठा आधार होता. नव्या जागेत बस्तान बसण्यात त्याची खूप मदत झाली होती.

अजयची नवी शाळा घरापासून जवळच होती; पण ही सगळी बदलाबदली झाल्यापासून अजयचं मात्र सगळं तंत्रच बिघडलं होतं. तो खूप अबोल आणि निरुत्साही झाला होता. त्याचा नेहमीचा हसरा-प्रसन्न चेहरा कसल्यातरी काळजीने काळवंडलेला असे. त्याच्या मनावर सतत कसलातरी ताण असल्याचं जाणवे. याबद्दल मिसेस देशमुख त्यांच्या भावाजवळ बोलल्या होत्या. सुरुवातीला वडील लांब गेल्यामुळे तो थोडा नाराज झाला असेल, म्हणून दोघांनीही त्याच्याकडे जरा दुर्लक्ष केलं होतं. पण आठवीच्या परीक्षेत अजयची झालेली घसरगुंडी पाहून त्यांना काळजी वाटू लागली होती. तेव्हा प्रशांतमामा एक दिवसाआड येऊन अजयशी गप्पा मारून जाऊ लागला. अजयशी बोलून, त्याच्या कलाकलाने घेऊन त्याची समस्या जाणून घ्यायचं त्यांनी ठरवलं होतं. म्हणूनच आज शाळेत जायचं नाही असं अजय म्हणाला, तेव्हा त्याच्या आईने पूर्वीप्रमाणे त्रागा केला नव्हता.

अजयची समस्या खरोखरच फार गंभीर होती. एका छोट्या गावातून या नव्या जागी, वेगळ्या वातावरणात, नव्या शाळेत आल्यापासून त्याचं बालपणचं भावविश्वच बदलून गेलं होतं. गावच्या शाळेत एक हुषार विद्यार्थी म्हणून त्याचं खूप कौतुक होत असे. मित्रमंडळीतही तो सगळ्यांचा आवडता होता. मित्रांच्या कंपूचं नेतेपण नेहमी त्याच्याकडे असे.

अजयला वाचनाची फार आवड होती. परीकथा, राजपुत्र, राक्षस, जादू, याबरोबरच साहसकथा, प्रवासवर्णने, विज्ञानकथा अशांसाखा विविध विषयांवरील पुस्तकं वाचायला त्याला फार आवडे. वडील त्याला ती आणून देत.

बालवयसुलभ त्यालादेखील स्वप्नरंजनाची सवय होती. या स्वप्नांच्या विश्वात कधी तो एखादा राजपुत्र असे, तर कधी सागरसफरीला निघालेला खलाशी. कधी एखादा खगोलशास्त्रज्ञ बनून ग्रहताऱ्यांचा शोध लावण्यात तो मग्न होई, तर कधी अवकाशयानात बसून अज्ञात ग्रहांच्या सफरीवर निघालेला असे. प्रशांतमामा घरी आला की, त्याला अद्‌भुतरम्य गमतीशीर गोष्टी सांगून त्याच्या माहितीत भर घालत असे. आपले वडील म्हणजे एक सुपरमॅन असल्याचा त्याचा बालिश समज अजूनपर्यंत कायम होता. अजयच्या मते त्यांना काहीही अशक्य नव्हते. त्याच्या कल्पनाविश्वातसुद्धा त्याच्यावर काही संकटे आली तर त्याचे वडील त्यातून मार्ग काढत. त्याला वडिलांचा फार आधार वाटे.

बालपणीच्या अशा या मजेमजेच्या, सुरक्षित, स्वप्निल वातावरणातून कुमारवयात पदार्पण करताना अजयच्या बाबतीत झालेले बदल अगदी अचानक झाले होते.

अजयच्या स्वत:बद्दलच्या अवास्तव कल्पनांना नव्या जागेत, नव्या शाळेत आल्यापासून तडे जायला लागले. अभ्यासातदेखील एकापेक्षा एक हुशार मुलांशी स्पर्धा असल्याने त्याच्या हुशारीचं इथे कौतुक राहिलं नव्हतं. ही वस्तुस्थिती तो स्वीकारू शकला नाही. त्याच्या मनावर मोठा आघात झाला. त्यातून त्याची समजूत घालायला त्याचे वडीलही जवळ नव्हते. तो चिडचिडा झाला. त्याचं अभ्यासातलं लक्ष उडालं. सर्वांशी तो फटकून तुसडेपणाने वागू लागला. त्यामुळे चांगली मुलं त्याच्यापासून लांब राहू लागली. यात भर म्हणून तो आपल्या वागणुकीमुळे शाळेतल्या टवाळखोर कंपूच्या चेष्टेचा विषय बनला. आता तर रोज शाळेत जाणे हेच अजयसाठी मोठे संकट बनले होते. या सगळ्याचा परिणाम म्हणजे आठवीच्या परीक्षेत तो जेमतेम पास होऊ शकला. त्याच्या मनाची एकाग्रता आणि ग्रहणशक्ती कमालीची

क्षीण झाली होती. अनेकदा सांगूनदेखील त्याच्या काहीही लक्षात राहत नसे. या गोष्टीची अजयला कल्पना होती. त्याला खूप वाईट वाटत असे. काहीतरी घडावं, जादूची कांडी फिरावी आणि सगळं काही पूर्वीसारखं व्हावं असं त्याला फार वाटे; पण असं फक्त परीकथांमध्ये आणि विज्ञानकथांमध्येच घडू शकतं, हे त्याला ठाऊक होतं.

आतासुद्धा अयजला प्रशांतमामांनी पूर्वी सांगितलेली एक विज्ञानकथा आठवली. त्या गोष्टीत परग्रहावरील अतिप्रगत मानवांनी तयार केलेल्या सायनॅस्पिफायर नावाच्या एका यंत्राची गंमतजंमत होती. या यंत्राचा वापर करून कुणाचीही ग्रहणशक्ती आणि बुद्धिमत्ता कित्येक पटींनी वाढवता येऊ शके! गेले कित्येक दिवस त्या यंत्राचाच विचार अजयच्या डोक्यात घोळत होता. गेल्या आठवड्यात प्रशांतमामा आला असताना अजयने त्याला त्या यंत्राबद्दल विचारले होते. आता पुन: त्याने विचारले,

''मामा, मागे तू सांगितलेल्या गोष्टीतलं सायनॅस्पिफायर यंत्र खरंच असू शकेल का रे?''

''अजय, विज्ञानाला अशक्य असं काही नसतं. काही गोष्टी आज माहीत नसल्या तरी भविष्यात त्याची उकल झाल्यावर मोठे अद्‌भुत शोध लागू शकतात.'' उदाहरण म्हणून प्रशांतमामांनी त्याला ज्यूल व्हर्न नावाच्या विज्ञाकथा लेखकाच्या विज्ञानकथांबद्दल सांगितलं. शंभर वर्षांपूर्वी त्या लेखकाने मांडलेले काल्पनिक सिद्धांत आता प्रत्यक्षात आलेले दिसत होते.

'भविष्यात कोणी तसे यंत्र शोधून काढेलही कदाचित; पण तुला ते कशाला हवं आहे? तुला कोणावर त्याचे प्रयोग करायचेत का काय?'' प्रशांतमामाने त्याला हसतहसत विचारले होते.

आतासुद्धा आपल्या अभ्यासाच्या खोलीत बसला असताना अयजला त्या गोष्टीची आठवण झाली या खोलीतील पलंगावर लोळत व बाजूच्या खिडकीतून बाहेरच्या माडांच्या झावळ्यांमधून आकाशाकडे पहात असताना त्याच्या मनात त्या गोष्टीतल्या यंत्राचे विचार सुरू होते. खरंच, तसलं यंत्र आपल्याला मिळालं तर...?

एकाएकी त्याचं लक्ष आकाशात दिसणाऱ्या प्रकाशपुंजक्याकडे गेलं. प्रकाशाचा तो ठिपका हळूहळू मोठा होत होत जवळ आल्यासारखा भास होत होता. त्याला आश्‍चर्याचा धक्का बसला. त्या प्रखर प्रकाशाने त्याचे डोळे दिपून गेले. त्याने डोळे गच्च मिटून घेतले. त्याच्या डोळ्यासमोर काळोख पसरला. त्याची शुद्ध हरपली होती.

शुद्ध आली तेव्हा त्याला त्याच्याभोवती काही अनोळखी व्यक्तींचा गराडा पडलेला दिसला. एका प्रशस्त दालनात एका आरामदायी बिछान्यावर तो पडला होता. सभोवताली अनेक उपकरणे स्टँडवर ठेवलेली होती. दोघे तंत्रज्ञ त्या उपकरणांवरून कसल्याशा नोंदी घेत होते. वातावरणात कसलातरी उग्र दर्प भरून राहिला होता. त्या कक्षात झगझगीत प्रकाश पसरलेला होता. आजूबाजूला सगळं वातावरण, खाणाखुणा ओळखीच्या वाटत होत्या. मग एकदम अजयला आठवलं. हे सगळं हुबेहूब प्रशांतमामाने सांगितलेल्या



गोष्टीतल्यासारखं होतं. म्हणजे तो एखाद्या दूरच्या ग्रहावर होता की काय?

''होय मुला, तू टाग्लास्टिका नावाच्या एका प्रगत ग्रहावर आहेस.'' अजयच्या बिछान्यावर वाकून एक व्यक्ती बोलत होती, ''अंतरिक्षाचं रेडिओ स्कॅनिंग करत असताना तुझ्या मनात सुरू असलेले विचार आमच्या अत्यंत संवेदनशील अशा रेडिओग्राहकांनी टिपले. तू आमच्याविषयीच विचार करीत असल्याचे पाहून आम्हाला आश्चर्य वाटले. तुझी अडचण आमच्या लक्षात आली. तुला मदत करण्याचा निर्णय आमच्या वैज्ञानिक मंडळाने घेतला. मी या मंडळाचा प्रमुख आहे. हा आमच्यासाठीही एक नवा प्रयोग ठरेल. त्यासाठी आम्ही तुला हायपर स्पेस शटलमधून इथे आणलं आहे.''

''पण तुमचे रेडिओग्राहक माझे विचार कसे टिपू शकले? शिवाय तुम्हीसुद्धा माझ्या मनातलं कसं ओळखलंत? आणि तुम्ही माझी भाषा कशीकाय बोलू शकता?'' अजयने प्रमुखाला विचारले.

''हुशार आहेस तू!'' तो प्रमुख हसून म्हणाला, ''ही त्या सायनॅस्पिफायरचीच किमया. या उपकरणाच्या वापरामुळे मेंदूची ग्रहणशक्ती आणि आकलनशक्ती लाखो पटींनी वाढवता येते, हे तुला ठाऊक आहेच. मात्र ही क्रिया अत्यंत गुंतागुंतीची असते. मानवी मेंदू आणि मज्जासंस्थांचे जाळे हे न्यूरोप्रोटीन पदार्थांपासून बनलेले असते. या पदार्थांच्या असंख्य रेणूंमार्फत एखादा संदेश विद्युतपल्सेसद्वारा वाहून मेंदूपर्यंत पोहोचविला जातो. तो संदेश ग्रहण केल्यानंतर मेंदूकडून त्यावरची प्रतिक्रिया अशाच विद्युत्पल्सेसद्वारे प्रक्षेपित केली जाते. हे होत असताना मज्जापेशींमध्ये काही अडथळे निर्माण होतात. यामुळे एखादा संदेश मेंदूपर्यंत पोहोचण्यात अडचण येते आणि त्याची परिणामकारकता कमी होते. तसेच मेंदूची संदेशवहनाची क्षमतादेखील क्षीण होते. यामुळेच मेंदूची ग्रहणशक्ती व आकलनशक्ती कमी होत असते. आमच्या या उपकरणामुळे मज्जापेशींमधील अडथळ्यांवर मात करता येते आणि मूळ संदेश संपूर्णपणे आणि सुरळीतपणे मेंदूपर्यंत पोचू शकतो. मेंदूची त्या संदेशाबद्दलची प्रतिक्रियादेखील अचूक व परिणामकारक असते.'' मध्ये थोडा वेळ थांबून अजयकडे पाहात तो प्रमुख पुन्हा बोलू लागला, ''हे सगळं तुला जरा किचकट वाटेल; पण थोडक्यात सांगायचं म्हणजे, या यंत्राने मेंदू घासून-पुसून स्वच्छ आणि तल्लख होतो असं आपण म्हणूया. या यंत्राचा टोकाचा परिणाम म्हणजे समोरच्या व्यक्तीच्या विचारलहरीदेखील मेंदूला जाणवतात. यामुळेच दुसऱ्याच्या मनातले विचार ओळखता येतात.

तुझ्या मनातले विचार आमच्या रेडिओग्राहकांनी कसे ओळखले याचं हे उत्तर आहे. आमच्या रोबोटिक्स विभागामध्ये आम्ही काही पॉझिट्रॉनिक मेंदूंची निर्मिती केली आहे. हे मेंदू मुळातच शंभर टक्के सक्षम असतात. त्यांच्यात विचारलहरी ग्रहण करण्याची क्षमता असते. हे पॉझिट्रॉनिक मेंदू आमच्या रेडिओयंत्रणेशी जोडून त्यांच्याद्वारे आम्ही हव्या त्या व्यक्तीवर रेडिओलहरी केंद्रित करून त्याचे विचार जाणू शकतो. या यंत्रणेमुळे आम्हाला तुझेही विचार कळू शकले.

''भाषेचं म्हणशील तर ते अगदी सोपं आहे. आम्ही आमच्याच भाषेत बोलतोय पण आमच्या बहुभाषी संगणक यंत्रणेमुळे ते तुझ्या भाषेत तुझ्यापर्यंत पोचविले जात आहेत. असो. आम्ही घेतलेल्या निर्णयाप्रमाणे या उपकरणाचा वापर आम्ही तुझ्यासाठी करणार आहोत. यामुळे तुझ्या सगळ्या समस्या, अडचणी नाहीशा होतील.''

''मी पण दुसऱ्यांच्या मनातले विचार ओळखू शकेन?'' अजयने उत्सुकतेनी विचारलं.

''नाही बेटा; आम्ही तेवढ्या मात्रेचा वापर तुझ्यावर करणार नाही. कारण ते धोक्याचं ठरू शकतं. तुझ्यावर आम्ही अतिशय प्राथमिक प्रयोग करणार आहोत. यामुळे तुझी ग्रहणशक्ती आणि आकलनशक्ती फक्त वाढेल, त्याचा उपयोग तुझी स्मरणशक्ती वाढविण्यासाठी तुला होऊ शकेल. तू तयार आहेस ना?''

''होय, माझी तयारी आहेच!'' अजय मान डोलावून म्हणाला.


त्या प्रमुखाचं आणि अजयचं बोलणं सुरू असताना त्या कक्षातले तंत्रज्ञ प्रयोगाची तयारी करीत होते. एका मदतनिसाने ट्रॉलीवर ठेवलेले ते उपकरण अजयच्या बिछान्याजवळ आणले. गोष्टीत वर्णन केल्यासारखेच ते दिसत होते. अत्यंत गुंतागुंतीची रचना असलेल्या त्या उपकरणाला हेल्मेटसारखी चकचकीत धातूची एक टोपी केबल्सने जोडलेली होती. केबल्सची दुसरी टोके यंत्राच्या प्रोसेसिंग युनिटला जोडलेली होती.

सगळी तयारी पूर्ण झाल्यानंतर तो प्रमुख पुन्हा अजयजवळ आला.

(पान ९६ वर पुढे चालू)

# घरच्याघरी आकाशकंदील

डॉ. द. वि. नवाथे



दीपावली म्हणजे दीपोत्सव! असा हा सर्व वातावरण मंगलमय करणारा दीपोत्सव आता थोड्या अंतरावर आलेला आहे. घरात फराळाचे पदार्थ तयार होतील, रांगोळ्यानी घराची अंगणं सजतील! घरची छोटी मंडळी किल्ला करण्यात दंग होतील! मग आपल्याला वेध लागतात, नावीन्यपूर्ण आकाशकंदील तयार करण्याचे!

बाजारातील तयार आकाशकंदील आणण्यापेक्षा तो स्वत: तयार करण्यातील नवनिमिर्तीचा आनंद काही वेगळाच! कारण मरगळलेल्या मनात उत्साह, चैतन्य या आकाशकंदिलासारख्या सुबक कलाकृतीतूनच पेरले जाते; आत्मविश्वास वाढतो.

काही नवनवीन थर्मोकोलचे नक्षीकाम केलेले, शिंपल्याच्या किंवा शंखाच्या आकाराचे आकाशकंदील आपल्याला मोहवीत असतात. आपल्याला आवडलेल्या वस्तूंची किंमत नेहमीच महागडी असते; पण आपण जर आकाशकंदील घरीच करायचे ठरविले तर? अहो ते सहज शक्य असते! थोडेसे भूमितीबद्दलचे ज्ञान, एकाग्रता, आत्मविश्वास, अचूकता आणि बोटांचा हळुवारपणा हे गुण असले म्हणजे तुम्हाला पाहिजे तशी कलाकृती तुम्ही कागदातून तयार करू शकता.


आपण तयार केलेले असे हे देखणे आकाशकंदील घराच्या गच्चीवर, खिडक्यांमधून लावून दिवाळीतील दीपोत्सव साजरा करू शकू. दरवर्षीप्रमाणे मग यावर्षी षट्कोन व चौरस या तुम्हाला माहीत असलेल्या भौमितिक आकारांच्या साहाय्याने आकाशकंदील तयार करणार ना? मग लागा कामाला!

**साहित्य :** चांगला पांढरा कार्डशीट (मोठा), भूमितीची साधने, कात्री डिंक, फेव्हिकॉल इ.

**कृति :** ७ सें.मी त्रिज्या घेऊन एक वर्तुळ काढा व त्याच त्रिज्येने परिघाचे सहा सारखे भाग करून षट्कोन पूर्ण करा. षट्कोनाच्या खालच्या अंगातल्या दोन बिंदूंवरून त्याच त्रिज्येने एक केंद्रबिंदू काढून घ्या व त्या केंद्राचे साहाय्याने दुसरे वर्तुळ काढा. हे नवे वर्तुळ जुन्या वर्तुळाला दोन ठिकाणी छेदेल. त्यांना जोडणारी रेषा ही सामाईक बाजू होईल अशा पद्धतीने दुसरा षटकोन पूर्ण करा. दोन षटकोनाचा एक संच असे चार संच करा. षटकोनांच्या सर्व रेषांवर कर्कटक फिरवून त्या दुमडून घ्या.

उरलेल्या कागदावर ७ सेंमी. लांबीरुंदीचे ६ चौरस काढा.

चिकटवण्याची पद्धत: आकृतीतील




१-४ ह्या रेषेवर षटकोन किंचित वाकवा. २-७ व ५-८ ह्या बाजूंना शेजारील षट्कोन चिकटवा. तसेच शेजारच्या षट्कोनांच्या खालच्या बाजू खाली चिकटवा. १-२, १-३ व ४-६ ह्या चौरस चिकटावायचे आहेत. असे एकानंतर एक षटकोन चिकटवून घ्या व नंतर चार चौरसही त्यांच्या जागेवर चिकटवा. ७-८ रेषांच्या चौकोनावर जाड पुठ्ठा चिकटवून त्यात मध्यभागी आत इलेक्ट्रिकचा दिवा सोडता येण्यासाठी मोठे भोक ठेवा. तळाच्या रिकाम्या चौकोनाला रंगीत झिरमिळ्या चिकटवा.

षट्कोनात व चौकोनात आपल्या मर्जीनुसार नक्षी काढून ती कोरून काढा व आतल्या बाजूने पांढरा वा रंगीत कागद चिकटवा. हे कातरकाम व नक्षी षट्कोन चिकटवण्यापूर्वी करायला हवे, हे पक्के लक्षात असू द्या. •••



**डॉ. द. वि. नवाथे**
'अश्विनी' अपार्टमेंट, हॅपी कॉलनी
कोथरूड पुणे ४११०२९

*प्रबोधनच्या दिवाळी अंकासाठी अमेरिकेतून आलेली मेवामिठाई*

# जरा डोके चालवा!

**डॉ. वा. ना. दाण्डेकर**


## मेंदूला झिणझिण्या!




एका क्रिकेट क्लबमध्ये १८९ सदस्य आहेत. तीन वर्षांपेक्षा कमी काळ असलेले ८ सदस्य आहेत. ११ सदस्य वीस वर्षांपेक्षा लहान आहेत. ७० जण चष्मा वापरतात. १४० सदस्य पुरूष आहेत, तर...

'जे तीन वर्षांपेक्षा जास्त काळ सदस्य आहेत, ज्याचे किमान वय २० आहे, जे चष्मा वापरतात असे किमान किती पुरूष क्लबमध्ये असले पाहिजेत?

## धोंडिबा की कोंडिबा?






एका रस्त्याच्या दोन्ही बाजूला समान झाडे आहेत. धोंडिबा आणि कोंडिबा यांनी रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या झाडांच्या फांद्या तोडण्याचे काम स्वीकारले. उजव्या बाजूला फांद्या तोडण्याचे काम धोंडिबाने सुरू केले. तीन झाडांच्या फांद्या तोडून झाल्यावर कोंडिबा आला. धोंडिबाने कोंडिबाला उजव्या बाजूच्या फांद्या तोडण्याचे काम सांगितले व स्वत: डाव्या बाजूला फांद्या तोडण्याचे काम करू लागला.

कोंडिबाने काम संपल्यावर तो रस्त्याच्या दुसऱ्या बाजूस येऊन धोंडिबाला मदत करू लागला. कोंडिबाने ६ झाडांच्या फांद्या तोडल्या, तेव्हा सर्व काम संपले

तर मित्रांनो सांगा पाहू,कोणी जास्त झाडे तोडली व किती?


## घनाच्या विरुद्ध बाजू ओळखा!



अ) एक घन आकाराचा पुठ्ठ्याचा खोका आहे.

त्याच्या कडा कापून सोबतच्या आकृतीत ते उलगडून दाखविले आहे.

या पुठ्ठ्याच्या योग्य कडांवर घड्या घालून एक घन तयार करा व पुढील प्रश्नांची उत्तरे द्या.





१) क्र.१- या पृष्ठभागाच्या विरुद्ध पृष्ठभाग कोणता येईल?


२) क्र २- या पृष्ठभागाच्या विरुद्ध कोणता पृष्ठभाग येईल?

३) क्र.५-या पृष्ठभागाच्या विरुद्ध पृष्ठभाग येईल?


ब) खालील प, फ, आणि ब पैकी कोणत्या आकृत्यांवरून घड्या घालून घन करता येईल? कोणते पृष्ठभाग एकमेकाविरुद्ध असतील?



(प)



(फ)



(ब)

## खुनी कोण?




एका खुनाच्या बाबतीत काळू,बाळू, दारा व झिया या चौघांना पकडण्यात येऊन त्याची जबानी घेण्यात आली. 'कोणी खून केला?' असे विचारल्यानंतर प्रत्येकाने पुढील उत्तर दिले–

काळू : 'बाळूने खून केला'.
बाळू: 'दाराने खून केला'
झिया: 'मी खून केला नाही.'
दारा: 'बाळू खोटं सांगत आहे.'

या चौघांपैकी फक्त एक खरं सांगत आहे, तर खून कोणी केला? कोणाचे विधान खरे आहे?

## गोविंदाप्पाच्या घराचा क्रमांक कोणता?



गणाधीशचा मित्र गोविंदप्पा एक नवीन वसाहतीत राहायला गेला.तेथील घरे एका रस्त्याच्या दुतर्फा असून एका बाजूला घरांचे क्रमांक १ ते ४१ व दुसऱ्या बाजूचे क्रमांक ४२ ते ८१ असे होते. तुझ्या घराचा क्रमांक कोणता असे गोविंदाप्पाला विचारले असता त्याने गणाधीशला फक्त तीन प्रश्न विचारण्यास सांगितले. प्रत्येक उत्तर 'होय किंवा नाही' असे दिले जाईल. या तीन प्रश्नांच्या साहाय्याने घराचा क्रमांक निश्चित ठरवायचा आहे. प्रश्न असे आहेत:

१) घराचा क्रमांक ४१ पेक्षा लहान आहे ना?
२) घरक्रमांकाला ४ ने नि:शेष भाग जातो का?
३) हा घरक्रमांक पूर्ण वर्गसंख्या आहे का?

गणाधीशने अचूक उत्तर सांगितले. तुम्हाला जमते का ते पाहा बरे!

## गाळलेली संख्या ओळखा !

**अ, ब, क** या तीन वर्तुळात काही विशिष्ट सूत्रानुसार संख्या लिहिल्या आहेत ते सूत्र ओळखून प्रश्नचिन्हाच्या जागी कोणते चिन्ह येईल ते ओळखा. *(उत्तरे या अंकात इतरत्र)*




•••

**डॉ. वा. ना.दांडेकर**
३१/२ रोंलिंग ग्रीन सी अर्डरॉंचेस्टर हिल्स, MI– ४८३०९ अमेरिका




**आकाशातल्या ग्रहांबद्दल आपल्या मनात नेहमीच कुतूहल असते. हे ग्रह, तारे कसे निर्माण झाले? त्यांचा शोध कसा लागला? ग्रहमालेची निमिर्ती कशी झाली? असे प्रश्न तर आपल्याला पडतच असतात. नवीन ग्रहांचा शोध कसा घेतला जातो? त्याची गती, त्याची स्थिती कशी ठरविली जाते हेही आपल्या औत्सुक्याचे विषय आहेत. प्रसिद्ध शास्त्रज्ञ डॉ.जयंत नारळीकर यांच्या लेखातून आपण आपल्या प्रश्नांची उत्तरे शोधुयात.**

**पृ**थ्वीसकट आपल्या सूर्यमालेत एकूण नऊ ग्रह आहेत.. निदान आजवर तरी नऊ ग्रहच माहीत आहेत.काही पाठ्यपुस्तकांत दहाव्या ग्रहाचा उल्लेख असतो तो चुकीचा आहे. दहावा ग्रह असू शकेल; पण अद्याप तो सापडलेला नाही... दहाच काय, आणखी काही ग्रहांचे अस्तित्वही नाकारता येणार नाही; पण आजवर ज्यांच्याबद्दल आपण खात्रीपूर्वक बोलू शकतो असे नऊ ग्रह आहेत.

बुध, शुक्र, पृथ्वी, मंगळ, गुरू, शनी, युरेनस, नेपच्युन, प्लूटो.

त्यापैकी पहिले सहा पुराणकाळापासून माहीत होते. युरेनसचा शोध १७८१ साली, नेपच्युन शोध १८४६ साली तर प्लूटोचा शोध १८३० साली लागला. ह्या शतकात भारतात व्यंकटेश बापूजी केतकर यांनी १९११ मध्ये जवळजवळ प्लूटोच्याच कक्षेत नवव्या ग्रहाची कल्पना मांडली होती. दहाव्या ग्रहाचेही त्यांनी भाकित केले होते. दहावा ग्रह सापडणे किती सोपे/ अवघड आहे? आपण थोडा विचार करून पाहू आणि मग वेगळ्याच ताऱ्यांभोवती फिरणाऱ्या नव्या ग्रहमाला सापडण्याची संभाव्यता विचारात घेऊ.

पृथ्वी सूर्याभोवती एक चक्कर मारायला एक वर्ष घेते. सर्वात लांबचा ज्ञात ग्रह प्लूटो एक चक्कर मारायला २४८ वर्षे घेतो. केप्लर नावाच्या शास्त्रज्ञाने ग्रहांच्या गतीचे दीर्घ अवलोकन करून त्यामागचे सूत्र शोधून काढले होते. त्याचे स्वरूप असे आहे. ग्रहाच्या सूर्यापासूनच्या अंतराच्या घनाला आवर्तकालाच्या वर्गाने भागले तर सर्व ग्रहांच्या बाबतीत तेच उत्तर येते.प्लूटो-सूर्य अंतर पृथ्वी- सूर्य अंतराच्या सुमारे चाळीसपट धरून हा नियम प्लूटो आणि पृथ्वी यांना लावून पहा! जरी ह्या कक्षा दीर्घवर्तुळाकृती असल्या तरी वर्तुळाकृती असल्याने आपण एक वर्तुळ डोळ्यापुढे ठेवून एक लहानसे गणित मांडू. पृथ्वी वर्षभरात सूर्याभोवती ३६० अंशाच्या कोन काढते. वर्षाचे ३६५ ऐवजी ३६० दिवस घेतले तर एका दिवसात पृथ्वी केवळ (किंचित् कमीच!) एक अंश फिरते. प्लूटोचा आवर्तनकाल २४७. ७ वर्षांचा असल्याने त्याच्या बाबतीत हा फिरण्याचा वेग दर दिवशी सुमारे ०.००४ अंश इतकाच असणार. सूर्य आणि पृथ्वी दोहोपासून पुष्कळ लांब असल्याने पृथ्वीवरून पाहणाऱ्याला देखील एका रात्रीत प्लूटो दिशा ०.००४ अंशांनी बदलेली दिसेल.

नवा ग्रह शोधायला ही पद्धत वापरली जाते. ताऱ्यांच्या पार्श्वभूमीवर एखाद्या तारकेची दिशा बदलताना दिसली तर ती तारका तारा नसून ग्रह, धूमकेतू किंवा लघुग्रह असण्याची शक्यता असते.अर्थात् दिशाबदलाचे परिणाम किती सूक्ष्म असते हे प्लूटोच्या वरील उदाहरणातून दिसते आणि जर नवा ग्रह प्लूटोपेक्षाही लांब असेल तर त्याच्या दिशेतील बदल त्यापेक्षाही सूक्ष्म असणार आणि म्हणून शोधायला अवघड!

शिवाय ग्रह जितका सूर्यापासून लांब तितका तो अधिक मंद प्रकाशणार आणि म्हणूनही शोधायला कठीण.

इतके करूनही जर एखादी तारका ग्रह असल्याची शंका आली,तर खगोल निरीक्षकांना तिचे अवलोकन कित्येक वर्षे करावे लागेल.कारण दूरच्या ग्रहाची कक्षा ठरवायला ही निरीक्षणे आवश्यक असतात.

म्हणून सूर्यमालेत नवा ग्रह-ग्रह नंबर १०-निश्चित व्हायला ही सर्व पद्धत वापरली जाते आणि अजून अशा ग्रहाचे

अस्तित्व सिद्ध झालेले नाही.

इतर ताऱ्यांभोवती ग्रहमाला आहेत का? जर खुद्द आपल्या सूर्याचेच लांबीचे ग्रह इतके मंद दिसतात तर अनेक प्रकाशवर्षं दूर असलेल्या ग्रहमाला दिसणार तरी कशा?

असल्या तरी त्या दिसणार नाहीत! तरी पण त्यांचे अस्तित्व सिद्ध करता येते. त्यामागचे रहस्य असे आहे–

जेव्हा सूर्याभोवती बुध ग्रह फिरताना आपण पाहतो तेव्हा त्यामागची कारणमीमांसा अशी करतो– सूर्याच्या आकर्षणामुळे बुध ग्रह त्याच्याभोवती चकरा मारतो. न्यूटनच्या गतीच्या तिसऱ्या नियमानुसार सूर्याच्या बुधावरील गुरुत्वाकर्षणाच्या बळाइतकेच एक–पण विरुद्ध दिशेला–बुधाचे गुरुत्वाकर्षण सूर्याला खेचते; पण सूर्य जागचा हलत नाही–कारण त्याचे मोठे वस्तुमान आणि तुलनेने बुधाचे अत्यल्प वस्तुमान.

पण बुधाऐवजी गुरुएवढा प्रचंड ग्रह तिथे असता तर सूर्याइतका नामानिराळा राहू शकला नसता. सूर्य जागच्या जागीच थोडाफार थरथरला असता. लांबच्या ताऱ्याचे असेच थरथरणे पाहून खगोलशास्त्रज्ञ अंदाज बांधू शकतात की, त्याच्याभोवती एखादा ग्रह असावा.

ह्या पद्धतीने १९९५ साली ५१–पेगसाय ह्या ताऱ्याचे असेच थरथरणे पाहून फ्रान्स येथील हॉयटे प्रोव्हॉन्स वेधशाळेतल्या मिशेल मेयॉर आणि दिदिये केलॉझ यांनी असा निष्कर्ष काढला की, ह्याच्याभोवती एक ग्रह फिरतो आहे. निरीक्षणे इतकी बिनचूक होती की, त्यांवर आधारलेल्या गणिताने ह्या ग्रहाचे वस्तुमान आणि त्याची कक्षा ठरवता आली. वस्तुमान आहे पृथ्वीच्या दीडशेपटीहून जास्त–म्हणजे गुरू ग्रहाच्या निम्म्याहून जास्त आणि हा ग्रह मूळ ताऱ्यापासून सूर्य–पृथ्वी अंतराच्या पाच टक्के अंतरावर फिरत आहेत. मूळ तारा बराचसा सूर्यासारखाच आहे व आपल्यापासून ४० प्रकाशवर्षं अंतरावर आहे.

अशा तऱ्हेने आपल्या सूर्यमालेची मक्तेदारी आता राहिलेली नाही!

वास्तविक १९९१ मध्ये पल्सार ताऱ्यांचा अभ्यास करताना जॉड्रेल बँक (इंग्लंड) येथील रेडिओ निरीक्षकांनी असाच निष्कर्ष काढला होता. त्यांना एक पल्सार असाच थरथरताना दिसला आणि त्यावरून त्याच्याशेजारी एक ग्रह असल्याचा दावा त्यांनी केला.

पल्सार हा अतिशय दाट घनतेचा 'न्यूट्रॉन तारा'असतो. अख्खा सूर्य सगळीकडून दाबून २०–२५ किलोमीटर व्यासात बसविला तर त्यांची घनता किती प्रचंड असेल? त्यावरून पल्सारची कल्पना येते. हा अतिवेगाने आसाभोवती फिरतो आणि एखाद्या दीपस्तंभातून प्रकाशझोत फिरतो तसेच पल्सारमधून रेडिओलहरींचे झोत अतिशय नियमितपणे येत असतात. ह्या नियमितपणातून पल्सारचे 'घड्याळ' चालवता येते आणि अशा घड्याळातून निरीक्षक मूळ पल्सारचा अभ्यास करतात.

अशा निरीक्षणांतून जॉड्रेल बँक खगोलनिरीक्षकांनी काढलेला निष्कर्ष मात्र अखेर चुकीचा ठरला! पल्सारचे थरथरणे हे वास्तविक आपण पृथ्वीवरून पल्सार पाहातो म्हणून दिसते. ह्या थरथरण्याचा आवर्तनकाळ वर्ष किंवा ६ महिने असतो. त्यांत ग्रह असण्या–नसण्याचा संबंध नाही.

परंतु १९९२ मध्ये अलेक्झांडर वोल्स्झान याने PSR1257+12 कॅटलॉग नंबरच्या पल्सारचा सखोल अभ्यास करून त्याभोवती दोन तरी ग्रह फिरतात हे सिद्ध केले. त्यातील एका ग्रहाचे वस्तुमान पृथ्वीच्या २.८ पट तर दुसऱ्याचे ३.४ पट. पहिल्याचा पल्सारभोवती फिरण्याचा आवर्तनकाळ ६६.६ दिवस, तर दुसऱ्याचा ९८.२ दिवस आहे.

नवी ग्रहमाला तयार होते ती मूळ ताऱ्याभोवती एक गोल चकती तयार होते त्यातून. ही चकती आणि मूळ तारा एका आकुंचन पावणाऱ्या वायुमेघातून तयार होतात. हा वायूमेघ आपल्या आसाभोवती गिरक्या घेत असताना स्वत:च्या गुरुत्वाकर्षणामुळे आकुंचित होत जातो मात्र गिरक्या घेताना अपकेंद्री बळामुळे आसाशी लंबवत दिशेने मेघाचा भाग पसरत जातो आणि त्यातून ग्रह तयार होतात.

काही नवीन तारे अशा चकत्यांसकट आढळले आहेत. १९८३ मध्ये अंतराळातून इन्फ्रारेड (अधोरक्त) किरणांद्वारे वेध घेणाऱ्या आयरॅस दुर्बिणीतून बीटा पिक्टॉरिस ताऱ्याभोवती अशी चकती सापडली होती. अशा उदाहरणांतून आता असे दिसून येते की, ताऱ्यांच्या निर्मितीबरोबर ग्रहमालांची निर्मितीदेखील होत असावी.

पण पल्सारभोवती ग्रह कसे तयार झाले? कारण खुद्द पल्सारचा जन्म ताऱ्याच्या स्फोटातून होतो. ताऱ्याच्या स्फोटात त्याचा बाहेरचा भाग अंतराळात भिरकावला जातो आणि उरतो तो अतिघन गाभा,जो पल्सारच्या रूपाने दिसतो.अशा ह्या स्फोटक स्थितीत पल्सार भोवती संथपणे फिरणारे ग्रह कसे अस्तित्वात आले?

हे एक न सुटलेले कोडे आहे.

•••

**डॉ. जयंत नारळीकर**
आयुका, पुणे विद्यापीठ आवार,
गणेश खिंड, पुणे ७.

# विज्ञान प्रयोग : घर्षणविरहित चकती

**– प्रा. महेन्द्र सेठिया**

या दीपावली विशेषांकासोबत तुम्हाला एका प्लास्टिकच्या पिशवीत एक चकती, एक छोटीशी नळी व एक फुगा दिला आहे. तो फुगा त्या छोट्या नळीवर बसवा. नळीची जाड कड फुग्याच्या आत जाईल असे पहा. म्हणजे फुगा फुगल्यावर फुगा निसटून बाहेर येणार नाही. नळी तोंडात धरून फुगा फुगवा आणि हवा सुटणार नाही अशा पद्धतीने धरून ठेवा. तुम्हाला दिलेली चकती कोणत्याही गुळगुळीत पृष्ठभागावर (काच, सन्मायका इ.) ठेवा व चकतीच्या बाहेर आलेल्या भागावर फुगा फुगवलेली नळी बसवा. (तोपर्यंत फुग्यातून हवा बाहेर पडणार नाही असे बघा.) आता फुग्यावरील हात सोडून द्या व चकतीला छोटीशी टिचकी मारा. काय घडले? फुगा न फुगवता नुसत्या चकतीला पूर्वीइतकीच हळू टिचकी मारा. काय फरक जाणवतो? असे का घडले? आहे की नाही गंमत?

तुम्ही नीट निरीक्षण केल्यास तुम्हास जाणवेल की या चकतीच्या मध्यभागी एक बारीकसे भोक आहे. फुग्यातील हवा या भोकातून बाहेर पडते. व ती प्लास्टिकच्या चकतीला थोडीशी वर उचलते. चकती व गुळगुळीत पृष्ठभाग यामध्ये एक हवेचा थर निर्माण होतो. त्यामुळे चकती व गुळगुळीत पृष्ठभाग यामधील घर्षण कमी होऊन चकती अगदी सहजगत्या पृष्ठभागावर पुढे सरकते. हॉवर क्राफ्ट मध्ये हेच तत्व वापरले आहे. हॉवर क्राफ्ट हे जमिनीवर अथवा पाण्यावर चालणारे पंखाशिवायचे विमान अथवा शिडाशिवायचे जहाज आहे. फुग्याऐवजी कॉम्प्रेसरच्या साहाय्याने हवेचा थर निर्माण करून असे त्यावरून हे हॉवर क्राफ्ट अत्यंत जलद वेगाने पुढे सरकते.

**तुम्ही या वैज्ञानिक खेळण्यावर खालील प्रकारे प्रयोग करून पाहा.**

१. या चकतीचे वजन वाढवले तर काय होईल? त्यासाठी पुठ्ठ्याच्या गोल चकत्या या चकतीवर ठेवत चला. त्याच्या नोंदी ठेवा. किती वजनापर्यंत चकती सहज हलू शकते? अधिक वजनदार चकतीसाठी फुग्याऐवजी काय वापरता येईल?


२. चकतीचा आकार गोलऐवजी दुसरा कुठला ठेवला तर... तुमच्याकडे गुळगुळीत सन्मायकाचे किंवा प्लास्टिकचे तुकडे असल्यास त्याचे वेगवेगळे आकार कापून घेऊन हे प्रयोग करून पाहा.

३. ही चकती पाण्यावर चालेल का?एखाद्या पसरट परातीत पाणी घेऊन त्यावर ही चकती फिरते का पाहा?

४. खडबडीत पृष्ठभागावर ही चकती फिरण्यासाठी काय करावे लागेल?

५. हे तत्त्व व्यवहारात कुठे उपयोगी पडू शकते व कोठे त्याच्या वापराने काम सोपे, कमी शक्तीमध्ये होईल?

**या तत्त्वाचा वापर करून व्यवहारात उपयोगी येईल अशा**



**गोष्टींची चल प्रतिकृती (Working model) तयार करा.**

**नावीन्यपूर्ण व कल्पक प्रतिकृतीला विशेष बक्षीस रू. १०००/–**

(यामध्ये क्रमांक काढले जाणार नसून विशेष गुणवत्तेच्या व कल्पक आविष्काराच्या प्रत्येक प्रतिकृतीस प्रत्येकी रू.१०००/– चे पारितोषिक दिले जाईल.)

ही प्रतिकृती करण्यासाठी कोणतीही (तंत्रकौशल्यासाठी)मदत घ्यायला हरकत नाही. आपण केलेल्या प्रतिकृतीचे सविस्तर वर्णन व आकृत्या, छायाचित्र, संपूर्ण पत्ता व शाळा, इयत्ता, तुकडी इ.सह १५ जानेवारी १९९८ पर्यंत पाठवा.

तुमच्या कल्पकतेला आणि प्रयोगशील वृत्तीला विशेष वाब आव्हान देणारी ही स्पर्धा व हा खेळ तुम्हाला नक्कीच कामाला लावेल असा विश्वास वाटतो

**जरा विचार करा**

१) लोहचुंबकाने लोखंडाचा कीस आकर्षित होतो. जड लोखंडी साहित्य उचलून भट्टीत टाकायचे झाले तर साधा लोहचुंबक चालेल का?
या भट्टीत लोखंड वितळले तर ते कसे बाहेर काढता येईल?



**चंद्र ज्योति ह्या नक्षत्रांचे उजळित फुलबाजे । किरण पैंजणे घुमवित नाचति नभांत ध्रुवराजे**

# डोनाल्ड डक्‌चा 'उसना आवाज'

*विजय वि. देवधर*



**आपल्याला कार्टून्स बघायला नेहमीच आवडतात. वॉल्ट डिस्नेची कार्टून फिल्म म्हणजे मेजवानीच! ही कार्टून्स लोकप्रिय होण्यामागे अनेकांचा हातभार लागलेला असतो. त्यात विविध तंत्रज्ञ, चित्रकार, दिग्दर्शक यांच्या बरोबरीने 'मिकी, डोनाल्ड' अशा अनेक व्यक्तिमत्वांचा आवाजही असतो.अशाच एका 'आवाजी' कलाकाराचा परिचय आपल्याला करून देत आहेत; विजय देवधर. 'डोनाल्ड' ला आपल्या दुसऱ्या आवाजाने बोलकं करणाऱ्या हरहुन्नरी कलाकाराचे नाव आहे – क्लॅरेन्स नॅश.**

वॉल्ट डिस्नेच्या कार्टून फिल्मस् (व्यंगचित्रपट) ज्यानं पाहिला नाही असा माणूस क्वचित कुठे आढळेल!मुलांनो!चित्रपटगृहात अथवा आपल्या घरातल्या दूरदर्शनसंचावर तुम्ही पण वॉल्ट डिस्नेची कार्टून्स बघितली असतील. त्यातला मिकी माऊस हा उंदीर आणि डोनाल्ड डक हे बदक तर तुमच्या चांगलंच परिचयाचं असणार. व्यंगपटातील या दोघांच्या गमतीजमती पाहून तुम्ही मनमुराद हसला असाल आणि तुमची भरपूर करमणूक झाली असेल.

त्यातल्या त्यात डोनाल्ड डक या बदकाची धमाल तुम्हाला विशेष आवडली असेल. चित्रपटाच्या किंवा दूरदर्शनच्या पडद्यावर वावरणारं धुमाकूळ घालणारं हे बदक चक्क माणसारखं बोलतं! या बदकाला डोनाल्ड डकला– माणसाचा उसना आवाज कुणी दिला आहे हे तुम्हाला ठाऊक आहे का छोट्या मित्रांनो? नाही ना? या लेखाच्या निमित्तानं या अफलातून माणसाची ओळख मी तुम्हाला करून देणार आहे.

वॉल्ट डिस्नेच्या मानस–व्यंग–पुत्राला डोनाल्ड डकला उसना आवाज देणाऱ्या या माणसाचं नाव आहे क्लॅरेन्स नॅश. या माणसाचं चरित्र मोठं चित्तवेधक नि उद्‌बोधक आहे. काही एक विशिष्ट ध्येय साध्य करायचं असलं की त्या व्यक्तीला मोठा संघर्ष करावा लागतो. पण ते ध्येय साध्य करण्याची जिद्द जर माणसाच्या अंगी असली तर तो ते साध्य केल्यावाचून राहात नाही. याचं मूर्तिमंत उदाहरण म्हणून क्लॅरेन्स नॅशकडे बोट दाखवता येईल.

या अजब माणसाचा जन्म अमेरिकेत आकाहोमामधे झाला. नॅशच्या घरची परिस्थिती अगदी बेताचीच होती. त्यामुळे त्याचं बालपण तसं कष्टातच गेलं; पण मुलगा मोठा समजूतदार होता. छोटी मोठी कामं करून तो आपल्या कुटुंबाला हातभार लावू लागला. छोटा नॅश स्वभावानं फार गमत्या होता. निरनिराळ्या प्राण्यांच्या नि पक्ष्यांच्या आवाजाची नक्कल तो अगदी हुबेहूब करत असे. ही कला निसर्गानं त्याला उपजतच बहाल केली होती. गाईच्या हंबरण्याचा आणि बोकडाच्या बें॒बें॒ ओरडण्याचा आवाज अगदी हुबेहुब काढून तो लोकांना चकित करीत असे. कुत्र्याचं भुंकणं, मांजरीची म्यॉंव म्यॉंव, घोड्याचं खिंकाळणं असे विविध आवाजही तो काढू लागला. प्राण्यांचे

आवाज काढण्याच्या त्याच्या छंदामुळे अगदी लहानपणापासूनच त्यानं लोकांचं लक्ष आपल्याकडे वेधून घेतलं.

किशोरावस्थेत पोहोचल्यानंतर क्लॅरेन्स वेगवेगळ्या पक्ष्यांचे आवाज काढू लागला. लहानपणी तो वेगवेगळ्या प्राण्याचे आवाज काढत असे; पण आता त्याला सर्वात जास्त आवडू लागलं ते पक्ष्यांच्या आवाजांची नक्कल करणं! स्टेजवर आपली ही कला प्रेक्षकांसमोर सादर करावी अशी एक तीव्र इच्छा क्लॅरेन्सच्या मनात अगदी लहानपणापासूनच रुजलेली होती, पण असा मिमिक्रीचा कार्यक्रम करणाऱ्याला तेव्हा विशेष महत्त्व दिलं जात नव्हतं; पण कला सादर करण्यासाठी व्यासपीठ मिळणं महत्त्वाचं होतं! म्हणून थोडा मोठा झाल्यानंतर व्यासपीठावर-स्टेजवर प्रवेश करता यावा याकरता तो मेंडोलीन हे तंतुवाद्य वाजवायला शिकला. त्यामुळे त्याला छोट्या मोठ्या ऑकेस्ट्रांमध्ये वादकाचं काम मिळू लागलं अशा ठिकाणी कार्यक्रमांच्या मध्यंतरात संधी मिळाली की तो आपली ''मिमिक्री'' सादर करत असे. त्याच्या या कार्यक्रमाला प्रेक्षक उत्स्फूर्तपणे दाद



देत! त्यामुळे क्लॅरेन्सचा उत्साह दुणावला. तसं त्याला गाण्याचंही अंग होतं. त्याचा आवाज गोड होता; पण निरनिराळ्या पक्ष्याचे आवाज हुबेहूब काढणं ही त्याची प्रमुख आवड होती. व्यासपीठावर वावरण्याचा थोडाबहुत अनुभव मिळाल्यानंतर आणि मोठ्या कार्यक्रमांमधे सहभाग घेण्याइतकी पुरेशी तयारी झाल्यावर क्लॅरेन्स शिकागोला गेला आणि तिथल्या ऑपेरांमधून आपली कला दाखविण्यासाठी धडपडू लागला. संधी मिळेल तेव्हा अशा कार्यक्रमांमध्ये भाग घेऊन आपले 'मिमिक्री' चे प्रयोग सादर करू लागला.

मेंडोलीन वाजविण्याव्यतिरिक्त क्लॅरेन्सनं काही विशिष्ट पक्ष्यांच्या ओरडण्याच्या खास लकबी आत्मसात केल्या. 'चक चक चक' प्यूऽऽ वुई ऽऽ,' 'टिव टाऽऽऊऽऽ', 'टिवऽऽ टिवऽऽ,' 'टिर्रऽऽटी-टिर्रऽऽटी' असे पक्ष्यांचे विविध कूजनध्वनी तो हुबेहूब काढू लागला. नाईटिंगेल पक्ष्यांची लकेर तर तो इतक्या सुरेलपणे घेत असे की, बाहेरच्या एखाद्या झाडावर खरोखरचा नाईटिंगेल पक्षी गातो आहे असं वाटावं! घुबड आणि तत्सम दिवाभीतांचे घूत्कार, लहानसहान पक्ष्याचं चिवचिवणं, बदकाचं 'क्वॅक... क्वॅक अशी अनेक पक्षी-स्वर-वैशिष्ट्यं आपल्या असामान्य स्वरयंत्रातून तो अगदी लीलया काढू लागला. पक्ष्यांचे आवाज काढण्यात त्यानं इतकं प्रावीण्य मिळवलं की, तो स्वत:ला 'शीळ घालणारा पक्षिमानव म्हणवून घेऊ लागला. परंतु त्याच्या या कलेला शिकागोमध्ये म्हणावा तसा प्रतिसाद मिळाला नाही. या कामात त्याला मिळणारा मोबदलाही कमी होता. केवळ पक्ष्यांचे आवाज काढण्याला असं कितीसं उत्पन्न मिळणार! दोन कार्यक्रमांच्यामध्ये मिळणाऱ्या थोड्याशा वेळात 'मिमिक्रीचे' प्रयोग सादर करणाऱ्या कलाकारांना त्यावेळी फारच अल्प वेतन मिळत असे. मिळणाऱ्या अपुऱ्या वेतनात क्लॅरेन्सचं भागेना! त्याची आर्थिक ओढाताण होऊ लागली. त्यामुळे शेवटी नाइलाजानं आपल्या या उद्योगाला रामराम ठोकून तो सॅनफ्रान्सिस्कोला परतला. तिथं एका टेलिग्राफ कंपनीत दुरुस्ती कामगार म्हणून त्याला नोकरी मिळाली. त्याच सुमारास त्याचं लग्नही झालं.

तोवर १९३० साल उजाडलं होतं त्यावर्षी जबरदस्त आर्थिक मंदी आली. अनेक कंपन्या तोटा होऊ लागल्यानं भराभर बंद पडल्या. कामगार-कपातीची कुऱ्हाड लोकांवर कोसळली. या अरिष्टाची झळ क्लॅरेन्स नॅशलाही लागली. ज्या टेलिग्राफ कंपनीत तो कामाला होता, त्या कंपनीनं आपले बरेचसे कामगार कमी केले. त्यात दुर्दैवानं क्लॅरेन्सला डच्चू बसला. बेकारीचं संकट कोसळलं. त्यात नवीन लग्नही झाल्यामुळे पत्नीची जबाबदारीही वाढलेली! त्यामुळे नोकरी सुटल्यावर आता उपजीविकेचं काय? हा प्रश्न आ वासून त्याच्यासमोर उभा राहिला. अखेरीस आपल्या नूतन पत्नीसमवेत- मागरिटसमवेत- त्यानं सॅनफ्रान्सिस्को सोडलं आणि आपलं नशीब आजमविण्यासाठी तो लॉसएंजल्समधे येऊन दाखल झाला.

माणूस प्रयत्नवादी असला तर एक दार बंद झालं, तर दुसरी शंभर दारं

उघडतात असं म्हणतात. क्लॅरेन्सच्या बाबतीत असंच झालं. लॉसएंजल्समधे त्याची मिमिक्रीची कला उपयोगाला आली ! 'ॲडोहर मिल्क कंपनी' या दूध आणि दुधाच्या इतर पदार्थांची विक्री करण्याला कंपनीत त्याला 'फिरता सेल्समन' म्हणून नोकरी मिळाली. त्या कंपनीनं 'ॲडोहर व्हिसलिंग बर्डमन' अशी त्याची जाहिरात केली आणि मग क्लॅरेन्स त्याच कंपनीची उत्पादनांची जाहिरात करत चौफेर फिरू लागला. दूध आणि दुधापासून तयार केलेले इतर पदार्थ विकण्याकरता मुलांच्या शाळा हे उत्तम क्षेत्र ठरू शकेल असा विचार त्यानं केला आणि मग लॉसएंजल्समधल्या निरनिराळ्या शाळांना धडाधड भेटी देण्याचा सपाटा त्यानं सुरू केला. तिथल्या बालप्रेक्षकांसमोर निरनिराळ्या पक्ष्यांचे नि प्राण्यांचे आवाज काढत, त्यांचं मनोरंजन करत- 'निरोगी शरीरस्वास्थ्यासाठी नि निकोप मनासाठी फक्त आमच्या ॲडोहर कंपनीचंच सकस दूध प्या!'-अशी आपल्या कंपनीची जाहिरात तो एकीकडे करू लागला. या कंपनीत कामाला लागल्यामुळे क्लॅरेन्सचा एक फायदा झाला! कंपनीच्या जाहिरातीच्या त्याच्या तंत्रामुळे तिच्या उत्पादनांची विक्री वाढली. त्यामुळे खूष होऊन कंपनीच्या मालकानं क्लॅरेन्सला आणि त्याच्या पत्नीला-मार्गारिटला-लागेल तितकं दूध, लोणी, क्रीम आणि अंडी मोफत द्यायची सवलत दिली. हा एक प्रकारचा बोनसच होता! प्रतिकूल काळात तर तो फारच महत्त्वाचा ठरला. पोटापाण्याचा प्रश्न काही प्रमाणात सुटला होता!...

लॉस एंजल्समधे 'डिस्ने प्रॉडक्शन्स'हा सुप्रसिद्ध निर्माता वॉल्ट डिस्नेचा स्टुडिओ होता. आपल्या कामानिमित्त शहरात भटकंती करताना क्लॅरेन्स नेहमी 'डिस्ने स्टुडिओ' वरून जात असे. त्या स्टुडिओवरून जाताना त्याच्या मनात विचारांचं वादळ घोंगावे! वॉल्ट डिस्ने स्टुडिओचं प्रवेशद्वार खुणावून आपल्याला बोलावतं आहे अशी काहीतरी चमत्कारिक जाणीव त्याला होई! मनात उसळणाऱ्या उर्मींनी तो कमालीचा अस्वस्थ होऊन जाई! 'सेल्समन म्हणून दुधाची जाहिरात करत फिरण्यासाठी माझा जन्म नव्हे! पक्ष्यांचे, प्राण्यांचे आवाज काढण्याची माझी ही असामान्य कला अशी जाहिरातबाजी करण्यासाठी खचितच नाही... माझी योग्यता यापेक्षाही अधिक आहे....' त्याच्या मनात विचारांचं काहूर माजे. 'वॉल्ट डिस्ने स्टुडिओमध्ये शिरून तिथे आपल्या कलेचं काही चीज होतं का हे बघावं का?' त्याच्या मनात येई. पण मनातला हा विचार, मनात उसळणाऱ्या ऊर्मी तो दाबून टाकी! 'डिस्ने प्रॉडक्शन्स' सारख्या थोर लौकिकाच्या जगविख्यात संस्थेत आपली काय डाळ शिजणार? मिमिक्री करणाऱ्या आपल्यासारख्या सामान्य माणसाला तिथे कोण विचारणार? असे उलट विचार त्यांच्या मनात येत आणि निराशेने तो खचून जाई! त्या स्टुडिओत शिरण्याचं धाडस त्याच्यानं होत नसे; पण नियतीनं एखाद्याचं नशीब अकस्मात पालटायचं ठरवलं तर ती त्याला एकदम कुठल्या कुठे नेऊन बसवते! यशोमंदिराची दारंच त्यांच्यासाठी एकदम खुली होतात! क्लॅरेन्स नॅशच्याही बाबतीत असंच घडलं!



एक दिवस सकाळी तो आपल्या कामाच्या फेरीवर चाललेला असताना क्लॅरेन्स डिस्ने स्टुडिओसमोर पोहोचला. त्या ठिकाणी पोहोचताच त्याचे पाय आपोआप थबकले. स्टुडिओच्या प्रवेशद्वाराकडे त्यानं पाहिलं आणि त्याच्या मनात एकाएकी इतक्या जबरदस्त उर्मी दाटून आल्या, की त्याची पावलं आपोआप त्या प्रवेशद्वाराकडे वळली. मनातल्या सगळ्या शंकाकुशंका दूर सारून डिस्ने स्टुडिओमध्ये तो बेधडकपणे शिरला. तिथल्या रिसेप्शनिस्टला स्वत:ची ओळख देऊन आपलं नेमकार्ड त्यानं तिला दिलं.

'दुधाचं महत्त्व पटवण्यासाठी पक्ष्यांच्या आवाजांचे जलसे भरवणारा अजब पक्षीमानव!' अशी त्या कार्डावर त्याची ओळख छापलेली होती.

त्या रिसेप्शनिस्टनं त्याचं कार्ड आत एका डायरेक्टरकडे पाठवून दिलं. त्या डिस्ने-डायरेक्टरनं क्लॅरेन्सला मुलाखतीसाठी आपल्या खोलीत बोलवून घेतलं. त्याच्या ऑफिसखोलीत जाताच क्लॅरेन्सनं त्याला अभिवादन केलं. आणि तो म्हणाला, ''गुडमॉर्निंग सर! मी निरनिराळ्या पक्ष्यांचे आवाज

काढू शकतो. अगदी हुबेहुब काढू शकतो. तुमच्या कंपनीत माझ्या कलेचा कदाचित उपयोग होऊ शकेल.''

त्या डायरेक्टरनं क्लॅरेन्सकडे विस्मयानं पाहिलं नि त्याला विचारलं.''अस्सं? मग नमुनादाखल काहीतरी म्हणून दाखवता?''

''हो जरूर सर!'' क्लॅरेन्स पूर्ण आत्मविश्वासानं उत्तरला आणि बदकाच्या आपल्या खास आवडत्या आवाजात 'मेरी हॅड ए लिटल लँब' हे गाणं त्यानं म्हणून दाखवलं.किरट्या स्वरातला बदकाचा तो आवाज ऐकून तो डायरेक्टर विस्मयचकित झाला! त्याच्या मुद्रेवर समाधानाची छटा उमटली.

''जरा पुन्हा एकदा हे गाणं म्हणून दाखवता? इंटरकॉमवरून मिस्टर वॉल्ट डिस्ने यांच्याशी संपर्क जोडून देतोय!''तो क्लॅरेन्सला म्हणाला.

त्यानं इंटरकॉमचं बटण दाबल्यावर क्लॅरेन्सनं बदकाच्या स्वरात त्या गाण्याची पुनरावृत्ती केली.बदकाचा तो हुबेहूब किरटा स्वर वॉल्ट डिस्नेनं ऐकला मात्र, तो उत्स्फूर्तपणे एकदम ओरडला,

''अरेच्या!आपण इतके दिवस ज्याच्या शोधात होतो ते अफलातून बदक हेच!सापडलंच शेवटी आपल्याला..आपल्या डोनाल्डला हा आवाज अगदी परफेक्ट सूट होईल, डायरेक्टर! या अजब माणसाला करारबद्ध करून टाका!''

वॉल्ट डिस्नेचे ते शब्द ऐकून क्लॅरेन्सचा आपल्या कानांवर विश्वासच बसेना!पण त्यानं जे ऐकलं ते सत्य होतं! आणि अशा रीतीनं क्लॅरेन्स नॅशचं 'डिस्ने प्रॉडक्शन्स'या जगप्रसिद्ध चित्रपटसंस्थेत पदार्पण झालं!

डोनाल्ड डक या आपल्या मानसव्यंगपुत्राला उसना आवाज देण्यासाठी वॉल्ट डिस्नेनं क्लॅरेन्सला करारबद्ध केलं. 'द वाईज लिटन हेन' या त्याच्या नव्या चित्रपटात डोनाल्ड डक या बदकोबाच्या तोंडचे संवाद क्लॅरेन्सनं म्हटले.९ जून १९३४ या दिवशी वॉल्ट डिस्नेचा हा व्यंगचित्रपट प्रदर्शित झाला. चित्रपटाचं कथानक खूप गंमतीदार होतं. एका विधवा कोंबडीची ही कथा होती. या चित्रपटातला पहिला प्रसंग असा होता:

त्या कोंबडीला आपल्या शेतात पेरणी करायची असते. त्यासाठी तिला कुणाच्यातरी मदतीची गरज



असते.म्हणून जवळच असलेल्या सरोवराच्या एका बोटीपाशी ती जाते.या बोटीच्या डेकवर डोनाल्ड डक हे बदकोबा एक मळका खलाशी सूट घालून आपल्याच नादात नाचतच असतात. नाचात ते इतके गुंग झालेले असतात की, काठावरल्या कोंबडीकडे त्यांचं लक्षच जात नाही.शेवटी ती कोंबडी मोठ्यानं ओरडून त्यांचं लक्ष वेधते आणि त्यांना विचारते,''माझ्या शेतात पेरणी करायचीय.जरा मदतीला येता का?''

त्याबरोबर बदकोबा आपल्या खास स्टाईलमध्ये तिरकी मान करून गरगरीत डोळ्यांनी त्या कोंबडीकडे बघतात आणि पोट आवळत लंगडी सबब ठोकतात,

''मी? आणि तुझ्या शेतात काम करायला येऊ? छे:गं बाई!माझं पोट आज जाम दुखतंय बघ!''

उसन्या आवाजाच्या माध्यमानं रूपेरी पडद्यावर डोनाल्ड डकनं उच्चारलेले हे पहिले शब्द! त्याचा तो विशिष्ट चिरका आवाज प्रक्षेकांना इतका आवडला की, त्यानंतर डोनाल्ड डकची ही वैशिष्ट्यपूर्ण बदकबोली कायम गाजत नव्हे, क्वॅक क्वॅकत- राहिली. क्लॅरेन्स नॅश 'डिस्ने प्रॉडक्शन' या चित्रपटसंस्थेचा एक अविभाज्य घटक झाला.पाहता पाहता डोनाल्ड डकचे व्यंगचित्रपट लोकप्रियतेच्या शिखरावर जाऊन बसले. डोनाल्ड डक या बदकोबाचा अभिनय आणि त्याला क्लॅरेन्स नॅशच्या उसना आवाजाची जोड हे जणू समीकरणच होऊन बसलं.

वॉल्ड डिस्नेनं पुढे अनेक खटपटी लटपटी करणाऱ्या या बदकोबाचे सव्वाशेहून जास्त चित्रपट निर्माण केले आणि सबंध जगभर ते तुफान लोकप्रिय ठरले.लोकप्रियतेच्या बाबतीत डोनाल्डनं वॉल्ट डिस्नेचा दुसरा (खरं तर पहिला) मानसपुत्र मिकीमाऊस यालाही मागे सारलं आणि तो हॉलिवूड चित्रपटसृष्टीचा सुपरस्टार बनला. त्याच्या कार्टून्सनी नऊ ॲकॅडमी ॲवॉर्डस् आणि एक ऑस्कर ॲवॉर्ड पटकावलं. डोनाल्ड डकनं आपल्या प्रभावी अभिनयानं सबंध जगातल्या आबालवृद्ध प्रेक्षकांना जिंकलं ही वस्तुस्थिती असली, तरी त्याचं खरं अस्तित्व जोपासलं गेलं ते त्याचा दुय्यम

देहाभिमान–त्याचा उसना आवाज क्लॅरेन्स नॅश याच्यामुळेच!क्लॅरेन्स नॅश हा डोनाल्डशी इतका एकरूप झाला की वॉल्ट डिस्ने स्टुडिओमध्ये सगळे लोक त्याला गंमतीनं'डकी'या टोपण नावानं संबोधू लागले! क्लॅरेन्स स्टुडिओमध्ये कधीकधी स्वत:च्या मानवी आवाजात बोलत असे तर कधीकधी डोनाल्डच्या बदकबोलीत!

'डिस्ने प्रॉडक्शन'मध्ये प्रवेश केल्यानंतर क्लॅरेन्स नॅशची भाग्यरेखाच बदलून गेली. तो वैभवसंपन्न बनला. लहानपणापासून त्यानं जे कष्ट सोसले,जो संघर्ष केला, त्या सगळ्याचं सार्थक झालं.कॅलिफोर्नियातल्या ग्लेंडेल या शहरात त्यानं घर घेतलं नि तिथेच तो स्थायिक झाला. वॉल्ट डिस्नेच्या डोनाल्ड डकनं पुढे पन्नास वर्षांहून अधिक काळ सिनेसृष्टी गाजवली आणि क्लॅरेन्स नॅशनं आपल्या वयाच्या ऐंशीव्या वर्षापर्यंत उसना आवाज पुरवला!.. दुर्दम्य जिद्दीच्या बळावरच माणूस साफल्याचं शिखर गाठू शकतो. मुलांनो! यापुढे तुम्ही डोनाल्ड डकची कार्टून्स बघाल तेव्हा तुम्हाला 'क्लॅरेन्स नॅश'ची आठवण येईल ना? नक्कीच येईल अशी माझी खात्री आहे.

**विजय वि.देवधर**
७/१००,कामदा कॉम्प्लेक्स,
चिंचवड, पुणे ३३.


## नवीन खेळ खेळू या

बास्केटबॉल व डॉजबॉल या दोन खेळांचा मिश्रण असलेला हा नवीन खेळ आहे. डॉजबॉल, व्हॉलीबॉल असा कुठल्याही खेळाचा चेंडू वापरावा. या खेळासाठीचे क्रीडांगण आणि खेळाडूंच्या सुरूवातीच्या जागा खालील आकृतीत दाखविल्या आहेत. प्रत्येक संघात सुमारे १० ते १५ खेळाडू असावेत.

खेळाची सुरूवात मध्यरेषेवर चेंडू हवेत उंच उडवून केली जाते. दोन्ही संघापैकी एकेका खेळाडूने हवेत उडी मारून चेंडू आपल्याच खेळाडूकडे ढकलायचा. ज्या खेळाडूकडे चेंडू आला असेल त्याने लगेच तो प्रतिस्पर्धी खेळाडूंच्या डोक्यावरून शेवटच्या भागातील आपल्या संघातील खेळाडूकडे टाकायचा. अर्थात प्रतिस्पर्धी संघातील खेळाडू बास्केट बॉलप्रमाणे हवेमध्ये चेंडू आपल्या ताब्यात घेऊ शकतात. जेव्हा शेवटच्या भागातील खेळाडूकडे चेंडू असेल तेव्हा त्याने डॉजबॉलप्रमाणे मध्यभागातील प्रतिस्पर्धी खेळाडूला चेंडू फेकून मारायचा. फक्त शेवटच्या भागातील खेळाडूच डॉजबॉलप्रमाणे चेंडू मारू शकतील. जेव्हा मध्यभागातील खेळाडूला चेंडू लागेल तेव्हा चेंडू मारणाऱ्या गटाला २ गुण मिळतात. पण खेळ थांबविला जात नाही. ज्याच्याकडे चेंडू असेल त्याने पुढे खेळायला सुरूवात करावी. मध्यभागी खेळाडूंकडे फक्त शेवटच्या खेळाडूकडे चेंडू फेकणे अपेक्षित आहे. त्यांना डॉजबॉलप्रमाणे चेंडू मारता येणार नाही. ५ मिनिटानंतर खेळाडूंनी जागा बदलाव्यात.मध्यभागातील खेळाडू शेवटच्या भागात जातील. पुन्हा चेंडू मध्यभागी हवेत उडवून खेळाला प्रारंभ होईल. चेंडूचा पहिला टप्पा खेळाडूच्या कमरेखालील पायापर्यंत लागला तरच दुसऱ्या संघाला २ गुण मिळतील. टप्पा पडून अथवा घरंगळत गेलेल्या चेंडूचा स्पर्श प्रतिस्पर्धी खेळाडूस झाला तर गुण मिळणार नाहीत. खेळाडूंनी आखलेल्या चौकोनाच्या बाहेर जाऊन चेंडू घेतला किंवा फेकलेला चेंडू बाहेर गेला तर चेंडू प्रतिस्पर्धी खेळाडूच्या हातात देऊन खेळ पुन्हा सुरू करावा. याव्यतिरिक्त गरजेप्रमाणे बास्केटबॉल व डॉजबॉलचे योग्य ते नियम लक्षात घेऊन खेळ खेळावा. या खेळाला तुम्ही काय नाव द्याल?

असे २–३ खेळांचे मिश्रण करून, त्यात बदल करून तुम्हाला काही नवीन खेळ सुचतो का? असा खेळ तयार करून खेळा. त्याचे नियम तयार कराव तो खेळ सविस्तर लिहून आमच्याकडे पाठवा.

नावीन्यपूर्ण खेळाला प्रसिद्धी दिली जाईल, शिवाय खास बक्षीसही मिळेल.





# नंदूची पत्रे

हरिहर आठलेकर

***प्रिय बाबा,***

*नंदूचा प्रेमपूर्वक नमस्कार.*

*मी इथं मजेत आहे. बढती मिळाल्यामुळं तुम्हाला पुणं सोडून दिल्लीला जावं लागलं, ते एका अर्थी चांगलंच झालं. नाहीतर मला आपलं कोकण कसं पहायला मिळालं असतं? मी कोकणात एकटा पडलो असं तुम्हाला आणि आईला वाटत असेल; पण इथं नानाआजोबा आणि आजी यांच्यामुळं मला मुळीच एकटं वाटत नाही.*

*आमचं इथलं घर किती छान आहे बाबा! दारातच फणसाचं झाड आहे. कैऱ्यांनी लगडलंय नुसतं! परसवात साखरांबा, बिटकीचा, झकास आंबा सगळे मोहरले. आड्यातल्या जांभळीला पण मोहर आलाय. परसवात खाली खाडीकाठी टपोऱ्या लाल फुलांनी सावर बहरलीय. परवा सकाळी तोंड धुवायला विहरीवर गेलो होतो. काय मजा! तऱ्हेतऱ्हेची पाखरं तिथं मधासाठी आपली हजेरी लावतात. आजोबा त्यांची काही वेगळीच नावं सांगतात; पण दिनूमामानं मला 'प्राणीसृष्टी'चं पुस्तक दिलंय ना, त्यावरून मी त्यांना बरोबर ओळखतो. दयाल येतो, चंडोल आणि बुलबुलही असतात. अंगणाच्या कडेला जास्वंदीवर एका बुलबुलाच्या जोडीनं घरटं बांधलंय. ती जोडी या गर्दीत येते. भाटेडा, पाणमोर, साळुंकी, खंड्या, भारद्वाज, नाचण, पाकोळ्या, तऱ्हेतऱ्हेची किती पाखरं! विहिरीजवळच्या माडाच्या झापांना सुगरिणींनी घरटी विणलीत. परवा अशाच एका पडलेल्या घरट्याची मी टोपी केली आणि ती घालून एका समारंभात नक्कल केली. खूप मजा आली.*

*एका संध्याकाळी आजोबांबरोबर खाडीकाठी उभा होतो. पक्ष्यांचा एक थवा उंच आभाळात उडताना दिसला. बरोबर बाणाचं टोक असावं तसा त्यांचा म्होरक्या पुढं होता. त्याच्यामागं बाणाचा पिसारा रुंदावत जातो ना, तसे इतर बगळे ठराविक अंतर राखून उडत होते. मला बालकवींची ती ओळ आठवली,*

कोकणची हिरवीगार दाट झाडी, लाल मातीची नागमोडी वळणं, समुद्राची जागती गाज, लाल मातीत पिकणारा कोकणचा मेवा आणि फणसारखी बाहेरून खडबडीत पण आतून मायेचा गोडवा असलेली कोकणी माणसं! या सगळ्या वातावरणात आजी-आजोबांसमवेत राहणाऱ्या नंदूच्या कोकणातले बदलते हुंकार, उमलत्या वयात मुलांच्या मनात उठणारे तरंग आपल्यासमोर उमटतात ते नंदूने आपल्या आई-बाबांना लिहिलेल्या उत्कट पत्रांमधून!

***'बलाकामाला उडता भासे कल्पसुमांची माळाचि ते'*** *आजोबा म्हणतात ते इकडचे पक्षी नव्हेत. ते क्रौंच.ताश्कंद, सैबेरिया आणि हिमालयाच्या पहाडातून ऑक्टोबर महिन्यात इकडे येतात आणि मार्चच्या सुमारास परत जातात. मोठं नवल नव्हे? नेमकी वाट आणि वस्तीची नेमकी ठिकाणं त्या पक्ष्यांना बरोबर कशी कळतात?*

*काल मला आजोबांनी आकाशातला तारा दाखविला. त्याच्याच रेषेत उत्तरेकडे व्याध, मृग, रोहिणी शकट, शर्मिष्ठा, देवयानी असे बरेच पुंज आहेत. मृगपुंजावरून आजोबांनी ओरायनची गोष्ट सांगितली. आपल्या पुराणातही म्हणे ती गोष्ट जरा वेगळी आहे. आजोबांना केवढं ज्ञान आहे नाही! भटजीसारखा पंचा नेसतात. म्हणून नीराकाकू त्यांना उगाच हसते. पोशाखावरून माणसांची किंमत करता येत नाही, असं तुम्ही सांगत असता तेच खरं! आजोबा मला खूप आवडतात. आईला नमस्कार.*

*उषाताईला मुलगा झाला. हे कळलं. मी बिट्ट्याचा मामा झालो. पत्र पाठवा.*

***तुमचा आज्ञाधारक***
***नंदू***

***प्रिय बाबा***

*नंदूचा प्रेमपूर्वक नमस्कार.*

*परवा आईची आठवण आली. मला रडूसुद्धा आलं; पण तुमचं पत्र आलं आणि बरं वाटलं; आजी म्हणाली, 'तुम्ही, आई आणि इंदूरहून उषाताई मे महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात इकडे येणार.' या हां! टाळू नका. आईला नेहरू विद्यापीठात व्याख्याता म्हणून नेमलं हे वाचून आनंद झाला. तिला मे महिन्यात सुट्टी असेलच.*

*आठ दिवसापूर्वी आमची परिक्षा संपली. मला इंग्रजीत ९२ गुण मिळाले असं चिंतामणीसर आजोबांना सांगत होते. तुम्ही मला मराठी माध्यमाच्या शाळेत ठेवलं, हे चांगलं झालं असं आजोबा म्हणाले.*

*'मातृभाषा ज्याला उत्तम कळते त्याला अन्य भाषा सहज आत्मसात करता येते' असं चिंतामणीसर सांगतात. आठवीच्या पाच तुकड्यात मी पहिला येणार असंही ते म्हणाले. यंदा रानात काजूला चांगला बहर होता. आमची दहा पोती काजू बी झालीय. आजी सध्या आंब्या-फणसाची साठं तयार करण्यात गुंतलेली असते. रात्री आम्ही अंगणात बसतो. पुनर्वसूंचा दीर्घ चौकोन मावळतीकडे झुकलेला दिसतो. कालिदासानं त्याचं 'स्वर्गद्वार' असं वर्णन केलंय. आजोबा अशाच काही गोष्टी सांगत असतात.*

*आठ दिवसांपूर्वी आमच्या परसवात केवढा नाग होता. शेजारचे बंडुतात्या दांडा घेऊन त्याला मारायला आले; पण आजोबांनी मारू दिलं नाही त्याला. आमची जाग होती तोवर तो गप्प पडून होता. जाग मोडली तसा तो रानाच्या दिशेनं असा झपाट्यानं गेला की, काही विचारू नका! त्याची ती वळवळ पाहण्यासारखीच होती. आजोबा म्हणतात, ''तो आपल्या भक्ष्यामागं आला असणार. आपल्याला तो काही करणार नाही.'' आजी म्हणाली, 'मांत्रिकाला तरी बोलवा...' आजोबा हसले. म्हणाले, 'पुन्हा आला तर आणू मांत्रिक. असलं अस्सल जनावर माणसाच्या जागीला थारत नाही. आपल्या माडातले उंदीर त्याच्यामुळंच कमी होतात,' असं आजोबा सांगतात. बाबा! तुम्ही येताना मला सर्पाच्या माहितीबद्दल चांगलं पुस्तक घेऊन या. तुम्ही सर्वांनी लवकर या. मी वाट पहातोय. तोवर माझ्या परीक्षेचा निकाल लागलेला असेल.*

***तुमचा आज्ञाधारक***
***नंदू***

***प्रिय आईस***

*नंदूचा सप्रेम नमस्कार.*

*आई, तुम्ही दिल्लीला गेलात आणि एक दिवस तुमची खूप आठवण येत राहिली होती. मग तुम्ही आणलेली पुस्तकं वाचायला घेतली. जवळजवळ ती सगळीच वाचून झाली. परवा आमची शाळा सुरू होईल. चिंतामणी सरांनी माझ्याकडे शाळेचं वाचनालय सांभाळण्याचं काम द्यायचं ठरवलंय. माझ्याकडची भेट मिळालेली, काही विकत घेतलेली गोष्टींची शंभराहून अधिक पुस्तकं मी शाळेच्या वाचनालयाला द्यायची ठरविलीत. बाबांना ते आवडेल ना?*

*अजून उन्हाळा खूप होतो. पाऊस एकदाच पडून गेला. इथल्या लोकांच्या समजुती किती गमतीच्या असतात आई! मजाच झाली. त्या दिवशी मला जाग आली तीच मोठ्या आवाजानं. काय होतंय, काय कोसळतंय वाटलं आणि मी धडपडत उठलो. मोठं झाड कोसळावं तसा आवाज कानावर आला आणि मागाहून सोंऽऽसोंऽऽ असा प्रचंड आवाज येत राहिला. मग पुन्हा तस्साच धस्स आवाज. एका लयीत हा आवाज येत राहिला होता. मी अंथरूणातून उठून बाहेर अंगणात गेलो, तर गंगाराम शिगवण कोणाला तरी ओरडून सांगत*

होता, 'कोंडूर गराजलो रे!पावस लागी इलो.'

''आजोबा, हा कोंडूर कोण?''


'अरे तो कोणी प्राणी नाही. समुद्राची गाज ती..' आजोबांनी म्हटलं, अगस्ती अस्ताला गेला ना? सूर्य आता मृगपुंजात पोचला. आता दक्षिणवारे सुरू झाले.' आजोबांनी कोंडूर म्हणजे काय ते सांगितलं आणि न्याहारी झाली तसं आम्हाला घेऊन बाहेर पडले. आमच्या कोचऱ्यातून चार-पाच किलोमीटर चालावं लागलं. भुताच्या देवळाकडून थेट पश्चिमेला डोंगरकड्यावर पोचलो. पश्चिमेकडून सारखी मळभं येत होती. समुद्र खवळला होता. वारा भणाणत होता. सारं शब्दात नाही सांगता येत आई! एखाद्या महाकाय पुरुषानं फुंकर घालावी तसा वाऱ्याचा झोत पृष्ठभागावर आदळतो आणि एक मोठा गड्ढाच बनतो पाण्यात-मैलोनमैल पसरलेला. प्रचंड लाटा उसळतात आणि खडकाळ डोंगरकड्याशी टक्कर देतात. त्यातच त्या लाटांच्या उंचीएवढ्या उंचीवर कड्याला एक नैसर्गिक विवर आहे. त्या विवराच्या तोंडावर लाट आदळली की कानठळी बसेल असा आवाज येतो. फुटलेल्या लाटांचे तुषार वाऱ्याबरोबर मैलोनमैल पसरत जातात आणि ह्या कोंडुऱ्याची गाज म्हणे पंधरा वीस किलोमीटरच्या परिसरात घुमते. तू मागं एक 'कोंडुरा' म्हणून पुस्तक वाचीत होतीस ना, त्याचे लेखक चिं. त्र्यं. खानोलकर यांचाच हा खानोली गाव. आता मी सुद्धा वाचणार आहे.निसर्गाचं ते विक्राळ दृश्य पाहून समाधान होत नव्हतं; पण 'वारा थांबला की पाऊस येईल.चला!'आजोबा म्हणाले,आम्ही नाइलाजानंच परतलो आणि खरंच! आजोबांचं भाकितही खरंच झालं. आम्हाला वाटेत पावसानं गाठलं, तापलेल्या जमिनीवर पाणी पडलं तसा मातीचा हवाहवासा वाटणारा वास सुटला. त्यालाच 'मृद्गंध' म्हणतात ना आई?

मला या कोकणातल्या इथल्या माणसांची गंमत वाटते.कशाचा संबंध कुठे जोडतील याचा पत्ता नाही. आम्ही कोंडूर पाहून परतलो ते पाऊस आला म्हणून, ताता गावड्यांच्या घरी थांबलो. बंडूतात्या तिथं भिजतच आले कुठूनसे. वारा थांबला होता आणि पाऊस झिमझिम करीत होता. ताता गावड्यांच्या घराखाली न्हाणीतला माड होता. नस्तावरचा वारा प्रथम त्याच्यावरच आदळेल असा. अगदी उंच म्हातारा,पण लगडून धरलेला चारी बाजूंनी पेंडी होत्या. बंडूतात्यांचं लक्ष गेलं तसे म्हणाले,

'काय रे ताता, बोरड (म्हातारा माड) घरलीसा. तरी बरां वाऱ्याक दाद नाय दिल्यान...' त्यावर कोणीच काही बोललं नाही. तातांनी मात्र कपाळाला आठ्या घातल्या. काहीतरी पुटपुटलेसुध्दा. मला कससंच वाटलं. पाऊस थांबला तसे बंडूतात्या वाटेला लागले. आजोबा पान लावीत बसले होते म्हणून आम्हीही थांबलो होतो. अचानक भेंड्यांचा गोट्या म्हणाला 'बघा माड कसं करतोय!'

पहिलं तर माडाचा शेंडा थरथरत होता आणि माडाचं ते झाड हळूहळू खाली येत होतं. अर्धअधिक खाली आलं आणि ते धूड धप्पदिशी जमिनीसपाट झालं. ताता ओरडले,

बंडूतात्याचं ह्यां कर्म, मेल्याची



नजरच वायट! जायत थंय असो मरता! तेच्या नजरेनं मोटे मोटे फातरी फुटलेत...'

मला काही कळेनासं झालं. केवळ नजरेनं अशी झाडं कोसळतात? मग आजोबाकडून कळलं की, बंडूतात्यांना माणसं फार भितात आणि त्यांना टाळतात. दुभती म्हैस बहरलेलं झाडं, चांगली सजावट आणि जे जे चांगलं असेल ते त्यांच्या नजरेत भरू नये अशी खबरदारी घेतात. मी विचारलं, ''आजोबा, हे खरं का हो? कोणा एकाची नजर बाधते? एवढी ताकद असते नजरेत?'' आजोबा हसले आणि म्हणाले,

''अरे मग दगड फोडायला पाथरवट कशाला बोलवायला हवेत? असतात माणसांच्या एकेक खुळ्या समजूती.''

आमच्या परसवात सावरबोंडी केळ पोसवलीय. घडाला चांगली सव्वाशे केळी आलीत. दुसऱ्याच दिवशी आजोबा भारानं केळ मोडू नये म्हणून ढिगी देत होते. तेवढ्यात बंडूतात्या तिथं आले म्हणाले, ''हे घडाक गोणत्यान झाक. नाय तर वानरांक फावात.''

आजोबांनी त्याच्याच मदतीनं मग पोतं घालून घड बांधून टाकला. मला मात्र उगाच धाकधूक वाटत होती. अजून त्या घडाला आणि केळीला काहीही झालं नाही आहे. बिचारे बंडूतात्या!

आई खरंच तुम्ही मृगाचा पाऊस पडेपर्यंत राहायला हवं होतं. तुला आवडलं असतं. पाऊस जवळ आला की, रात्री कॉक् कॉक् करीत मिठाला जाणारा कोका, ''झोती व्हावतीऽऽऽ' चा पुकारा करणारं पाखरू, पहिल्या पावसाला तळ्यातला तटवा काढायला होणारी शेतकऱ्यांची धांदल, पाऊस पडल्यानंतर एकदम होणारा सृष्टीतला बदल आणि खवळलेला समुद्र असं सगळं पाहून तुला आपलं कोकण किती छान आहे ते कळलं असतं. तुमच्या पत्राची वाट पाहतोय. माझी तिमाही चाचणी झाली की पुन्हा पत्र लिहीन. बाबांना नमस्कार.

**तुझाच लाडका**
**नंदू**

प्रिय बाबा,

नंदूचा प्रेमपूर्वक नमस्कार.

तुमचं पत्र वाचून आनंद झाला. माझं कोकणचं निरीक्षण आईला आणि उषाताईला आवडलं हे वाचून बरं वाटलं. बाबा! इथं तुम्ही ज्या मराठी शाळेत सातवीपर्यंत शिकलात ती शाळा पाहिली. किती हो दूर जावं लागायचं तुम्हाला! सहज पाच किलोमीटर अंतर होईल ते. आता घरालगतच सात यत्तांची शाळा झालीय. गावात राहून बारावीपर्यंत शिक्षण घेता येतं. केवढा बदल नाही! पुढच्या शिक्षणासाठी आजोबांनी तुम्हाला पुण्याला जाऊ दिलं हे मोठंच आश्चर्य.

चार दिवसांपूर्वी तुमचे इथले शाळासोबती भेंडेकाका आजोबांना भेटायला आले होते. मुंबईला असतात ते. तुम्ही पुण्याला शिक्षणासाठी काय काय केलंत ते ते सांगत होते. तुम्ही म्हणे वार लावून जेवलात. पेपर टाकायचं आणि खानावळीत वाढपी म्हणून काम केलंत. तुम्ही आम्हाला हे कधीच सांगितलं नाही. 'माधुकरी, वार लावणं' वगैरे गोष्टी आता कोणा मुलाला कळणार सुद्धा नाहीत. खरंसुद्धा नाही वाटायचं.

परवा आमच्या चाचणीचा निकाल कळला. माझा दुसरा क्रमांक आहे; पण भाषाग्रुपमध्ये आणि सायन्स ग्रुपमध्ये मीच पहिला आहे. बाबा, दिवाळीच्या सुट्टीत आम्ही काही मुलांनी सिंधूदुर्ग जिल्हा बराचसा पायी फिरुन पाहायचं ठरवलंय. आमच्याबरोबर रामाणी सर असणार आहेत. त्यांना आमचा जिल्हा पहायचा आहे. ते सोलापूरचे. त्यांना आमचा जिल्हा खूप आवडलाय. आजोबांनी परवानगी दिलीय; पण तुम्हाला माझं हे भटकणं आवडेल ना?

गेल्या आठवड्यात नारळीपौर्णिमा झाली. आजोबा मला घेऊन वेंगुर्ल्याच्या बंदरात गेले होते. वाजतगाजत मिरवणुकीनं रामेश्वराचा नारळ येतो तो समुद्रात पडल्यानंतर व्यापारी आपापले नारळ फेकतात. ते फेकण्यातदेखील मोठी चुरस असते. कोणाचा नारळ किती दूर जातो त्यासाठी तशीच. होड्या घेऊन खळखळत्या समुद्रात नारळ पकडण्यासाठी कोळ्यांची स्पर्धा असते. एक मोठा तरबेज तरूण होता. त्यानं पन्नासहून अधिक नारळ जमा केले होते. त्या दिवशी नारळ लढवायचा एक खेळ असतो. मीसुद्धा त्यात भाग घेतला. मी माझ्या सौंगड्याचे दहा नारळ फोडले; अखेरी न्हानू कांबळीनं माझा नारळ फोडलाच. त्याचा नारळ अजिंक्य

ठरला. त्यानं एकंदर पंचवीस नारळ फोडले पण त्याचा काही फुटलाच नाही. मजा आली.

वेंगुर्ले बंदरात कोणी गावस्कर नावाचे गृहस्थ आजोबांना भेटले. ते तुम्हाला ओळखतात. त्यांनी आपल्या घरी नेलं आम्हाला. बाबा, सुनील गावस्कर हे क्रिकेटियर कोकणातले! हे मला माहितच नाही. आमच्या आजोबांची त्यांच्या आजोबांशी- अप्पा गावस्करांशी चांगली जान पहचान होती म्हणे. मी त्यांचं उभादांडा वस्तीतलं घरदेखील बघून आलो. केवढी माणसं आपल्या कोकणानं निर्माण केलीत!

आजी आणि आजोबा आता घर झाडणं रंग काढणं, सारवणं वगैरे कामात गुंतलीत.आमचा गणपती येणार ना! उषाताई एव्हाना बिट्टयाला घेऊन इंदूरला गेली असेल. आता दिवाळीची सुट्टी संपल्याशिवाय मी पत्र पाठवीत नाही. आजोबांचं खुशालीचं पत्र येईलच. आईला सप्रेम नमस्कार. परवानगीचं पत्र पाठवा.

तुमचा आज्ञाधारक

नंदू

**प्रिय बाबांना**

**नंदूचा सप्रेम नमस्कार.**

तुम्ही मला आपला नवीनच उदयाला येऊ घातलेला सिंधुदुर्ग जिल्हा पायी फिरून पाहायची परवानगी दिलीत आणि काही सूचनाही केल्यात. मी तुमचा उतराई कसा होऊ बाबा? तुम्ही थोरच आहात.तुम्ही सांगितल्याप्रमाणे मी रोज डायरी लिहिलीच.आता तर मला ती सवयच लागून गेलीय.

तुम्ही म्हणता बाबा, की तुम्हाला असं कधी वाटलं नाही. अशी संधी आलीच नाही; पण बाबा! तुम्ही आरस काकांच्याबरोबर बाराव्या वर्षीच गाव सोडलं. तुम्ही जे पाहिलंत आणि जे अनुभवलंत ते काय थोडं होतं बाबा? तुम्ही बाहेर पडलात त्या काळी म्हणे कुडाळ किंवा वेंगुर्ले गाठल्याशिवाय मोटार पहायला मिळत नव्हती. इथली माणसं पाठीवर पडशीचं ओझं टाकून पायीच फिरत असत. आता आमच्या गावातून दिवसातून दहा गाड्या ये जा करतात. एक बस थेट मुंबईला जाते. आजोबा म्हणतात, त्यांच्या लहानपणी वेंगुर्ल्याला जायचं म्हणजे चार घाट्या चढून उतराव्या लागत. आता तर प्रत्यक्षच पाहिलं. साऱ्या जिल्ह्यात आता डांबरी रस्त्यांचं जाळं झालंय. रेल्वे येऊ घातलीय. काही ठिकाणी लायनीसुद्धा टाकून झाल्यात. पायी फिरण्यात एक वेगळीच मज्जा असते. रमणीसर बरोबर असल्यानंतर आमची सफर एकदम छान झाली. या भूमीनं किती मोठी माणसं देशाला दिलीत बाबा! मराठीत पहिलं वर्तमानपत्र सुरू करणारे 'दर्पणकार' बाळशास्त्री जांभेकर तर पोंभुर्ल्याचे. वैदिक वाङ्मयाचं संशोधन करणारे वेदमहर्षी श्रीपाद दामोदर सातवळेकर सावंतवाडी-जवळच्या कोलगावचे. मराठीला पहिलं ज्ञानपीठ पारितोषिक मिळून देणारे वि. स.खांडेकर मूळ सावंतवाडीचे. त्यांनी शिरोड्यात सोळा वर्ष शिक्षक म्हणून काम केलं. नाटककार मामा वरेरकर मालवणचे तर जयवंत दळवी आरवलीचे, सर्कशीचा हत्तीवाद्यांसह मोठा गोतावळा सांभाळीत जगाचं भ्रमण करणारे वालावलकर वालावलीचे, तबलापटू आचरेकर आचऱ्याचे किती माणसं सांगावी!

बाबा, मी जिथं जिथं गेलो आणि तिथं जे पाहिलं, ऐकलं त्याची तुमच्या सांगण्याप्रमाणं डायरी लिहिलीय. तुम्हाला वाचायला आवडेल ती. एका गावात एक जत्रासुद्धा पहायला मिळाली. दशावतारी नाटक मी पहिल्यानंच पाहिलं. नाटकातली भाषणं लिहिलेली नसतात. आयत्यावेळी जे सुचेल, ते बोलायचं आणि कथानक उभं करायचं. गंमतच! तुम्ही लहानपणी ती नाटकं पाहिली असणार. तुम्ही सांगितलंय, आता मोठी पत्रं लिहायची नाहीत. अभ्यास करायचा.. आता चार महिने मी झटून अभ्यास करायचं ठरवलंय.मी मेरिटमध्ये येणार याची मला खात्री आहे.मग मात्र तुम्ही मला दिल्लीला न्यायला हवं; पण आधीच सांगून ठेवतो, मी बारावीपर्यंतचा अभ्यास याच शाळेत करणार. चिंतामणी सर मला मुळीच जाऊ देणार नाहीत. आईला सप्रेम नमस्कार.

**तुमचा आज्ञाधारक**


**नंदू**

●●

**हरिहर आठलेकर**

२९३/सी,भटवाडी, सावंतवाडी,

जि. सिंधुदुर्ग.




# जिम्नॅस्टिक्स् खेळांची जननी

– मोरेश्वर गुर्जर

**प्र**त्येक विषयाला आपली अशी काही सौंदर्यस्थाने असतात; अगदी गणितासारख्या रुक्ष वाटणाऱ्या विषयालाही त्याचे अंगभूत असे काही सौंदर्य हे असतेच. कलात्मक अभिव्यक्ती हे जिम्नॅस्टिक्सचे सौंदर्यस्थान आहे.

अशा ह्या खेळाचा उगम ख्रिस्तपूर्व इ. स.२१०० मध्ये झालेला असला; तरी त्याचे खरे महत्त्व ग्रीक आणि रोमन लोकांनी जाणले होते. याची साक्ष महान तत्त्वज्ञ प्लेटो (इ. स. पू. ४२७ ते ३४७) ह्यांच्या पुढील वाक्यावरून स्पष्ट होते. ''संगीत आणि जिम्नॅस्टिक्स्चा समावेश असल्याखेरीज कोणत्याही शिक्षणाला काही मूल्य प्राप्त होणे अशक्य आहे. शरीरासाठी जिम्नॅस्टिक्स् आणि आत्म्यासाठी संगीत.'' त्यांच्या ह्या विचारसरणीचा प्रभाव पूर्ण युरोपियन संस्कृतीवर झाला. त्यामुळे पुढे मानवी मूलभूत हालचालींबरोबर नृत्य, दोरावर चढणे, कोल्हाट उड्या मारणे, मानवी मनोरे करणे अशा विविध स्वरूपाच्या क्रीडाप्रकारांचा समावेश होऊन आरोग्यरक्षण, बलसंर्वधन आणि सैनिकी प्रशिक्षण हे त्याचे प्रमुख उद्देश झाले. अर्थात् त्यासाठी पुढील काही दिग्गजांचे अथक प्रयत्न कारणीभूत झाले होते हे विसरता येणार नाही:– जर्मनीचे जॉन बॅसडो गट्स्मूथ, फेड्रिक जॉन, स्वित्झरलंडचे हेन्रिच पेस्टेलॉजी, अडॉफ स्पाअीस्, स्विडनचे पी.एच. लिंग, एच्. एफ्. लिंग इ.

साधारणपणे १८८१ मध्ये




जिम्नॅस्टिक्स्च्या आंतरराष्ट्रीय संघटनेची स्थापना झाली. आणि १८९६च्या पहिल्या अर्वाचीन ऑलिंपिक्समध्ये ह्या खेळाचा समावेश झाला. अर्थात त्यावेळच्या क्रीडाप्रकारांमध्ये आणि आजच्या स्पर्धांमधील क्रीडाप्रकारांत जो थोडासा बदल दिसून येतो त्याचे मुख्य कारण म्हणजे कालानुरूप स्पर्धात्मक दृष्टिकोन वाढत गेला व शास्त्रोक्त संशोधनाबरोबरच स्पर्धेची गुणप्रदान संहिताही तयार झाली आणि विविध खेळांचे स्वरूपही निश्चित होत गेले.

आज ऑलिंपिक्सच्या जिम्नॅस्टिक्स्च्या स्पर्धांमध्ये प्रामुख्याने दोन प्रकारच्या स्पर्धा घेतल्या जातात त्या अशा

१) आर्टिस्टिक्स् (कलात्मक) जिम्नॅस्टिक्स्- पुरूष व स्त्रियांसाठी.

२) ऱ्हिदमिक जिम्नॅस्टिक्स् फक्त स्त्रियांसाठी

आर्टिस्टिक जिम्नॅस्टिक्स्मध्ये पुरुषांसाठी पुढीलप्रमाणे क्रीडासाधने असतात.

१) फ्लोअर एक्सरसाइजेस्

२) पॉमल हॉर्स

३) रोमन रिंग्ज

४) पॅरलल बार्स

५) हॉरिझाँटल बार

६) व्हॉल्टिंग हॉर्स (उभा)

त्याचप्रमाणे स्त्रियांसाठी पुढील चार साधने असतात:-

१) व्हॉल्टिंग हॉर्स (आडवा)

२) बॅलन्सिंग बीम

३) अन्इव्हन बार्स

४) फ्लोअर एक्झरसाइजेस. (पार्श्वसंगीतासह)

आर्टिस्टिक्स् जिम्नॅस्टिक्स्मध्ये प्रत्येक साधनांवर केल्या जाणाऱ्या कौशल्यांचा एक स्वतंत्र असा विशिष्ट घाट असतो. उदा **फ्लोअर एक्झरसाइज**मध्ये विविध तालबद्ध हालचाली आणि हवेतील कोलांट्या उड्या व त्यातील विविध वळसे ह्यांना जास्त महत्त्व असते.स्त्रियांसाठी मात्र नृत्यात्मक पदन्यासावर व नाजूक हालचालीवर भर दिला असून त्यासाठी पार्श्वसंगीत आवश्यक असते.

**पॉमल हॉर्स**वर दोन्ही पायांच्या दोन्ही दिशांकडून (घड्याळाच्या काट्यांची दिशा आणि विरुद्ध दिशा) चक्राकार गिरक्या न अडखळता करणे ह्याला महत्त्व असते.

**रोमन रिंग्ज**वर ताकदीचे आणि झोक्यांचे असे दोन्ही प्रकारांचे तुल्यसापेक्ष प्रमाण राखणे अनिवार्य असते.


**व्हॉल्टिंग हॉर्स**वर इतर साधनांप्रमाणे ११-१२ व्यायाम प्रकारांच्या एकत्रीकरणाचा संच वा आकृतिबंध नसतो. खेळाडूला त्यावर एकूण दोनदा उडी मारावी लागते. साधारण २५ मीटर अंतरावरून खेळाडू पळत येतो. नंतर २० सेंमी. उंचीच्या स्प्रिंगबोर्डवरून पायाने उडी घेऊन हॉर्सवर हात टेकताना व सोडताना हवेत विविध अंशांत शरीराभोवती वळसे घेऊन जमिनीवर येतो.स्त्रियांसाठी मात्र हॉर्स आडवा ठेवलेला असतो.

**पॅरलल बार्स्**वर काही तोल संभाळणारे, झोका घेऊन केलेले, काही ताकदीचे आणि बारची पकड सोडून हवेत उडी मारून पुन्हा बार पकडणे अशा स्वरूपाची कौशल्ये करावी लागतात.


**हॉरिझॉन्टल बार:-** प्रामुख्याने न थांबता अडथळ्याविना झोक्यांचे व्यायाम प्रकार करताना बारवर विविध प्रकारच्या हातांच्या पकडीने आणि बार पकडून आकृतिबंध पूर्ण करणे अगत्याचे असते.

**अन् इव्हन बार:-** दोन समांतर बार असतात. त्यातील एक दुसऱ्यापेक्षा अधिक उंच असतो. एका बारवरून दुसऱ्या बारवर विद्युत्वेगाने केलेल्या विविध पकडी,हवेतील कोलांट्या उड्या मारून पुन्हा बार पकडणे आणि संपूर्ण झोक्यांचे व्यायामप्रकार यांचा यात समावेश असावा लागतो.


**बीमवर** साधारणपणे फ्लोअर एक्सरसाइजेससारखे व्यायामप्रकार



१९७६ च्या मॉट्रियल ऑलिपिकमध्ये इतिहासाचे सोनेरी पान लिहिलं गेलं ते रूमानियाच्या १४ वर्षांच्या 'नादिया कोमनसी'ह्या चिमुरडीच्या नावाने. घडलं असं की, अनुइव्हन बारवर तिने केलेला वैयक्तिक कौशल्यांचा संच म्हणजे 'न भूतो न भविष्यति'असा होता. काय नव्हतं त्यात? सौंदर्य, आकर्षकपणा, सादरीकरण, वैभव, धैर्य, कलात्मकता, विद्युत्वेगाच्या पकडींबरोबरच, हवेतील नावीन्यपूर्ण कोलांटी उडी म्हणजे 'कोमनसी समरसॉल्ट!' तिचा संपूर्ण संच इतका परिपूर्ण आणि बिनचूक होता की, त्यामुळे ऑलिंपिक्समध्ये प्रथमच गुणफलकावर १० पैकी १० गुण हा आकडा विराजमान झाला आणि 'कॉम्प्युटर'असमर्थ होऊन अयशस्वी झाला.



असतात. ऑलिपिंक स्पर्धांसाठी प्रथम जिल्हा स्तर, विभागीय स्तर,राज्य स्तर,राष्ट्रीय स्तर आणि मग जागतिक स्तर अशी सर्वसाधारपणे क्रमवारी खेळांडूच्या निवडीसाठी असते. ज्या वर्षी ऑलिपिंक स्पर्धा असतात त्याच्या अगोदर झालेल्या जागतिक स्पर्धांमधील पहिल्या आलेल्या १२ संघाना (सहांचा एक संघ ऑलिपिंकमध्ये सरळ प्रवेश असतो.जे संघ १३, १४,आणि १५ क्रमांकावर आले असतील त्या देशाचे तीन



खेळाडू, १६ व १७ क्रमांवर आलेल्या देशातील दोन सर्वोतम खेळाडू आणि वर उल्लेख केलेले देश वगळून सर्वोतम नऊ खेळाडू यांना वैयक्तिकरित्या स्पर्धेत भाग घेता येतो. म्हणजे हा खेळ सांघिकही आहे आणि वैयक्तिक आहे.खेळाडूला वर उल्लेख केलेल्या सर्वच्या सर्व साधनांवर भाग घेणे अनिवार्य असते.

**स्पर्धांचे स्वरूप :-**

क्रमांक एक ही सांघिक अजिंक्यपदाची स्पर्धा असते.प्रत्येक साधनावर खेळाडूने केलेल्या वैयक्तिक संचात सर्वात जास्त गुण मिळणाऱ्या चार खेळाडूच्या गुणाची बेरीज करून जास्त गुण मिळवणारा संघ विजेता ठरतो. ह्या पहिल्या स्पर्धेतून उत्कृष्ट ३६ खेळांडूची निवड होऊन (प्रत्येक देशातील जास्तीत जास्त तीन खेळाडू) त्यांची सर्व साधनांवर पुन्हा स्पर्धा घेतली जाते. ती क्रमांक दोनची वैयक्तिक अजिंक्यपदाची स्पर्धा होय. नंतर पहिल्या स्पर्धेतून प्रत्येक साधनावरचे आठ उत्कृष्ट खेळाडू निवडले जातात (प्रत्येक देशातून जास्तीत जास्त दोन) आणि त्यांच्या स्पर्धा त्या त्या साधनांवर घेतल्या जातात ती, क्रमांक तीनची त्या त्या साधनावरील विजेत्याची स्पर्धा.

स्पर्धकाला प्रत्येक साधनावर दहापैकी गुण दिले जातात. त्यांची विभागणी अशी असते-

| | |
|---|---|
| व्यायामातील अवघडपणा | २.४० गुण |
| व्यायामांचे सादरीकरण | ५.०० गुण |
| विशिष्ट गरजेचे आवश्यक प्रकार | १.२० गुण |
| बोनससाठी (विशेष बक्षिसी) | १.४० गुण |
| एकूण | १०.०० गुण |

जिम्नॅस्टिक्स्‌मध्ये केवळ अवघडपणा हा निकष नसतो. तो कोणत्या प्रकारे सादर केला आहे याला महत्त्व असते. बोनस गुणांमध्ये व्यायाम प्रकारातील धोका, नवनिर्मिती आणि त्यातील जास्त अवघडपणा ह्या गोष्टींना प्राधान्य असते. ह्या दृष्टीने पुढील वाक्यांचे खूप महत्त्व आहे: "The content of all exercises must confirm to the capabilities of the gymnast.The degree of difficulty of an exercise must never be escalated at the expense of correct form and technically correct execution.A



१) किरकोळ चुकीसाठी ०.१० गुण वजा करणे.
२) मध्यम चुकीसाठी ०.२० गुण वजा करणे.
३) मोठ्या अथवा लक्षणीय चुकीसाठी ०.४० गुण वजा करणे.
४) खेळाडू साधनांवर पडला तर ०.५० गुण वजा करणे.

साधनांवर आपला आकृतिबंध चालू करण्यापूर्वी आणि पूर्ण झाल्यानंतरही सावधान स्थितीत येणे खेळाडूला बंधनकारक असते. आपला संच चालू असताना क्रीडामार्गदर्शक अथवा मदतनिसाशी संभाषण करता येत नाही. पुरुषांच्या स्पर्धा सहाही साधनांवर एकाच वेळेला चालू होतात व सर्वांचे सादरीकरण पूर्ण झाले की ते ते संघ आळीपाळीने दुसऱ्या साधनांवर जातात. ह्याच पद्धतीने स्त्रियांच्याही स्पर्धा घेतल्या जातात.

gymnast must in full and complete control of his body. For the execution of exercises in competition one of the most important concerns in gymnastics is the prerequisite of safty, elegance and flexibillty for an essential performance!"


प्रत्येक साधनावर 'अ' आणि 'ब' अशा पंचांचा संमिश्र गट असला, तरी खेळाडूच्या संचाचे मूल्यांकन मुख्यत्वे ६ पंचांकडून केले जाते. सगळ्यांत जास्त व सगळ्यांत कमी असलेले गुण वगळून व राहिलेल्या चार पंचांच्या गुणांची बेरीज करून आलेल्या संख्येला चारने भागतात. त्यातून जी संख्या येईल ते त्या खेळाडूला मिळालेले गुण समजावेत. प्रत्येक स्पर्धेमध्ये खेळाडूंनी किती कठीण प्रकार करावेत; त्याची जुळणी कशी असावी; केलेल्या चुकांसाठी किती गुण कापावेत इ.नियमांच्या संहितेचे तंतोतंत पालन करून गुणप्रदान केले जाते.

कुठल्याही साधनांवरील कौशल्यांचा संच करत असताना एखादा खेळाडू खाली पडला तर त्याला तीस सेकंदाच्या आत पुन्हा साधनांवर चढून त्याचा आकृतिबंध पूर्ण करता येतो,पण त्यासाठी ०.५०गुणांची वजावट होते. खेळाडूने केलेल्या तांत्रिक चुकांसाठी गुणांचे सर्वसाधारण वर्गीकरण पुढीलप्रमाणे असते–

**२) ऱ्हिदमिक (तालबद्ध) जिम्नॅस्टिक्स्**

ह्या स्पर्धात पुढीलप्रमाणे पाच सामने असतात:–

१) हूप्स् (प्लॅस्टिकची गोल कडी)
२) रबरी चेंडू
३) इंडियन क्लब्स्




**उमलणं आणि फुलणं यात बरंच अंतर आहे; उमलणं अगदी स्वाभाविक आहे, फुलणं त्यानंतर आहे.**

४) रिबन्स

५) स्किपिंग रोप्स

नृत्यमय पदन्यास, लालित्यपूर्ण नाजूक हालचाली, विविध प्रकारच्या उड्या, तालबद्ध व्यायामप्रकार ह्यांचा एक क्रमबद्ध आकृतिबंध वरील साधनांच्या साहाय्याने स्त्रियांना पार्श्वसंगीतावर करावा लागतो. त्यामध्ये विविध पद्धतीने साधन हवेत उंच फेकून ते वैविध्यपूर्ण हालचालींनी पुन्हा झेलणे, ह्याला अनन्यसाधारण महत्त्व असते.

कलात्मक सौंदर्याबरोबरच सर्व खेळाचा मूलाधार म्हणूनही जिम्नॅस्टिक्सचे एक आगळेच महत्व आहे.

सुसंवाद, सामर्थ्य, चिकाटी, धैर्य, लवचिकता, शारीरिक व मानसिक संतुलन, अवकाशभान, शरीरांवर संपूर्ण नियंत्रण इ. कितीतरी गुणांची वाढ ह्या खेळातील वैविध्यपूर्ण हालचालींमुळे होऊ शकते. उदा. ॲथलेटिक्स्मधील बांबूवरील उडी (पोलजंप) हे कौशल्यांतील सारखेपण आहे. ''फॉस्बरी फ्लूप'' (उंच उडी) म्हणजे जिम्नॅस्टिक्समधील ''फ्लिपबॅक'' च आहे. ड्रायव्हिंगमधील सर्व कौशल्ये जिम्नॅस्टिक्समधील ॲक्रोबॅटिक्सचेच प्रकार आहेत. म्हणजेच हवेतील विविध कोलांट्या आणि त्यातील शरीराभोवती घेतलेले वळसेच नाहीत का? सिंक्रोनायझिंग स्विमिंग म्हणजे जमिनीवरील विविध कसरतींचे, सुंदर-सुंदर आकारांचे आकृतिबंधच आहेत. कबड्डीमधील हनुमान उडी, आसनांमधील लवचिकता; बॅडमिन्टन टेनिसमधील अचानक घ्यावी लागणारी झेप म्हणजे ''लंजिंग मूव्हमेन्टस्'' इ. कितीतरी उदाहरणे देता येतील. त्याचा जास्त विस्तार न करता रशियन तज्ज्ञ व्हि बेलिकोव्ह (V.Belyakov) ह्यांचे पुढील उल्लेख फारच बोलके आहेत. ते म्हणतात :- "No athlete can do without gymnastics. No matter what sports he excels. Gymnastic exercises sometimes called Auxiliary gymnastics are a compulsory element of the training in football, swimming, tennis, skating, cycling, track and field, welght lifting, boxing and so forth. These Auxiliary gymnastics help the athlete to acquire litheness and teach him body control".

आज ह्या खेळात रशिया, रूमानिया, चीन, बेलारूस, जपान, कोरिया, अमेरिका, युक्रेन, जर्मनी इ. राष्ट्रांचे



वर्चस्व आहे. त्यामानाने आपला दर्जा अगदीच सुमार असला, तरी महाराष्ट्रातील काही खेळाडूंनी आंतरराष्ट्रीय निमंत्रित स्पर्धांमध्ये, राष्ट्रीय स्पर्धांमध्ये चांगली कामगिरी केलेली आहे. उदा. अलाहाबादचा विकास पांडे, महाराष्ट्रातील महेन्द्र चेंबूरकर, मानसी टोपकर, अजित जरांडे, झंवर भगिनी, तृप्ती दळवी, मानवेन्द्र व पवन हे भोईर बंधू, संजीवनी करंदीकर, जयश्री बापट, सविता जोशी, मुक्ता भिडे, इ.खेळाडूंना घडविण्यामागे मुंबईच्या समर्थ व्यायाम शाळेचे उदय देशपांडे, पवनपुत्र व्यायामशाळेचे सुहास पाठारे, दीपक सुर्वे, महेश साटम, पुण्याचे महाराष्ट्र व्यायाम मंडळ, सन्मित्र संघ, मुक्तांगण, औरंगाबादचे मराठवाडा सांस्कृतिक मंडळ व तेथील शिक्षक मकरंद जोशी मुलुंड जिमखाना तसेच भारतीय प्राधिकरण व महाराष्ट्र शासनाच्या प्रशिक्षकांचा वाटा फार मोठा आहे. भविष्यात हे प्रयत्न वर्धिष्णू होतील असे वाटते.

••

**मोरेश्वर गुर्जर**

३२/१, प्लॉट क्र.१०, एरंडवणे, पुणे ४

१९९० च्या युरोपियन चँपियनशिपमध्ये तीन सुवर्णपदके; ९० च्या ''गुडविल गेम्स'' मध्ये तीन सुवर्णपदके; ९०च्या जागतिक चषकस्पर्धेत एक सुवर्ण, एक रौप्यपदक, ९१ च्या जागतिक स्पर्धेत एक सुवर्ण, तीन रौप्यपदके, १९९२ जागतिक स्पर्धेत दोन सुवर्ण एक रौप्य १९९२ च्या युरोपियन स्पर्धेत दोन सुवर्ण, तीन रौप्य आणि एक कास्यपदक मिळवून ह्या सर्वांवर सोन्याचा कळस म्हणजे १९९२ च्या बासिलोना ऑलिंपिक्समध्ये सांघिक-वैयक्तिक आणि पॉमल हॉर्स, रिंग्ज,व्हॉल्टिंग हॉर्स आणि पॅरलल बार्स् अशा साधनस्पर्धेत-म्हणजेच सर्व तऱ्हेच्या स्पर्धेत सहा सुवर्णपदके मिळविणारा बेलारूसचा 'व्हिटॅली शेरबो' म्हणजे जिम्नॅस्टिक्स जगतातील एक महान आश्चर्यकारक घटना आहे!

# लिहिण्याला पर्याय नाही!

**मंगला गोडबोले**

**''आपण बुवा वर्गात, शाळेत पहिल्या नंबरावर येण्याच्या लायकीचे आहोत– फक्त लेखी परीक्षा नसली तर...शाळेत सारखासारखा माझाच पहिला नंबर येऊ नये, इतरांनाही संधी मिळावी म्हणून हा प्रस्ताव मान्य झाला नसावा. कारण शाळेतल्या जवळजवळ सगळ्याच मुलामुलींची हीच इच्छा आहे–माझ्याइतकाच नव्हे, तर कदाचित जास्तच लिहिण्याचा कंटाळा इतरांनाही आहे.''लेखनाविषयी इतका कंटाळा असूनही आपण मोठेपणी चक्क व्यावसायिक लेखिका झालो. हे सांगत असतानाच 'लिहिण्याला पर्याय नाही'हे आपल्या खुसखुशीत भाषेत पटवून देताहेत मंगला गोडबोले.**

**मी** शाळकरी वयात होते तेव्हा निबंधासाठी,वक्तृत्वस्पर्धेसाठी 'जर...तर..'चे विषय देण्याची फॅशन होती.

उदाहरणार्थ–

मला पंख असते तर...

पडका किल्ला बोलू लागला तर...

आई संपावर गेली तर...

आठवड्यामध्ये रविवार नसता तर...

असल्या अनेक विषयांवर मी सक्तीने कल्पनाशक्ती लढवत राहिले. इलाज नव्हता; पण माझ्या मनात खरोखर स्फुरलेला स्थिरावलेला जरतारी विषय एकच असे–

'जर फक्त तोंडी परीक्षा असेल तर...'

किंवा फार तर 'जर लेखी परीक्षा रद्द झाली तर...'

तोंडी परीक्षा हा माझा बालेकिल्ला होता. पहिल्यापासून शरीराचा सर्वात बळकट अवयव एकच– तो म्हणजे तोंड, त्याचा दुहेरी वापर सतत चालू ठेवायचा. कधी खाण्यासाठी, कधी बोलण्यरासाठी. हात–पाय दमत, तोंड कधी दमत नसे. ते बिचारं जागेपणी चालूच. कधीकधी झोपेतही. अशा या मजबूत तोंडाला तोंडी परीक्षेची भीती का वाटावी? पाठांतर चोख असे, आवाज बरा होता, (पुढे मुलांवर ओरडून–ओरडून तो बिघडला असं ती म्हणतात) वाचलेलं लक्षात राहण्याची कुवतही बरी होती. तेव्हा धडाधडा म्हणून टाकणं, सांगून टाकणं ह्यात कसलीच अडचण नव्हती. लेखी परीक्षा म्हणजे फारच कटकट असे. चौथीपर्यंत आम्हाला दौत आणि टाक वापरावा लागे. ह्या टाकानं कायम माझा काटा काढला.ती तिरकी बाकं, अगोदरच्या विद्यार्थ्यांनी त्याच्यावर कोरलेले शिलालेख, ती दौतीची सांडलवंड, ते टाकाचं, नीबचं सारखं बदलणारं हृदय,त्या शाईचा कमी–जास्त पातळपणा असे असंख्य शत्रू लेखी परीक्षेला दंड थोपटून उभे असत. लिहितालिहिता जीव मेटाकुटीला येई. डोक्यामध्ये–मनामध्ये सगळं काही तयार आहे–फक्त कागदावर उतरवण्याचा वैताग आहे असं वाटे. आपण बुवा वर्गात, शाळेत पहिल्या नंबरावर येणाच्या लायकीचे आहोत. फक्त लेखी परीक्षा नसती तर...किंवा फक्त तोंडी परीक्षाच असती तर...

शाळेत सारखासारखा माझाच पहिला नंबर येऊ नये, इतरांनाही संधी मिळावी म्हणून हा प्रस्ताव मान्य झाला नसावा. पुढे माझ्या हेही लक्षात आलं की, शाळेतल्या जवळजवळ प्रत्येक मुलामुलीची हीच इच्छा आहे.माझ्या इतकाच इतरही सर्वांना लिहिण्याचा कंटाळा आहे. कदाचित जास्तच. लिहून माझी फक्त बोटं किंवा मनगट किंवा हात दुखायचा; पण आणखी कोणाकोणाचं तर लिहून पोटही दुखल्याचं ऐकायला मिळालं. माझ्या एका मैत्रिणीच्या पायावरून सायकलचं चाक गेल्यामुळे ती लेखी परीक्षेला आली नव्हती त्यावरून तर माझी

खात्रीच झाली की,लिहिण्यानं पायाला त्रास होत असावा. एकूण लिहिणं म्हणजे सर्व दु:खांचं मूळ आहे.

आयुष्यात कोणा माणसाचं काय होईल सांगता येत नाही. 'पेन इज पेनफुल' असं मानणारी मी पुढे चक्क व्यावसायिक लेखिका झाले. आयुष्यात किती कागद आणि शाई मी नासली असेल कोण जाणे तरीही अजूनही मला लेखन ही कृती त्रासदायकच वाटते. वाचन कसं सुखाचं असावं पलंगावर लोळून वाचावं, चिवडा खातखात वाचावं, बसमध्ये-गाडीमध्ये उभ्या उभ्या वाचावं, आपल्यापाशी पुस्तक नसेल तर शेजारच्याच्या पुस्तकात नाक घालून वाचावं. वाचून डोळे दुखले ही तक्रार सहसा होत नाही. लिहिण्याचं तसं नाही. आधी धडपणे टेबलखुर्चीवर बसा, पुढ्यात छानसे कागद घ्या. वाकून, मान पाठ एक करून त्यांच्यावर अक्षरं लिहित बसा. अशी अनेक अक्षरं झाली की थोड्या ओळी भरणार. मग लहानसा परिच्छेद होणार, मग संपूर्ण कागद, मग पुरता निबंध किंवा लेख, अशा अनेक लेखांचं एक पुस्तक. हुश्श! माझ्याच जुन्या पुस्तकांकडे अविश्वासानं बघावंसं वाटतं ते उगाच नाही. लेखन म्हणजे केवढा दीर्घोद्योग आहे बरं!

आपलं प्राचीन ज्ञान हे सगळं मौखिकच होतं. लेखनकलेचा विकास होण्यापूर्वीचा तो काळ होता. सगळं ज्ञान गुरूमुखातून शिष्याच्या मुखात यायचं. असंच ते पिढी-दर पिढी चालू राहायचं. कशालाही लेखी शब्दांचा जाच नाही. पण ही झाली त्याची एक बाजू. दुसऱ्या बाजूनं तिथं पुरावा नसणं, दुरुस्ती नसणं, फेरविचार नसणं हे तोटे येत असणारच. छपाईयंत्राचा शोध आला आणि ज्ञानाच्या कक्षा अमर्याद विस्तारल्या. तोवर भूर्जपत्रावर, कापडावर, दगडावर, खलित्यावर, कागदावर अशा प्रकारांनी लेखी शब्द जास्त जास्त सोपा आणि टिकाऊ व्हायला लागले होतेच. छापील रूपात त्याची देवाणघेवाण सोपी झाली.करता करता लेखन हा माणसाचा आयुष्याचा अपरिहार्य भाग झाला. किती? तर सतराव्या शतकात समर्थ रामदासांना 'दिसामजी काहीतरी लिहावे'असं सांगावंसं वाटलं. दौत कशी असावी, तिच्यात मसी (=शाई) केवढी भरावी. कलम कोणतं वापरावं, कागद कसा पुढ्यात घ्यावा अशा सगळ्या गोष्टीबद्दल स्पष्ट सूचना देणारे समास त्यांनी लिहिले.

बिचाऱ्या विद्यार्थ्याचं मात्र मरण ओढवलं. प्रश्नोत्तरं लिहा, टीपा लिहा, निबंध, कल्पनाविस्तार लिहा, शिवाय नुसतं लिहा असंही नाही. शुद्धलेखनाचे नियम पाळून लिहा, चांगल्या अक्षरात लिहा (अक्षरासाठी पाच मार्क राखून ठेवण्यात येतील ही धमकी विसराल का?) विशिष्ट पद्धतीनं किंवा नमुन्यानुसार लिहा. लिहाल तर राहाल. तेव्हा लिहीत राहा, त्याशिवाय शिक्षणातून सुटका नाही. हा छळ पुरेसा वाटला नाही म्हणून की काय, आमच्यावेळी रोज पाच ओळी शुद्धलेखन काढण्याचा फतवा निघाला. प्रत्येक विद्यार्थ्यानं वर्षभर रोज पाच ओळी कशात तरी बघून उतरवून काढायच्या. सुंदर अक्षरात हे तर ओघाने आलंच. रोज जसे दात घासायचे, तोंड धुवायचं, आंघोळ करायची तसंच शुद्धलेखन काढायचं. काही चलाख मुलं पुढच्या चार आठ दिवसांचं शुद्धलेखन सवडीनुसार आधीच उरकून टाकायची. मग शिक्षकही त्याच्यावर आधीच काट मारून टाकायचे. याबाबत एक सर बोलल्याचं आठवतं, ''पुढच्या चार दिवसांचं आज जेवून दाखवणाऱ्या मुलानंच पुढच्या चार दिवसाचं शुद्धलेखन उरकावं. भलत्या गोष्टीत शॉर्ट कट उपयोगाचा नाही!''

सगळ्या काळांमध्ये सगळ्या विद्यार्थ्यांना सगळे शिक्षक 'दुष्ट' वाटतात तसेच आम्हालाही ते सर तेव्हा वाटले असणार. आज विचार केला तर त्या सगळ्या पद्धतीत काही तथ्य आहे असं वाटतं.

खरोखर लिहिण्याला पर्याय आहे का? लिहिणं ही नुसतीच शारीरिक हमाली आहे का?

अलीकडे कोणालाही-कसलाही निरोप पोहवायचा असला तर माणसं पटकन 'फोन करू' असं म्हणतात. 'पत्र पाठवू असं म्हणत नाहीत आणि ते योग्यच आहे. सतत विस्तारत जाणाऱ्या फोनच्या जाळ्याचा उपयोग कोणी का करून घेऊ नये? पण फोनवरचं किती मुद्देसूद असतं आणि किती वेळ अवांतर गप्पामध्ये वाया जातो? शिवाय कित्येकदा फोन बंद केल्यानंतर अर्रर...' हे खरं सांगायचं राहिलंच' असं म्हणण्याची पाळी किती जणांवर येते? तेच चिठ्ठी किंवा पत्र नेमका निरोप नेमक्या भाषेत पोचण्याची केवढी जास्त हमी मिळते? तोंडी निरोप देण्या-घेण्यातून किती घोटाळे, गैरसमज होतात हे आपण सगळेच अनुभवतो.

लेखी शब्द कसा ठाम असतो तोंडी शब्द महा खोडसाळ. मागेपुढे होणार. पुन्हापुन्हा येणार. काही वेळा बोलणारा

एका अर्थानं बोलला तरी ऐकणारा त्याचा वेगळाच अर्थ घेणार. मग त्या अर्थाचे फाटे फुटणार. ह्या सगळ्या पश्चात उपद्व्यापापेक्षा एकदाच पूर्ण विचारांती आपलं म्हणणं लिहून काढलं तर?

ही पूर्ण विचारान्ती लिहिण्याची बाबच खरं तर लेखनातल्या सगळ्या कंटाळ्याच्या मागे असते. 'उचलली जीभ लावली टाळ्याला' म्हणतात तसं 'उचललं पेन लावलं कागदाला' असं करता येत नाही. सुरूवात कुठून करायची हा प्रश्न सतावत कायमच राहतो. सुरूवात मनासारखी झाली तरी मध्येमध्ये गाडी अडते. चांगला शेवट करणं तर मोठं आव्हानच वाटतं. मनापासून लिहायचं असेल तर हात जास्त वापरावा लागत नाही. बुद्धी, विचारशक्ती जास्त वापरावी लागते. त्याचा शीण जास्त येतो. लिहिणारा हात राबू नये म्हणून आपण बुद्धी जास्त राबवतो.

तरीही हे करायला पाहिजे याबाबत माझ्या मनात शंका नाही. बुद्धीची शिस्त, मनाची शिस्त, नेमकेपणा मुद्देसूदपणा,हे गुण अंगी बाळगायचे असले तर लिहिण्याच्या सरावाला पर्याय नाही. मी आकाशवाणीसाठी प्रसंगोपात पुष्कळ लिहिलं. आता आकाशवाणीचा जमाना उरला नाही, तुम्ही लिहिलेलं कोण ऐकलंय, वगैरे शंकाही लोकांनी मला ऐकवल्या.पण खरोखर सांगते माझ्या आकाशवाणीवरच्या लेखनाने 'आकाशवाणीचा' किती फायदा झाला हे मला माहीत नाही. माझा मात्र नक्की फायदा झाला. आपलं एखादं म्हणणं किंवा एखादा मुद्दा बारा, सोळा, किंवा वीस मिनिटांमध्ये मांडायचा असेल, तर त्यातलं प्रत्येक मिनिट काटकसरीनं वापरायला हवं. प्रत्येक शब्द कसा त्याच्या जागी तोच हवा. सुरूवातीला हे जमवायला त्रास पडला. वेळ संपून गेला तरी मुद्दा मागेच राहिला. असेही अनुभव आले; पण हळूहळू लिहिलेल्या शब्दांवर माझी हुकूमत यायला लागली. आता एक मुद्दा दहा मिनिटांपासून एक तासापर्यंत कितीही अवधीमध्ये सारख्याच परिणामकारकपणे मांडण्याबद्दल मला बराच आत्मविश्वास आलेला आहे. लिहिण्याचा, लिहित राहण्याचा 'रियाज'वाया जात नसतो हे मला पूर्णपणे पटलेलं आहे.


टाक-दौतीशी झटापट करण्यात आमचं बालपण गेलं. आताच्या मुलांकडे बॉलपॉईंट, फायबर टिप, वगैरे नवनव्या फॅशनची पेनं असतील. आणखी उच्चभ्रू घरांमधली मुलं कदाचित कॉम्प्युटरवर वर्ड प्रोसेसरवर लिहीत असतील. आम्ही 'श्रीगणेशा' वाले होतो, आता घराघरात रोमन लिपीची आराधना असेल. हे सगळे बाहेरचे बदल झाले. मुलांनी कोणत्याही भाषेत, कोणत्याही माध्यमात, कोणत्याही साधनाने लिहावं-पण लिहावच.

ज्याला आयुष्यात काहीतरी करायचंय, करून दाखवायचंय त्यानं आळस कधीही करू नये. लिहिण्याला पर्याय नाही. मग लिहूनलिहून हात-पाय,पोट-डोकं किंवा काहीही दुखलं तरी चालेल.

••

**मंगला गोडबोले**
७, गीताली, पी.वाय.सी पुणे ४





# प्रभुराम एकटे नाहीत

**म.वि. कोल्हटकर**

**म. वि. कोल्हटकर यांच्या कथेचा नायक सुट्टीत मामाकडे राहायला येतो आणि स्वत:ची करमणूक करून घेण्यासाठी खिडकीचा आश्रय घेतो. खिडकीतून त्याला दिसतात शेजारचे प्रभुराम आजोबा.... नेहमी एकटेच बागेत काम करणारे. पण खरं तर प्रभुराम आजोबा एकटे नाहीत!...**

**मे** महिन्याची सुट्टी सुरू झाली. मी मामाकडे गेलो. मामाचा मुलगा बबन शिबिरासाठी गेला होता. आणखी एक आठवड्यानंतर तो परत येणार होता. त्यामुळे घरात माझ्याबरोबर खेळण्यासाठी कोणीच नव्हते.

मी स्वत:ची करमणूक करून घेण्याचा प्रयत्न केला. टीव्ही बघितला, गोष्टीची पुस्तके वाचली, सापशिडीचा खेळ खेळलो, शेवटी मला कंटाळा आला. मग मी काय केले असेल? मी एक स्टूल घेतले. उंचावर असलेल्या खिडकीत बसलो.

मला खिडकी आवडते. खिडकीमधून रस्त्यातील माणसे दिसतात. त्यांच्या हालचाली पाहणे मला आवडते. त्यांचे चेहरे मी नीट निरखून पाहतो. चेहऱ्यावरून एकेकाचे नाव काय असेल याचा मी अंदाज बांधतो किंवा त्या चेहऱ्याला जुळणारे नाव कोणते ते शोधतो. चेहऱ्यावरून त्या माणसाच्या मनात कोणते विचार चालले असतील याचा तर्क करतो.

त्या दिवशी मी खिडकीत चढलो. बाहेर पाहिले. समोर रस्ता होता. रस्त्यापलिकडे एक छान घर होते. त्या घरात सत्तरी ओलांडलेला एक माणूस होता. तो सतत कामात होता. हा माणूस अगदी एकटा दिसत होता.

मी मामीला विचारले, ''का ग? ते समोरच्या घरातले आजोबा एकटेच आहेत का?

मामी म्हणाली,'होय एकटेच आहेत ते. त्यांची बायको गेल्या वर्षी वारली'.

'ते तुसडे आहेत का ग?'

'छे: मुळीच नाही'.

'मी बोलू का त्यांच्याशी?'

'बोल ना. तू बोललास तर त्यांना बरे वाटेल. स्वभावाने ते भिडस्त आहेत त्यांचं नाव आहे प्रभुराम भगत!

दुसऱ्या दिवशी संकष्टी चतुर्थी होती. तेव्हा मी सकाळी भगत-आजोबांच्या घरी गेलो आणि त्यांना म्हणालो,

'तुमच्या बागेतल्या दुर्वा घेऊ का?'

'हो ऽऽ घे ना' ते हसून म्हणाले.

भगतआजोबा माझ्याबरोबर त्यांच्या परसदारी आले. हिरव्यागार हरळीचीच तजेलदार एकवीस त्रिदले त्यांनी खुडली. त्यांची जुडी बांधली. नंतर कर्दळीच्या पानाचा छानदार द्रोण त्यांनी बनवला. द्रोणात काही जास्वंदीची लाल फुले, चार-दोन मोगऱ्याची टपोरी फुले तसेच दुर्वांची जुडी त्यांनी ठेवली. मग तो शोभिवंत द्रोण त्यांनी माझ्या हातात ठेवला.

भगतआजोबा फार बोलके नाहीत; पण त्यांच्या घरात गेलो हे त्यांना

आवडले होते.

मी खिडकीतून भगतआजोबांच्या हालचाली पाहू लागलो. अर्धी चड्डी आणि बनियन घालून ते सतत कामात असत. झाडलोट, सारवण, बागकाम सगळे काम ते मन लावून करीत होते.

अशीच एकदा सायंकाळ झाली. आजोबांनी पडवीत कंदील लावला. कंदिलाचा प्रकाश अंगणात पडला होता. सिमेंटच्या कट्टयावर भगत आजोबा बसले होते. त्यांनी अंगाभोवती कांबळे लपेटले होते. चेहेऱ्यावरून ते थकलेले दिसत होते. कट्टयाखाली त्यांचा कुत्रा अदबीने बसला होता.

मी रस्ता ओलांडून आजोबांच्या अंगणात गेलो आणि म्हणालो, 'आजोबा येऊ का मी?'

'अरे ये ना. त्यात विचारायचे काय?' भगतआजोबा प्रेमाने म्हणाले. मी आजोबांजवळ कट्टयावर बसलो.

'आजोबा, एकटेच असता तुम्ही? मी विचारले. 'घरात कुण्णी दिसत नाही ते?' मी म्हणालो.

'हा काय समोर मोतीराम आहे. गोठ्यात कपिला आहे. वृंदावनात तुळस आहे. पिंजऱ्यात मिठूराम आहे. बागेत केळ आहे. नारळ आहे. आंबा आहे. मला एकटे राहणे आवडत नाही!'

भगतआजोबा म्हणाले.

अजून पुरता अंधार झाला नव्हता.

आजोबांचा चेहरा मला अंधुकपणे दिसत होता.

मी पाहिले, आजोबांचा चेहेरा उतरला होता. त्यांनी कांबळे लपेटले होते. अधूनमधून ते बारीक कण्हतसुद्धा होते.

मी विचारले, 'आजोबा,तुम्हाला बरे नाही का वाटत?'

आजोबा बळेबळेच हसले आणि म्हणाले, 'तसं काही नाही!'

'मग विव्हळताय का अधूनमधून?'

'चालायचंच. कुठेतरी दुखलं की होतं विव्हळायला?'

'कुठं दुखतंय सांगा ना?'

'पाठीवर!'

'बघू दे मला तुमची पाठ!'मी म्हणालो.

आजोबांनी बरेच आढेवेढे घेतले.

मी अगदी हट्टाला पेटलो, तेव्हा आजोबांचा इलाज चालेना. त्यांनी कांबळे दूर केले पाठ उघडी केली.

त्यांची उघडी पाठ पाहताच मला आश्चर्यांचा धक्का बसला.

आजोबांच्या पाठीवर काळेनिळे कितीतरी व्रण दिसत होते.

'आजोबा, तुम्हाला कोणी मारले का?'

'छे रे, कुणी नाही मारले मला!'

'खूप दुखते का पाठ?'

'तरीही तुम्ही सगळी कामं कशी करता हो?'

'संध्याकाळ झाली की पाठीवरच्या जखमांना जाग येते.'

'आणि दिवसा?'

'दिवसा त्या शांत असतात. संध्याकाळ झाली की त्या जाग्या होतात. कारण, संध्याकाळ झाली की माझ्या मनात त्या सर्व आठवणी गर्दी करतात'

'त्या सर्वांच्या म्हणजे कुणाच्या हो?'

'वाघ, सिंह, अस्वल, असे सर्वजण'

'त्यांनी काय केले?'

'त्यांनी मला खूप बोचकारले.'

'बाप रे. तुम्ही त्यांच्या तावडीत सापडला होता काय? भारीच क्रूर असतात. ते वाघ सिंह!'

'छे: रे. ते प्रेमळ असतात'.

'पण त्यांनी तर तुमच्या पाठीवर जखमा केल्या ना?'

'म्हणून काय झालं?'

'तुम्ही त्यांची शिकार करण्यासाठी गेला होता काय जंगलात?'

'छे: छे'

'मग कुठे भेटले हे वाघ, सिंह तुम्हाला?'

'मी त्यांना आणले पकडून विश्वासघात करून!'

'कुठून?'

'जंगलातून. नुसते आणले नाही त्यांना फसवून, तर त्यांच्या पाठीवर इलेक्टिक चाबकाचे फटकारे पण मी मारीत राहिलो!'

'ते कशासाठी?'

त्यांना वठणीवर आणण्यासाठी. माझ्या मर्जीप्रमाणे त्यांनी खेळ करून दाखवावा यासाठी !

'तुम्ही कोण आजोबा?'

'अरे मी, दि ग्रेट परशुराम माळी सर्कसमध्ये रिंगमास्तर होतो'

'मग या प्राण्यांनी तुमच्या पाठीवर जखमा का केल्या?

'मी त्यांचे स्वातंत्र्य हिरावून घेतले. त्यांचा आहार तोडला. माझ्या तालावर त्यांना नाचवले.'

'वाघ आणि सिंह भारी क्रूर असतात.'

'छे: रे, त्यांच्यासारखे दयाळू प्राणी कुठे मिळणार नाहीत. अरे, शेळीबरोबर एक थाळीत मी वाघोबाला मुकाट्यानं जेवणाची सक्ती केली. वाघोबाचा यापेक्षा अधिक घोर अपमान कोणता असेल? मी त्याला इतके फसवले, इतके छळले पण त्याने कधीही दगाफटका केला नाही. मी रोज सर्कसच्या खेळामधे वाघाच्या

जबड्यात माझी मान देत असे. पण वाघाने माझ्या मानेला दाताचा स्पर्शसुद्धा केला नाही.'

'मग त्याने बोचकारले कधी?'

'सुरूवातीला ते रागावले, चिडले, अगतिक होऊन त्यांनी मला बोचकारले.'

'आता कुठे असतील ते वाघ-सिंह?'

'ते थकून, झिजून, म्हातारे होऊन मरण पावले. पण त्यांचे शाप मला लागले आहेत. सायंकाळ झाली की त्यांचे खोल उसासे मला ऐकू येऊ लागतात. जखमा तडतडतात. मग त्यांचे चेहेरे अंधार होत जातो तसतसे स्पष्ट दिसू लागतात.'

'खरंच दिसतात अजून ते?'

'होय! खरेच दिसतात.त्यांचे डोळे लाचारीने भरलेले. अरे,वाघाने वाघासारखे हिंस्त्रपणे राहायला पाहिजे. त्यांच्या डोळ्यात हताशपणा पाहून मला अस्वस्थ वाटू लागते.'

'तुम्ही त्याला कधीच नाही विसरणार?'

'कधीच नाही. मला माणसापेक्षा वाघ,सिंह,हत्ती ही जनावरे माझे भाऊबंद वाटतात; पण ते रोज सायंकाळी भेटतात.'

'बाकी दिवसभर तुम्ही एकटेच?'

'छे:रे!हा मोतीराम,मिठू, कपिला ही झाडे-माझे कुटुंब लहान नाही!'भगत आजोबा म्हणाले.

अंधार पडला.गारठा वाढला. भगत-आजोबांनी कांबळे घट्ट लपेटले. ते अद्याप कण्हतच होते.

बराच वेळ मला तिथून उठावेसे वाटले नाही.. ●●

**म.वि. कोल्हटकर**

'वैष्णव'१६ जीवनछाया सोसायटी

# शब्द कोडे

शब्दकोडी सोडविण्यात तर मजा असतेच पण ती तयार करायला अधिक मजा येते. जास्त बुद्धी वापरावी लागते. अशा छान, वेगवेगळ्या आकारातील विविध शब्दकोडी तयार करून छात्र प्रबोधनकडे पाठवा !

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | ३ | ■ | ४ | ५ | |
| | ■ | ६ | | ■ | ७ | | ■ |
| | ■ | ८ | | ■ | ९ | | १० |
| ११ | १२ | ■ | ■ | १३ | | ■ | |
| १४ | | | १५ | | ■ | १६ | |
| ■ | | ■ | १७ | | ■ | १८ | |
| १९ | | ■ | २० | | | ■ | ■ |

**आडवे शब्द**

१) लांब चोच असणारा पक्षी
४) भिंतीत खोदून तयार केलेली जागा
६) काळपुरूष
७ ...ची सर नाही असा वाक्प्रयोग वापरला जातो.
८) ...ही धातुपासून तयार केली जाते.
९) शेत, मोकळे मैदान
११) साल, वर्ष
१३) हार, मुलीचे नाव
१४) सुंदरता,मनोहर
१६) दुधापासून बनणारा एक पदार्थ
१७) मनावर ताबा ठेवणे
१८) हा शब्द पुल्लिंगी आहे.
१९) झाडाभोवती बांधलेली बैठक
२०) एका काश्मिरी राजाचे नाव

**उभे शब्द**

१) नक्षीकाम
२) एक हत्यार, शेतीचे अवजार
३) राजा, देव, यांच्या मस्तकावर जे धरले जाते...
४) बांधकामाच्या शुभारंभाचे वेळी ही विधीपूर्वक बसवितात.
५) कोळी होडी चालविणारा
१०) सूर्यकिरण
११) मोत्याचा हार
१२) वंदन
१३) आईची आई
१५) यश देणारी
१६) गाण्यातील लकेर

**- स्वाती ढेकणे**

# सांगा बरं!

१) वाहनांच्या नंबर प्लेटवरील क्रमांक काळे कधी असतात व पांढरे कधी असतात? त्या क्रमांकांवरून वाहनांच्या नोंदणीचे ठिकाण कसे ओळखाल?
२) भातापासून तांदूळ, लाह्या, पोहे, चुरमुरे कसे तयार केले जातात?
३) साध्या पतंगाला एक सरळ काडी व एक वाकलेली काडी असते, असे का करतात? व्यवहारात असे अजून कोठे कोठे आढळते?

# वाचलेच पाहिजे असे काही

## बोक्या सातबंडे भाग १,२,३

**लेखक –**
**दिलीप प्रभावळकर**




**गे**ले काही दिवस दर गुरुवारी साडेसात वाजता दूरदर्शनवरून सादर केली जाणारी 'बोक्या सातबंडे' ही मालिका तुम्ही सर्वजण उत्सुकतेने पाहात असालच. असं काय बरं वैशिष्ट्य आहे या मालिकेत? कुठलीही दूरदर्शन मालिका जेव्हा यशस्वी होते तेव्हा त्याचं अर्ध श्रेय असतं लेखकाचं! मात्र दूरदर्शनवर कथा पाहात असताना विनासायास आनंद मिळत असला तरी मूळ कलाकृती–पुस्तक वाचणं यातील आनंद काही औरच असतो. श्री दिलीप प्रभावळकर हे रंगभूमीवरील ख्यातनाम नट म्हणून आपल्याला परिचित आहेत.तसेच वृत्तपत्रातील सदरांतूनही त्यांची ओळख लेखक म्हणून आपल्याला झाली असेल. पण बोक्या सातबंडे भाग १,२,३ या तीन पुस्तकाच्या रूपात त्यांनी किशोर वयाच्या वाचकांसाठी नव्हे सर्वांसाठीच सुंदर कथांचा खजिना सादर केला आहे.

यापूर्वी भा.रा. भागवतांच्या 'फास्टर फेणे' ने असेच वेड तुम्हाला लावले असेल, चि. वि. जोशींच्या 'चिमणराव गुंड्याभाऊ'च्या कथा वाचताना तुम्ही निखळ विनोदाचा आनंद उपभोगला असेल. पण दिलीप प्रभावळकरांचा मिस्किल मानसपुत्र– 'बोक्या सातबंडे' तुम्हाला अधिक जवळचा वाटेल; कारण तो तुमच्या काळातील, तुमच्या वयाचा मुलगा आहे. आई, बाबा, दादा, आजी यांच्याशी त्याचे खूप मोकळेपणाने संबंध आहेत.'बोक्या'म्हणजे जणू निर्मळ मनाचा नि धाडसी वृत्तीचा तुमचा मित्रच! तो व्रात्य आहे पण वांड नाही. खोडकर आहे पण खोडसाळपणाने उगीचच दुसऱ्याला त्रास देणारा नाही. गरजूंना मदत करणं व ढोंगी माणसांच्या वर्मावर घाला घालणं हा त्याचा धर्म आहे. जणू तुमच्या मनातील सुप्त भावनांचा आविष्कार म्हणजे एकेक कृती! बहुतेक वेळा संकटातून; अग्निदिव्यातून तो सहीसलामत पार पडतो पण कधीकधी फसतोही.

'बोक्या'च्या नावातूनच त्याचं गोंडस व्यक्तिमत्व व्यक्त होतं. घरातील शेंडेफळ म्हणून बोक्या तसा सर्वांचा लाडका–पण केव्हा काय उचापती करेल म्हणून सगळ्यांच्या मनात त्याच्या वागण्याविषयी सतत एक धसका आहे. भाग १ मध्ये एकूण पाच कथा आहेत. त्यातील 'गुप्त खजिन्याचा शोध,' 'दादाचं प्रेमप्रकरण' मध्ये त्याचे उपद्व्याप काहीसे अंगाशी येतात.शेजारच्या 'हंगामे' यांच्याकडे घरकामाला असलेल्या संगीताला ते लोक मारहाण करतात; कामाला जुंपतात हे पाहून बोक्याचा जीव कळवळतो. तिची सुटका करण्यासाठी त्याने योजलेले थरारनाट्य मुळातूनच वाचायला हवे. आपले मित्र, दादा, आई, बाबा,आजी यांच्याशी लाघवाने गोड बोलून हवे ते साध्य करून घेण्यात बोक्या पटाईत आहे. दादाच्या प्रेमप्रकरणात तो मदत करायला जातो आणि घोटाळा करून ठेवतो; दादाचा राग ओढवून घेतो. पण दादाला कॉलेजात सतावणाऱ्या दामलेची फजिती करून त्याची भरपाई करतो.

एखादं छोटसं कुत्र्याचं पिल्लू नाही, तर कमीत कमी मांजरीचं पिल्लू तरी पाळावं असं तुमच्या मनात असतंच की नाही? आता कुणाचे आई बाबा पाळू देत नाहीत ते जाऊ द्या! भाग २ मधील बोक्याचे 'प्राणी पाळण्याचे प्रकरण म्हणजे' धमालच धमाल! नाजूकशा लव्हबर्डस्, माशापासून ते कासव एवढंच काय बिनविषारी हिरवा साप, सुरवंट यांसारखे प्राणी बोक्या घरात आणतो. मग आजीच्या कॉटवरती लपवून ठेवलेल्या खोक्यातून साप पळाल्यावर होणारी धावाधाव यापासून ते शेवटी बाबांच्या परवानगीने त्यांचं भरवलेलं प्रदर्शन–सगळं तुमच्या मनातलं! 'खरी कमाई' करण्यासाठी बोक्याने काढलेल्या

अभिनव कल्पना तितक्याच हृद्यही आहेत. सोसायटीतील कामाला येणाऱ्या बायकांच्या गरीब मुलांना शिकवणं, त्यांची सहल नेणं, – हे वाचताना तुम्हाला वाटेल अरेच्या! खरंच की सुट्टीमध्ये आपणसुद्धा अशा प्रकारचं काम सहज करू शकू.

भाग ३ मध्ये बोक्याचा आजार म्हणजे 'पडू आजारी'... मधलं कौतुक वाट्याला येऊनही बोक्याला मात्र शाळेत जायचं असतं. –का बरं? शिवाजी महाराजांची नीती अवलंबून आपल्या मित्राला आपल्या जागी झोपवून बोक्या कसा पळ काढतो याचे धमाल वर्णन या कथेत आहे. सतत काही ना काही उचापती करणारा बोक्या नेहमी कुणाला तरी मदत करायला धडपडत असतो. आजीची पंच्याहत्तरी साजरी करताना तिला काय आवडतं ते करण्याचा त्याचा अट्टाहास आहे. स्वत: काम करून मिळालेल्या पैशातून आजीच्या वाढदिवशी वर्गातील गरीब मुलांना तो मदत करतो.

असा हा बोक्या–उपद्व्यापी पण लोभस. आई, बाबा, दादा, आजी या प्रत्येकाशी असलेले त्याचे भावसंबंध वेगवेगळ्या पातळीवरचे आहेत. या सर्व कथांमधून अनुषंगाने येणाऱ्या इतर व्यक्तिरेखाही तितक्याच वास्तव आहेत, तारूण्यात पदार्पण करणारा दादा–त्याचा व्यायाम, छान राहण्याची आवड, कविता करण्याची भावुकता, त्याचं प्रेमप्रकरण; असा दादा तुमच्या आमच्या घरात असतोच. आजीची सर्वांशी जवळीक आहे पण तिचं एक खास विश्व आहे. घरातल्या प्रत्येकाच्या हालचालीकडे तिचा एक कान आहे. तिला सगळ्यात सहभागी होण्याची इच्छा आहे. आई–बाबा प्रसंगी रागावणारे पण मनातून प्रेम करणारे!

दिलीप प्रभावळकरांची लेखनशैली मुळात मिश्कील नि खट्याळ आहे. त्यातून बोक्या–सारखी व्यक्तिरेखा रंगवताना त्यांच्या भाषेत, खट्याळपणाला उधाणच येतं. वाचकांना ते खुदकन हसवतात, रिझवतात. प्रसन्न विनोदाचा शिडकावा करीत बोक्याबरोबर आनंदाच्या गावाला घेऊन जातात.

असा हा बोक्या सातबंडे! पुस्तकाचं बाह्यरूप, चित्रही अशी देखणी की कुणीही प्रेमात पडून पुस्तक वाचायला घ्यावं, या पुस्तकाच्या रूपाने मराठी वाङ्मयातील विनोदी कुमार साहित्यात दिलीप प्रभावळकरांनी मोलाची भर घातली आहे.

••

**वर्षा कुलकर्णी**
२२ अ 'मैफल' ९१/३, शिक्षकनगर,
कोथरूड, पुणे ३८.

## एक अभिनव स्पर्धा!

### तुम्हीच लिहा 'पुस्तक–परिचय!'

'छात्र प्रबोधन'च्या अंकात आपण, 'वाचलेच पाहिजे असे काही' मध्ये पुस्तक परिचय वाचत असता. पुस्तकांशी दोस्ती ही आपली आपण करायची असते. पुढे काही पुस्तकांची यादी दिली आहे. त्यामधील कोणतीही २ पुस्तके निवडून त्यांचा प्रत्येकी सुमारे ५०० शब्दांत परिचय करून द्या. रसास्वाद लिहिताना त्याचा वाङ्मय प्रकार, व्यक्तिरेखा, भाषाशैली, कथानक, मांडणी, आशय इ. चा समग्र असा कोणता परिणाम होतो हे मांडायचा प्रयत्न करा. खालील पत्त्यावर आपले लेखन २५ डिसेंबर पूर्वी आमच्यापर्यंत पोहोचले पाहिजे. '**उत्कृष्ट पुस्तक परिचयाला विशेष पारितोषिक मिळेल.**

**पत्ता छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी, ५१० सदाशिव पेठ पुणे ३०**

## पुस्तकांची यादी:

१) झेप–ना.सं.इनामदार
२) झाडाझडती–विश्वास पाटील
३) यक्षाची देणगी– जयंत नारळीकर
४) सूर्यास्त– प्र.के अत्रे
५) उपरा– लक्ष्मण माने
६) नटसम्राट– वि.वा.शिरवाडकर
७) टिळक– आगरकर– विश्राम बेडेकर
८) साहसाच्या जगात–विजय देवधर
९) अंधश्रद्धा प्रश्नचिन्हे– नरेंद्र दाभोळकर
१०) मुंबई दिनांक– अरूण साधू
११) वाघरू–गो. नी. दाण्डेकर
१२) रूटस्– अनु.सिंधू अभ्यंकर
१३) सुदाम्याचे पोहे–श्री.कृ.कोल्हटकर
१४) आभाळवाटांचे प्रवासी
**– किरण पुरंदरे**
१५) एकाकी पूर्वांचल– विनय सहस्त्रबुद्धे
१६) निसर्गायण– दिलीप कुलकर्णी
१७) योद्धा शेतकरी –विजय परूळेकर
१८) माणदेशी माणसं
**– व्यंकटेश माडगूळकर**
१९) बोलगाणी– मंगेश पाडगावकर
२०) झेंडूची फुले –प्र. के. अत्रे

# गुंतवणुकीचा श्रीगणेशा



**डॉ. वसंत पटवर्धन**

**सामान्यत: माणूस हा बचतप्रिय प्राणी आहे. बँक, रोखे, जमीन, सोने, चांदी इ. गुंतवणुकीचे अनेक मार्ग! या सर्व गुंतवणुकींना एक पर्याय आहे–शेअर्स! ही गुंतवणुक म्हणजे नेमके काय, शेअरबाजाराचे व्यवहार कसे चालतात, त्यावर कशाकशाचा परिणाम होतो, शेअर बाजारातील घोटाळे या सगळ्याचा परिचय करून घेऊन शेअर्समधील डोळस गुंतवणूक कशी फायदेशीर ठरते याविषयी ओळख करून देत आहेत, अर्थशास्त्रज्ञ डॉ. वसंत पटवर्धन**

'मनुष्य हा उद्योगशील प्राणी आहे, तो विचार करणारा प्राणी आहे' अशा माणसाच्या अनेक व्याख्या केल्या जातात, पण त्याच्या या उद्यमशीलतेमुळे व विचार करण्याच्या शक्तीमुळेच 'तो भावी काळाचा विचार करणारा व त्यासाठी एक बचत व गुंतवणूक करणारा प्राणी आहे' अशीही त्याची व्याख्या केली जाते.

तसं पाहिलं तर खार, मधमाशा, वगैरेंची उदाहरणे साठवणूक करण्याच्या संदर्भात दिली जातात; पण नजिकच्या भविष्यकाळापुरता व अन्नापुरताच अल्पमुदती साठा हे प्राणी करीत असतात. माणूस पुढे जातो. त्याला प्रपंच जन्मभर करावा लागतो. पक्ष्यांची पिले चार सहा आठवड्यांत उडून गेली की त्यांची जबाबदारी संपते. पण माणसाला कुटुंबाचा व मुलांचा प्रतिपाळ वर्षानुवर्षे करायचा असतो. शिवाय त्यांचं शिक्षण, आजारपण, प्रवास यासाठी खर्च करावा लागतो. चार काटक्यांचं तात्पुरतं घरटं त्याला चालत नाही. राहण्यासाठी जागेला पैसे उभे करावे लागतात. त्यामुळे कमाईची शक्ती आली की, आवश्यक गरजा भागवून उरलेली रक्कम बाजूला काढणे हे प्रत्येकाचे कर्तव्य ठरते.

अशी बचत नुसती बाजूला काढून चालत नाही. केवळ पैसे बाजूला ठेवले तर ते हरवण्याचा धोका असतो. पैसे चोरीला जाऊ शकतात. कुणी उसने मागून परत न करण्याची शक्यता असते. नुसते सुरक्षित ठेवले तरी ते कागद म्हणून कसर खाऊन टाकण्याची, पावसापाण्यात भिजून लगदा झाल्यावर निरुपयोगी ठरण्याचीही शक्यता असते. त्यामुळे ती बचत योग्य रीतीने गुंतवणुकीत परिवर्तनीय करावी लागते.

अशी परिवर्तनीय बचत गुंतवणूक संज्ञेला प्राप्त होत असली,तरी गुंतवणूक जरूर पडेल तेव्हा पुन्हा पैशांत रूपांतरित होणे तितकेच महत्त्वाचे असते. तसेच महागाई ही सतत वाढतच असते. त्यामुळे आज १०० रुपयांना मिळणारी वस्तू जर वर्षाने ११० रुपयांना मिळणार असेल, तर आज वस्तू न घेण्यामुळे, त्याग केल्यामुळे, तोटा कमी होऊ नये, पुन: ती वस्तू निदान घेण्यासाठी १०० रुपयांचे ११० रुपये मिळणार असतील तरच ती गुंतवणूक वाजवी ठरेल. शिवाय वर्षभर त्या वस्तूचा उपभोग न घेण्याच्या त्यागाची काहीतरी किंमत म्हणून ११० रुपयांऐवजी ११५ रुपयांची अपेक्षा बाळगणेही गैर ठरणार नाही. म्हणजे गुंतवणूक करताना मनुष्य सुरक्षितता, स्थैर्य, रूपांतर शक्यता, जिथे गुंतवणूक केली जाईल त्या जागेबद्दची खात्री किंवा रूपांतरासाठी आवश्यक बाजाराचे अस्तित्व व काहीतरी व्याज,फायदा एवढ्या गोष्टींचा विचार करेल हे उघड आहे.जे लोक ते करीत नाहीत ते मूलभूत चूक करीत असतात व त्यामुळे त्यांना पस्तावण्याची पाळीही येते.

गुंतवणुकीत माणसाला होईल तेवढा जास्त फायदा हवा असतो. पण धोका घेतला तरच फायदा होण्याची शक्यता असते. जास्त धोका–जास्त नफा, कमी धोका–कमी नफा हे गुंतवणुकीचं पहिलं तत्त्वज्ञान आहे; पण त्यामुळे लोक नको त्या आमिषालाही बळी पडतात.

रक्कम रोख पैशाचे स्वरूपात ठेवण्याची काळजी घेतली तर ती सुरक्षित, निर्धोक राहील; पण त्यावर

काही व्याज, उत्पन्न सुटणार नाही. तीच रक्कम बँकेतल्या बचत खात्यात ठेवली तर साडेचार टक्के व्याज मिळेल, सुरक्षित राहील. पाहिजे तेव्हा पैशांत तिचं रूपांतर होईल. मुदतठेवीत ठेवली तर मुदतीनंतर आठ ते बारा टक्के व्याज मिळेल; पण मुदत संपेपर्यंत ती काढता येणार नाही. बँकेऐवजी चांगल्या कंपनीत ठेवली तर व्याज चौदा टक्के मिळेल; पण वेळ पडल्यास बँकेच्या मुदतठेवीवर कर्ज काढता येते तसे कंपन्यांतील ठेवीवर कर्ज मिळत नाही. पैसे गुंतले की मुदत संपेपर्यंत मनुष्य अडकून राहतो.

याहीपेक्षा कंपन्यांना इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट बँक, आय.सी.आय सी. आय. अशांसारख्या वित्तसंस्था यांच्या तारण असणाऱ्या रोख्यांमध्ये गुंतवणूक करता येते. याची वेळ पडली तर बाजारात विक्री करता येते; पण रोखे बाजारात पाहिजे तेव्हा विक्री करून पैसे परत मिळू शकतील, इतका हा बाजार अजून प्रगल्भ झालेला नाही. जमिन, इमारती, सोने, चांदी यासारख्या गुंतवणुकीपूर्वी विशद केलेल्या सर्व निकषाला उतरत नाहीत म्हणून त्यांचा विचार करण्याची जरूरी नाही.

या सर्व गुंतवणुकीना आणखी एक पर्याय आहे. तो म्हणजे, कंपन्याच्या भागभांडवलातील समभाग व आता पुन्हा लोकप्रिय होऊ लागलेले अग्रक्रम भाग याचा! या गुंतवणुकीत, नीट पथ्ये पाळली तर सुरक्षितता, रोकड रकमेत रूपांतरासाठी बाजाराची उपलब्धता, भांडवलात वाढ होण्याची शक्यता व दरवर्षी लाभांश मिळण्याची खात्री यामुळे ही गुंतवणूक सर्वांना भावते. आज सुमारे ८००० कंपन्यामध्ये सुमारे एक ते सव्वा कोटी लोकांनी गुंतवणूक केली आहे. ही गुंतवणूक देशातल्या २४ शेअर बाजारात करता येते. त्यांत राष्ट्रीय शेअर बाजार व ओव्हर काऊंटर एक्चेंज ऑफ इंडियाचा समावेश आहे. मुंबई शेअर बाजार व हे दोन्ही बाजार मुंबईत आहेत. उरलेले २२ शेअर बाजार पुणे, इंदूर, दिल्ली, चेन्नई, कलकत्ता, राजकोट, हैद्राबाद अशा विविध ठिकाणी आहेत.

यातील मुंबई बाजारावर एकूण व्यवहारांपैकी ६० टक्के व्यवहार होतो. ज्या शेअर्समध्ये हा व्यवहार होतो. त्यातील महत्त्वाच्या १०० कंपन्या 'अ' गटात घातल्या आहेत व उरलेल्या 'ब' एक व 'ब' दोन अशा गटात समाविष्ट आहेत. अ गटातील १०० कंपन्या पैकी ज्यांचं भांडवल अनेक कोटी रुपये आहे, बाजारभावाने प्रचंड मूल्य होते अशा तीस कंपन्या निवडून त्यांच्या भावावर निर्देशांक ठरवतात. बाजारमूल्यांपैकी सुमारे ४० टक्के मूल्यांचे या कंपन्या प्रतिनिधित्व करतात, म्हणूनच त्यांची निर्देशांक ठरवणाऱ्या कंपन्यात गणना होते. त्यांच्यापैकी प्रत्येकाचे भाव रोज जसे कमी जास्त होतात त्यांच्या बेरजेची पहिल्या ठरवलेल्या दिवसांशी तुलना करून निर्देशांक रोज बदलतो व तो वर्तमानपत्रात प्रसिद्ध होतो. रिलायन्स, टाटा स्टील, हाऊसिंग डेव्हलपमेंट, ए. सी. सी., बी. एस. ई. एस. अशा कंपन्या त्यात आहेत. अमेरिकेत ३० कंपन्यांचा डाउजोन्स नावाचा निर्देशांक आज अनेक वर्षे ठरविला जात आहे, त्यावरून आपल्याकडची ही कल्पना राबवली गेली.

शेअर किंवा रोखे घेतल्यानंतर घेणाऱ्याला एक हस्तांतरण फॉर्म भरून कंपनीकडे आपल्या नावावर ते शेअर्स चढवायला पाठवायला लागतात; पण हल्ली इलेक्ट्रॉनिक ट्रान्सफरची पद्धत अमलात यावी म्हणून डिपॉझिटरीची कल्पना प्रसृत केली आहे. ज्या कंपनीचे शेअर्स प्रथम विक्रीला येत असतात तिथे कंपनी आपले फॉर्म व प्रॉस्पेक्टस् नावाचे माहितीपत्रक अर्जदारांना दलालामार्फत देते. या विक्रीला प्राथमिक बाजार म्हणतात. अशी विक्री अर्जदाराला शेअर्स दिल्यावर पुरी होते. जास्त मागणी आली तर अर्जदाराला सर्व पैसे परत मिळतात किंवा अंशत: शेअर्स व अंशत: रक्कम मिळते. या बाजारातील विक्रीला सार्वजनिक विक्री असे म्हणतात. या विक्रीनंतर आपल्या शेअर्सची नोंद वेगवेगळ्या शेअर बाजारावर करण्यासाठी कंपन्या अर्ज करतात व अशा नोंद झालेल्या शेअर्सची विक्री विक्रेत्याला करता येते व नवीन व्यक्तींना ते घेता येतात. असे व्यवहार नंतर होणाऱ्या बाजाराला दुय्यम बाजार म्हणतात. शेअर्सची विक्री खाजगीरित्या कंपनीने केली तर त्याला प्रायव्हेट प्लेसमेंट म्हणतात.

या सर्व व्यवहारांचे नीट नियमन करण्यासाठी व गुंतवणुकदारांच्या हितसंबंधांचे रक्षण करण्यासाठी सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडियाची (सेबीची) स्थापना १९८८ साली झाली व एक कायदा करून तिला एप्रिल १९९२ पासून व्यापक अधिकार देण्यात आले. बाजारांत दलाल, उपदलाल, मर्चंट बँकर, लीड मॅनेजर, असे अनेक घटक असतात. त्यांच्यासाठी सेबीने नियम घालून दिले आहेत व त्यानुसार त्यांना व्यवहार

करावे लागतात.

शेअरबाजारांत ज्या कंपन्या असतात त्यांच्यावर आर्थिक, राजकीय, आंतरराष्ट्रीय अशा अनेक घटनांचा परिणाम होत असतो. त्या अनुकूल असल्या तर कंपनीची विक्री वाढते, नफा वाढतो व बाजारातल्या त्यांच्या शेअर्सच्या किंमती वाढतात. घटना प्रतिकूल असल्या तर भाव घसरतात. अनेकदा खोट्या अफवांनीही भाव कमीजास्त होतात. त्यामुळे शेअर्समध्ये गुंतवणूक केल्यावर फायदा होण्याची शक्यता असली, तरी गुंतवणूकदाराला अशा घटनांची माहिती घ्यावी लागते, अभ्यास करावा लागतो व त्याप्रमाणे योग्य वेळी खरेदी-विक्री करावी लागते. येरा गबाळाचे ते काम नाही.

शेअर बाजारात लोकांची बचत प्रत्यक्ष अगर युनिट ट्रस्ट, अन्य म्युच्युअल फंड, बँका वैगरे संस्थांद्वारे येत असते. लोकांची बचत वाढली तर बाजारातील गुंतवणूकही वाढेल. पण महागाई वाढली आणि आपल्या गरजा भागविण्यासाठीच जर मिळवलेले उत्पन्न जास्त प्रमाणात खर्च करावे लागले, तर शेअर बाजारात पैसे उपलब्ध होणार नाहीत. शेअरबाजारापेक्षा अन्य ठिकाणी गुंतवणूक केल्यास जास्त व्याज, वा जास्त नफा वा जास्त सुरक्षितता मिळेल असे जरी वाटले, तरी शेअर बाजाराकडे लोक कमी वळतात. शेअर्सचे भाव फार वर गेले तर कोसळण्याची भीती असते. तेव्हा तेजी सतत राहिल्यानंतरही मंदी येते. मध्यंतरी शेअरबाजारात घोटाळे खूप झाले, त्याच वेळी चांगल्या कंपन्यांच्या रोख्यांवरील व्याजाचे दर वाढले त्यावेळी गुंतवणूकदारांचा ओढा या रोखेबाजाराकडे वळला होता.

शेअरबाजारातील घोटाळे अनेक कारणांमुळे होतात. खोट्या नोटांप्रमाणे खोट्या शेअरसर्टिफिकिटांची छपाई करणे व ते बाजारात विकणे, अति लोभामुळे लोकांनी व्यवस्थापन माहीत नसलेल्या कंपन्यांत त्यांनी दाखविलेल्या आमिषांमुळे पैसे घालणे व अशा निशाचर लोकांनी ते पैसे गोळा करून, पोबारा करणे वगैरे कारणे त्यामागे असतात. म्हणून उत्तम सचोटीच्या दलालाची निवड या व्यवहारासाठी करावी लागते.

ज्या कंपनीच्या कारभारात वाढ होण्याची शक्यता असते, जिचे व्यवस्थापन चांगले असते, ज्या कंपनीची निर्यात आहे, संगणक, ऊर्जा अशा भविष्यांत उज्जवल काल असलेल्या धंद्यात जी आहे व जिने कित्येक वर्षे लाभांश दिला आहे, अशी कंपनीच गुंतवणुकीसाठी निवडली म्हणजे बचतीच्या मूळ भांडवलात घट होत नाही. चांगले शेअर्स अनेक वर्षे ठेवले तर बराच फायदा होतो. बजाज ऑटो, टेल्को, रिलायन्स, महिंद्र महिंद्र, हिरो होंडा, अशी काही नावे या संदर्भांत सांगता येतील; पण प्रत्येकाला योग्य गुंतवणूक साधेलच असे नाही. भाव सतत वर जात असतात. त्याला तेजी म्हणतात. भाव कमी होऊ लागले की, बाजारात मंदी आली असे म्हणतात. पण हे रहाटगाडगे सारखे चालू रहाते. तेव्हा गुंतवणूकदाराने अधूनमधून मंदी आली तरी घाबरून चालत नाही. शेअरबाजारातील गुंतवणूक आणि आधी सांगितलेले अन्य गुंतवणुकीचे प्रकार तुमची उत्सुकता चाळवतील अशी खात्री आहे.

••

**डॉ. वसंत पटवर्धन**
'सरस्वती' ३९ डे. जिमखाना
कॅफे गुडलक मागे, पुणे -४



# करून तर बघा

## सॉफ्ट टॉईज–हत्ती

रेखा जोशी


**सॉ**फ्ट टॉईज किंवा कापडापासून बनवलेली मऊ खेळणी लहान मुलांसाठी आपण नेहमी आणतो किंवा कुणाला भेट म्हणून देतो. बाजारात ती वेगवेगळ्या रंगात तसेच प्रकारात मिळतात. ही खेळणी आपण घरीही बनवू शकतो.

हे हत्तीच्या आकाराचे खेळणे बनविण्यासाठी फ्लॅनेलचे प्लेन, कोणत्याही आकर्षक रंगाचे कापड पाव मीटर घ्यावे. शिवण्यासाठी त्याच रंगाचा दोरा व आत भरण्यासाठी कापूस घ्यावा.

प्रथम ज्या आकाराचा हत्ती करावयाचा आहे त्याचे चित्र कागदावर काढून घेऊन कापून घेणे. तसेच कानाचा आकार काढून घेऊन कापून घेणे. हत्तीचा आकार फ्लॅनेच्या कापडावर ठेवून थोडी शिलाई मार्जिन ठेवून आखून घेणे. असे दोन तुकडे आखून व कापून घेणे, कानासाठी चार तुकडे आखून व कापून घेणे.

सर्वप्रथम कानाचा भाग तयार करणे. आकृतीत दाखवल्याप्रमाणे 'अ' पासून 'ब' पर्यंत उलट दिशेने शिवून घेणे व तुटक रेषांचा भाग आत कापूस भरण्यासाठी मोकळा सोडणे. अशा रीतीने शिवून ते भाग उलटवून घेणे. दोन कानाचे आकार तयार झाले की त्यात कापूस भरून हाताने चपटा आकार देणे.

हत्तीच्या शरीराचा भाग कापून त्याला 'क' व 'ड' या तुटक रेषेवर कापून घेणे. या शरीराच्या दोन्ही भागाला कान जोडून घेणे. त्यानंतर हे दोन्ही भाग दोन्ही कान आत येतील असे ठेवून, कडेने उलटी टीप घालून शिवून घेणे, 'य' व 'र' या ठिकाणी कापूस भरण्यासाठी जागा ठेवून देणे व हा भाग उलटून शिवून घेणे. उलटल्यानंतर आत पेन्सिल घालून हत्तीचा सर्व आकार व्यवस्थित झाला आहे की नाही हे पाहून घेणे. त्यानंतर ल, व 'य' या ठिकाणी उलट टीप कापडयाच्याच रंगाच्या दोऱ्याने घालणे, त्यामुळे हत्तीचे पायाचे भाग तयार होतील.आता आत कापूस घालावा.सर्व कोपऱ्यांपर्यंत कापूस व्यवस्थित पोहोचला आहे की नाही हे पाहावे. कापूस भरण्याचे काम पूर्ण झाल्यावर, य, र, या ठिकाणी मोकळी सोडलेली जागा बाहेरून बारीक टाके घालून बंद करावी. जर आवाज करणारे खेळणे हवे असेल तर कापूस भरताना पोटाच्या भागात छोटे खुळखुळ्यासारखे विकत मिळते ते किंवा छोटे घुंगरू घालून घ्यावे. डोळ्यांच्या खुणेवर काळ्या रंगाच्या दोऱ्याने बारीक टाके घालून डोळ्याचा आकार द्यावा. त्याच दोऱ्याने छोटा गोफ करून तो शेपटीच्या जागी शिवून टाकावा. अशा रीतीने हा हत्ती तयार होईल.या खेळण्यासाठी साधा कापूस वापरला तरी चालतो. परंतु ते खेळणे मळले तर धुता येत नाही. यासाठी बाजारात धुता येणारा कापूसही मिळतो. तो थोडा महाग असतो. असा कापूस वापरला तर ते खेळणे खराब झाले तरी साबणाच्या पाण्याने स्वच्छ धुता येते. लहान मुलांनी खेळताना तोंडात घातले तर ते स्वच्छ असलेले चांगले.म्हणून थोडा खर्च आला तरी असा धुता येणारा कापूस वापरा.दिवाळीच्या सुट्टीचा उपयोग करून असे सुंदर खेळणे घरीच तयार करा व बघा, त्यापासून मिळणारा आनंद हा काही वेगळाच असेल.




••


**रेखा जोशी**

अ/६ संगमश्री सोसायटी,
सगंम प्रेससमोर, कोथरूड पुणे २९






अंधाराला आहे प्रकाशाचे भान, प्रकाशामधून येथे विकसतो प्राण.



कामसेना अहमदनगर जवळ मांडवगण येथे येऊन पोहोचली. तेथील एका सरदाराला तिने विचारले
तुमच्या राजाजी विषयी खूप ऐकले आहे. कसे आहेत ते ?
बाईसाहेब, त्यांच्याइतका चतुरस्त्र माणूस शोधून सापडणार नाही. बादशहाची खूप मर्जी आहे त्यांच्यावर.
मांडवगणला निजामशहाने सुंदर उपवन निर्माण केले होते. त्या उपवनातून हिंडत असता कामसेनेच्या मनात विचार आला.
माझ्या गायनानं मी ह्या प्राण्यांना नक्कीच भुलवू शकेन.
कामसेनेने उद्यानात बसून ललत राग आळवायला सुरुवात केली. तिच्या गायनाने नादब्रह्म निर्माण झाले. तिच्या भोवती प्राणी गोळा झाले.
प्राणी जवळ येताच तिने आपल्या अंगावरचे दागिने काढून कोणाच्या गळ्यात तर कोणाच्या शिंगात अडकवले.
आता मी कोतवालाकडे दागिने चोरीला गेल्याची तक्रार करीन. हा प्रकार कोणालाच समजणार नाही.


कामसेना अहमदनगरला आली. तिने तिथल्या कोतवालाकडे तक्रार केली
आपल्या निजामशाहीतून माझे मूल्यवान दागिने चोरीला गेले. दागिने नसतील तर मी बादशहापुढे कशी नाचणार? आजच्या आज चोरीचा तपास लावा.
बाईसाहेब, निश्चिंत रहा. मी आत्ताच तपासाची आज्ञा देतो.
कोतवालाने सैनिकांना आज्ञा दिली, पण चोरीचा तपास लागेना.
कोतवालसाहेब, खूप तपास केला. पण चोर किंवा दागिने सापडत नाही.
अरे बापरे! बादशहाला कळले तर कसं होणार?
निजामशहाच्या कानी हा चोरीचा प्रकार गेला.
आपल्या राज्यात एक नर्तकी अदाकारीसाठी आली आणि तिचे दागिने चोरीला गेले ही नामुष्कीची गोष्ट आहे.
निजामशहाने साबाजीला बोलावून घेतले.
साबाजी, निजामशाहीची अब्रू तुमच्या हातात आहे. कसंही करून ह्या चोरीचा तपास लावा.
आज्ञा, हुजूर!



साबाजी तपास करीत मांडवगण ला आला. तेथील उपवनात हिंडत असता एका हरणाच्या गळ्यात रत्नहार दिसला.
ह्या हरणाच्या गळ्यात रत्नहार! नक्कीच काहीतरी गडबड आहे. ही चोरी नव्हेच. हा बनाव आहे. ही माझी परीक्षा आहे.
साबाजी उपवनात बसला. त्याने शुध्द सारंग राग आळवायला सुरुवात केली. त्या गायनाने मंत्रमुग्ध होऊन प्राणी गोळा झाले.
साबाजीने प्राण्यांच्या अंगावरचे दागिने काढून घेतले.
साबाजी बादशहाकडे आला.
महाराज, हे पहा कामसेनेचे दागिने.
आपल्याला कसे मिळाले?
तिलाच बोलावून घ्या, म्हणजे कळेल.
बादशहाने कामसेनेला बोलावून घेतले.
हेच का आपले दागिने? नीट बघून घ्या.
आपल्याला समजलेच कसे? खूप कत्तल झाली असेल.
कत्तल अजिबात नाही. चोरी केली होती, ती शुध्द सारंगाने पकडली.




कला, क्रीडा, वाङ्मय, समाजसेवा, उद्योग, शेती, इ. विविध क्षेत्रांत उत्तुंग शिखरावर असलेल्या व्यक्तींची जीवने पाहाताना आपल्या मनात नेहमीच उत्सुकता असते. कसं बरं मिळालं असेल हे यश? त्या यशोमंदिराचे चमचमते शिखर आपल्याला भुरळ घालत असते. पण त्याच्यापर्यंत पोहोचण्याची वाट नेहमीच खडतर असते. 'मी असा घडलो' या लेखमालेत काही थोर व्यक्ती स्वत:च्या जडणघडणीचा मनोज्ञ आलेख तुमच्यासाठी रेखाटत आहेत. यातून एक नक्की जाणवतं; की या सर्वांच्या यशामागे कठोर साधना आहे, गुरूंविषयी अपार श्रद्धा आहे आणि जीवनाची सखोल जाण आहे.

जीवनातील अनुभव हेच ज्याचं 'विद्यापीठ' अशा अतिशय संवेदनाक्षम, कविमनाच्या **नारायण सुर्व्यां**ना, तथाकथित सारस्वतांच्या दुनियेत सन्मान मिळण्यापूर्वी जे सोसावं लागलं, त्याची जीवघेणी सल त्यांनी मांडलेल्या प्रसंगातून बोलकी झाली आहे.

एखाद्या नर्तकीची भावमग्न मुद्रा पाहाताना, पदन्यासातील लय अनुभवताना जो अननुभूत आनंद आपल्याला मिळतो, थेट तोच आनंद प्रसिद्ध कथक नर्तिका **रोहिणी भाटे** यांच्या लेखातून आपल्याला मिळेल. रंगभूमीवरील प्रसिद्ध नट **निळू फुले** 'यशस्वी कलावंत होण्यातून हळूहळू प्रगल्भ माणूस कसा झालो?' याचे चित्र आपल्यासमोर उभे करतात.

चित्रकार म्हणून मिळालेल्या आजच्या यशामागे प्रतिभा, परिश्रम याच्याबरोबरच अनेक गुरूंचं पाठबळ आहे, याचा उल्लेख ख्यातमानाम चित्रकार **भय्यासाहेब ओंकार** आवर्जून करतात.

'बॉलबॉयपासून आंतरराष्ट्रीय पातळीवरील दर्जेदार फलंदाज' या आपल्या प्रवासातील कठोर परिश्रमाचे महत्त्व क्रिकेटियर **चंदू बोर्डे** विशद करतात.

वैद्यकीय शिक्षण संपल्यानंतर समाजसेवेच्या आंतरिक प्रेरणेने **डॉ. वागळे** कुर्डुवाडीसारख्या खेड्यात जातात;आपले अवघे जीवन तेथील रुग्णांच्या सेवेत व्यतीत करतात,हा वेगळा अनुभव त्यांच्याच शब्दात वाचू या.

शून्यातून सुरूवात करून आज शेकडो एकर जमिनीत शेतीचे विविध प्रयोग करीत, हिरवे नंदनवन फुलवणाऱ्या **श्री. विश्वास कचरे** यांचा जीवनप्रवास म्हणजे उदंड हिम्मत, अथक परिश्रम, पराकोटीची जिद्द यांचे मूर्तिमंत दर्शन.

'सिंहगडच्या पायथ्याशी असलेल्या एका लहानशा खेड्यात जन्मलेला विद्यार्थी पुढे संस्कृतचा गाढा अभ्यासक बनल्यावरही आपल्या मातीला, लोकांना विसरला नाही, या मागची प्रेरणा कशी मिळाली? हे **प्रा. राम डिंबळे** यांच्याच शब्दात वाचायला हवं.

भावी आयुष्यात कुठल्याही क्षेत्रात गेल्यावर उत्तुंग यश मिळवायचेच ही प्रेरणा या लेखमातून तुम्हांला नक्कीच मिळेल असा विश्वास वाटतो. अशा या अष्टपैलू आठ व्यक्तिमत्वांचा जीवन पट तुमच्या समोर मांडला आहे.

# स्वत:ला रचीत गेलो....



**नारायण सुर्वे**

**मा**झा जीवनप्रवास तसा सहज, सोपा व सरळ नाही. खूप वेडीवाकडी वळणे, त्यातील खाचखळगे व त्यांनाही ओलांडून पुन्हा उभे राहणे असे पदोपदी घडवत, वाढत आणि सर्वांशी स्वत:ला जोडीत, या भारतीय समाजातील एक संस्कारित नागरिक म्हणून सन्मानपूर्वक जगणे फार कष्टाचे असते. त्यासाठी सर्व सोसण्याची आणि अनुभवातून शिकत, कणखर वृत्ती म्हणा किंवा कटुता टाळून जागृत दृष्टिकोन बाणवून वागावे लागते किंवा अगदी काव्यमय भाषेतच सांगायचे, तर स्वत:लाच अनुभवाचा दीप पेटवून त्या प्रकाशात जपून वाटचाल करावी लागते. मी माझ्या 'माझे विद्यापीठ' ह्या कवितेत म्हटलेय,

ना घर होते, ना गणगोत,

चालेन तेवढी पायाखालची
जमीन होती.
दुकानांचे आडोसे होते,
मोफत नगरपालिकेची
फुटपाथ खुलीच होती.

असे आयुष्य लाभलेला, या वाटेवरील मी एक प्रवासी.

माणूस केवळ जगतो हे तितकेसे खरे नाही, तर तो अनेक अंगाने जगत असतो.कडू-गोड अनुभवाची शिदोरी सोबत वागवित असतो. तो विचार करणारा असल्यामुळे स्वाभाविकच व्यक्तिगत पातळीवर, राजकीय किंवा सामाजिक पातळीवरील आणि लिहिणारा असला तर वाङ्मयीन व्यवहारातल्या विविध घटना किंवा तत्सम घडामोडीही त्याच्या वाट्याला येतच असतात.माणसाजवळ स्वत:चा विचार व जिद्द आणि चिवटपणा असला, तर सर्व दिशाहीन म्हणा किंवा आशा- निराशेच्या क्षणीही सावरण्याची अंगभूत शक्तीही निर्माण होते. चांगले ते स्वीकारण्याची व वाईट ते फेकून देण्याची तयारी मनापाशी असली, की बरेचसे काम सुकर होते. उत्तम हे नेहमीच थोडे असणार व निकृष्ट म्हणा किंवा खोट्या प्रवृत्ती आसपास नेहमीच वावरणार अथवा सदैव नाही तरी बऱ्याचदा अशाच प्रवृत्ती आपणाला तापदायक होत राहणार; याची पूर्ण कल्पना मनाशी बाळगून, स्वत:ला नीटपणे घडवायचे आहे, बदलायचे आहे व स्वत:पुढील भविष्याला अर्थ देत जगायचे आहे याचे डोळस भान व समतोल विचार असला की, तेवढ्या आधारावर सावरता येते.

म्हणून माझ्या साहित्यिक जीवनातले, कवी अथवा लेखक म्हणून नावारूपाला येण्यापूर्वीचा व नावारूपाला आल्यानंतरचा एक अनुभव सांगतो. मोठेच गमतीदार व मला स्वत:ला उद्‌बोधक वाटणारे हे अनुभव आहेत. माझ्या विविधांगी व सर्वस्पर्शी असे जगण्यातले शेकडो अनुभव मजपाशी आहेत.

तर त्यातली ही एक मला घडवणारी हकिकत:

१९५६ साली मी 'डोंगरी शेत माझं ग'हे लोकगीत लिहिले. तेव्हा मी मुंबई महानगरपालिकेत शिपायाची नोकरी करीत होतो. आता शाळेतील शिपाई असे न म्हणता 'सेवक' असे म्हटले जाते, हे बरेच झाले.

१९५६ साल म्हणजे 'संयुक्त महाराष्ट्र' चळवळीचा ऐतिहासिक कालखंड. महाराष्ट्रातील बहुसंख्य मराठी विभाग व एकूणएक मराठी माणूस ह्या आंदोलनाभोवती जोडला गेला होता. सेवकाची नोकरी करीत असूनही मीदेखील या चळवळीशी संबंधित होतो. जिथे चळवळ तिथे मराठी माणूस हे मी अनुभवीत होतो. महाराष्ट्रशाहीर अमरशेख यांचे शाहिरी पथक हे या चळवळीचे एक अंगभूत भाग झाल्यासारखेच होते. शाहिरांची डफावर थाप पडल्याशिवाय कोणतीही जाहीर सभा सुरूच होत नसे, असा हा वैभवशाली कालखंड होता.

'डोंगरी शेत' हे माझे गाणे शाहीर अमरशेखांनी शेकडो सभांतून गाऊन लोकप्रिय केले होते. या दरम्यान मी आणखी काही गाणी व कविताही लिहिल्या. आचार्य अत्रे यांच्या 'नवयुग' साप्ताहिकातही काही कविता तेव्हा प्रकाशितही झाल्या होत्या. त्यातली 'दोन दिवस' ही एक माझी कविता पुढे अनेक वर्षे १० वी साठी मराठी पाठ्यपुस्तकात समाविष्ट करण्यात आली. थोडेसे प्रसिद्धीचे बळ मिळूनही माझे स्वत:च्या लेखनाविषयी समाधान नसे. आजही नाही. तरीही तेव्हाचा माझा 'नवखा कवी' म्हणून आरंभ असल्याने मला अधिकच अस्वस्थ वाटे व छंदशास्त्र अथवा साहित्यशास्त्र आपण समजावून घेतले पाहिजे, त्याशिवाय काही खरे नाही असे सारखे वाटत राही. म्हणून मी एक दिवस माझा मित्र शंकर पवार याच्यासह मुंबई मराठी साहित्य संघाच्या दारावर जाऊन उभा राहिलो. आम्ही दोघेही नवखेच होतो. मुंबईच्या साहित्यसंघातर्फे प्राज्ञ, विशारद व आचार्य अशा पदव्यांचे वर्ग चालत आणि त्याविषयीच्या जाहिरातीही वर्तमानपत्रातही येत असत.

मी फक्त चौथी इयत्ता पास झालेला व शंकर पवार ५ वी इयत्ता; परंतु साहित्याविषयीचे प्रेम व लिहिण्याची आवड असल्याने अधिक ज्ञान मिळविले पाहिजे ही त्यामागील भूमिका होती.

तेव्हा मुंबई मराठी साहित्य संघाची कचेरी गिरगावातल्या केळेवाडीत एका बंगल्यात होती. आजच्या थियेटरसारखी प्रचंड इमारत असे काही तिथे नव्हते. अंदाजे १९५८-५९ चा हा कालखंड असावा.

पांढरी खादीची टोपी, धोतर व पांढरा झब्बा घातलेले एक गृहस्थ कचेरीत बसले होते. गोरेपान, उंचेले आणि तगडे असे गृहस्थ होते. आम्ही १ दोघेही बाबळटासारखे बिचकत त्यांच्या पुढ्यात जाऊन उभा राहिलो. एकतर आम्हा दोघांचे खडबडीत चेहरे,



काळासावळा वर्ण व अपरिचित माणसे म्हणून की काय ते बसल्या जागेवरून ओरडले,

''कोण पाहिजे?''

''साहित्य संघाची कचेरी हीच का?''

''नाहीतर तुम्हाला गोदाम वाटले की काय ?''

तीच व्यक्ती.

आम्ही दोघेही ओशाळलो. गडबडून गेलो. मोठ्या श्रद्धेने व आशेने गेलो होतो आम्ही आणि उत्तर तर असे मिळालेले.

''हं- बोला काय हवेय?' पुन्हा तीच व्यक्ती.''

''इथे प्राज्ञ, विशारदचे वर्ग चालतात ना? त्या वर्गात आम्हाला प्रवेश हवा आहे''. मी धिटाईने म्हणालो.

''अस्सं तुमचे शिक्षण किती?

''माझे इयत्ता ४थी पर्यंत'' मी.

''माझे पाचवी इयत्ता शंकर पवार.

''काय? ४थी ५ वी? ह्य!'' करीत अंगावरचे झुरळ झटकून टाकावे तसे करीत ते पुढे म्हणाले,''म्हणजे याचा अर्थ असा की तुम्हा दोघांनाही व्याकरण येत नाही. स्वत:ची सही तरी करता येते का तुम्हाला नीट? ज्यांना व्याकरण येत नाही. त्यांना साहित्यशास्त्र काय डोंबलाचे कळणार? प्रवेश मिळणार नाही जा तुम्ही!''

हे ऐकल्यावर आम्ही दोघांनी तिथून पळ काढला. पुढे कित्येक वर्षे मी त्या बंगलीकडे फिरकलोच नाही.

आज शंकर पवार आमच्यात नाही. उत्तम वाचणारा, साहित्याची आवड असणारा आणि मुंबई महापालिकेत चतुर्थश्रेणीत काम करणारा दलित तरूण होता तो.

मी मात्र हटलो नाही. माझ्यातला चिवटपणा आणि जिद्द, जी तत्कालीन संयुक्त महाराष्ट्राच्या व डाव्या चळवळीच्या प्रेरणेने अधिक बळकट झाली होतो, तीच मला लाभदायक ठरली.

तेव्हा मुंबई मराठी साहित्य संघाचे अध्यक्ष प्रा.न.र. फाटक होते. ते रुईया कॉलेजात मराठीचे प्राध्यापक, उत्तम वक्ते व प्रकांडपडित आणि इतिहास-संशोधक म्हणून त्यांचा मोठा लौकिक होता. त्यांची व्याख्याने मी आवर्जून ऐकत असे. खूपच तर्कशुद्ध आणि धारदार बोलत ते. त्यांना माझे 'डोंगरी शेत' हे गाणे आवडले होते व एका जाहीर सभेत त्यांनी माझे कौतुकही केले होते. शाहीर अमरशेख तेव्हा 'युगदीप' हे मासिक काढायचे व त्यांच्या संपादक मंडळात मीही होतो. आणि आमचे काका म्हणजे प्रा.न.र. फाटक हे त्या मसिकाचे सल्लागार होते. त्यामुळे त्यांचा व माझा पूर्वपरिचय होताच आणि त्यांच्याच सूचनेवरून आपणाला साहित्य संघात प्रवेश मिळेल या आशेनेच मी गेलो होतो.

''तुम्हाला व्याकरण येत नाही?'' या वाक्यानेच मी पेटून गेलो होतो, अस्वस्थ होतो व स्वत:च्या दळभद्री आयुष्याबद्दल संतापलो होतो.

एक दिवस प्रा.न.र. फाटक यांच्या गिरगावातल्या घरी त्यांच्या दाराशी जाऊन उभा राहिलो. ते घरीच होते. त्यांची लिहिण्याची खोली ग्रंथांनी भरलेली होती. मला पाहताच ते उठले. म्हणाले, ''नारायणा- बस.घेतलास का प्रवेश साहित्यसंघात?''

मी काही क्षण गप्प राहिलो. नंतर म्हणालो, ''नाही. ते म्हणतात, तुला व्याकरण येत नाही. आणि जर व्याकरणच येत नाही तर प्रवेश मिळणार नाही.''

''काय म्हणतात? व्याकरण येत नाही तुला? जो उत्तम गाणी आणि कविता लिहितो त्याला व्याकरण येत नाही? थांब''. म्हणतच त्यांनी साहित्यसंघात फोन लावला. फोन लागला. साहित्य संघातून जी व्यक्ती बोलत होती त्या व्यक्तीवर ते संतापले. ''त्याला व्याकरण येत नाही तर ते शिकवा. नगरपालिकेतला एक चपराशी तुमच्याकडे शिकण्यासाठी प्रवेश मागतो आणि तुम्ही त्याला नकार देता? त्यापेक्षा ते मराठीचे वर्गच बंद करा!'' म्हणतच काकांनी खणकन फोन खाली ठेवला. एक नि:स्पृह आणि वृद्ध प्रकांडपंडित किती संतापू शकतो हे मी पहिल्यांदाच अनुभवीत होतो. मी थरारलो.

बाळू- त्यांचा मुलगा- त्याला म्हणाले. ''बाळू, एक कप चहा टाकायला सांग- नारायणा बैस'' आणि ते घुम्मसे घुश्यातच धुमसत राहिले. म्हणाले, ''पुढल्या आठवड्यात असाच ये घरी सकाळचा. मी तुझ्यासाठी कॉलेजातून पुस्तके आणून ठेवतो. ते देतील प्रवेश तुला.''

मी चहा घेऊन तिथून निसटलो व बाहेर आल्यावर रस्त्यावरच दहा मिनिटे भ्रमिष्टासारखा उभा राहिलो. मनात म्हटले,''नारायणा- हा अनुभव बघ आणि संघातला अनुभव बघ. तुला या सर्वच फुफाट्यातून जायचे आहे.''

नंतर पुढल्या आठवड्यात त्यांच्या

घरी मी गेलो तो त्यांना 'नकार' सांगायला. माझा शिकण्याचा उत्साहच मावळला होता. माझा निश्चय पक्का झाला होता.

मला बघताच 'ये, बैस' म्हणाले. ''ही पुस्तके घे- वह्या घेशील ना? नाहीतर वह्यांसाठी पैसे देतो.''मला काय बोलावे हेच कळेना. मी हतबुद्ध झालो. दहा मिनिटे काहीच बोललो नाही. पुन्हा त्यांनी मला हटकले.

''का रे? गप्प का?''

''नाही काका, मी परत त्या दिशेने जाणार नाही. मी स्वत:च शिकेन. तुमची नुसती व्याख्याने ऐकली तरी मी समृद्ध होईन!'' हे ऐकताच ते माझ्यावर एकदा धबधबा कोसळावा तसे कोसळले, संतापले. तरीही त्यांच्या त्या संतापण्यात एक प्रेमाचा व आत्मीयतेचा धागा होता. त्यांनी माझी निर्भत्सना केली, तरीही त्यात वडील रागवावेत तशी प्रेमाची कळकळही होती, पोटतिडीक होती.

मी त्यांच्या पायाला स्पर्श केला आणि तरातरा बाहेर आलो. त्यांचा कणवेने भारावलेला चेहरा बघून मी अधिकच व्याकूळ झालो. ते माझ्याकडे पाहाताच उभे राहिले.

पुढे घटना कशा विलक्षण घडतात त्याही पाहण्यासारख्या,विचार करण्यासारख्या आहेत. मी त्यांचा अर्थ 'प्रारब्ध' असा लावणार नाही.प्रारब्ध असेल तर ते नेहमीच आमच्याच वाट्याला का? असा प्रश्न उरतोच. तर तसे नाही आणि मी देखील नशिबावर विसंबून राहणारा माणूस नाही. माझेपाशी विचार होता, दृष्टिकोन होता, नीरक्षीरविवेक होता. १९६२साली अभिनव प्रकाशनातर्फे माझा पहिला काव्यसंग्रह 'ऐसा गा मी ब्रम्ह!' या नावाने प्रकाशित झाला व या संग्रहास लगेचच पुढील वर्षी – म्हणजे १९६३ मध्ये महाराष्ट्र राज्याचा 'केशवसुत' पुरस्कार मिळाला.

लगेचच पुढच्या वर्षी- म्हणजे १९६४ साली मुंबई मराठी साहित्य संघातर्फे परळच्या शिरोडकर हायस्कूलच्या सभागृहात प्राज्ञ, विशारद व आचार्य परीक्षांच्या पुरस्कारवितरण समारंभात प्रमुख पाहुणा होतो. ज्यांनी 'तुम्हाला व्याकरण येत नाही!' म्हणून प्रवेश नाकारला होता तेच त्या समारंभाचे अध्यक्ष होते.

याही पुढची एक विलक्षण घटना म्हणजे १९६६ साली माझा दुसरा कवितासंग्रह 'माझे विद्यापीठ' या नावाने पॉप्युलर प्रकाशनाने प्रकाशित केला व तो 'अखिल भारतीय साहित्य महामंडळाने' आचार्य परीक्षेसाठी पांच वर्षांसाठी नेमला. ज्याला व्याकरण येत नाही, त्या माणसाचा!

परंतु याही पुढची आणखीही एक विलक्षण घटना म्हणजे 'न भूतो न भविष्यती' असे म्हणावी अशी. ती घटना म्हणजे समग्र महाराष्ट्रातील विद्वन्मान्य मंडळीनी १९९५ साली परभणी येथे झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचा अध्यक्ष म्हणून मोठ्या प्रेमाने मला निवडून दिले. अगदी प्रचंड बहुमताने आणि परभणी येथील साहित्य संमेलनास जमलेल्यर जनसमुदायाने 'अपूर्व अन् अद्‌भुत असा सोहळा' अनुभवला.

प्रवृत्ती श्रेष्ठ की कार्य श्रेष्ठ?

व्याकरण श्रेष्ठ ? की साहित्य?

हे ओळखण्याइतका विवेक मजपाशी होता. समोरच्या वास्तवानेच मला हे शिकविले होते- भान दिले होते.

म्हणूनच मी माझ्यापुरता एक लहानसा सिद्धांत बनविला तो म्हणजे, समोरचे वास्तव, परिस्थिती वाच; त्यात जगणाऱ्या व लढणाऱ्या माणसांची मानसिकता, अगतिकता आणि बंड लक्षात घे आणि नंतर वेळ फावलाच तर पुस्तके वाच. 'माणसाइतका पवित्र शब्द शब्दकोशात दुसरा कोणताही नाही, असे जे म्हणालो त्याचे कारणही हेच. त्याचा इतिहासही हाच.

अनुभव कविता घडवितो असे म्हणतात, त्यातीलच एक माझी कविता अशी

### स्वत:ला रचीत गेलो

आकाशाच्या मुद्रेवर
अवलंबून राहिलो नाही
उगीच कुणाला
सलाम ठोकणे जमलेच नाही.
पैगंबर खूप भेटलेत;
हेही काही खोटे नाही.
स्वत:लाही उगीचच
हात जोडताना पाहिले नाही.
वावरलो हरेकांत
हरेकांना दिसू आलोच नाही
आम्ही असे कसे ?
असा प्रश्न स्वत:लाही केला नाही.
कळप करून ब्रह्मांडात हंबरत हिंडलो
नाही.
स्वत:लाच रचीत गेलो;
ही सवय गेलीच नाही.

**– श्री. नारायण सुर्वे**
बी ३४, आदर्श वसंत बहार,
सहार रोड, जीवनविकास केंद्राजवळ,
अंधेरी (पू.) मुंबई ६९.





# मी अशी घडले...

**रोहिणी भाटे**

'**मी** अशी घडले' म्हणण्यापेक्षा मी अशी 'घडत आहे' असे म्हणणे मला अधिक अर्थपूर्ण आणि सयुक्तिक वाटते...कारण कोणतीही व्यक्ती आपल्या कार्यक्षेत्रातून अगदी निवृत्त झाली, तरी 'घडायची' थांबत नसते, अशी माझी धारणा आहे... 'घडण्याची' दिशा बदलू शकते, वेग बदलू शकतो आणि घडण्याची जाणीव कमी अधिक जागरूक किंवा साक्षेपी होऊ शकते...

मी 'नर्तकी' व्हायचे काही मुद्दाम ठरविले नव्हते; तसेच पुढील आयुष्यात कोण व्हायला आवडेल हेही वाढतेपणी माझ्या मनात पक्के ठरलेले नव्हते. कोणताही छंद लावून घ्यायला, तो वाढवायाला किंवा जोपासायला घरातून मुळीच आडकाठी नव्हती, उलट प्रोत्साहनच होते; पण एकच अट होती... जे करायचे ते आवडीने केले पाहिजे, ते निभावण्याची तयारी पाहिजे. कितीही प्रयास पडले तरी मग मागेपुढे पहायचे नाही, कच खायची नाही आणि त्या निवडलेल्या क्षेत्रात खोलवर घुसायचे! त्याला पार लावण्याचा ध्यास धरायचा! माझ्या बहीण-भावंडापैकी माझ्यासारख्या दोलायमान वृत्तीचे, स्वभावाचे, आणखी कोणीच नव्हते; त्यामुळे त्यांच्यापैकी प्रत्येकाने आपाआपले क्षेत्र चटकन् निवडले आणि आपल्या उद्दिष्टांप्रत यशस्वीपणाने जाता येईल असा अभ्यासाचा मार्ग स्वीकारून वेगाने प्रवास सुरू केला.

मी आपली कितीतरी वर्षे अधान्तरीच! मनात यायचे, इंजिनियर व्हावे का? नाहीतर संस्कृतची अध्यापिका? थोरली बहीण म्हणायची.. म्हणायची काय, सुनवायची! आज्ञा करायची, तुला डॉक्टरच झाले पाहिजे...' अर्थात् तिच्या आवाजाहून मोठा आवाज काढणे शक्यच नसल्याने डॉक्टर होण्याच्या इराद्याने मी फर्ग्युसन कॉलेजमध्ये विज्ञानशाखेत नाव घातले.

गणित, पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र, प्राणिशास्त्र नि वनस्पतीशास्त्र याशिवाय इंग्रजी आणि जर्मन या भाषा हे सर्वच विषय मला आवडायचे, 'इंटरेस्टिंग' वाटयचे. सर्व विषयात मला गती होती. तरी पण भाषा विषय अधिक आवडायचे आणि रसायनशास्त्राचे प्रयोग करायला मजा वाटायची. इतके असूनदेखील प्रथम वर्ष संपतासंपता वाटायला लागले की, हे काही खरे नाही! डॉक्टर नाही, आपण इंजिनियर व्हायचे! आणि लगेच लागलेल्या सुट्टीत मी प्रगत गणिताच्या वर्गात नाव नोंदवून आले. सुट्टी संपायला आली, तसा माझ्या डोक्यात पुन: एकदा गोंधळ उडालेला असून, विचारांमध्ये अनिश्चितता आली आहे, ते माझ्या आईच्या लक्षात आले आणि माझ्या भविष्याबद्दलचा काही निर्णय असा घाईने न करता, तिने निश्चयाने माझे नाव विज्ञानशाखेकडून बदलून घेऊन

कला शाखेत दाखल केले आणि पुढचा विचार घाईने करावा लागू नये,असा निवान्त अवधी मला मिळवून दिला!

या अवधीत 'नृत्या'शी झालेली माझी जुजबी ओळख अशी ना तशी, थोडी गाढ होत गेली आणि मी इतर सर्वमान्य व्यवसायांचा विचार बाजूला सारून 'नर्तकी' होण्याचा धाडसी निर्णय घेतला! अर्थात हा निर्णय विलक्षणच होता.एका ऊर्मीने मी तो घेतला होता. ५०/६० वर्षांपूर्वीच्या त्या सनातनी विचारांच्या काळात ते एकप्रकारे 'पाप'च समजले जात होते. शिवाय निवडलेला मार्ग अपरिचित होता. नर्तकी व्हायचे, म्हणजे नक्की कोण व्हायचे नृत्य शिकायचे कसे, कुठे? संभाजी पुलाच्या शहराबाहेरील बाजूच्या टोकाशी किंवा पायथ्याशी चार- दोन वर्षे अलीकडे - पलीकडे सुरू झालेला तथाकथित नृत्यवर्ग म्हणजे थातुरमातूर काहीतरी होते. बस्! एवढे भान मला त्याकाळीसुद्धा अंतरातूनच आले होते. अस्सल नृत्यकला कुठे शिकायला मिळेल? नृत्यकलेत कौशल्य संपादन करण्यासाठी किती नि कशाप्रकारची मेहनत करावी लागेल? ती मेहनत करण्याएवढी चिकाटी नि आवड आपल्या आपल्या ठायी आहे का? या साऱ्या प्रश्नांची उत्तरे सहजासहजी मिळावीत अशी त्याकाळी समाजाची स्थितीच नव्हती. एवढेच काय, प्रश्न पडावेत, यासाठी आवश्यक असलेली या क्षेत्रातली माहिती असणारी एकही व्यक्ती पुण्यात असणेही असंभवनीय, अकल्पनीय होते!

पण मनात आले आणि निर्णय घेऊन टाकला. मग एखाद्या शिक्षकाचा, गुरूंचा शोध, पुणे - मुंबई नियमित वाऱ्या, अशी मुशाफिरी सुरू झाली. मात्र घरून भरभक्कम आधार आणि निरपेक्ष उत्तेजन मिळत राहिले. थोड्याच दिवसांत एक महत्त्वाचा साक्षात्कार झाला की, मला जे शिकायचे आहे, ते 'कथक' नावाचे उत्तरभारतीय अभिजात नृत्य आहे!

माझे पहिले कथक शिक्षक श्री.मन्नालालजी आणि पहिले नृत्यगुरू पं. मोहनराव कल्याणपूर यांच्या संपर्कात मी आले ती योगायोगाने किंवा नियतीच्या कृपेमुळे म्हणू! कारण त्यांच्या मार्गदर्शनाखाली जो प्रवास सुरू झाला, तो योग्य दिशेने- आणि जे 'घडणे' सुरू झाले ते हाती आलेल्या कच्च्या मालातून योग्य प्रतिमा निर्माण होईल, अशा नृत्यशिक्षणातल्या यथायोग्य अभ्यासक्रमाच्या आधाराने.

इथपर्यंत मोठ्या कष्टाने, हिकमतीने, पुण्यात येणाऱ्याजाणाऱ्या प्रत्येक कलावन्ताकडून शिकून गोळा केलेला नृत्यबोलांचा नि बंदिशी (तथाकथित)चा संग्रह, गुरू मोहनरावांनी, अगदी सुरूवातीच्या धड्यांच्या दरम्यानच फेकून द्यायचे फर्मान काढले! मी हबकलेले! नाही म्हटले तरी १००/१२५ बोल होते ना गोळा झालेले. गुरूजींनी 'ते बोल टाकून दे'म्हटले तरी मी ते पुन: पाहू अशा विचाराने केवळ बाजूला ठेवले आणि त्यानंतर अनेक वर्षांनी गुरूजींच्या ह्या फर्मानाचा खरा अर्थ मला लागला.

बोली भाषेला जसा एक आपल्या विशिष्ट पद्धतीचा डौल असतो, तोल असतो, तसा तो नृत्यबोलांनाही असायला हवा. नृत्यबोलांची भाषासुद्धा आपल्यापरीने विशुद्ध असायला हवी, राखायला हवी. बोलांतून गुंफलेली लयतालांची वीण, त्या बंदिशीच्या पठनातून ऐकू येणाऱ्या नादाच्या चित्रमय विणीशी समांतर नि सजातीय असायला हवी, हे सत्य मला कळले. जसे कळले, जेव्हा कळले, त्या क्षणी माझ्या घडण्याला एक नवीन सुभग आकार मिळाला आणि बुद्धीला लाभला जणू एक तिसरा डोळा..एक नवाच दृष्टिकोण!...

१९६० साली माझ्या नृत्यजीवनात अचानक भाग्योदय झाला आणि गुरू पं.लच्छूमहाराज या लखनौच्या कथकशैलीच्या आचार्यांच्या सहवासाचे एक सुदृढ पर्व सुरू झाले. ते एक नाही दोन नाही दहा वर्षांचे आणि म्हणून माझ्या लेखी एक सुवर्णपर्वच!

या काळात, नृत्याचे मुख्य साधन जो मानवी देह, त्याची जणु माझी नव्याने ओळख झाली! म्हणजे माझा देह, माझे स्वत:चे शरीर काही मला नवे नव्हते; पण त्या शरीराच्याद्वारे मी निर्माण करत असलेल्या आकाराचे, आकृतिबंधाचे, स्थितीचे,गतींचे आणि त्याचे कलात्मक नियोजन करणाऱ्या काळाचे- तालाचे नि लयीचे भान मला समग्र आणि अचूकपणे येऊ लागले. नृत्य 'करण्याचे' हळूहळू नृत्य 'होण्यात' संक्रमण व्हायला लागल्याचे निश्चितपणे लक्षात आले. 'घडण्यात आता ठोसपणा किंचितसुध्दा राहिला नाही! विचारात आणि आचारात आता सूक्ष्मतेची पक्की धारणा झाली. सर्व अंगकृती भावपूर्ण, लयबद्ध, सहज, अकृत्रिम होऊ लागल्या आणि सार्थ तालालयीचे सर्व

खेळ अचूक, नियामक आणि तरीही उत्सफूर्त, स्वच्छन्द होत गेले आणि हस्तलाघव, हस्तभाषेचा वापर तर साऱ्या अर्थान्तरांचा अर्क निजोडच, जणु काही छोट्याशाच एक दोन आविर्भावात थेट सिद्ध होऊ शकणारे नृत्यचित्र! असे माझे 'घडणे' भराला येत असतानाच...

पं. लच्छूमहाराज लखनौला त्यांच्या जन्मस्थानी-उर्वरित जीवन व्यतीत करण्यासाठी आणि तिथल्या थांबलेल्या नृत्यचळवळीला जाग आणण्यासाठी मुंबई सोडून गेले आणि माझे सोनेरी पर्व अंशत: संपले. कारण त्यानंतर मुंबईत पं. मोहनरावांचा आधार थोडीच वर्षे होता.

पं.लच्छूमहाराजांचा दहा वर्षांचा सहवास माझ्या मन-बुद्धीला अभिनयाच्या क्षेत्रात अशी चालना देऊन गेला.

आपल्या शरीरातल्या अणुरेणूंची जाणीव ठेवत नृत्यातूनच चैतन्याच्या विलासांचे दर्शन घडविण्याचे कसब असे काही मनावर बिंबित झाले, की आजदेखील त्यांचे माझ्या जीवनातले 'असणे', अस्तित्व मला जाणवते आहे. पं.मोहनरावांचे मार्गदर्शन तर याही पुढच्या काळात चालू होते. त्यांनी स्पष्ट करून दिलेल्या कथकच्या तंत्रमंत्राचा कलाव्यवहारात अनेक तऱ्हांनी, अनेक दिशांनी उपयोग करीत असताना साऱ्या पैलूंची समजपूर्वक व्यवस्था लावणे सुरूच होते.

१९८५ पर्यंत मात्र माझ्या उभय गुरुवर्यांचे निधन झाले आणि मनाला कमालीचे पोरकेपण आले. आता माझे 'घडणे' कायमचे थांबले असेच मला वाटले. तेवढ्यात आतूनच एक नवीन भान, एक नवीन आदेश आला. मी नृत्य शिकायला सुरूवात केल्यापासून नियमित शिकवीतही होते. गुरूंकडून 'घडत' होते आणि शिष्यांना 'घडवीत' ही होते. कळत, नकळत! आता गुरूद्वयांच्या पाठीमागे त्या 'घडविण्याच्या' प्रक्रियेचाच 'घडण्याला' आधार मिळाला; या प्रयासातूनच 'शिकणं' आणि 'शिकवणं', 'घडणं' आणि 'घडविणं', या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत असेही लक्षात आले आणि मी विश्रब्ध झाले, निवांत झाले.



आज 'अशी' मी घडत आहे,
....घडविण्यातून!

••

**रोहिणी भाटे**
वृंदावन सोसायटी, एरंडवणा, पुणे ४

# कलावंत होता... होता...

**निळू फुले**



**मु**लांनो,

'मी असा घडलो!' ह्या लेखमालेसाठी हा लेख लिहिताना माझा भूतकाळ मी आठवू लागलो आणि खरोखर मी स्वत:च चक्रावून गेलो.कारण तो माझा लहानपणचा काळ आणि आजचा काळ ह्याचा विचार करताना जाणवते की, केवढा प्रचंड बदल झाला आहे- माणसांच्या राहणीमानात. पोशाख- खाणेपिणे किती बदलले आहे. महत्त्वाचे म्हणजे माणसाच्या आचारविचारात केवढा बदल झाला आहे!

मी लहानाचा मोठा झालो तो खडकमाळ आळी म्हणून स्वारगेटला लागून असलेला एक गावठाण भाग. पुण्याचा पूर्व भाग.ह्या भागात माझ्या लहानपणी रस्ते डांबरी झालेले नव्हते, बससेवा (पी.एम.टी.) सुरू झालेली नव्हती. टांगे आणि बैलगाड्या दिसायच्या.

गावठाण्यातली सर्व घरे मातीचीच होती. हिंदू-मुस्लीम-ख्रिश्चन असा मिश्र वस्तीचा विभाग.अगदी गरीब घरात एखादी शेळी असायची आणि जरा बऱ्या घरात एखादी गाय किंवा म्हैस असायची. एखाददुसरा अपवाद वगळता प्रत्येक घरात ५/६ मुले असायची-कमाल १०/१२ मुले. माझ्या घरात आम्ही सर्व बहिणभाऊ



एखादा राग असा फुलावा अनंताला जाऊन भिडावा.

मिळून ११ जण होतो. आळीतले लोक क्रिकेटची टीम म्हणायचे. ह्या वस्तीच्या जरा दूरवर दलितांच्या झोपड्या असायच्या. नवराबायको-५/६ मुले आणि त्या मुलांच्या आजाआजी अशी मिळून १०/१२ मंडळी त्या छोट्याशा झोपडीत राहायची. ती लहान मुले टमरेल घेऊन रस्त्यावरच प्रातर्विधीसाठी बसलेली असायची. म्युन्सिपाल्टीच्या झाडूवाल्या त्यांचा रोज उद्धार करायच्या. अशा वातावरणात मी लहानाचा मोठा झालो.

ते दिवस होते स्वातंत्र्यचळवळीचे. रोज प्रभातफेऱ्या निघायच्या, झेंडावंदने व्हायची. सभा व्हायच्या. आम्हा मुलांना त्यातले सारे नीट कळत नव्हते; पण आम्ही उत्साहाने त्यात भाग घ्यायचो.

एका संध्याकाळी वाड्यात मुलांची, तरुणांची एक बैठक बोलावली गेली. विषय होता, राष्ट्रसेवा दलाची शाखा काढण्याबाबत. श्री. अप्पा मायदेव आणि लालजी कुलकर्णी असे दोन कॉलेज विद्यार्थी सायकलीवरून त्या बैठकीला आले होते. मधु निरफराके, चंदू बोराटे, फत्तू परदेशी, श.बा. शिंदे अशी माझी सौंगडी मंडळी जमली होती. त्या बैठकीत ठरले की शाळा सुटल्यानंतर संध्या. ६ वा. घोरपडे पेठेतल्या खड्डा पटांगण ह्या मैदानात रोज जमायचे आम्ही न चुकता तिथे जाऊ लागलो. कबड्डी, खोखो, लंगडी असे मैदानी खेळ असायचे. अधूनमधून प्रा. ग. प्र. प्रधान, प्रा.केळकर, भाई वैद्य, यदुनाथ थत्ते, राजा मंगळवेढेकर गोष्टी सांगायला यायचे. इंदूताई केळकर, लीलाधर हेगडे, वसंत बापट ही मंडळी गाणी शिकवायला यायची.

नंतर आम्ही मित्रमंडळींनी मधु निरफराकेलिखित एक लहानसं प्रहसन बसवलं. आमच्या परिसरातल्या गल्लोगल्ली त्यांचे प्रयोग केले. सावकार शेतकऱ्यांना कसे पिळतात असा विषय होता त्या प्रहसनाचा. ह्या प्रहसनाच्या प्रयोगाने एक काम केले, की आमच्यातली पब्लिकची भीती घालविली. आम्ही सभाधीट झालो. पुढे मग पुणे शहर सेवादलाचे कलापथक निघाले. 'पुढारी पाहिजे'- ले.पु.ल.देशपांडे 'बिनबियाचे झाड', 'कुणाचा कुणाला मेळ नाही' ले.व्यंकटेश माडगूळकर ह्या लोकनाट्याचे अक्षरश: हजारो प्रयोग आम्ही केले. पुण्यामध्ये गणेशोत्सवात सर्व गल्लोगल्ली हे कार्यक्रम आम्ही केले. हळूहळू पुण्याबाहेर निरनिराळ्या साखर कारखान्यांतून गणेशोत्सवात आम्हाला मागणी येऊ लागली. ५/६ हजार लोकांसमोर कार्यक्रम व्हायचे. प्रयोग संपल्यावर शाळकरी मुले-मुली माझ्या सह्या घेऊ लागली आणि माझ्या लक्षात आले की,'आपण स्टार झालो आहोत'.

प्रा.प्रधानसर इंग्रजी भाषेतल्या उत्तमोत्तम साहित्याची ओळख करून देत होते. शिवाजी मराठा हायस्कुलात शांता शेळके आम्हाला शिक्षिका होत्या. त्या इंग्रजी, फ्रेंच, रशियन भाषेतल्या अनुवादित कथा ऐकवत होत्या. पु.ल.देशपांडे, ग.दि. माडगूळकर, व्यंकटेश माडगूकर, साने गुरूजी, जयवंत दळवी, भाई वैद्य, बाबा आढाव, राजा मंगळवेढेकर, सुधा वर्दे, आवाबेन देशपांडे, प्रमिला दंडवते, कमल पाध्ये अशा जाणत्या लोकांच्या सहवासात- साहित्याची, संगीताची नृत्य- नाट्य ह्या माध्यमांची जाण वाढत होती. राष्ट्रसेवा दलाचे कलापथक हीच आमची सांस्कृतिक शाळा झाली. त्या शाळेने आम्हाला चहुअंगाने समृद्ध केले. आमच्या आयुष्यातल्या राजकीय- सामाजिक- सांस्कृतिक ज्ञानाची पायाभरणी ह्या शाळेने केली. मी ह्या समाजाचा एक घटक आहे. ह्या समाजाचे मी काही देणेघेणे लागतो. हा विचार ह्याच शाळेने मनात पक्का केला. अंधश्रद्धा निर्मूलन समिती, भ्रष्टाचार निर्मूलन समिती, सामाजिक कृतज्ञता निधी ह्या संस्थातून काम करताना हीच बांधिलकीची भावना मनात असते.

आणखी एक फार महत्त्वाची गोष्ट ह्या शाळेने शिकविली. ती म्हणजे, कुठल्याही माणसांशी वादविवाद करताना त्याचे म्हणणे सविस्तरपणे, कुठलेही पूर्वग्रह मनात न ठेवता ऐकून घेणे. विचारांवर- बुद्धीवर कुठलेही झापड न बांधून घेणे. सर्वांचे ऐकू या- पण विचार आपल्या बुद्धीच्या निकषावर घासून घेतल्याशिवाय तो विचार ग्राह्य धरायचा नाही. त्यामुळे अनेक पराकोटीचे मतभेद असूनसुद्धा अनेक जाति-धर्मातल्या अनेक राजकीय- सामाजिक संघटनातल्या मंडळीशी माझा संवाद होऊ शकतो. यशस्वी कलावंत होण्यातून हळूहळू समृद्ध- प्रगल्भ माणूस होत जाणे ही प्रक्रिया कायम राहिली असा हा प्रवास आहे.

मुलांनो, तुम्हांला हे सगळं सांगताना स्वत:लाच एकदा पुन्हा तपासून बघण्याची संधी छात्र प्रबोधनच्या संपादकांनी मला दिली, त्याबद्दल त्यांना मन:पूर्वक धन्यवाद! ••

**निळू फुले**
'सोनाई, आनंदनगर पौड रस्ता, पुणे ३८


# ‘शिव’ सौंदर्याचा उपासक

**भय्यासाहेब ओंकार**

**मी** अडीच वर्षांचा असताना काढलेले एक पेन्सिलीचे चित्र माझ्या वडिलांनी त्यांच्या डायरीत चिकटवून ठेवले आहे व त्याबद्दल ‘‘भय्यानी काढलेले पहिले चित्र’’अशी नोंद केली आहे.हे चित्र मोराचे आहे. खरे म्हटले तर तो एक साधा पक्षी आहे. फक्त त्याच्या डोक्यावर तुरा दाखवल्याने त्यास मोर म्हणायचे. चित्र साधारण असले तरी या पक्षाच्या पायाखाली जमिनीवर छायेच्या ज्या रेषा मारल्या आहेत. त्यात माझे चित्रकारपण दडलेले आहे असे मला वाटते.

सुमारे पासष्ट वर्षापूवीचा हा काळ; पण त्या काळातही मी चित्रकार व्हावे असे माझ्या वडिलांना वाटे. वडील स्वत: न्यायाधीश होते, चित्रकार नव्हते. आई मात्र देवापुढे हौसेने निरनिराळ्या रांगोळ्या काढी. चित्रकलेची आवड मला तिच्याकडून आली असावी.

प्रथमपासून वडिलांनी माझ्या चित्रकलेला प्रोत्साहन दिले. त्यांच्या बैठकीच्या खोलीत मोठी सतरंजी अंथरलेली असे. त्यावर चित्रे





काढण्यासाठी त्यांनी मला खडूची पेटी आणून दिली होती व चित्र पुसून टाकण्यासाठी ब्रश दिला होता.

मला चित्रकला शिकवण्यासाठी खास शिक्षक ठेवले होते. अगदी आरंभी थोत्रे नावाचे शिक्षक येत. मी डावखुरा असल्याने दोन्ही हाताने सफाईने चित्रे काढी, त्याचे त्यांना कौतुक वाटे.

त्यानंतर मला चित्रकार दिगंबर सखाराम नाईक हे चित्रकला शिकवण्यासाठी ठेवले. ते चित्रपटांच्या वृत्तपत्रातल्या जाहिराती करीत. रविवार पेठेतील बालाजीच्या देवळात सुरेख रांगोळीचे गालिचे काढीत. बंगाली चित्रशैलीत जलरंगात ते अप्रतिम काम करीत. त्यांच्यामुळे माझ्या चित्रकलेची मोठीच प्रगती झाली. शरदचंद्र चटर्जी, प्रेमचंद वगैरे थोर साहित्यिकांच्या साहित्याचे ते अभ्यासक होते. नाईक मास्तरांच्यामुळे मला त्या साहित्याचीही गोडी लागली.

एका सुट्टीत वडिलांनी एक प्रयोग केला. त्यांच्या बैठकीच्या खोलीत



भिंतीवर खालच्या बाजूस एक पट्टी काढून त्यात चौकोन आखून दिले व त्या चौकोनात मला रोज एक चित्र काढण्यास सांगितले. स्वत:च्या बैठकीच्या खोलीचा वापर करू देणारा पालक विरळाच.

सुट्टीत माझी वक्तृवाची तयारी त्यांनी करून घेतली. वाड्यातल्या मुलांना जमवून ते रोज एक विषय देत. ‘शनिवारवाडा’, ‘मी मुख्यमंत्री झालो तर’ असे ते वेगवेगळे विषय असत. दिवसभर आम्ही तयारी करायचो. रात्री वाड्यातले कुटुंबीय व मुले यांची अंगणात बैठक व्हायची. आम्ही भाषणे करायचो. परगावाहून आलेले पाहुणे त्या बैठकीचे अध्यक्षस्थान स्वीकारीत व बैठकीचा समारोप होई.

माझी मावशी काव्यकल्पलता सारजाबाई बापट हिने माझ्या साहित्य गुणाला प्रोत्साहन दिले. तिला काव्याची गोडी असल्याने तिच्या संग्रही अनेक कवितांची पुस्तके होती. मोरोपंत, केशवसुत, गोविंदाग्रज, तुकारामाची गाथा, समर्थ रामदासांचे साहित्य, कवि यशवंतांचे कवितासंग्रह ही पुस्तके मला तर नित्य वाचायला मिळत. त्याशिवाय माझ्यासाठी तिने केतकरांचा ज्ञानकोश व शब्दकोश यांचे भाग आणून दिले होते. माझ्या आवडीच्या अनेक साहित्यिकांची पुस्तके ती माझ्यासाठी मुद्दाम विकत आणून देई. वि.स.खांडेकरांच्या कादंबऱ्या व लघुनिबंध, ना.सी फडके यांच्या कादंबऱ्या, मामा वरेरकरांनी शरदचंद्र चटर्जी यांच्या पुस्तकांची केलेली भाषांतरे, साने गुरूजींची

पुस्तके, सावरकरांचे साहित्य अशा विविध पुस्तकांची माझ्यासाठी खास खरेदी होई. माझ्या लेखनाला याचा पुष्कळ उपयोग झाला. वयाच्या तेराव्या वर्षी मी लिहिलेले 'स्वभावचित्रे' हे माझ्या कुटुंबियांच्या व्यक्तिमत्वाची ओळख करून देणारे छोटे पुस्तक माझ्या मावशीने कौतुकाने छापले होते.

नूतन मराठी विद्यालयाचा मी विद्यार्थी. माझ्यावेळी ना. ग. नारळकर हे मुख्याध्यापक होते. ते चित्रकलेला प्रामुख्याने वाव देत. आमची चित्रे आवर्जून नोटीसबोर्डवर लावली जात. आम्हाला छोटी स्केचबुक्स मोफत देऊन प्रत्यक्ष निसर्गातील गोष्टीचे चित्रण करण्यास प्रोत्साहन मिळे. याच शाळेत चित्रकला विषयासाठी श.शं.घोरपडे पर्यवेक्षक होते. त्यांनी माझ्या कलेला खूप प्रोत्साहन दिले. पुढच्या आयुष्यातही त्यांचे मार्गदर्शन हा माझा अमूल्य ठेवा होता. ह्याच शाळेत व्ही. के. पाटीलसर चित्रकलाशिक्षक होते. त्यांचे ब्लॅकबोर्ड ड्रॉइंग अप्रतिम होते. त्यांच्या रेखाटनाचा माझ्या मनावर परिणाम झाला.

शालेय शिक्षण संपल्यानंतर चित्रकलेचे पुढील शिक्षण घेण्यासाठी मी रानडेज् फाईन आर्ट क्लासेस या संस्थेत दाखल झालो. वा.गो. रानडे, ज.द.गोधळेकर अच्युत घोगले या तीन कलाशिक्षकांच्या सहवासात मी आलो. रानडे जुन्या परंपरेचे पुरस्कर्ते होते, गोंधळेकर हे युरोपातून शिकून आलेले, ते नव्या-जुन्याच्या सीमारेषेवर होते. घोगले हे नवकलेचे चाहते होते. या तीन शिक्षकांच्यात गमतीने होणारे वाद मनोरंजक असत.

ज.द. गोंधळेकरांचा स्टुडिओ क्लासचे जवळच होता. त्या स्टुडिओतही त्यांचे चालणारे चित्रकाम पाहायला मी जाई. त्यांची चित्रकलेवरील इंग्लिश पुस्तकांची लायब्ररी समृद्ध होती. ती पुस्तके मी वाचायला नेई. चित्रकलेवरही विपुल वाङ्मय इंग्रजीत उपलब्ध आहे, हे पाहून मी थक्क झालो. या वाचनातून माझ्यातील कलासमीक्षक घडला.

गोंधळेकर हे एक आदर्श शिक्षक होते. ते आमच्या चित्रावर कधीही दुरूस्ती करीत नसत. चित्राच्या बाजुला करून दाखवीत. व 'हे पटले तर स्वीकारा' असे सांगत. भिंतीवर पडलेल्या पोपड्याच्या जागेभोवती चौकोन आखून त्यात काँपोझिशन पाहण्यास शिकवीत. कधीही कोणाविषयी अनादराचा शब्द नाही, अशा त्यांच्या विनम्र वृत्तीचा माझ्या मनावर परिणाम झाला व विद्यार्थ्यातील आत्मविश्वास वाढविण्याची त्यांची पद्धत मला अनुकरणीय वाटली.

चित्रकार दीनानाथ दलाल यांच्या चित्रांचा मी विलक्षण चाहता होतो.त्यांची अनेक चित्रे मी लायब्ररीतून, जुन्या मासिक पुस्तकांवरून खरेदी केली.त्यांच्या मी नकला केल्या. त्या चित्रांच्या रेषाकृती चारचार वेळा घटवून पाठांतर करावे तसे केले.

योगायोगाने चित्रकार दलालांचा माझ्या वडीलांमुळे परिचय झाला व पुढे तो वाढतच गेला. त्यांच्या स्टुडिओत काम करण्याची संधी मिळाली. चित्र शक्यतो ब्रशने पूर्ण करावयाचे व अखेरचा हात म्हणून स्प्रेगन वापरायची हे त्यांनी शिकविले. त्यांनी काही गुरूमंत्र दिले. त्याचा मला आयुष्यभर उपयोग झाला. ते मंत्र असे

(१) चित्रकार दलालांसारखी चित्रे काढता असे तुम्हास कोणी म्हणाले तर ते भूषण न समजता दूषण समजा. चित्रकार ओंकारांची चित्रे ओंकारांसारखीच निघायला हवीत.

(२) तुम्ही इतर गिऱ्हाईकांसाठी जी चित्रे काढता ती पाहण्यास मी उत्सुक नाही. स्वत:चा 'रियाज' म्हणून जी चित्रे काढाल ती पाहण्यास मी उत्सुक आहे. त्यातच तुमची प्रगती आहे.

(३) गिऱ्हाईकाच्या समाधानाबरोबरच स्वत:चे समाधान होणे अगत्याचे माना.

(४) नवे प्रयोग करण्याकडे प्रवृत्ती ठेवा.

पुढे सातत्याने मी काम करीत राहिलो व कामातूनच माझी प्रगती होत गेली. चित्र नुसते चांगले होऊन भागत नाही, ते छपाईत उतरावे लागते. यासाठी प्रत्यक्ष छापखान्यात जाऊन छपाईतंत्राची मी माहिती करून घेतली.

चित्रकलेचा प्राध्यापक म्हणून एस.एन.डी.टी. कॉलेजात नोकरीला लागल्यावर तिथली कला विभागाची लायब्ररी मी समृद्ध केली. कलेचा इतिहास शिकवताना मी इतरही विषयांची पुस्तके वाचे. उदाहरणार्थ, चित्रकार गोमाने स्पेनच्या राज्यक्रांतीला मदत केली हे वाचल्यावर स्पेनचा त्या काळचा इतिहास समजून घेतला. चित्रकार गॉग ताहिती बेटात गेल्याचे वाचल्यावर मी ताहिती बेटाचा भूगोल समजून घेतला. या अशा अभ्यासाने त्या त्या व्यक्तीचे चौरस जीवन मी विद्यार्थिनींपुढे उभे करू शके. विद्यार्थिनी म्हणत, ''सर, तुम्ही त्या चित्रकारांना भेटून आल्यासारखेच त्यांचे चरित्र

आमच्यापुढे उभे करता.''

आईला मी ग्रॅज्युएट व्हावे असे वाटे. तिचा मृत्यू व्हायाच्या आदल्या दिवशीच मी बी.ए. झाल्याचे आनंददायक वृत्त तिला कळले त्या समाधानात तिने प्राण सोडला. आणि पुढे मी एम.ए.आणि पीएच.डी ही झालो.पीएच.डीसाठी मी मराठी साहित्याच्या ग्रंथसजावटीचा विषय निवडला होता. त्यासाठी मी अनेक लायब्र्यांमधून पुस्तके मिळविली व वाचली. त्यामुळे या विषयाचे माझे ज्ञान समृद्ध झाले.

मी स्वत: पी.एच्.डी झाल्याने पी.एच्डी. चा गाईड म्हणून चांगले मार्गदर्शन करता आले. पाच विद्यार्थिनी माझ्या हाताखाली पी.एच.डी. झाल्या.

माझी आई मला सांगे, ''बाळ, जग ही एक धर्मशाळा आहे.काही काळासाठी आपण इथे वस्ती करतो. या धर्मशाळेला जमले तर रंगरंगोटी कर; पण ते जमले नाही तर इथे निदान घाण तरी करू नकोस!''

ते तिचे म्हणणे जीवनभर पाळले. प्रामणिकपणे काम केले. अश्लील चित्रे काढली नाहीत किंवा दारूच्या जाहिरातीसारखी समाजाला बिघडविणारी चित्रेही निर्माण केली नाहीत. लहान मुलांसाठी विपुल लेखन आणि चित्रे काढली. या गोष्टीचे मला मानसिक समाधान वाटते आहे.

••

**प्रा.डॉ. भय्यासाहेब ओंकार**
प्रभात रोड, गल्ली क्र.९ पुणे ४.



# क्रिकेटच्या माध्यमातून देशसेवा !

**चंदू बोर्डे**



**पं**धरा वर्षे क्रिकेटच्या माध्यमातून देशाची सेवा, जगातील नामवंत संघांविरूद्ध मिळालेली खेळण्याची संधी, आग ओकणाऱ्या तोफखान्यासमोर माझी तळपलेली बॅट, ५५ कसोटीचा अनुभव, तीन हजारांपेक्षा अधिक धावा आणि पाच शतके, अशा माझ्या कारकिर्दीचा आलेख डोळ्यांसमोर आला की माझा क्रिकेट जीवनपट उलगडत जातो. या खेळाने आपल्याला खूप काही दिले, व्यक्ती म्हणून आयुष्यात एक आनंददायी जीवन दिले असे वाटून जाते. मी जेव्हा मागे– म्हणजे पन्नास वर्षांपूर्वीच्या काळाकडे

वळून पाहतो तेव्हा माझ्या डोळ्यांसमोर येतो तो 'बॉलबॉय चंदू'. 'बॉलबॉय' म्हणून क्रिकेटच्या मैदानावर माझा प्रवेश झाला आणि मी घडत गेलो. आंतरराष्ट्रीय पातळीवर एक भरवशाचा, दर्जेदार फलंदाज म्हणून माझी ख्याती झाली. लेगस्पिनर म्हणून नावारूपास आलो. पण या सर्वांच्यामागे प्रामुख्याने आहे ती माझी जिद्द. जिद्द मी अशासाठी म्हणतो की, निराश होणाऱ्या काही घटना घडल्या तरी मी माझ्या निर्धारापासून ढळलो नाही.

मी मोठा क्रिकेटपटू व्हावे अशी काही माझ्या घरची परिस्थिती नव्हती. त्या काळात सर्वसाधारणत: प्रत्येक घर मोठ्या कुटुंबाचे असे. आमचे घरही त्याला अपवाद नव्हते. आम्ही पाच भाऊ, पाच बहिणी आणि आईवडील असे आमचे मोठे कुटुंब होते. त्यात आर्थिक परिस्थिती खूपच बेताची होती. अशा परिस्थितीत तुम्ही कल्पना करू शकता की, क्रिकेटसारख्या खर्चिक खेळाकडे जाणे मला कसे शक्य होते? परंतु माझे नशीब बलवत्तर म्हणून म्हणा, की माझ्यात क्रिकेटची जन्मत: गुणवत्ता होती म्हणून म्हणा, मला संधी मिळाली आणि माझ्या हातात लेदरचा चेंडू आला, बॅट आली आणि पांढऱ्या कपड्यांसह मी चमकू लागलो.

माझा जन्म २१ जुलै १९३४ मधला आणि आज मी ६४ व्या वर्षात पदार्पण केले आहे; परंतु अजूनही मी शारीरिकदृट्या तंदुरूस्त आहे. अजुनही मी शारीरिकदृटया भक्कम आहे, समाधानी आहे. याला कारण म्हणजे क्रिकेटसाठी घेतलेले कठोर परिश्रम. लहानपणी आम्ही भावंडे खेळ खेळायचो, ते ज्यासाठी पैसे लागणार नाहीत असे खेळ. प्रत्येकजण आपापला स्वतंत्र खेळ खेळायचा. प्रत्येकाचे छंदही निराळे होते. माझे बालपण गेले ते विटीदांडू, सुरपारंब्या, आट्यापाट्या, असे खेळ खेळण्यात. आईवडिलांची नजर चुकवून मी विहिरीत पोहायलाही जायचो. त्यामुळे खूप काही व्यायाम व्हायचा. मनही प्रसन्न रहायचे. पतंग उडविण्यातही मी रमून जायचो. आणि त्या सर्व क्रीडा प्रकारात वेळ कसा निघून जायचा ते समजायचेही नाही.एखादा खर्चिक खेळ आपण खेळला पाहिजे असे मनातही यायचे नाही. त्यासाठी पैसे कुठून आणणार हा प्रश्न होताच: स्वाभाविकच क्रिकेट, बॅडमिंटन, टेनिस या खेळाविषयी माझ्या बालमनाला आकर्षण नव्हते; परंतु माझे सुदैव म्हणून मला अनुकूल अशी परिस्थिती निर्माण झाली. त्याचे असे झाले की, माझ्या वडिलांची बदली पुण्याहून वडगावला झाली; पण त्यांनी मला आणि थोरल्या बंधूंना शिक्षणासाठी पुण्यातच चुलत्यांकडे ठेवले. माझे चुलते त्यावेळी क्वार्टरगेट येथे वायएमसीए मध्ये (यंग मेन्स खिश्चिन असोसिएशन) राहत होते. वायएमसीए संस्थेचा खेळासाठी चांगला नावलौकिक होता. त्यावेळी या संस्थेत क्रिकेट, टेनिस, बॅडमिंडन टेबल टेनिस असे श्रीमतांचे खेळ खेळले जात असत. त्यावेळी मी लहान असल्याने संस्थेचे सभासद मला 'बॉलबॉय'ची भूमिका बजावण्यासाठी म्हणजे चेंडू आणून देण्यासाठी बोलवीत; परंतु त्यामुळे मला मोठमोठ्या खेळाडूंचा खेळ पाहण्याची संधी मिळाली. मोठ्या लोकांशी माझा संपर्क येऊ लागला आणि क्रिकेटविषयी मला आकर्षण वाटू लागले. या आकर्षणातूनच मी मोठ्या लोकांच्या खेळाचे अनुकरण करू लागलो. त्यांच्या शैलीचे बारकाईने निरीक्षण करू लागलो.

एखादा लहान मुलगा चेंडू कसा फेकतो यावरून त्याच्यातील गुणवत्ता कळून येते. माझ्याबाबतील तसेच झाले. मला क्रिकेटची इतकी गोडी लागू लागली की, मैदानावर जाऊन सभासद कधी खेळण्याकरता येतात याची वाट पाहू लागलो. मैदानावर लांब उभे राहून चेंडू अडविणे आणि तो फेकणे एवढेच काम मला करावे लागत असले, तरी माझ्या क्षेत्ररक्षणाचा व गोलंदाजीचा पाया तिथे घातला गेला असे मला वाटते.

माझे शिक्षण रास्ता पेठ एज्युकेशन सोसायटीत झाले. गोलंदाजीत माझी चांगली प्रगती होत राहिल्याने मला शाळेच्या ज्युनियर संघात स्थान मिळाले. आणि तिथून माझ्या क्रिकेट कारकिर्दीचा प्रवास सुरू झाला.

बाराव्या वर्षी मी आंतरशालेय स्पर्धेतील पहिला सामना खेळलो. आयुष्यातील पहिला सामना मी कधीच विसरणार नाही. एसएसपीएमएसच्या मैदानावरील त्या सामन्यात मी शतक ठोकले होते आणि म्हणूनच हा सामना माझ्या दृष्टीने अविस्मरणीय होता.

पुढे-म्हणजे वयाच्या सोळाव्या वर्षी नेल्सन कोरे यांच्या संघाकडून पूना क्लबविरूद्ध खेळलो. या सामन्यातही माझी फलंदाजी, गोलंदाजी व क्षेत्ररक्षण या तिन्ही क्षेत्रांत चांगली कामगिरी झाली. त्यावेळी पूना क्लबचे कर्णधार एन.डी. नगरवाला होते. नगरवाला यांना खेळाडूची चांगली पारख. त्यांनी माझा खेळ पाहिला व ते माझ्या

खेळामुळे प्रभावित झाले. त्यामुळे पूना क्लब संघात घ्यावे ही कोरे यांनी केलेली शिफारस त्यांनी ताबडतोब मान्य केली आणि मग पूना क्लबचे मैदान माझे माहेरघरच झाले. या मैदानावर मी रोज संध्याकाळी न चुकता सराव करू लागलो. सरावाच्या वेळी मी माझ्या खेळाचे विश्लेषण करून त्यातून लक्षात येणाऱ्या चुका दुरूस्त करण्यावर भर देऊ लागलो. चुकांची पुनरावृत्ती होणार नाही याची काळजी घेऊ लागलो. तंदुरूस्तीसाठी मी खूप मेहनत घ्यायचो.

रोज सकाळ संध्याकाळ धावण्याच्या व्यायामावर माझा भर राहिला आणि या सर्वाचे फळ मला वयाच्या अठराव्या वर्षीच मिळाले.१९५२ मध्ये रणजी करंडक संघात माझी निवड झाली आणि तिथून माझी कारकीर्द बहरतच गेली.

महाराष्ट्र, बडोदा आणि पुन्हा महाराष्ट्र असा माझा रणजी संघाचा प्रवास होत राहिला.

रणजीत पदार्पण केल्यानंतर अवघ्या तीन वर्षातच मी कसोटीपटू झालो. १९५५ मध्ये भारतीय संघात निवड झाली आणि १९६९-७० च्या हंगामापर्यंत मी कसोटी खेळत राहिलो. या काळात कर्णधारपदही भूषविले. इंग्लड, ऑस्ट्रेलिया, वेस्ट इंडिज, न्यूझीलंड पाकिस्तान आदी देशात या संधीचे चीज केले. हे माझ्या कारकिर्दीतील आकडेवारी पाहिली तर कुणीही सांगेल. १९७३ पर्यंत मी रणजी करंडक स्पर्धेत खेळत होतो. या काळात महाराष्ट्र संघाने अंतिम फेरीपर्यंत मजल मारली होती. रणजी करंडक जिंकण्याची संधी थोडक्यात हुकली होती.

निवृत्तीनंतर मी राष्ट्रीय निवड समितीच्या अध्यक्षपदावर काम केले. माझ्या अध्यक्षपदाच्या कारकिर्दीतच आम्ही निवडलेल्या भारतीय संघाने विश्वकरंडक (१९८३) जिंकला. भारतीय संघाचा व्यवस्थापक म्हणूनही मी काम केलं. अशा या कारकिर्दीने मी एक समाधानी जीवन जगत आहेत.



क्रिकेटला एक वेगळे वलय आहे. आपल्या देशात हा खेळ लोकप्रिय आहे. या खेळात आता पैसाही चांगला मिळतो. आयुष्यात खेळाडू चांगल्या प्रकारे स्थिरावतो. मुख्य म्हणजे या खेळाने शरीरसंपदा लाभते. खिलाडूवृत्ती अंगात भिनली जाते. या खेळामुळे शिस्त येते. लहान वयात या सर्व गोष्टी भिनल्या गेल्यास तुमचा निश्चितपणे विकास होतो. तुम्हालाही या खेळात माझ्याप्रमाणेच यश मिळो यासाठी माझ्यातर्फे शुभेच्छा!


••

**चंदू बोर्डे**
सी/१०३,चॉईस अपार्टमेंट
ढोले पाटील रोड पुणे १

---

# ३२ वर्षांच्या तपश्चर्येचे मनोगत...

**डॉ. अशोक वागळे**



१९८५ च्या १जानेवारीस मी मुंबईतले माझे शिक्षण संपवून व अनुभव मिळवून कुर्डूवाडीत प्रवेश केला. अपुरी साधनसंपत्ती, तुटपुंजे मनुष्यबळ व हॉस्पिटल चालविण्यास लागणाऱ्या इमारतीचा अभाव अशी अनेक आव्हाने स्वीकारून मुंबई सोडली. माझे इतर डॉक्टरमित्र विविध महानगरीच्या प्रकाशझोतात राहिले, वाढले प्रसिद्धीस आले आणि त्यांनी नावलैकिक मिळविला; पण मी कुर्डूवाडीतच राहिलो व येथे एक हॉस्पिटल चालू करण्याचे आव्हान पत्करले. ह्या ३२वर्षाच्या तपश्चर्येचे मनोगत मी आपल्यासमोर उलगडणार आहे.

माणसाचा मानव बनण्यास, संस्कार, शिक्षण व अनुभव अशा त्रिगुणांची उत्कृष्ट जोड असावी लागते.

दगडातून जशी सुबक मूर्ती बनते तसा माणसाचा मानव बनतो तो संस्कारामुळे, मूर्तिकार मूर्ती



फुलारेल माझी कविता वेडावेल, नाचेल, तिलाही जीवनाचे अर्थ शिकवून ठेवलेत.

बनविताना कधी हातोडीचे घाव दगडावर घालतो तर कधी नाजूक कुंचल्याने तो घासतो. त्याचप्रमाणे हळूहळू संस्काराच्या रूपाने माणुसकी मानवात येत असते.

माझ्यावर संस्कार प्रमुखत: आई-बाबा, बंधू, गुरूजी ह्यांच्याकडून झाले. माझा जन्म पुण्याच्या ससून हॉस्पिटल झाला. बाबा ससून हॉस्पिटलमध्ये डॉक्टर बी.जे मेडिकल महाविद्यालयात प्राध्यापक होते, त्याची बदली होत असे. पुण्यानंतर होनावर, येरवडा,कारवार- बेळगाव, सांब्रा अशा ठिकाणी मी आईबाबांच्या सान्निध्यात राहिलो. हॉस्पिटलमध्ये बाबांना तर घरी आईला मी सगळ्या कामात मदत करायचो.

होनावर हे कर्नाटकातील फार सुंदर शहर आहे.शरावती नदी सागराला मिळते त्या ठिकाणी हे शहर वसलेले आहे. बाबांचे हॉस्पिटल टुमदार टेकडीवर होते. त्यांच्या वैद्यकीय व्यवसायाव्यतिरिक्त observatory ची जबाबदारीपण त्यांच्यावर असे. मी त्यावेळी ५ वर्षाचा असेन. त्यांच्याबरोबर उंच शिडीवर चढून जाऊन वाऱ्याची दिशा, वेग,तापमान, हवेतील आर्द्रता, पावसाचे प्रमाण इत्यादी गोष्टींचे मापन करण्यास मी त्यांना मदत करीत असे.

संस्काराने माणसाचा मानव होत असताना शरीर, बुद्धी, मन ह्यांचा विकास होण्यास शिक्षणाचा उपयोग होतो.कारवारला मी प्राथमिक व माध्यमिक शाळांतून शिकलो. ह्याच सुमारास १९४७ साली भारत स्वतंत्र झाला. प्रभात फेऱ्या, संध्याकाळी तिरंगी झेंड्याखाली सेवादलाच्या शाखा भरवून वेगवेगळ्या कार्यक्रमांत भाग घेणे, अनेक पुढारी नेत्यांची भाषणे ऐकणे, रस्ते-गटारे साफ करणे, करमणुकीचे कार्यक्रम राबविणे, आमची शाळा बांधून तयार होत असताना गवंडी, सुतार ह्यांच्या हाताखाली कामे करून हस्तलिखित मासिके चालविणे, खेळांच्या मॅचेसमध्ये भाग घेणे, वक्तृत्वस्पर्धा, निबंधस्पर्धा ह्यांच्यात मनापासून जिंकण्यास उतरणे, ॲथलेटिक्स सफरी, समुद्रातून पोहून जाणे, मासेमारी, कोळी जाळे टाकत असताना त्यांच्या छोट्या नावांतून समुद्रात आतपर्यंत जाणे, तिरंगी झेंडे विकून पैसे जमा करणे, अशा अनेक कार्यक्रमांतून मॅट्रिकपर्यंतची ११ वर्षे कशी संपली हे समजलेसुद्धा नाही. ह्या ११ वर्षांत फक्त पुस्तकी ज्ञानच मिळविले नाही तर आयुष्यात विकासाला जरूर वाटणाऱ्या सर्व गोष्टींचे शिक्षण मिळाले. मुंबईमध्ये १५ वर्षे वैद्यकीय शिक्षण घेतल्यानंतर मी ज्यावेळी कुर्डूवाडीसारख्या अविकसित गावात आलो त्यावेळी ज्या अनेक समस्या समोर उभ्या ठाकल्या, त्यांना समर्थपणे तोंड देण्यास मला ह्या शिक्षणाचा उपयोग झाला.

म.गांधीच्या हत्येनंतर एकाएकी आम्हा विद्यार्थ्यामध्ये विणलेली खादी वापरण्याची चढाओढ सुरू झाली. आपण स्वत: चरख्यावर बसून सूत काढून, त्याची खादी बनवून वापरण्यात आम्हाला धन्यता वाटे. त्यावेळी चरख्याला ५ रूपये पडत; पण ते आम्हाला जड वाटत. अशा वेळी आमच्या शिक्षकांनी आपल्या तुटपुंज्या पगारांतून आमच्या अतृप्त इच्छा पूर्ण करण्यास चरखे विकत घेऊन दिले. हे सर्व चरखे आज नाहीत; पण त्याच्याबद्दल शिक्षकांच्या थोर अंत:करणाची आठवण मनात घर करून आहे.

कारवार येथे शालेय शिक्षण संपवून १९५३ साली महाविद्यालयीन शिक्षणासाठी मुंबईत आलो. निघताना आमच्या गुरूजींनी आम्हांला साश्रू नयनांनी निरोप दिला. हा त्यांच्या आवडत्या शिष्यांचा सन्मान होता.

मी मुंबईत आलो त्यावेळी अंगात एक आखूड चड्डी व हाफ शर्ट असे. त्यावेळी कोकणातून आलेला रामा गडी अशी माझी निर्भत्सना होत असे. मुंबईतल्या श्रेष्ठ, अभ्यासात व खेळात अग्रेसर मानलेल्या सेंट झेविअर्स कॉलेजमध्ये मी प्रवेश घेण्याचे ठरविले.प्रवेशासाठी आवश्यक गुण परीक्षेत मिळालेले होते. फक्त इंग्रजी बोलता येत नव्हते.आपण खेड्यातून आलो आहोत या जाणीवने बुजरेपणा होता.

इंग्रजीत अस्खलित व लांबलांब वाक्ये बोलण्याची सवय ह्या कॉलेजमध्ये पुढे शक्य झाली. सेंट झेविअर्समध्ये सर्व जातीजमातीचे विद्यार्थी असत व मित्र एकमेकांशी इंग्रजीतच बोलत. त्यामुळे माझे इंग्रजी सुधारले. पुढे वैद्यकीय महाविद्यालयामध्ये लिहिणे-वाचणे- बोलणे इंग्रजीमध्येच होणार असल्यामुळे मला फार उपयोगी पडले.जी एस मेडिकल कॉलेजमध्ये मी मॅगेझिनचा संपादक झालो व चांगल्या प्रतीचे इंग्रजी लिहू लागलो.

सेंट झेविअर्सच्या प्राध्यापकांच्या शिकवणीत जी खुबी व प्राविण्य होते तसे मला अन्यत्र कुठे दिसून आले नाही. तेथील दोन वर्षात मी

भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, आणि जीवशास्त्र या विषयांत माझे प्रभुत्व मिळविले. त्यामुळे पुढील मेडिकल कॉलेजमधील मूलभूत शास्त्रांमध्ये मी निपुण झालो.

त्यावेळच्या मुंबईच्या प्रसिद्ध असलेल्या के.इ.एम्. हॉस्पिटल व जी. एस. मेडिकल कॉलेजमध्ये मी प्रवेश मिळविला. शरीररचनाशास्त्र शवविच्छेदन यांचा अभ्यास कंटाळवाणा न मानता मी मनापासून केला. त्यामुळे आजाराची पूर्ण माहिती मिळवून त्यावर मात करणे शक्य होते हे मला पटले होते. Clinical terms सुरू झाल्यावर मी जास्तीत जास्त वेळ वॉर्डात घालवू लागलो. त्या काळात डॉ. परूळकर यांच्याकडून सर्जरीच्या विषयावर मी जी माहिती मिळवली व त्यांच्याबरोबरीने अनेक शस्त्रक्रिया केल्या त्याचा मला भावी आयुष्यात यशस्वी सर्जन बनण्यात उपयोग झाला.

के.ई.एम्. मध्ये अनेक निष्णात प्राध्यापकांच्या हाताखाली मी शिकत होतो.सर्जरीविषयी माझ्या मनात विशेष आवड निर्माण झाली होती. एम्.बी.बी.एस्. होईपर्यंत मी माझ्या पुढील आयुष्याची रूपरेषा नक्की केली होती. मी सर्जनची पदवी घेऊन लहानशा गावात जाऊन ऑपरेशनच्याद्वारे समाजसेवा करणार होतो. जनरल सर्जरीशिवाय अस्थिव्यंगोपचारशास्त्र, कॅन्सर, प्लॅस्टिक या सर्जरीच्या निरनिराळ्या अनेक विभागातून मी अनुभव मिळविले. स्त्री-रोग व प्रसूतिशास्त्र ह्या विषयावरच्या शस्त्रक्रिया पण मी शेजारच्या वाडिया मॅटनिटी हॉस्पिटलमध्ये इतर मित्रांबरोबर कामे करून शिकून घेतल्या. लहान मुलांवर शस्त्रक्रियेचे अनुभव माझे गुरू आर्थर डिसा ह्यांच्याबरोबर कामे करून मी मिळविले.

टाटा मेमोरिअल हॉस्पिटलचे जगप्रसिद्ध सर्जन डॉ. अर्नेस्ट बॉर्जेस ह्यांच्याकडे मी काम करून कॅन्सरवरची अवघड ऑपरेशन्स् मी आत्मसात केली. डॉ.ए.के. तळवलळकर हे त्यावेळी अत्यंत प्रसिद्ध अस्थिरोगतज्ज्ञ होते. त्याच्या युनिटमध्ये प्रथम हाऊसमन, नंतर रजिस्ट्रार म्हणून मी कामे केली व अस्थिरोगविषयक शस्त्रक्रिया मी आत्मसात केल्या. डॉ.आर्थर डिसा, डॉ.अर्नेस्ट बोर्जेस व डॉ ए.के. तळवलकर ह्या सर्वोत्कृष्ट सर्जनबरोबर ५-६ वर्षे कामे करून सर्जरीमध्ये प्रावीण्य मिळविले.

कुर्डूवाडीला आल्यावर पाच वर्षांनंतर मी वेलोरच्या सी.एम. सी. मध्ये न्युरोसर्जरी व युरोसर्जरीची माहिती व अनुभव मिळविला.

मुंबईच्या धावपळीच्या पंधरा वर्षाच्या शिक्षण व अनुभवाच्या शिदोरीसह कुर्डूवाडीत प्रवेश केला. हे एक प्रचंड आव्हान होते. जरी मी सर्जरीत प्रवीण व ज्ञानी होतो, तरी मला येथे हॉस्पिटलचे प्रशासन, कामगाराचे प्रश्न, व्यवसायाचे नियोजन वगैरे विषयांवर माहिती, ज्ञान व अनुभव मिळवावे लागले. वीज, पाणी बांधकाम- सुतारी ह्या कामाची आवड निर्माण करून घ्यावी लागली. पोलिस, राजकारणी, इन्कमटॅक्स ऑफिसर, सामाजिक कार्यकर्ते ह्यांच्यासमवेत चांगले संबंध ठेवण्याचे प्रयत्न करावे लागले. विविध कला-क्रीडांत मी आनंद मिळवू शकलो.



कुर्डूवाडीत आलो तेव्हा वीज, पाणी, रस्ते, या प्राथमिक सोयीही तेथे उपलब्ध नव्हत्या.पण मनामध्ये आपल्या ज्ञानाचा उपयोग ग्रामीण भागातील आपल्या बांधवांना व्हावा, जमेल तसे त्यांचे अश्रू पुसावेत ही सेवाभावाची उर्मी जागी झाली होती. त्यामुळे आलेल्या अडचणीचा त्रास वाटला नाही. आज कुर्डूवाडीमध्ये सुसज्ज असे १०० खाटांचे रूग्णालय आहे.

माझ्या जीवनाची ६१ वर्षे कशी संपली हेच मला समजत नाही. ह्यापुढे किती वर्षे मी माझे जीवन जगणार आहे ह्याची मला कल्पना नाही; पण मला एका गोष्टीची खात्री आहे की, त्या उरलेल्या आयुष्यातील प्रत्येक क्षण मी आनंदात जगणार आहे व माझ्या भोवताच्या प्रत्येकासाठी मी प्रत्येक क्षण घालविणार आहे त्यांना तो मी अर्पण करणार आहे.

मानवी जीवन हे एका झाडाप्रमाणे आहे. झाड आपल्या खोल मुळातून धरणीची सत्वे व पाणी शोषून घेते. आपली पाने, फळे, फुले, आपली सावली, आपला वारा व आपल्यामुळे आलेला पाऊस ह्यांच्या रूपाने ते गरूजूंना नि:स्वार्थीपणे मदत देते, ज्यावेळी झाड पडते त्यावेळीसुध्दा लाकूड बनून ते आपले सर्वस्व अर्पण करते. मानवाचे जीवन असेच नि:स्वार्थी व समृद्ध असावे.

••

**डॉ. अशोक वागळे**
'माधवस्मृति' रूग्णालय,
कुर्डूवाडी, जि.सोलापूर


एखादी लय अशी जुळावी, सारी जाणीव विरूनी जावी. एखादा ताल असा धरावा, अंतापर्यंत तोल रहावा.

# भाकरीने मला घडविले!

## डॉ. विश्वास कचरे



**सो**लापूर जिल्ह्यातल्या एका छोट्याशा गावात– तेलंगवाडीत मी जन्मलो. घरात अठराविश्वे दारिद्रय. लहानपणच्या आठवणी म्हणजे कधी मिलोच्या भाकरीशिवाय काही खायला मिळालं नाही.. ना ल्यायला कधी कापडं.. मयताच्या बाराव्याला डोक्यावरून विधी करून काढतात त्या कपड्याचा शर्टसुद्धा प्रसंगी शिवून घालायला लागायचा. वडिलांनी खंडाने जमीन घेतली. त्यात माझे आईवडील अहोरात्र खपायचे, तरीही दारिद्रय संपत नव्हतं.

७ वी पास झाल्यावर गावात हायस्कूल नव्हते, म्हणून बार्शीला कर्मवीर मामासाहेब जगदाळे यांच्या हायस्कूल व बोर्डिंगमध्ये प्रवेश घेतला.'कमवा आणि शिका'या योजनेखाली शिकू लागलो. जगदाळेमामांना व्यायामाची आवड. पहाटे ५-५ ।। वाजता उठून जो विद्यार्थी १ किलोमीटर अंतर पळत जाऊन येईल त्याला अर्धी भाकरी मिळे. त्या भाकरीच्या आशेने मीही पळायला जायचो. सकाळी १० वाजता आमटी भाकरीचे जेवण मिळे. त्यानंतर २ वाजताच्या सुट्टीत खूप भूक लागायची. सकाळच्या जेवणातल्या उरलेल्या भाकरी स्वयंपकघरात असायच्या. भूक अनावर होऊन त्यातली मी एखादी भाकरी चोरून शर्टाच्या आत लपवायचो. चोरी पकडली गेली तर मार बसायचा; पण त्या मारापेक्षा पोटातील भूक जास्त असायची. त्यामुळे चोरीचंही काही वाटायचं नाही.

दिवस असेच हालात चालले होते. आणि मी अकरावी पास झालो. त्याकाळात वडिलांनी आठ एकर जमीन उधार हप्त्याने घेतली. वडील ज्यांच्याकडे मजूर म्हणून काम करायचे त्या सधन लोकांना ही गोष्ट आवडली नाही. मारहाण करण्यापर्यंत त्यांची मजल गेली. एवढंच काय, आमच्या कुटुंबाला वाळीत टाकण्यात आलं.या सगळ्या गोंधळात माझी शाळा बंद झाली. शेतात अहोरात्र काम... काम... आणि काम. परिस्थिती थोडी सुधारली आणि माझे लग्न झाले.

शेती आणि शेतीचा विकास याबाबत नवनवीन कल्पना सुचत होत्या; कष्ट करायला माझी ना नव्हती; पण वडिलांना शेतीत नवीन प्रयोग करण्याच्या माझ्या कल्पना पटेनात. वारंवार खटके उडू लागले. ''ही माझी जमिन आहे, यातील १इंचही तुला मिळणार नाही. तू स्वत: कमव आणि जमीन घेऊन तुझे प्रयोग कर!'' वडीलांचे हे शब्द ऐकून, गेली १२/१३ वर्षे ज्या मातीत आपण कष्ट केले ती सोडून जाण्याची वेळ आलीय हे उमगले आणि अंगावरच्या कपड्यानिशी १९८० साली मी आणि माझी पत्नी घराबाहेर पडलो. खिशात एक नवा पैसाही नव्हता; पण मनात जिद्द होती,स्वप्नं होती.

माळावर राहण्यासाठी झोपडी तर उभारली; पण जगण्यासाठी आर्थिक प्राप्तीची गरज होती. काही सुचेना. एका मित्राने हे सर्व ओळखले. माझ्यावर त्याचा फार जीव-तोही माझ्या सारखाच गरीब पण सासुरवाडीकडून मिळालेली पाच ग्रॅम वजनाची एकुलती एक अंगठी त्याकडे होती, ती त्याने मला दिली. ती विकून १००० रू आले. मी आज जो आहे त्यात या मित्राच्या या अमूल्य मदतीचा मोठा वाटा आहे.

एका बॅंकेच्या मॅनेजरला भेटलो! कचरे नावाची पत न वापरता जगण्याची वडिलांनी घातलेली अट होती, म्हणून मित्राच्या नावावर दोन म्हशीसाठी कर्ज घेतले त्या म्हशीच्या दुधावर माझा प्रपंच सुरू झाला. प्राप्ती कमी असल्यामुळे अनंत आडचणी होत्या. आरे कॉलनीतून कमी किमतीत त्यावेळी व्यायला झालेल्या संकरित कालवडी मिळत. मी त्या दोन घेतल्या. दोनच्या ४ करत मी ४ वर्षात १०।१२ गायींचा मालक झालो, मात्र या गायी दुधाच्या पैशांतून व त्या गायीला होणाऱ्या कालवडीतून वाढल्या. त्यातच मी लहान पिले खडकी हॅचरीतून आणून कोंबड्या वाढवण्याचा नवा व्यवसाय

चालू केला व आर्थिक प्राप्ती वाढली. सन १९८० ते ८५ पर्यंत ज्या गायी व कोंबड्या, शेळ्या वाढल्या त्या विकून तो पैसा मी १९८५ ला जमिनीत व तिच्या विकासासाठी वापरायचा ठरवला व १६ मे १९८५ ला २७ एकर पूर्णपणे पडीक जमीन १५०० रु.एकराने विकत घेतली व तिचा विकास करणे सुरू केले.

मी व माझी पत्नी सौ.शीला शेतात काम करू लागलो. एक विहीर १९८५ ला खोदली. पाणी अल्प लागले. होते तेवढे सर्व पैसे जमीनविकासात संपलेले. या अल्प पाण्यात मी एक एकर डाळिंब फळबाग लावली. ६७ नव्या पैशाला एक मडके कुंभाराकडून ठरवून घेतले.त्यास एक लहान होल करवून घेतले. मी व माझी बायको शीला दोघांनी पाणी खांद्यावर वाहून आणून या मडक्यात घातले व ती झाडे फळाला आणली. सन १९८६ साली मे महिन्यात संकरित टोमॅटो २एकर लावले. त्यास आधारासाठी काठ्या व तार यासाठी पैसे नाहीत म्हणून ट्रकचे जुने मोठे टायरचे बाजूचे रिंग १ रुपयास चांभाराकडून घेऊन ती जाळावयाची. त्यातून सुमारे १ किलो तार निघे. ती तार व ओढ्याच्या वेड्या बाभळीच्या झुडुपाच्या काठ्या वापरून टोमॅटो लावून फळाला आणले. त्याच सुमारास फळे चालू झाल्यावर रोडवर टोमॅटो नेण्यासाठी बैलगाडी व बैल नव्हते म्हणून, १०६० रूपयांस सांगोल्याहून एक ''सोन्या'' नावाचा म्हातारा झालेला व दोन वर्षे चालेल असा बैल विकत आणला व टोमॅटो डालातून रस्त्यावर व तेथून सोलापूर व पुणे येथे पाठवणी सुरू केली. या टोमॅटोच्या दोन एकर फळपिकांतून मला ४ लाख रूपये त्यावेळी मिळाले व मी आयुष्यातील पहिले लाख रुपये पाहिले, कमविले. माझी पत्नी, भाऊ या दोघांचाही या सर्व कष्टात सहभाग आहे, जो बैल १/२ वर्षे काम करेल म्हणत होतो त्याने ९ वर्षे काम केले व आजही तो निवृत्तीचे जीवन जगत आहे. त्याचे पायाचे दर्शनाने माझा दिवस सुरू होतो. त्यास रोज मनापासून वंदन करतो.

मी त्या २७ एकर जमिनीत डाळिंब व बोर फळबागा लावल्या. त्यात ७ एकर आंबा, ४ एकर बोर, १५ एकर डाळिंब फळाला आणली. मग मात्र मी मागे वळून पाहिले नाही.

सन १९९०/९१ साली आणखी २३ एकर पडीक माळरान जमीन घेतली व तिचा विकास केला.त्यात पूर्ण डाळिंब लावले; पण पाण्याचे दुर्भिक्ष्य आले.

आयुष्याची इतकी वर्षे कष्ट करून वाढविले ते पीक जळून जाते की काय? असे वाटू लागले. काळजीने झोप उडाली. मग अक्षरक्ष: दररोज २० किलोमीटर अंतरावरून पाण्याचे टँकर भाड्याने लावून दररोज ५००० रुपयांचे पाणी विकत घेऊन बागा जगविल्या. मिळविलेले पैसे तिथेच संपले. प्राप्ती कमी झाली अशाच एका रात्री १० किलोमीटर अंतरावर आष्टी तलावातून पाणी आणावे ही कल्पना सुचली. पाइपलाइन टाकली तर अंदाजे खर्च ३५ लाख रु. येईल असा तज्ज्ञांचा अंदाज आला. एवढी मोठी रक्कम कशी उभारावी असा प्रश्न पडला. १९९१/१९९२ साली देशाची आर्थिक स्थिती नाजुक होती. बॅंकेतून कर्ज मिळणे कठीण होते आणि माझ्याकडे तर अजिबात पैसे शिल्लक नव्हते.



मी एक दिवस विचार केला, भावास- बायकोस इथे तेलंगवाडीचे शेतीत ठेवावे व आपण बाहेरगावी पाणी उपलब्ध असेल अशी एखाद्याची जमीन १ वर्षासाठी करावी (कसावी, आपले हातखंड्याचे टोमॅटो पीक करावे व बॅंकेत कर्जासाठी लागणाऱ्या मार्जिनमनी इतके पैसे मिळवावेत. त्यानुसार ज्यातून पीक येत नव्हते अशी एकाची जमीन मी कसायला घेतली. अहोरात्र कष्ट केले आणि त्याचे फळही अमाप उत्पादनाच्या रूपात मिळाले. त्यासाठी मी माझा हजरजबाबीपणा, विक्रीकौशल्य, उत्पादनकौशल्य व अविश्रांत श्रम करून माझे लक्ष्य पूर्ण केले व ३५ लाख रूपयांची लिफ्ट योजना मी स्वखर्चाने-कुणाच्याही आर्थिक मदतीशिवाय-फक्त २ महिन्यांच्या कालावधीत पूर्ण केली व माझ्या तहानलेल्या झाडांना, वृक्ष-वेलींना थेंब थेंब पाणी पुरवणे चालू केले. सदरची योजना १९९३ मध्ये पूर्ण झाली.

शेतात गरजेइतके पाणी आले. मग मात्र मी अजिबात मागे पाहिले नाही. पडीक माळरान जमीन, त्या जमिनीत सृष्टी निर्माण झाली. तेव्हापासून कोणतेही पीक घेतले नाही,जमीन वहिवाटली नाही अशा जमिनी विकत घेऊन फळबागा विकसित करणे, मिळणारे शेती-उत्पादनाचे रकमेतून खरेदी, तिचा विकास करणे, ठिबक सिंचन सेट बसविणे, रस्ते काढणे व

बांधणी, स्वत:साठी शेतामध्ये रहाता बंगला बांधणे, पॅक हाऊस बांधणे तसेच लोंबर क्वार्टर बांधणे ही कामे मी १९९४ ते १९९७ मार्च अखेर पूर्ण केली. (त्यासाठी कोणत्याही बँकेचे कर्ज घेतले नाही.)

आज रोजी माझेकडे १२५ एकर डाळिंब फळबाग, ५ एकर हापूसकेशर आंबा फळबाग, ५ एकर बोर फळबाग उभी आहेत. दोन फार्म हाऊस (बंगले), काही ४ चाकी वहाने, मालवाहू वहाने, ट्रॅक्टर्स, सर्व अद्ययावत शेती उपयोगी यंत्रणा,पॅकिंग हाऊससह लाखो रूपयांची बांधकामे, रस्ते, कोट्यवधी रुपयांची शेतीत गुंतवणूक मी शेती उत्पादनातून उभी करू शकलो याचा मला आनंद वाटतो. संपूर्ण ११/१२ वर्षाचा काळ व आयुष्याचा पूर्वकाळ पाहिला, तर अनेक अडचणी, संकटे आली, निसर्गाचे लहरीपणामुळे नुकसान झाले. पाण्याची कमतरता, मरणाच्या कठड्यावर येऊन उभा होतो. मागे वळून परत जाणे शक्य नव्हते. संपूर्ण दारे लागलेली होती, अशा अवस्थेत प्राप्त परिस्थितीशी झुंजणे एवढेच माझ्या हाती होते, ते मी पूर्ण केले. ज्या ज्या वेळी संपूर्ण खचून जाई त्यावेळी माझी पत्नी सौ शीला ही पहाडासारखी पाठीमागे उभी राहिली. आजचे यश आम्हा सर्व कुटुंबियांचे आहे.

२ ऑक्टोबर १९९६ रोजी राजभवनात मा. राज्यपाल यांचे हस्ते ''कृषिभूषण'' पुरस्कार देऊन महाराष्ट्र शासनाने मला सन्मानित केले.१८ सप्टेंबर १९९७ रोजी कै.वसंतराव नाईक पुरस्कार मिळाला. आजपर्यंत माझे शेतीला १२ लाख लोकांनी भेटी दिल्या. त्यात सर्वसामान्य शेतकरी होते, ज्येष्ठ मुलकी अधिकारी, मंत्रीगण, शास्त्रज्ञ, कुलगुरू अशी मंडळी होती. आजही चाललेले प्रयोग पाहण्यासाठी दररोज सुमारे ५०० लोक येत असतात.

मी, माझी पत्नी सौ शीला माझा भाऊ रमेश - सर्वजण पहाटे ५।। ते रात्रीपर्यंत काम करीत असतो. जेवण-पाणी शेतावर, फोन व फॅक्सद्वारा संपर्क व कामाचे नियोजन, या आधारे अविरत श्रमातून झाडे फुलवीत असतो.

कामाचे योग्य नियोजन, बाजारपेठांचा अभ्यास, कष्ट करायची पूर्ण तयारी, शेतीवर संपूर्ण श्रद्धा व हजरजबाबीपणा, या पंचसूत्रीनुसार माझा विकास झाला. पैसे मिळवण्यापेक्षा निर्मितीमधील आनंद जास्त आहे, म्हणून आता थांबायचे नाही. हा शेतीउद्योग वाढवत राहायचे.

ज्या भाकरीने मला घडवले ती कष्ट करून भूक लागली तर पोटभर मिळावी म्हणून मी अव्याहत काम करत राहणार. मात्र भाकरीने मला घडविले, म्हणून ''मी असा घडलो!'' मी थांबलो तर गंजून जाईन.

**विश्वास कचरे**
कष्टाची भाकर, तेलंगवाडी,
पो.शेटफळ ता.मोहोळ, जि.सोलापूर .

---



# ग्रामे ग्रामे रत्नसंपदा

**प्रा. राम डिंबळे**

**व**याच्या कितव्या वर्षांपर्यंत माणूस ढकलगाडीसारखा परिस्थितीच्या रेट्यानुसार इकडे-तिकडे जात राहातो आणि कोणत्या वयात तो ठरवतो की, नाही, मला आता असंच जायचं, हा मोठाच महत्त्वाचा प्रश्न आहे.

काही माणसं आयुष्यात कधीच असं ठरवीत नाहीत असं दिसतं. त्यांना वाटतं की, जे नशिबात असेल ते होईल उगीच ग्रहयोगांशी भांडून काय साधणार आहे?

काही जण म्हणतात की,'माझ्या जीवनगाडीचा चालक मी असलो पाहिजे. रस्ता खडतर असेल, तर प्रवास फारतर सावकाश होईल. कधी रस्ता चुकेल. कधी तिथल्या तिथेच फेऱ्या मारीत बसावं लागेल. कधी उलटही फिरण्याची पाळी येईल; पण जिथं जायचा माझा हट्ट आहे, त्याच दिशेनं जाणार म्हणजे जाणार.'

असल्या हेकट (किंवा चांगल्या भाषेत 'ध्येयवादी') प्रवाशांपैकी एक मी आहे असे मला वाटते. खरं तर माझ्या मित्रांना यांच्या अगदी उलट माझं

गाडं चालतं असं वाटतं. ते म्हणतात, ''कुणीही तुमच्या गाडीचा ताबा घेतात अन् तुम्हाला पाहिजे तिकडे दामटतात!''

लहानपणी आई वडिलांच्या आपल्याबद्दलच्या योजना असतात. लाड, छडी, प्रोत्साहन इत्यादी शक्य त्या सर्व उपायांनी ते आपल्याला त्या योजनेत बसवू पाहतात.

माझ्या वडिलांना माझ्यासाठी या सर्व उपायांचा वापर करावा लागला. आज मी जो काही आहे त्याचे निम्मे श्रेय माझ्या वडिलांचे आहे. आणि उरलेले श्रेय माझ्या पितृतुल्य गुरूचे. म्हणजेच कै. अप्पासाहेब पेंडसे यांचे आहे.

सिंहगड किल्ल्याच्या पायथ्याशी कल्याण नावाचं माझं गाव. तिन्ही बाजूंनी डोंगर आणि चवथ्या बाजूला चार मैल चालत गेल्यावरच रस्ता. १९४७ साली कल्याणची परिस्थिती सर्व जगापासून तुटलेली अशी होती. या गावच्या सर्वच मुलांना मोठेपणी भाताचे शेतकरी होण्यापलीकडे दुसरे काही शक्यच नसे. फार तर कुणी मुंबईत गोदीकामगार किंवा गिरणीकामगार व्हायला जात.

या गावात शाळा रस्ता, दवाखाना, वगैरे चैनीच्या गोष्टी बिलकुलच नव्हत्या. बसकी मातीची, कौलारू, अंगणधारी घरं आणि भोवताली जिराईत भातशेतीचं डोंगरी शिवार. गावाला जगाची माहिती नव्हती अन् जगाला गावाची पर्वा नव्हती. ज्यावर्षी दोनवेळा पोटभर पुरेल एवढे भात होईल, तो सुकाळ. बाकी सर्व परवडच. इतर पिकं ठाऊक नाहीत. इतर व्यवसाय माहीतही नाही अन् शक्यही नाहीत. क्वचित काही वस्तू घेण्यापायी पुणेबाजाराला जाणारी माणसं असतं. त्यांच्याकरवी, 'हिंदुस्थानात ब्रिटिशांचे राज्य चालू आहे म्हणे' असे कळे.

गावात जी थोडी जिज्ञासू, धडपडी माणसं होती, त्यापैकी माझे वडील एक होते. शहरभागातल्या शहाण्या माणसाशी जेवढी आपली जानपहचान होईल. तेवढे बरे दिवस आपल्याला दिसतील, असे त्यांच्या ध्यानात आलेले होते. कल्याणगावी कै. अप्पासाहेब भागवत नामक ध्येयवेड्या माणसाने ४० सालात काही ग्रामरचनेचे प्रयोग करायला प्रारंभ केला. त्यांनी दुध गोळा करुन पुण्याला विकावे असा प्रयत्न केला. त्यांनी पाटी-पेन्सिल गावात पोचवली. दारूसारखी व्यसनं करू नका असा विचार मांडून पाहिला. भागवत पुण्याचे निवृत्त सिटी इंजिनिअर होते त्यांच्या ध्येयवेडाचा गावावर खरं तर त्यावेळी फारसा परिमाण झाला नाही. काहीजण दुधाच्या व्यवसायाचा तर काहीजण शिक्षणाचा विचार मनात घोळवू लागले, एवढेच.

पण गावात सगळेच निरक्षर. कोण शिकविणार कुणाला अशी स्थिती.

या परिस्थितीत एक विलक्षण योगायोग घडला. माझे वडील सिंहगडावर गुरे चारीत असताना त्यांना सायंकाळच्या वेळी तटावरून उडी टाकू पाहणारा एक तरूण दिसला. त्यांनी त्याला अडवलं.जीव देणं हे पुरुषार्थाचं काम नाही, हे त्याला पटवलं. सुशिक्षित माणूस आहेस, तर चल माझ्या घरी अन् शिकव माझ्या मुलांना असं विनवलं. त्यामुळे ते पुराणिक गुरूजी आमच्या गावात, माझ्या घरी राहायला आले. गुरं चारणाऱ्या पोरांच्या टोळक्याबरोबर रानोमाळ हिंडत त्यांनी आम्हाला आकडेमोड आणि अक्षरओळख शिकविली. खऱ्या अर्थानं कल्याणचं ते 'चरवाहा स्कूल'-



गुराख्यांची शाळा म्हणजे माझ्या अशिक्षित वडिलांची अफलातून कल्पना होती.

त्या शाळेला माडगुळकरांच्या 'बिनभिंतीची उघडी शाळा' कवितेचा स्पर्श होता.

मी लहानपणी विलक्षण उनाड होतो. (लिहिता लिहिता मला या शब्दाची व्युपती सुचते आहे ती अशी- उन्हात उंडरणारा तो उन्हाड) ह्या अर्थानं पाहिलं तर ऊन, वारा, पाऊस, चढ-उतार, ओढे-नाले सकल पंचभूतांशी लगट करणारं, आंबा- चिंचा- करवंदांची चव चाखणारं, पाखरं-भेकरं, ससे- मासे अशा प्राणीविश्वाशी शिवाशिव खेळणारं ते रम्य बालपण माझ्या वडिलांच्या लेखी निव्वळ 'उनाडपणा'होतं. या मुलाला वळण लावलं पाहिजे, शिकवलं पाहिजे, जरा स्थिर केलं पाहिजे असं त्यांना वाटे.

या सुमारास सिंहगडावर माझ्या वडिलांनी एका विलक्षण माणूसवेड्या, देवमाणसांशी मैत्री केली. ज्ञान प्रबोधिनीचे संचालक कै. अप्पासाहेब पेंडसे त्यावेळी सिंहगडावर निवांत व्यासंगासाठी आले होते. तिथे त्यांची माझ्या वडिलांशी मैत्री जुळली. त्यांच्याबरोबरच अप्पा कल्याण गावी आले. नानांना (माझ्या वडीलांना) ते म्हणाले की, 'तुमचा हा धाकटा मुलगा मोठा उनाड आहे म्हणता ना? मग देऊन टाका की तो मला! मला अशी उनाड मुलंच हवी आहेत!'

वडील म्हणाले 'दिला, आता

त्याचं काय करायचं ते तुम्हीच ठरवा.' त्या क्षणाला माझ्या आयुष्याला एक वेगळी, अपूर्व अशी दिशा मिळाली. अप्पा म्हणाले, 'तुम्ही या मुलाला चौथीपर्यंत इथेच शिकवा अन् पाचवीला पुण्याला मजकडे पाठवा-'

पण गावात रीतसर अशी शाळा नव्हतीच कुठून तरी शिकवणारे मास्तर आणायचे अन् पोरं कोंडायची त्याच्या वर्गात, असा तो शैक्षणिक पायंडा होता. वर्ग म्हणजे मारूतीचे मोडकं देऊळ. फळा म्हणजे देवळाचे काळे लाकडी खांब. छडी हेच शैक्षणिक साधन.

अशा शाळेत जायला मी साफ नकार दिला. कल्याणच्या डोंगररानात माझं पंचमहाभूत शिक्षण चालू होतं, ते मला प्यारं होतं. माझ्यासोबत दहा बारा दोस्तांचं टोळकं असे; त्यांना सोडणं जिवावर आलं. मग माझ्या थोरल्या बंधूंनी मला चक्क ठोकीत, उचलून नेऊन गुरूजींपाशी आदळलं. शिक्षण क्षेत्रात माझं ते पहिलं पदार्पण- दुसऱ्याच्या पायानं! माझ्या वडीलांनी गुरूजींजवळ गोळ्याबिस्किटं देऊन ठेवली होती. घरी आला तर मार अन् शाळेत गेला तर खाऊ' अशी दुहेरी शिक्षणप्रेरणा मला लागू पडली आणि मला शाळेचं वेड लागलं.

कल्याणच्या त्या गावशाळेत गुरूजींच्या असं ध्यानात आलं की, हे पोरगं हुशार आहे वरून ते बावळं आणि व्रात्य वाटतं; पण मुद्दयाच्या गोष्टीकडे त्याचं अचूक लक्ष असतं. मी वर्गात सर्वच बाबतीत सरस ठरू लागलो आणि गुरूजींना माझं वेड लागलं. मी त्या शाळेचा 'शोपीस' झालो.

माझ्या निरक्षर वडिलांना माझ्या साक्षरतेचं मोठं कौतुक वाटू लागलं. एखाद्या जाणत्या प्रौढासारखा मी नवनाथाची पोथी वाचून जमलेल्या भाविक ग्रामस्थांना समजावून सांगायला लागलो. पोथीतला शब्द समजला नाही तर कुणाला विचारायचे? असा प्रश्न होता. त्यातून मला वेड लागलं. शब्दाचा अर्थ असा का होतो याचा विचार करायची सवय लागली.त्यावेळी मी होतो अवघा दहा वर्षाचा.

पाचवीसाठी मी पुण्याला अप्पासाहेबांकडे राहायला आलो. एखाद्या उपाशी माणसाला अन्नकोटात राहायला मिळावे तशीच माझी अवस्था झाली. मला वाचनाचे विलक्षण वेड होते. पण माझ्या निरक्षर गावी पुस्तक म्हणून उपलब्ध नसे. इथे पुण्यात आप्पांकडे राहायला आल्यावर घराच्या चहू भिंतीना पुस्तकांच्या कपाटाची तटबदी होती. मी शेकड्यांनी पुस्तके वाचली. मग मला अप्पांनी सांगितले की, गोष्टीच्या ओढीने पुस्तक वाचणे म्हणजे 'नळी फुंकिली सोनारे' इकडून तिकडे निघून जाणे एवढेच आहे. तेव्हा वाचलेल्या पुस्तकाचे सारग्रहण व रसग्रहण लिहीत जा! आजही माझ्याकडे मी चाळीस वर्षापूर्वी लिहिलेल्या ह. ना. आपट्यांच्या कादंबऱ्या परीक्षणाच्या वह्या आहेत! मग हळूहळू काय वाचावे याचा विचार करायची सवय लागली. नंतर वाचत असलेल्या पुस्तकांवर आपली स्वत:ची अधोरेखने, खुणा करायची, उसनी आणायची (आणि आपल्याकडेच ठेवून द्यायची!) असा छंद लागला. हौसेनं लोकांना पुस्तके वाचायला द्यायचे वेड लागले. आजही माझ्याजवळ पुस्तक नाही असे कधी नसते. हिंडताना बॅगेत पुस्तक. झोपलो तर उशाशी पुस्तक प्लॅटफॉर्मवर किंवा वेटिंगरूम मध्ये नुसताच बसलो असे नाही. सदैव हाताशी पुस्तक.आता अनेक ग्रंथवेड्या मित्रांना वाचनाचे संदर्भ एकमेकांना सांगायची सवय लागली आहे.

वेचक वाचायचे आणि वाचलेले वेचायचे हा मोठाच आनंदमार्ग आहे.

वाचनातूनच काही चांगले लिहायची प्रेरणा मला आप्पांनी दिली. लिहिण्याचा ओनामा सुरेख अक्षराने होतो. माझे अक्षर त्यावेळी फक्त सुवाच्य होते. आपले अक्षर शिल्पासारखे सर्वांगसुंदरच असावे असे मला वाटू लागले. त्यासाठी प्रथम ज्यांची अक्षरे चांगली आहेत अशाच्या वह्या आणून त्या गिरवल्या. मग मला असे खूळ लागले की आपल्या एकेका अक्षराच्या मागे लागायचे आणि पिच्छा पुरवून ते वळणावर आणायचे. मराठीतील इ ह ड ळ ह क्ष यांसारखी आडवळणी अक्षरे मी महिनामहिना घटवून सुघड केली.उत्कृष्ट अक्षराचा प्रभाव कुणावरही चांगलाच पडतो. पुढे कोणा महत्त्वाच्या व्यक्तीला पत्र लिहायचे, तर ते माझ्या अक्षरात लिहवून घ्यायची पद्धत पडली.

मला शब्दसंगतीचा चांगला कान आहे. सहजगत्या पद्यरचना सुचायला लागली. मी त्या कविता अप्पांना लिहून दाखवू लागलो. त्यांनी मला प्रोत्साहन दिले. मग शाळेच्या वार्षिकात दरवर्षी माझी कविता येऊ लागली, आता कानामनात गुणगुणाऱ्या लयबद्ध शब्दलडी हा माझा स्वभावच झाला. कधीतरी मोटारसायकलवरून जाताजाता अचानक शब्द स्फुरतात आणि मी मध्ये रस्त्यातच थबकतो. खिशातल्या डायरीत ती शब्दमौक्तिकांची माळ उतरवून ठेवतो;

बाजूची रहदारी चमकून पाहते, की याला मध्येच काय झाले बुवा! अशी अनेक गेय, प्रासादिक गीते आणि कविता करून कुठे हरवून जातात त्याची गणती नाही! बोलबोल म्हणता उस्फूर्त कविता करण्याची ही सवय हा एक वेगळाच आत्मानंद आहे.

अनेक प्रतिभावंतांचे काव्यसंग्रह वाचतो तेव्हा त्यातल्या विलक्षण कल्पनांनी मी हरखून जातो. आपले मन एवढे संवेदनशील कधी होईल असे वाटते. आपण फारच धसमुसळे आणि अवघड आहोत याची जाणीव होते.

पुण्याच्या शाळेत गेल्यावर मी गावरान मुलगा प्रथम थोडासा बुजलो. नंतर जाणवू लागले की, या पुणेरी चटपटीतपणात दर वेळी अकलेचा भाग असतोच असे नाही. आपणही काही अगदीच बुद्धू नाही. तेव्हा यांच्याबरोबरच होड लावायला हरकत नाही. मग शाळेच्या परीक्षांमध्ये कस लागू लागला आणि असे ध्यानात आले की, इथेही आपण इतरांपेक्षा कमी नाही. आपण पहिले येण्याच्या क्षमतेचे आहोत. माझे गावरान हेल आणि आडदांड काळे रंगरूप यामुळे पुणेरी मुले माझे माप काढू पाहायची. पैलवान पोराच्या गुढग्यात मेंदू असतो, असा एक लोकभ्रम असे. त्यात मी कुस्तीत शाळेचा चॅम्पिअन होतोच. त्यामुळे मी मठ्ठ असलोच पाहिजे अशी साऱ्यांच कल्पना-अगदी सरांचीही; पण पहिल्या-दुसऱ्याच परीक्षेला मी पहिला आलो तेव्हा चितपट झालेले ते चाभरट चेहरे मला अजूनही आठवतात. मग मला पहिला येण्याचं वेड लागलं. पुढेपुढे तर पहिला येणं ही माझी आर्थिक गरजही असायची. गरजेपोटी शिष्यवृत्त्या मिळवणारा मी विद्या 'अर्थी' झालो तो अखेरपर्यंत.

माझी म्हणून अभ्यास करायची पद्धत मी बसवली. टिपणं काढायची, ती व्यवस्थित-शिस्तीत जमवून ठेवायची, त्यात वेगवेगळ्या पुस्तकांच्या वाचनानं भर घालायची आणि मग परीक्षेत जसा प्रश्न असेल त्या धोरणानं ती शिदोरी वापरायची पद्धत मी अचूक बसवली. अगदी नवव्या यत्तेपासून थेट एम.ए. पर्यंत मी भरपूर टिपणे काढीत असे. माझी टिपणे नंतरच्या अनेक तुकड्या वापरीत. आजही मजकडे ती तीस वर्षांतली जुनी टिपणं शाबूत आहेत.

शाळकरी वयातच अप्पांनी मला वक्तृत्वस्पर्धांत भाग घ्यायला लावलं. प्रथम ते मला भाषणं लिहून देत. ती म्हणून घेत. अनेकांसमोर सराव करून घेत. अशा तयारीच्या भाषणांना आंतरशालेय स्पर्धेची बक्षिसं मिळाली. मला हुरूप आला. मग 'आयत्या वेळचा विषय' हा माझा हातखंडा झाला. ऐनवेळचं भाषण मला अधिकच छान जमे. तयारीचं भाषण करताना पाठांतर विसरण्याचा ताण असतो. तो ऐनवेळच्या भाषणात नसतो. पाहिजे फक्त श्रोत्यांच्या डोळ्यात डोकावून, मुद्दा त्यांच्या मनी उतरवण्याचा आत्मविश्वास. असा आत्मविश्वास मिळविण्यासाठी अप्पांनी मला विहिरीत ढकलून पोहायला शिकवण्याचे जे तंत्र असते, त्या पद्धतीने शिकवले.

त्याचे काय झाले, ६२ साली चीन-भारत युद्ध झाले. सर्वत्र त्याचे वातावरण होते; पण खेडोपाडी चीन कोण अन् भारत कोण, कसलाच पत्ता नव्हता. अप्पा मला म्हणाले, ''तू नीट अभ्यास करून नकाशांच्या मदतीने गावोगाव चीन-भारत युद्ध समजावून सांग!'' मी दहावीत होतो. खूप तयारी करून गावी गेलो. मीच श्रोते जमवले. पाठ केलेली माहिती आणि नकाशे



उलगडू लागलो. लोकांचे चेहरे मख्ख! मग लक्षात आले की, मी सांगतोय त्याचा लोकांच्या अनुभवाशी काही संबंध नाही. त्यांना कशी कळणार मॅकमोहन लाईन? तेव्हा पाठांतर राहू द्यावं पुस्तकात. बोलावं ते मुद्द्याचंच. मग मी म्हटलं, ''चीन अन् भारताची हद्दीच्या बांधावरून मारामारी झाली. आपल्या सातबारावरली जमीन चिन्यांनी ताबा घालून हिसकावली!'' लोकांचे चेहरे उजळले. ते म्हणाले, 'आपल्याकडं काय लाठ्याकाठ्या न्हाईत का?' मी म्हटलं, 'आहेत, पण कमी. अन् त्यांच्याकडं हत्यारं जास्तीची. त्याने आपण मार खाल्ला. नेहरू चाचा म्हणाले की, ''नाही तरी त्या जमिनीत काय उगवत नाही. तर जाऊ द्या. कुठं भांडायचं?'' मग लोक चेवानं म्हणाले, ''असं कसं दबून चालंल? आज नाय तर उद्याच्याला ठोकू की चिन्याला. उगा आपला हिस्सा कसला कबूल करून टाकताय होय?''

मला कळलं, की काळजाला हात घालणं हेच खरं वक्तृत्व. आधी वक्त्यानं हेरलं पाहिजे की श्रोत्यांना रस कशात आहे? मग त्यानं श्रोत्यांशी समरस व्हायला हवं. एकदा श्रोते आणि वक्ता समरस झाले की चतुर वक्ता आपले सर्व म्हणणे श्रोत्यांच्या गळी उतरवू शकतो. वक्ता म्हणजे पोपट किंवा कॅसेट नव्हे, तो चिंतक हवा, विचारवंत हवा. त्याचे बोलणे ऐकून श्रोत्यांची वृत्ती बदलली पाहिजे. एरवी

भाषण म्हणजे नुसते मनोरंजन होईल.

मी अशा वक्तृत्वाची स्वत:ची अशी शैली तयार केली. आपलं बोलणं लोकांना आवडणारं, हसवणारं हवं आणि विचार करायला लावणारं, अंतर्मुख करणारंही हवं अशी दक्षता घेतली.

आता मी अखंड व्याख्याने देत असतो; पण कॉलेजात असताना माझी १।।-२ तासांची स्वतंत्र व्याख्याने झाली होती, ती आजही लोकांना आठवतात. आपल्याला मराठीप्रमाणेच हिंदी, इंग्रजी (आणि संस्कृतातूनही) व्याख्याने देता आली पाहिजेत, अशी साधनाच मी केली. आपल्याला हे कसं जमेल, आपलं हसं तर होणार नाही ना? असल्या शंकांनी मी कधीच अडखळलो नाही.

जन हसती तर हसुंदे,
सवयच त्यांना गंमत करण्याची।
जे पडती त्या हसती,
जे चढती त्या संमत करण्याची।।

यातून पुढे मी कॉलेजमध्ये प्राध्यापक झालो आणि माझा ठसा त्या क्षेत्रातही उमटवण्याचा प्रयत्न केला.

माझ्या गावंढळपणाला लोक हसतात हे मला कळत असे. म्हणूनच मनात अशी ईर्षा निर्माण झाली की, आपण कुत्सितपणे हसणाऱ्यांना माना डोलवायला लावले पाहिजे, तर खरे.

मी संस्कृतचा खास अभ्यास करायचे ठरवले. तथाकथित संस्कृतज्ञांनी विद्येच्या दाराशी पाठांतराची तटबंदी उभी करून ठेवली आहे. आधी या ४७ शब्दांची प्रत्येक २४ रूपे अचूक घोकून दाखव. तर तुला संस्कृत येईल अशी प्रारंभिक परीक्षा त्यांनी सांगितली. मला घोकंपट्टीचा विलक्षण कंटाळा. माझी विस्मरणशक्तीही तशीच जबरदस्त, म्हणून त्यांना म्हटले की, ''मातृभाषा मराठीची विभक्तरूपे मी कुठे घोकली आहेत? तरी मी अचूक बोलतोच ना? तशीच, मातृभाषेप्रमाणेच ही महामातृभाषा मला का नाही सहजगत्या अवगत होणार?'' एवंच, भाषेचं सहजशिक्षण सुखसाध्य आहे असं तत्त्व मी सांगू पाहात होतो; पण पंडितांनी पाठांतराला अंतर द्यायचे नाकारले. मग मी चेवाने घोकंपट्टीचा पंडित झालो. संस्कृतच्या प्रत्येक परीक्षेत पहिलाच यायचो. पुढे विद्यापिठीय परीक्षेत आजही अबाध्य असणारे विक्रम करीत मी एम्.ए. पर्यंत पहिलाच येत गेलो. दहावीच्या एस्.एस्.सी. संस्कृताची तयारी करताना गुरुवर्य आठल्येकर शास्त्रींबरोबर संपूर्ण लघुकौमुदी शब्दश: प्राशन केली. बोल-बोल म्हणता संस्कृतात श्लोकरचना करायला शिकलो. व्यासंगाचे वेड लावून घेतले. कॉलेजमध्ये प्रा. अर्जुनवाडकरांसारखे दुर्लभ गुरू लागले. त्यांनी ज्या मायेने संस्कृत शिकवले, त्याला तोड नाही. ज्या कॉलेजात शिकलो त्याच एस्.पी.त मी संस्कृतचा प्राध्यापक म्हणून पदवीपर्यंत शिकवू लागलो.

पुढे प्रबोधिनीच्या पसाऱ्यात ग्रामविकास, उद्योजकता, चळवळी यांच्यासाठी संस्कृतचा व्यासंग अर्ध्यावरच राहिला, ही मोठीच रुखरुख मनात आहे खरी.

एवंच, आंगठेबहाद्दर शेतकऱ्यांची मुलं कमकुवत आहेत म्हणून मागे पडतात हे खरं नाही. संधीअभावी ती सुकतात. माझ्यासारखी संधी मिळत गेली, तर त्या खाणीतही मोठा रत्नसंभार आहे हे ती दाखवून देतील. कालिदासानं म्हटलं असेल उपरोधानं की, 'पत्तने विद्यमानेऽपि ग्रामे रत्नपरीक्षा' (शहाणे शहरात शोधण्याऐवजी त्यांना गावोगाव धुंडाळायचे कशाला?) पण माझं उदाहरण सांगतं की 'ग्रामे म्हणजे रत्नसंपदा'.

••


**प्रा. राम डिंबळे**
नवी पेठ, पुणे ३०

**सेल्युलर नेटवर्कचे कार्य कसे चालते?**

सेल्युलर सेवा म्हणजे कम्युनिकेशन रेडिओ किंवा वॉकी-टॉकी नव्हेत; त्याऐवजी वायरलेस आणि केबल टेक्नॉलॉजी या दोन्हींचा उपयोग करून रेडिओ ट्रान्समिशनचे सामान्य टेलिफोन यंत्रणेबरोबर एकत्रीकरण केले जाते. सेल्युलर सेवेचे नेटवर्क, सेल्समध्ये विभागलेले असते आणि प्रत्येक सेल रेडिओ बेस स्टेशनाद्वारे नियंत्रित केला जातो.

सेल्युलर फोन, रेडिओद्वारा जवळच्या रेडिओ बेस स्टेशनशी जोडलेला असतो आणि हे स्टेशन फायबर ऑप्टिक्स किंवा मायक्रोवेव्ह ट्रान्समिशनद्वारा स्विचिंग सेन्टरशी जोडलेले असते. तुमचा कॉल दुसऱ्या सेल्युलर फोनकडे पाठवायला पाहिजे, की सर्वसामान्य पब्लिक टेलिफोन यंत्रणेकडे हे सेन्टर ठरविते.

जेव्हा तुम्ही एका रेडिओ बेस स्टेशन विभागातून (सेल) दुसऱ्या विभागात जाता, तेव्हा आपोआपच ही यंत्रणा तुम्हाला नव्या बेस स्टेशनशी जोडते. तुमच्या लक्षातही येणार नाही, इतक्या कमी वेळात तुमचा सेल्युलर फोन नव्या रेडिओ बेस स्टेशन विभागात लॉक होतो आणि तुमचा कॉल विनाअडथळा चालू राहातो.



# एका कोळियाची कथा

एक छोटंसं गाव होतं. त्यामधे एक शेतकरी राहात होता. त्याचे नाव कोळिया. शेतकऱ्याला न शोभण्यासारखा आळशीपणा त्याच्यामध्ये होता. सारे शेतकरी शेतावर जायचे. शेतात राबायचे. उत्तम पीक काढून मजेत रहायचे. कोळियाचे सारे विलक्षणच!

रोज सकाळी लवकर उठायचा आणि साऱ्या शेतकऱ्यांबरोबर शेतात जायला निघायचा. वाटेत कुठेतरी एखाद्या झाडाखाली थांबायचा, तेथील जवळपासची फळे खायचा.जवळच्या झऱ्याचे पाणी प्यायचा मस्त झोपायचा. आणि घरी यायचा. एक दिवस त्याच्या बायकोला शंका आली. ती म्हणाली,‘‘तुम्ही इतक्या लवकर कसे घरी येता?’’ कोळिया उत्तरायचा- माझे काम फार भरभर आहे. यंदा तर मी एक प्रयोग करणार आहे!’’

‘‘कसला प्रयोग?’’

‘‘यंदा मी शेतात भुईमूग पेरणार आहे.’’

‘‘त्यात काय नवीन? दरवर्षीच पेरतो आपण एका शेताच्या तुकड्यात भुईमूग.’’

‘‘तू उद्या मला खारे शेगदाणे करून दे. चांगले खमंग भाजून दे. तेच पेरू शेतात.म्हणजे पीक पण खऱ्या खमंग दाण्याचं येईल.’’

‘‘वेडे का काय तुम्ही? भाजलेले दाणे कसे उगवतील?’’

‘‘बायकांना काही अक्कल नसते. नवरा सांगतो तेवढे करावे.’’

बिचारी कोळियाची बायको! तिने शेजारणीकडून पायलीभर उसने शेंगदाणे आणले. कढईत दाणे खमंग भाजले. मीठ घालून खारवून तयार केले. थैली कोकियाच्या हातात देऊन ती म्हणाली ‘‘घ्या करा तुमचा प्रयोग! ’’

पण कोळियाचा प्रयोग वेगळाच होता. मुळातच तो आळशी आणि खादाड. त्याने ती शेंगदाण्याची थैली घेतली. अर्ध्या वाटेतच तो थांबला. बायको जेवण बरोबर देत असेच. ते त्याने संपवले आणि यथेच्छ खारे दाणे खाल्ले. उरलेले दाणे पिशवीत ठेवले आणि पिशवी एका झाडाच्या ढोलीत लपवून ठेवली. नंतर चांगले तीन चार दिवस त्याचा फराळ चालू होता- कोळियाचा.

सुगीचे दिवस सुरू झाले. लोकांची शेते पिकली,धान्याच्या गाड्या घरी येऊ लागल्या, तशी कोळियाच्या बायकोने भुणभूण सुरू केली. ‘‘अहोऽ’’ आपल्या शेतीची कापणी कधी करायची? धान्य वेळेत घरी आले की

बरे!आणि हो! आपण लावलेल्या खाऱ्या दाण्यांचे शेत पण पिकले असेल ना?

आता आली का पंचाईत! खरं म्हणजे कोळियाने शेत लावलेच नव्हते. तर धान्य कुठून आणणार?आता काहीतरी युक्ती करायला हवी. बायको तर सारखी भुणभुण करते आहे. तेव्हा शेतात काहीतरी करायला तर हवे.त्याने आपल्या शेजारच्या शेतातील धान्य रात्री चोरून आणले. मोठी थैली बायकोपुढे टाकून तो म्हणाला–

''पाहा! कसे छान पीक आले आहे ते!''

बायको हरखली. म्हणाली– ''सर्व शेतीची कापणी केव्हा करायची?''

कोळियाने काहीच उत्तर दिले नाही.दुसऱ्या दिवशी रात्री तो परत शेतात गेला आणि त्याने परत एक पोतेभर धान्य चोरून आणले, घरात पाच-सहा पोत्यांची थप्पी झाली. बायकोला संशय आला, हा काय प्रकार? रात्री कशाला पीक काढायचे? आणि ते सुद्धा एक पोतेच! काहीतरी नक्कीच भानगड असणार. ती अगदी अस्वस्थ झाली; पण करणार काय बिच्चारी!

पण ज्या शेतकऱ्याच्या शेतातील धान्य चोरले जात होते त्याच्या लक्षात आले. चोर पकडायलाच पाहिजे. त्याने एक युक्ती केली. त्याने एक रबराचा माणूस तयार केला. शेतामधे हातात काठी घेतलेला हा रबराचा माणूस एका फळीला बांधून त्याने उभा करून ठेवला.

रात्र झाली. कोळिया शेतात आला. हातात पोतं होतं. खळ्यावर असलेले धान्य तो पोत्यात भरत होता. इतक्यात त्याचे लक्ष समोर गेले. समोर एक माणूस उभा होता.--

''कोण आहे ते! इतक्या रात्री शेतात कोण आलंय?'' एक नाही की दोन नाही.काहीच कसा हा माणूस बोलत नाही! कोळिया संतापला. पुढे झाला. त्याने त्या माणसाच्या एक थोबाडीत दिली. दिवसभर पडणाऱ्या कडक उन्हाने रबर पाघळला होता. कोळियाचा हात त्याला चिकटून बसला. आता आपण पकडले जाणार या भीतीने त्याने दुसऱ्या हाताने त्या माणसाचे तोंड मागे ढकलले, तर दुसराही हात तोंडाला चिकटून बसला. सकाळ झाली. शेतीचा मालक आला. रबरी माणसाला चिकटून बसलेला कोळिया त्याने पाहिला. तो म्हणाला बरी शिक्षा झाली! न्यायाधीशानेही त्याला दंड केला. धान्याचे पैसे परत द्यावे लागले. तेव्हापासून कोळिया तोंड लपवून कोपऱ्यात बसू लागला. अनेक वर्षे गेली या कोळियाचे वंशजही असेच कोपऱ्यात बसू लागले आणि अंगाला चिकटलेल्या रबराचे धागे काढू लागले. परत त्यातच अडकू लागले. माणसे म्हणायची, 'पाप केलं की त्यांच्यात आपण अडकणारच! बालमित्रानो! हा कोळिया तुम्ही पाहिला आहे. आपल्या घराच्या कोपऱ्यात आपल्या अंगावरील रबराचे धागे सोडवीत जाळे विणणारा आणि स्वत:च त्यात अडकणारा. आपण ज्याला 'कोळी' म्हणतो ना, तोच हा कोळिया!

**मूळ कथा (नायजेरियन)**

••

---

**डॉ. लीला दीक्षित**
'४'अनुवी, ५५ डहाणूकर कॉलनी,
कोथरूड, पुणे २९.

*स्वस्तात जगप्रवास*

कधी कधी चलाख लोक दुसऱ्यांना ठकविण्यासाठी विज्ञानाला वेठीला धरतात. आता हाच किस्सा पाहा ना :

पॅरिसच्या एका कल्पक ठकसेनाने २५ सेंटमध्ये, अत्यंत स्वस्त प्रवासाचं आश्वासन देणारी जाहिरात वृत्तपत्रांतून प्रसिध्दीस दिली. हजारो किलोमीटर अंतराच्या या प्रवासाला काहीही त्रास, दगदग होणार नाही याची हमी दिली होती. या जाहिरातीला भरपूर प्रतिसाद मिळाला. असंख्य लोक पैसे भरून नाव नोंदवून प्रवास कधी सुरू होईल याची प्रतीक्षा करू लागले.

मात्र, प्रवासाचे तिकीट वगैरे येण्याच्या आधी या सर्व लोकांना एकेदिवशी एक पत्र आले. ''आपण सर्वजण पृथ्वीवर आहोत आणि पृथ्वी आपल्यासकट सूर्याभोवती फिरत आहे. म्हणजे तुम्ही सध्या ताशी हजार किलोमीटरपेक्षा अधिक वेगाने अवकाशात प्रवास करीत आहात. तेव्हा आता आरामात खुर्चीत बसा आणि प्रवासाचा आनंद लुटा!'' 'खुर्ची खिडकीजवळ घेतल्यास बाहेरचं दृश्य बघण्याची मजा तुम्ही घेऊ शकाल' अशी खास सूचनाही पत्रात होती.

आता यातील गमतीचा भाग सोडला, तर वैज्ञानिकदृष्ट्या ही फसवणूक होणार नाही. कारण, पृथ्वी आपल्यासकट प्रचंड वेगाने फिरतेच; मात्र पृथ्वीवरील वस्तू त्याच वेळी फिरत असल्यामुळे पृथ्वीच्या गतीची जाणीव आपल्याला होत नाही. त्यामुळे जगप्रवास नाही घडला तरी अभिनव वैज्ञानिक संकल्पनेची माहिती देण्यासाठी २५ सेंट ही तशी किरकोळ नाही का ?



# कोड्यांच्या अंतरंगात

**डॉ. सुरेश करंदीकर**

तुमच्या सर्वांच्या परीक्षा नुकत्याच संपल्या असतील. दिवाळी सुट्टी सुरू झाली असेल. दिवाळीच्या फराळाबरोबर बुद्धीला खाद्य नको का? म्हणून कोडी.

१) माझ्याजवळ तीन भांडी आहेत. सर्वात लहान भांड्यात ३ लिटर दूध मावते. दुसऱ्या भांड्यात पाच लिटर दूध मावते. तिसरे एक भांडे आहे त्यात नेमके किती लिटर दूध मावते ते माहीत नाही; पण आठ लिटरपेक्षा जास्त दूध मावते. तीन लिटरचे पाच लिटरचे ही दोन्ही भांडी भरली आहेत. सर्वात मोठे भांडे रिकामे आहे. या तीन लिटर भांड्यांच्या मदतीने मला तीन लिटरच्या आणि पाच लिटरच्या भांड्यात एकेक लिटर दूध हवे आहे. तीन लिटर आणि पाच लिटरच्या भांड्यात प्रत्येकी किती दूध ठेवाल?

भांड्यावर कसल्याही खुणा करावयाच्या नाहीत!

२) तीन मित्र प्रवासाला निघाले होते. एकाजवळ सहा, दुसऱ्याजवळ पाच व तिसऱ्याजवळ चार भाकरी होत्या. त्यांना वाटेत प्रवासी भेटला. मग चौघांनी मिळून सारख्या प्रमाणात त्या भाकरी वाटून घेतल्या. जेवण झाल्यानंतर त्या प्रवाशाने त्यांना तीन रूपये दिले. तर तिघांनी हे रुपये कसे वाटून घ्यावेत?

३) परवाच्या गणेशोत्सवात मी पेणहून गणपतीच्या देखण्या मूर्ती आणल्या. मी मूर्तींचे पार्सल उघडले. आणि मी देवघरात रंगविलेल्या कोनाड्यात मूर्ती ठेवू लागलो. एकेक कोनाडयात एकेक याप्रमाणे मूर्ती ठेवल्या, तर एक मूर्तीला कोनाडाच उरला नाही, म्हणून मी दोन दोन मूर्ती एकेका कोनाड्यात ठेवू लागलो तर एक कोनाडा शिल्लक व रिकामा राहिला. तर मित्रांनो आता ओळखा आमच्या देवघराला कोनाडे किती होते व पेणहून मूर्ती किती आणल्या होत्या?

४) गिरीशरावांनी एकशे तीन रुपयांची पुस्तके खरेदी केली. हे एकशे तीन रुपये त्यांनी आठ नोटांत दिले.या आठ नोटात एक रुपयाची नोट मुळीच नव्हती. तर सांगा की, गिरीशरावांनी किती रुपयाच्या नोटा दिल्या?

५) एका गृहस्थाला नारळाच्या बागेतून नारळ आणावयाचे होते. त्या गृहस्थाने माळ्यांना नारळ घेण्याची परवानगी मागितली.त्या बागेला तीन दरवाजे होते आणि प्रत्येक दरवाजावर उभ्या असलेल्या माळ्याने सांगितले की, तू आणशील तेवढ्या नारळांतील निम्मे नारळ मला द्यावे लागतील.' तो गृहस्थ चतुर होता तो म्हणाला, 'मी तुम्हाला निम्मे नारळ देईन; पण तुम्ही मला त्यातील एक नारळ परत दिला पाहिजे.' माळ्यांनी ते कबूल केले. तो गृहस्थ नारळाच्या बागेत गेला. त्याने तिन्ही दरवाजांवर माळ्यांना निम्मे नारळ दिले एक नारळ प्रत्येक माळ्याने त्याला परत दिला. घरी जाताना त्या चतुर गृहस्थाजवळ जेवढे नारळ त्याने स्वत:साठी आणायचे ठरविले होते तेवढे नारळ त्याच्या हातात कायम राहिले. तर मित्रानो सांगा की, त्या गृहस्थाने किती नारळ घेतले होते?

विद्यार्थीमित्रांनो, मी तुम्हांला पाच समस्या सांगितल्या आहेत. यापैकी तीन किंवा तीनपेक्षा जास्त प्रश्नांची उत्तरे तुम्हांला देता आली, तर तुमची बुद्धी चांगली आहे हे समजायला हरकत नाही मग तुमच्या बुद्धीचा पडताळा या समस्यांच्या आधारे घेणार ना?

(उत्तरे अंकात इतरत्र) ••

**डॉ सुरेश करंदीकर**
दयानंद शिक्षणशास्त्र महाविद्यालय
सोलापूर ४१३००२

# गुरुत्वाकर्षणाचा स्थिरांक 'g'

– डॉ. सी. के. देसाई

मुलांनो, प्रयोग हा विज्ञानाचा आत्मा आहे. प्रयोगाशिवाय विज्ञान हे विज्ञान नव्हेच. एखादा सिद्धांत प्रयोगांनी सिद्ध होऊ शकत नसेल तर त्याला विज्ञानात स्थान मिळत नाही. म्हणून प्रयोग करीतच विज्ञान आत्मसात करायला हवे. जे विज्ञान आपण वर्गात वाचतो, त्या संबंधीचे प्रयोग विद्यार्थ्यांनी स्वत: करून पाहावेत. असे प्रयोग करून दाखवा असे हट्ट शिक्षकांकडे करावेत. शिक्षकांनीही ते कौतुकाने पुरवावेत. आपल्या घरी अथवा शाळेच्या प्रयोगशाळेत काही गोष्टी शक्य नसतील, तर त्या विज्ञानशोधिकेत येऊन करून पाहाव्यात, यासाठीच पुण्यामध्ये विज्ञानशोधिकेची स्थापना झाली आहे.

पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणाचा स्थिरांक ''स'' ची किंमत प्रयोगशाळेत प्रयोगांनी कशी मिळवतात, यासंबंधी दोन- तीन प्रयोग तुम्हाला थोडक्यात सांगणार आहे.

पदार्थांमध्ये गती उत्पन्न होण्यास बलाची आवश्यकता असते. गुरूत्वाकर्षणाचे बल, विद्युत चुंबकीय बल आणि अणुकेंद्रातील शक्तिमान बल तीन प्रकारची बले विश्वातील व्यवहराला कारणीभूत असतात, हे आता प्रयोगाधारित सत्य म्हणून मान्य झाले आहे. वस्तुमान हा पदार्थाचा मूलभूत गुणधर्म आहे आणि कोणत्याही दोन पदार्थांमध्ये आकर्षण निर्माण करणारे जे बल असते त्यास गुरुत्वाचे बल असे म्हणतात. गुरुत्वाकर्षणाच्या बलामुळेच पृथ्वी व इतर ग्रह आपल्या विशिष्ट कक्षेत सूर्याभोवती फिरत असतात. तसेच आकाशातील इतर गोलांच्या गतीलाही गुरुत्वाकर्षणाचे बलच प्रामुख्याने कारणीभूत असते. या बलामुळे दोन पदार्थात आकर्षणच होत असते. हे सदासर्वकाळ कार्य करीत असते. न्यूनने दोन पदार्थामध्ये बल किती असते याचा सिद्धांत व सूत्र सांगितले आहे. $F=\frac{Gm_1m_2}{r^2}$


$m_1$ आणि $m_2$ हा दोन पदार्थाची वस्तुमाने दर्शवितात तर, 'r' ने दोन पदार्थांमधील अंतर दाखविले जाते.'. "G' हा नुसता गुरूत्वस्थिरांक असून 'F' ही गुरुत्वाकर्षणाच्या बलाची किंमत दर्शविते. पृथ्वीच्या गुरुत्व- बलामुळेच सर्व पदार्थ व प्राणिमात्र पृथ्वीवर असतात. कोणताही पदार्थ नुसता ''उचलायचा'' झाला तरी या बलाविरुद्ध कार्य करावे लागते. त्यासाठी उर्जा खर्च करावी लागते. उचललेला अथवा वर नेलेला कोणताही पदार्थ नुसता सोडून दिला, तरी तो पृथ्वीकडे आकर्षिला जातो, यालाच ''पदार्थ पृथ्वीवर पडतो'' असे आपण म्हणतो. पृथ्वी आणि m वस्तुमानाचा कोणताही पदार्थ यामध्ये m 'g' इतके गुरुत्वाकर्षणाचे बल असते. यालाच त्या पदार्थाचे वजन असे म्हणतात. न्यूटनच्या सूत्रामध्ये $m=m_1$ हे पदार्थाचे वस्तुमान मानले, तर $r=R$ पृथ्वीची त्रिज्या होते.म्हणजे पदार्थाचे वजन अर्थात पृथ्वी व पदार्थ यामधील गुरुत्वबल. $=mg=m\cdot\frac{GM}{r^2}$ असे होते. प्रत्येक ग्रहाचे वस्तुमान (m) व सरासरी त्रिज्या (R) वेगवेगळी असल्याने प्रत्येक ग्रहावर ''स''ची किंमत वेगवेगळी असते, म्हणजेच एकाच पदार्थाचे वस्तुमान जरी सर्व ग्रहांवर तेच असले तरी त्या वस्तूचे वजन वेगवेगळे असते. इतकेच नव्हे ध्रुवीय आणि विषुववृत्तीय त्रिज्या वेगवेगळी असल्याने पृथ्वीवर सुद्धा 'g' ची किंमत थोडी वेगवेगळी भरते. प्रत्येक वस्तूवर 'g' सदासर्वकाळ कार्य


करीत असल्याने, विज्ञानाच्या प्रत्येक जिज्ञासूने याची किंमत प्रयोगशाळेत प्रयोग करून स्वत: मिळवायला हवी व ती सर्वसामान्य किंमतीबरोबर ताडून पाहायला हवी. इतकेच नव्हे तर 'g' ची किंमत मिळविण्याचे प्रयोग करायला हवेत.

प्रयोगशाळेत 'g' ची किंमत सामान्यत: साध्या आंदोलनाद्वारे काढली जाते. धातूचा गोल गोळा. साध्या कपडे शिवण्याच्या दोऱ्याने बांधून तो टांगला असता, साधा आंदोलक तयार होतो. धातूच्या गोळयाऐवजी दगड जरी बांधला तरी चालतो. या आंदोलकाचा आंदोलनकाल फक्त त्याच्या लांबीवर व 'g' च्या किंमतीवर अवलंबून असतो. याचाच अर्थ असा की, जर आंदोलकाची लांबी आणि आंदोलनकाल याचे अचूक मापन केले तर 'g' ची किंमत अचूक मिळू शकते. $g=4p^2 (1/T^2)$ यात TT=22/7, l = लंबकाची लांबी व T= आंदोलनाचा काळ होय.

वरील सूत्र शिकविण्यापूर्वीच शाळेत विद्यार्थी न्यूटनचे गतीविषक सिद्धांत आणि समीकरणे शिकत असतात. बलाची व्याख्या F=ma करून यातील "a" म्हणजे 'F' या बलामुळे वस्तुमानाच्या पदार्थात उत्पन्न होणारे ''त्वरण'' याची त्यांना ओळख झालेली असते.हे बल जेव्हा पदार्थ आणि पृथ्वी यांच्यातील गुरूत्वबल असते, तेव्हा "a" म्हणजेच "g" होतो. या सूत्रावरूनच ही न्युटनची गतीविषयक समीकरणे तयार होतात. यातील दुसरे समीकरण $S=ut+{}^{1}/_{2}at^2$ असे आहे. पदार्थ जेव्हा पृथ्वीकडे मोकळा सोडला जातो तेव्हा u= पदार्थाची सुरूवातीची गती =o असते. a ची जागा g ने घेतल्याने, पृथ्वीवर पडताना पदार्थाने कापलेल्या अंतराचे सुत्र $s={}^{1}/_{2}gt^2$ इतके सोपे होते. एखादा पडणारा पदार्थ निश्चित किती उंचीवरून पडतो ती उंची (s) आणि त्याचा पतनकाल (t) मोजला तर 'स' ची किंमत काढता येते. पतनकाल व उंची मोजता येईल, असा शालेय अभ्यासक्रमाशी सुसंगत प्रयोग पाहू या.

सुमारे १ मीटर लांब, ३-४ सें. मी. रूंद व १-२ सें.मी. जाड अशी लाकडाची पट्टी घ्यावी. लाकडाच्या पट्टीला रुंदीच्या बाजूने आणि जाडीच्या बाजूने ३ ते ४ छिद्रे पाडा. जाडीच्या बाजूने सायकलचा स्पोक घालून ही पट्टी स्टँडला अडकवा. एकेका छिद्रातून स्पोक घालून जर या पट्टीचा आंदोलनकाल मोजला तर आपल्याला असे आढळून येते की, हा आंदोलनकालही आंदोलकाच्या लांबीबर अवलंबून आहे. आता समोरच्या एका छिद्रातून दोरा ओवून घ्या. या दोऱ्याच्या टोकाला दोन ते तीन सें.मी. व्यासाचा एक लोखंडी गोळा बांधा. हा दोरा दुसऱ्या स्टँडवरील पट्टीवरून पुन्हा लाकडी पट्टीच्या खालच्या बाजुला मधोमध बांधा दोऱ्याची लांबी जर सुयोग्य जळवून घेतली तर पट्टी आकृतीत दाखविल्याप्रमाणे तिरकी दिसेल.



हा दोरा जळत्या काडीने जाळला अथवा कात्रीने कापला असता लोखंडी गोळा सरळ खाली पडू लागेल आणि तत्क्षणी लाकडी पट्टी आंदोलन सुरू करील. आंदोलन घेत लाकडी पट्टी गोळ्याच्या रेषेत आली. तर क्रिकेटच्या चेंडूला बॅटने फटका मारावा तसा गोळ्याला फटका बसेल. आपल्याला नेमके हेच करावयचे आहे. आंदोलनकाल बदलता यावा म्हणून जाडीच्या बाजूने तीन चार छिद्रे घेतली आहेत तर पडणाऱ्या गोळ्याची उंची बदलता यावी म्हणून रुंदीवर तीन चार छिद्रे घेतली आहेत. साध्या पांढऱ्या कागदाच्या घडीत कार्बन कागद घालून पट्टीला खालच्या बाजूला चिकटपट्टीने चिकटवून ठेवा. लोखंडी गोळा पट्टीवर जिथे आपटतो तिथे पांढऱ्या कागदावर काळा ठिपका उमटतो यावरून लोखंडी गोळा किती उंचीवरून (s) खाली पडला हे अचूक काढता येते. लाकडी पट्टीचा आंदोलनकाल स्वतंत्रपणे व अचूकपणे मोजता येतो. हल्ली सेकंदाचा १००वा भाग मोजू शकणारी इलेक्ट्रॉनिक मनगटी घड्याळे उपलब्ध असतात.त्याच्या साहाय्याने वीस आंदोलनांसाठी आंदोलनकाल मोजल्यास एक शतांश सेकंदाची चूक वीस आंदोलनांवर वितरित होऊन आंदोलनकाल (T) अचूक मोजला जाऊ शकतो. S आणि $t = \frac{T}{4}$ या दोन्ही किंमती अचूक मोजून $S = \frac{1}{2}gt^2$ या समीकरणात घातल्यास 'स'ची किंमत मिळते.

पृथ्वीवर पडणाऱ्या सर्व पदार्थावर पृथ्वीच्या गुरुत्वबलाचे एक त्वरण कार्य करीत असते. त्यामुळे वरून सोडलेले कोणतेही दोन पदार्थ सारख्याच गतीने आणि सारख्याच वेळाने पृथ्वीवर पडतात, हे गॅलिलिओने प्रथम दाखवून दिले. वरच्या प्रयोगाच्या साहाय्याने हे सिद्ध करणे अगदी सोपे आहे. वेगवेगळ्या वेळी प्रयोग करताना जर वेगवेगळे गोल अथवा पदार्थ वापरले, तरी त्यामुळे तयार होणारे ठिपके एकाच ठिकाणी उमटतात. म्हणजेच लाकडी आंदोलकाच्या १/४ आंदोलन काळात वेगवेगळ्या वजनाचे पदार्थ सारखेच अंतर कापतात हेही सिद्ध होते.


यातील वेळ मोजण्याची अचूकता वाढवली तर 'स'ची किंमतही अधिकाअधिक मिळते.याच प्रयोगात लोखंडी गोळा विद्युतचुंबकाच्या साहाय्याने वर स्थिर पकडता येतो. विद्युत्चुंबकातील विद्युतप्रवाह बंद केल्याबरोबर लोखंडी गोळा खाली पडणे सुरू होते. आणि तत्क्षणी इलेक्टॉनिक घड्याळ सुरू होते. विशिष्ट अंतरावर प्रकाशकिरणाचा सेन्सरही ठेवलेला असतो. यातून तो गोळा गेल्याबरोबर घड्याळ बंद होते. यामुळे सेकंदाच्या भागापर्यंत वेळ अचूक मोजली जाते व (g) किंमत अचूक काढता येते. मुंबईच्या होमी भाभा विज्ञानशिक्षणकेंद्राच्या साहाय्याने आपल्या विज्ञानशोधिकेतही हा प्रयोग करण्याची सोय उपलब्ध आहे. तुम्ही थोडीशी चिकाटी ठेवलीत तर तुम्हालाही हे प्रयोग स्वत: घरी अथवा शाळेत करून पाहता येतील?


**डॉ. सी. के देसाई,**
संचालक विज्ञानशोधिका
भारतीय विद्या भवन पुणे १६

## कापाकापीचे कोडे

एखादी आकृती घेऊन तिचे तुकडे करायचे व ते तुकडे जोडून एक निराळीच आकृती तयार करायची. यावर आधारित काही मजेदार कोडी पुढे दिली आहेत.


चित्र १ मध्ये बारा बाजू असलेल्या एका नियमित बहुभुजाकृतीचे सहा तुकडे तयार केले आहेत. हे सहा तुकडे पुन्हा जोडून चौरस तयार करा.






चित्र ३ मध्ये दाखविलेल्या E अक्षराच्या आकृतीचे पाच तुकडे केले आहेत. हे पाच तुकडे जोडून चौरस तयार करा.

चित्र ४ मध्ये दाखविलेले अधिक चिन्ह ५ चौरसांनी मिळून बनले आहे. त्याचे चार तुकडे अशारितीने करा की ते तुकडे जोडून १ चौरस तयार होईल.



(कोड्याची उत्तरे पुढील अंकात पाहा.)



# कबुतरांचं जग

**अनुराधा औरंगाबादकर**

**निळी– जांभळी कबुतरं! पंख फडफडवून हवेत झेपावणारी कबुतरं! गटर्र गुंऽऽ करणारी भोळी, निष्पाप दिसणारी कबुतरं! 'दाणा खा, पाणी पी, भुर्रकन उडून जा! या कवितेल्यासारखं याचं साधं जगणं!**
**पण स्वत:च्या आनंदासाठी या निष्पाप कबुतरांच्या स्पर्धा लावल्या जातात. आणि इथेच सुरू होतो त्यांच्या जीवनातला दुसरा अध्याय! कारूण्यानं भरलेला! स्पधेत जखमी झालेल्या कबुतरांची आर्त गाणी समजून घेणारे पक्या आणि दीपू तुमच्याच वयाचे! त्या कबुतरांच्या जगात तुम्हाला ते घेऊन जातील! प्राण्यांच्या भावबिंदूकडे बघण्याची एक नवी दृष्टी देतील.**

सकाळची वेळ होती, घाईघाईनं मी स्वैपाक करीत होते. एवढ्यात आमच्या कुत्रीचं मोठमोठ्यांदा ओरडणं कानावर आलं. आमची कुत्री छोटी होती. दिवसभर तिला घरातच बांधून ठेवायचो आम्ही! तिचं नाव आम्ही चंदा ठेवलं होतं, पण सकाळी– सकाळीच ती साखळी तोडून पळून गेली होती! ती ओरडायला लागली म्हणून बाहेर येऊ पाहू लागले.

तीन–चार भली मोठी कुत्री तिच्या अंगावर धावून येत होती. तिला मारत होती. मी तिला हाका मारेपर्यंत तिच्या पायाला दुसऱ्या कुत्र्यानं चावा घेतला होता. तिच्या पायातून रक्त वाहात होतं, मी धावत गेले आणि तिला उचलून घरात घेऊन आले. तिच्या जखमेवर हळद चेपली. तिला पांघरूणात गुंडाळलं रिक्षातून डॉक्टरकडे घेऊन गेले. जनावरांचा सरकारी दवाखाना! एक डॉक्टर आणि दोन मदतनीस यांची धावपळ उडाली होती. सरकारी दवाखान्याशिवाय दुसरीकडे जनावरांच्या उपचाराची सोय नव्हती, सारी गर्दी इथंच एकवटली होती. कुणीतरी बाई होत्या. त्यांची म्हैस बाळंतपणासाठी अडली होती. एका शेतकऱ्याचा बैल आजारी पडला होता. तो चाऱ्याला तोंड लावत नव्हता. शेजारी एक शेळी, बँऽबँ करून किंचाळत होती. तिचा पाय तुटला होता.

एका पांढऱ्या पामेरियन कुत्र्याला सलाईन लावलं होतं. एवढ्या गोंधळात मी माझ्या चंदाला घेऊन गेले. डॉक्टरांनी तिला साखळीनं बांधून ठेवलं आणि ते तिला औषध लावायला लागले.

मला ते दृश्य बघवेना, म्हणून मी बाहेर येऊन उभी राहिले.

एवढ्यात एक मुलगा 'डॉक्टर, डॉक्टर' म्हणून ओरडत आला. बारा तेरा वर्षाचा तो मुलगा जिवाच्या आकांतानं हाका मारीत होता. गळ्यात तांबडा रूमाल बांधलेला,मळकट टी शर्ट, जुनी–पुराणी रंगही ओळखू न येणारी हाफ चड्डी असा त्याचा अवतार होता. अंगाला कित्येक दिवसात पाणीही लागलं नसावं, असा कळकट रंग होता त्याचा.

''डॉक्टर पुढे आले, त्यांनी विचारलं, --- ''आज काय झालं रे दीपक?---''--- जखमी झालंय! खूप रक्त येतंय! तुम्ही लौकरलौकर चला डॉक्टर नाहीतर– नाहीतर त्याचा जीव जाईल हो! तो कळवळून बोलत होता -- पटकन जा आणि घेऊन ये त्याला!–''डॉक्टर असं म्हणताच तो पळत सुटला.

दीपकची नि माझी ही पहिली भेट होती. कुणीतरी आजारी होतं आणि तो काळजीत होता, एवढंच मला समजलं! आता हा त्याच्या कुणाला घेऊन आला आणि त्याचं औषधपाणी डॉक्टर करीत बसले तर माझ्या चंदाचं कसं होईल या काळजीत मी पडले.

चंदा ! आमचं हे बाळच होतं जणू! चंदा कधी कुत्रा म्हणून वागली नाही आणि आम्हीही तिला कधी तसं बागवलं नाही. ती आमची लाडकी होती. एवढसं लागलं तरी तिला ते सहन व्हायचं नाही. ती माणसारखी

विव्हळायची. तिचं रडणं बघून आम्हीही रडायचो. हे सारं मनात येत असताना, दुसरा एक मुलगा धापा टाकीत आला. त्याच्या हातात एक कबुतर होतं.

-- ''पक्या आज पुन्हा मारलं वाटतं तुझ्या कबुतराला?--'' डॉक्टर त्याच्याकडे वळून विचारू लागले.

--''बघा ना हो डॉक्टर लागलंय त्याला दिपू मघाशीच तुम्हाला बोलवायला निघाला होता. तुमची वाट बघण्यापेक्षा कबुतरालाच घेऊन यावं म्हणून मी धावत आलो.''

डॉक्टरांनी कबुतराला जवळ घेतलं. त्याचं रक्त टिपून कापसाच्या बोळ्यांनी आणि औषध लावून बॅण्डेज बांधून टाकलं.

हे होईपर्यंत दीपक दारात येऊन उभा राहिला.

--''डॉक्टर याच्या जिवाला धोका नाही ना?--''पक्यानं विचारलं.

--''काही होत नाही रे! पण तुम्ही हा कबुतरांना उडवायचा खेळ खेळता कशाला? हेच मला समजत नाही. रोज उठून तुमच्या कबुतरांच्या केसेस! का खेळता त्यांच्या जीवाशी? अरे, ती काय खेळणी का आहेत?'' डॉक्टर असं बोलून माझ्या चंदाचं बॅण्डेज बांधायला गेले.

मी दीपकच्या उतरलेल्या चेहऱ्याकडे बघितलं. त्याचे डोळे भरून आले होते. कोणत्याही क्षणी त्याला रडू फुटलं असतं अशी त्याची केविलवाणी अवस्था झाली होती. पक्यानं कबुतराला छातीशी घट्ट धरून ठेवलं होतं. कबुतराचा एक पाय दुखावला गेल्याने ते केविलवाणं दिसत होतं. त्या कबुतराच्या चेहऱ्यापेक्षा अधिक केविलवाणा चेहरा पक्याचा दिसत होता.

माझ्या चंदाला घेऊन निघतानिघता मी पक्याशी बोलू लागले.

-''पायाला दोरी बांधली होतीस का रे या कबुतराच्या? काचला गेला ना त्याचा पाय?-''

दीपक आणि पक्या तिथल्या बाकड्यावर बसले. मीही त्याच्या शेजारी बसले. त्यांनी सांगितल, ''दोरी बांधली नव्हती, आकाशात उडताना ते पडलं होतं नि पाय मोडला होता.''

पक्याचा रडका चेहरा बघून मी त्याला धीर दिला. थोडीशी ओळख झाली आणि या ओळखीतून एका नव्या जगाची ओळख झाली- हे जग होत कबुतरांचं!

निळी जांभळी कबुतरं! पंख फडफडून हवेत झेपावणारी कबुतरं! गटर्र गुंऽऽ गटर्र गुंऽऽ करणारी कबुतरं! भोळी निष्पाप दिसणारी कबुतरं! ही कबुतरं कधी कुणाच्या वाट्याला गेलेली मी पाहिली नव्हती, कधी किडे- मकोडे खाताना पाहिली नव्हती, मुंबईत गेट वे ऑफ इंडिया आणि 'हॉटेल ताज' या परिसात थव्यांनी कबुतरं येतात. त्यांच्यासाठी मोठ्ठं आवार राखूनच ठेवलेलं आहे. तिथे दाणे घातले जातात, ते टिपायला कबुतरं येतात. शेजारीच पिण्यासाठी पाणी ठेवलेलं असतं, एवढं मला माहीत होतं!

'दाणा खा, पाणी पी,भुर्रकन उडून जा!' सर्वांनाच ही कविता तोंडपाठच असते. तसंच यांचं साधं जगणं! मोठमोठ्या इमारतींच्या वळचणीला कबुतरं बसतात.झाडावर बसलेली कबुतरं फार कमी वेळा दिसतात.अशा या कबुतराविषयी खूप माहिती त्यानं सांगितली. मी त्याच्या घरी कबुतरं बघायला गेले.

पक्याचा दिवस सुरू होतो, तोच मुळी कबुतराच्या गुर्टर्र गुंऽऽ गुटुर्र गुऽऽ या आवाजानं! पक्याच घर म्हणजे दीड खणाची खोली! एका खोलीत पक्या, चार बहिणी आणि आई वडील एवढा संसार राहायचा आणि पुढच्या खोलीत भाजी अंडी विक्रीचं दुकान! घराला लागून घरं! एका घराची भिंत दुसऱ्याच्या घराला भिडलेली! घराच्या रांगांसमोर वाहणारी उघडी गटारं! त्या गटाराची घाण सगळीकडे पसरलेली. घरांपुढे जी मोकळी जागा होती, त्या जागेत कबुतरांची लाकडी खुराडी ठेवलेली होती. खुराड्यातील कबुतरं घुमत होती.

खुराड्यासमोर दोन माणसं उभी होती. त्यांचं वय तीस पस्तीस वर्षाचं असावं. हे दोघं पक्याचे काका होते, काकाच्या हातात काठ्या होत्या, त्या काठ्यांनी ते कबुतरांना ढोशीत होते. आऽऽ आऽऽ करून बोलवीत होते.

कबुतरांना काठ्यांनी ढोसताना पाहून पक्याचे डोळे डबडबले. त्याला वाईट वाटत होतं. त्यानं काकांना बाजूला केलं आणि तो खुराड्याजवळ गेला. खुराड्याचं दार उघडून त्यानं कबुतरांना बाहेर काढलं त्यांच्या अंगावरून हात फिरविला. कबुतरांचे पाय नाचू लागले. ती आनंदून गेली. पक्यानं एका ताटलीत दाणे ठेवले. कबुतरं लगबगीनं पुढं आली, चोचीत दाणा घेऊन खाऊ लागली. एक कबुतर रुसून बसल्यासारखं बाजूला उभं राहिलं होतं. पक्यानं त्याला उचललं छातीशी धरलं आणि तो त्याच्याशी बोलू लागला. एखाद्या लहान मुलांशी बोलावं अशा आवाजात बोबड्या

स्वरात तो म्हणत होता– ''अले अले सोनू अछं रूशायचं नाय! दाणे खायचे. शहाणा ना तू?'' बोलत बोलत त्यानं कबुतराच्या चोचीत दाणे भरविले, कबुतरानं पंख फडफडवले खाली उतरून ते नाचलं मग सगळीच कबुतरं एक पाय उचलून नाचत राहिली. पक्यानं त्यांना भांड्यातून पाणी दिलं. दाणा-पाणी पिऊन कबुतरं समाधानी झाली

पक्याच्या काकानं त्यांना काठीनं ढोसलं, तशी पक्यानं त्यांना आऽ आऽऽ करून बोलावलं सारी कबुतरं पक्याच्या भोवती जमा झाली.

-''काका काठ्यांनी नका हो मारू! मागच्या वेळीही पप्प्याचा पंख तुटला होता मारामुळे! त्याला उडतासुद्धा येईनासं झालंय!'' पक्यानं कळवळून सांगितलं.

''तुला काय कळतं रे पक्या? अरे, तुझ्या वयाचा होतो तेव्हापासून कबुतरांचा छंद जडलाय माझ्या जिवाला! आता पंधरा वर्षांच्या अनुभवानंतर मला तू शिकवतोस होय रे?''

''शिकवत नाही हो, पण मारू नका एवढंच सांगतोय!''

''अरे, त्यांना जसा दाणा-पाणी द्यावा लागतो, तसा मारही द्यावा लागतो. त्याशिवाय उडायला शिकतील का ती? पुढच्या महिन्यात स्पर्धा होतील तेव्हा सोन्यानंच स्पर्धा जिंकली पाहिजे!'' काका पक्याला दरडावत होते.

पक्याने कबुतरांनाही नावं ठेवलेली होती. त्यांची बारशी केली होती. एका खुराड्यात दोन कप्पे केले होते, मध्ये आडवी फळी घालून! त्या खुराड्यात वीस-बावीस कबुतरं ठेवली जात होती. खुराडा नुसता घाण होऊन गेला होता. कबुतरांची पिसं त्यात पडली होती. त्यातच त्यांनी खाणं खाऊन घाण करून ठेवलेली होती. एक उग्र-कुबट वास खुराड्यातून येत होता. खुराड्यातल्या एका कोपऱ्यात, अंडी घालून बसलेली कबुतरीण भकास चेहऱ्यानं बाहेर बघत होती.

पक्यानं पाणी आणून खुराडं स्वच्छ केलं.

एका कबुतराच्या गळ्यावर हिरवा रंग चमचमत होता. त्या कबुतराला 'हिरव्या' नावानं हाका मारीत पक्यानं आकाशात उडवलं. ते झेप घेत आकाशाकडे उंचावलं.

कबुतरांच्या आकाशात उडण्याच्या स्पर्धा असतात. कोणतं कबुतर आकाशात जास्त वेळ उडेल? यावरून त्याचं यश हरवलं जातं. जास्त वेळ उडण्याचं कसब ही एकच कसोटी असते यशाची!

या स्पर्धेसाठी कबुतरांना आकाशात उडण्याचं शिक्षण दिलं जातं. पहिल्यांदा तास, दोन तास उडण्याचा सराव झाला की मग हळूहळू वेळ वाढवतात. कधी एखादं कबुतर कंटाळून लौकर परत येतं. एखादं कबुतर चार तास उडतं.

पक्याकडे वीस-बावीस कबुतरं होती. त्यांना दाणा-पाणी घालायला दोन तास तरी द्यावे लागायचे. आकाशात उडण्याचं शिक्षण द्यायचं असेल त्या कबुतरांना दाणे द्यायचे नाहीत. ती उडून आल्यावर त्यांना दाणे घालायचे असतात.


कबुतरांच्या स्पर्धा लागल्याचं कळलं की दुसरे लोक कोणतं कबुतर जिंकेल, यावरून या पैजा लावतात. कबुतरांच्या उडण्याची स्पर्धा घेण्याचं ठरलं की दिवस पक्का करतात. त्या दिवशी कबुतरं आकाशात सोडली जातात. जे कबुतर सर्वात शेवटी खाली उतरेल ते कबुतर जिंकतं असा खेळ असतो.

आपले काका कबुतरांच्या स्पर्धा घेतात. याचं पक्याला वाईट वाटतं. त्यांच्या जिवाचे होणारे हाल बघून त्याचा गळा दाटून येतो. मग तो दिपूकडे जातो. दोघं मित्र गळ्यात गळा घालून आकाशात उडणाऱ्या कबुतराकडे बघत राहतात. एखादं कबुतर पडलं, जखमी झालं तर, पक्या दिपू दोघं त्यांना घेऊन जनावराच्या दवाखान्यात जातात. त्यांना औषधपाणी करतात. त्यांच्या अंगावरून हात फिरवतात, त्यांना प्रेमानं हदयाशी धरतात. त्यांना आंजारतात गोंजारतात, दाणा-पाणी देतात. मग ही कबुतरंही एक पाय वर करून नाचतात. गुर्ररऽऽ गुंऽऽ गुर्ररऽऽ गुंऽऽ असं गाणं गातात. मग त्यांचं वेगळंच जग तयार होतं. त्या जगात सगळेच आनंदानं नाचतात, गातात! काकांनी छंद म्हणून पाळलेल्या कबुतरांची उड्डाणस्पर्धा, हा त्याच्या आवडीच्या आनंदाचा भाग असतो; पण पक्या आणि दिपू यांचा आनंद हदयाच्या प्रेमातून फुललेला असतो.

जखमी कबुतरांना जवळ घेणारे, मूक कबुतरांची आर्त गाणी समजून घेणारे दिपू आणि पक्या हे दोघं नवीन जग निर्माण करून आनंदी जीवन जगत आहेत. ••

**अनुराधा औरंगाबादकर**
४ शाल्मली पारिजात सोसा..,
पारिजातनगर, नाशिक ५


व्यवहार जनांचा हा तर निव्वळ भास राष्ट्रार्थ भव्य कृति करावयाचा ध्यास



# मोरगिरीचा शोध

**आनंद पाळंदे**

**'भव्य हिमालय तुमचा अमुचा, केवळ माझा सह्यकडा', या ममत्वाने सह्याद्रीचा अक्षरशः कानाकोपरा धुंडाळणारे 'डोंगरयात्री' आनंद पाळंदे यांची 'गिर्यारोहणगाथा' आपण वाचलीच आहे. पुणे-मुंबई रस्त्यावरून लोणावळ्याजवळ दिसणाऱ्या जांभुळणीच्या डोंगरांच्या गराड्यात डोळे वर काढणारे ते डोंगरशिखर 'मोरगिरी'. या मोरगिरीवर मित्रांसमवेत केलेल्या चढाईची आणि शोधाची चित्तथरारक आठवण वाचताना वाचकांना जणू आपणच ही डोंगरसफर अनुभवतो आहोत असा प्रत्यय येईल.**

१८८५ च्या बाँबे प्रेसिडेन्सीच्या गॅझेटिअरमधे पुणे जिल्ह्यातील डोंगरांचे वर्णन करताना एक नोंद आढळते. "About six miles south of the Duke's Nose and a mile inland from that line of the Sahayadris. rises the lofty pic-turesque range known as the Jambulni hills. "पुणे मुंबई प्रवास करताना पुष्कळ वेळा मळवली आणि लोणावळे या स्थानकांच्या दरम्यान या जांबुळणीच्या डोंगरांनी लक्ष वेधून घेतले होते. डोंगराच्या गराड्यात हे डोंगरशिखर एखाद्या ज्वालामुखी पर्वताच्या ढिगासारखे डोके वर काढताना दिसते.

मुळशी, पवना खोऱ्यांमधून हिडतानाही या डोंगरशिखराने खूपदा उत्सुकता चाळवली होती. याचे 'मोरगिरी' असेही नाव समजले होते; पण त्यावेळी असे वाटले नव्हते की, इथे एक अज्ञात दुर्ग चोरासारखा बसलेला आहे. या मावळभागातले ज्ञात गिरीदुर्ग म्हणजे तुंग, तिकोना, कोराईगड, लोहगड आणि विसापूर. वर्षानुवर्षे या दुर्गांच्या यात्रा डोंगरप्रेमी करत आले आहेत.

या दुर्गांवरून 'मोरगिरी' लोभसही दिसतो. एका डोंगरयात्रेत तर तुंगपासून कोराईगडकडे जाताना आम्ही मोरगिरीच्या पदरातूनच रांग ओलांडली होती. मोरगिरी माथ्यासंबंधी काही ऐकीव माहिती ऐकून मानाही डोलावल्या होत्या; पण वेळेअभावी आम्ही तिथून काढता पाय घेतला होता.

गोपाळराव चांदोरकर हे व्यवसायाने वास्तुशिल्पी, पण त्यातून वेळ काढून पर्यावरण चळवळीचे काम करणारे किंवा ऐतिहासिक स्थळांच्या अभ्यासासाठी वेळ दवडणारे. जवळच्या जीवनसंस्थेचे काम करताना मोरण्याचा 'मोरगिरी' डोळ्यात भरला. चौकशी करत करत ते शिळीमच्या शरद शिंदे आणि मुकुंद जोशी यांना बरोबर घेऊन निम्मा डोंगर चढूनही गेले; पण एका कड्यापाशी त्यांना माघार घ्यावी लागली.

पाच-सहा वर्षे अशीच गेली. नुसताच तो कडा चढून जायला हवा. वरती काहीतरी निश्चितपणे चित्तवेधक सापडणार अशी बोलणी व्हायची. भारत इतिहास संशोधक मंडळाच्या बुधवारच्या चर्चांमधून 'छयाऽ आता काही शोध लागायचा बाकी नाही.' इतकी वर्ष हा भाग प्रसिद्ध आहे. चोरून राहीलच कसा! वगैरे. मंडळाच्या ग्रंथालयातील गॅझेटियरे, इतिहासाची काही पुस्तके, साधनग्रंथ, नकाशे धुंडाळून झाले; पण मोरगिरीचा पत्ता लागला नाही आणि अचानक हरिष कपाडियांचे 'ट्रेक द सह्याद्री' पुन्हा चाळताना 'जांबुळी'ने लक्ष वेधले. खरे म्हणजे या पुस्तकाची पारायणे झाली

होती; पण जांबुळीचे वर्णन वाचायचे राहून गेले होते.विस्मृतीला जात चाललेला 'मोरगिरी' एकदम डोक्यात घुसला आणि त्याच्या अवघडपणाची टक्कर द्यायचे आम्ही निश्चित केले.

दोर, खिळे, कॅरॅबिनरस् जमा केले आणि या गोष्टीची सवय असलेले दोन मावळे- विकास भोंडवे, समीर पटवर्धन यांना बरोबर घेऊन आमची मोहीम निघाली. साफसफाईसाठी खुरपे, मोजणीसाठी गुंडाळी टेप, होकायंत्र हेही पोतडीत समाविष्ट केले आणि काही बँकवाली मंडळीही यात सामील झाली- न जमल्यास खाली थांबण्याच्या बोलीवर. कारण टॉपवर असलेल्या बँक ऑफ बरोडामधील ही मंडळी असली तरी दिवसभर खुर्चीत बसलेली व कामाची वेळ आटोपल्यावर पुन: जादा कामासाठी खुर्चीला चिकटणारी अथवा टिचक्या मारीत बैठक मारणारी होती. अर्थात देहाला कष्ट न देता 'टॉप' गाठणे जरा अवघडच बाब ठरणार होती.

तर अशी आमची संमिश्र तुकडी मोरवे गावाशी पोहोचली एकदाची. एकदाची अशासाठी की, हमखास वेळेवर येण्याची आश्वासनं देते झालेले जीपचे चक्रधर हमखास उशिरा आले आणि रामप्रहरी डोंगरचढाईला लागण्याचे आमचे नियोजन उधळले गेले. सर्व बँकवाल्यांना डोंगरयात्रेच्या नादी लावण्याच्या उद्दिष्टाने मी चढ फार नाही, सोपा आहे, सहज चढू शकाल अशा लोणकढ्या मारल्या होत्या. त्यामुळे मोरण्यातून तुंगच्या शेजारचा उत्तुंग मोरगिरी बघून हबकूनच गेलो. अर्थात दुसऱ्या बाजूला 'डोंगरात यायचंय काय बचमजी, चाखा आता मजा' असाही भाव मनावर तरंगला. सुदैवाने चक्रधराने एका दगडगोट्यांच्या कच्च्या रस्त्याने गाडी चढविली आणि निम्म्या डोंगरात नेऊन उभी केली असे वाटले. प्रत्यक्षात दोन टप्पे चढाई शिल्लक होती.

उशीर झाल्याने उन्हाचा त्रास वाढला होता आणि मोरगिरीचा सर्वोच्च माथा आता पदराआड लपला होता. एकूण चढाई खडी होती. हे पाहून मंडळीनी नट्टापट्टा करण्यासाठी आणलेले कपड्यांचे जादा जोड, खाण्याच्या थैल्या, पत्त्यांचे कॅट- जेवढे म्हणून जादा वाटले ती सामुग्री गाडीजवळ सोडण्याचा निर्णय एकमताने घेतला.

पदराचा कातळकडा एक-दोन ठिकाणी भेदला गेला होता.त्याच्या पोटाशी जंगलाचा एक मोठा पट्टा दिसत होता. यातून वाट कशी असेल असा एक प्रश्न साहजिकच पडत होता. कारण ह्या डोंगराला तुंग तिकोन्यासारखी वहिवाट अजिबात नाही.

एवढ्यात तुंगी गावाचे मामा- दादा लक्ष्मणराव आखाडे भेटले. दादांनी वाट दाखवायला यायचं कबूल केलं. पण! हा 'पण' आमच्या लगेच लक्षात आला; पण म्हणजे अर्थात रोजगार. मोरगिरीच्या अन् तुंगच्या मध्यभागी आता एस्सार कंपनीची गुलाबशेती असलेले हरितगृह झाले आहे. त्यामुळे लोकांना खुळखुळणाऱ्या 'रोज'ची सवय लागली आहे. अर्थात यात फारसे चूक मानता येणार नाही. पूर्वी मात्र लोक आपणहून गूळपाणी समोर ठेवून एखादा गडी आपुलकीने गड दाखवायला सोबत देत असत. 'पण' चा दर जरा जास्त होता. पण बँकवाले अशी रक्कम कर्ज म्हणून देतील अशी भीती दाखविल्यावर घासाघीस करून आम्ही 'पण, जिंकला. लक्ष्मणरावांच्या मागून आम्ही कूच केले.

चैत्रमासाची शुद्ध नवमी होती. रामजन्माचा आनंद सर्व सृष्टीने फुलून व्यक्त केला होता. कुड्याची आणि करवंद रानजाईची तसेच फाफटीची पांढरी फुले मंद वास पसरवत होती. पांगारा, पळस शेंड्यांवर भगव्या, लाल ज्वाला फडकवत होते. झाडांच्या खोडांवर गुलाबी अमरी लक्ष वेधीत होती. लाकूडतोडीतूनही हे राहिलेले वैभव प्रसन्न करीत होते.

लक्ष्मणरावांनी चांगली वाट सोडली आणि गवतात झाकलेल्या, पुसट झालेल्या वाटेने ते निघाले. हे आलीच म्हणत ते एखाद्या झाडामागे गुप्त होत आणि दरडीच्या माथ्यावरून दर्शन देत. ओढ्यातल्या डगमगत्या दरडीवरून फारतर पन्नास मीटर चढलो असू, तेवढ्यातच काहींना धाप लागली. त्याचा फायदा घेऊन अन्यजणांनीही बसकण मारली.

वाट अशी नव्हतीच. ओढ्यावर रानाचं छान आच्छादन होतं. खूप उंची गाठली असे वाटत असतानाच मोकळवनातून माथ्याचा कातळपट्टा जवळ दिसला आणि लक्षात आलं की, पुढे तीव्र चढ असणार. कड्याच्या पोटातून आम्ही आडवे सरकू लागलो. पायाखालची जमीन जणू सरकत होती. उघड्यावर आल्यानंतर बारीक पाऊलवाट होती. एकीकडे दरी, वाटेवर घसारा अन् डोक्यावर उन्हाचे छत्र यामुळे पदर गाठेपर्यंत नाकी नऊ आले.

पवना दरीचा सुंदर देखावा आता दृष्टीस पडत होता. तुंग अन् तिकोना यामध्ये निळा जलाशय पसरला होता.

सह्याद्रीवरून येणारा थंड वारा आता सुखावू लागला. त्या विश्रांतीची अशी मोहिनी पडली की, पुढे निघण्याचे कोणी नाव काढेना.

'ती कड्यात खिडकी दिसतीय का? आग, तिथे जाखमाता आहे' एकदम गार पाणी मिळालं. आम्ही सर्वांनी तिकडे पाहिलं. पदरातून मोरगिरीचे शिखर अजूनही २००मीटर उठवलं होतं. कातळकडा माथ्याचे रक्षण करत ठाकला होता. कड्याखाली तीव्र मातीच्या उताराखेरीज झाडंझुडपं काहीच नव्हती. कडा म्हणजे काय याची पूर्वकल्पना नसल्यामुळे किंचितशी काळजी दाटून आली; पण गोपाळराव आणि लक्ष्मणराव केव्हाच चढाईला भिडले आणि अन्य मंडळीही निरागसपणे त्यांच्यामागे चढून गेली. मर्द मावळा मोडेल पण वाकणार नाही अशी समजूत मनात घट्ट असल्यामुळे कोणीही त्या क्षणाला कुरकुरलं नाही.

अर्थात खरी गोष्ट अशी होती की, चढताना हात-पाय दोन्हीचा वापर पूर्वजांचे स्मरण करून करावा लागत होता आणि पाठीमागे वळून पाहण्याची हिंमतच होत नव्हती. जाखमातेच्या गुहेपाशी मात्र पुढे मार्गच नव्हता आणि थंडगार पाणी पिऊन तृप्ती झाल्यावर जेव्हा खाली डोकावणे झाले तेव्हाच खाली जाताना कसं जायचं याची जाणीव झाली.


गुहेत जाखमातेची अनघड मूर्ती आहे. शेजारी दगडी पणती आणि पाण्याचे टाके. गुहेत चारजणांना बसता येणे शक्य होते. गुहेबाहेर चारजणांना जेमतेम थांबता येत होते आणि लगेच भृगुपानच.'लक्ष्मणराव, पुढे कुठून जायचे?' माथा जेमतेम २०मीटर उंच राहिला होता; पण वाट कुठेच दिसत नव्हती. म्हणून आम्ही लक्ष्मणरावांना विचारणा केली. 'नायबा, आम्ही कधी वर गेलो नाही. इथे यायचं, पूजा करायची आणि परत फिरायचं'. गोपाळरावांनी कड्यात दोन खाचा दाखवल्या. तो भाग तासून काढला होता व शिडी लावण्यासाठी त्या खाचा पडल्या होत्या. त्यावर पायऱ्यांच्या पुसट खुणा दिसत होत्या. गोपाळरावही इथूनच परत फिरले होते.

तिथे जागा इतकी लहान होती की, जेमतेम एक माणूस उभा राहू शकत होता. त्याच्या खांद्यावर चढून वर हात पोचला असता; पण ही कसरत करणे तिथे शक्य वाटत नव्हते. इकडे आठ जणांमधल्या चारजणांनी वर न येण्याचा निर्णय घेऊनच टाकला होता.खाली जायचं की नाही याचाही त्यांचा निर्णय होत नव्हता. शिवमहिम्न, भीमरूपी स्तोत्र मनातल्या मनात पुटपुटणे चालू होते.

हरिष कपाडिया 'ट्रेक द सह्याद्री' मध्ये जांबुळी पिनॅकलचे वर्णन करतात.

"" The Pinnacle is Conical with steps leading to its top. An exposed move on the blown off steps makes it interesting. A temple and a watertank at the foot of the pinnacle. " आम्ही अगदी त्याच जागी थबकलो होतो.

विकास आणि समीरने शांतपणे दोर, स्लिंग, कॅरॅबिनर, हातोडी असा जामानिमा तयार केला. समीरने बिले दिली आणि उजवीकडच्या १००मीटर खोल दरीचा आदर ठेवीत विकास कुशलपणे व आत्मविश्वासाने सहज चढून गेला. आम्ही सर्व आऽऽवासून बघत असताना त्याने दोरावरती अँकर करून



'शिडीचा कडा'


दुसरे टोक आमच्यापर्यंत पोहोचवले.

लोणावळ्याचे नागफणी टोक, जिवधनची वांदरलिंगी चढणाऱ्या विकास अन् समीरला ते एक सोपे कातळारोहण होते; पण आम्हाला दोराधार असूनही धडधड कमी ठेवता आली नव्हती. उजवीकडची दरी तर एक दोन क्षण काळजाचा ठोकाच चुकवत होती. टप्पा पार झाल्यावर खोदीव पायऱ्यांची चिंचोळी वाट होती. त्यावर माती साठली होती. त्यामुळे त्यात पावट्या खणूनच पाय ठेवता येत होता. आणखी एक कातळटप्पा चढून माथ्यावर पोहोचलो. चौफेर उत्कृष्ट दृश्यांची रेलचेल होती. कोरीगड, सारूतरचा भोजचा डोंगर, अनघाई, माणिकगड, नागफणी, राजमाची ढाक, INS शिवाजी, लोणावळे, लोहगड, विसापूर, भातराशी, वळव्हण तलाव, तुंग, तिकोना मांडवी, आजिवली असा सारा पसारा छानच होता. उन्हाळा असूनही थंड वारा होता. उत्तरेलेला पन्नास मीटर कडा सरळ तुटला

होता.त्याखाली हिरव्या राईने झाकलेली घुसळखांबापर्यंत धावणारी डोंगररांग तर दक्षिणेला गावापर्यंत व पुढे तिकोनाकडे फिरणारी रांग यांचे दर्शन संस्मरणीय होते.

या पहिल्या भारावलेल्या अवस्थेतून गोपाळराव चांदोरकरांनी ओरडून जागे केले. इकडे या! पाण्याचे टाके आहे रे' माथा अगदी लहान, त्यामुळे खोलगट भागात पाण्याचे टाके लगेच दिसले. पाणी हिरवे होते. ४५३ मीटर लांबीरुंदीचे टाके होते मग आमची दृष्टी भिरभिरू लागली. एका ठिकाणी घरटच्याच्या जोत्याचे अवशेष, तर दुसरीकडे मातीच्या ढेकळांमध्ये खापरे. एका ठिकाणी शिशाच्या चपटच्या विटाही गवसल्या.

त्या भलत्याच जड होत्या. मग माझी नजर कुठे प्राकारभिंत दिसते का याचा शोध घेऊ लागली. प्रवेशद्वाराजवळ एक दोन चिऱ्यांची प्राकार बांधलेली दिसली आणि मन समाधान पावले.



हा निश्चितपणे गिरीदुर्ग होता. मात्र इतिहासाच्या विस्तीर्ण कालखंडात त्याचे अस्तित्व विसरले गेले होते. या लपलेल्या चोरावर मोर बनून स्वारी करण्याचे भाग्य आम्हाला लाभले होते.

शिडीचा कडा काळजीपूर्वक उतरलो. इथे कातळ असल्यामुळे पाय घसरत नव्हते; पण जाखमातेनंतर खरी कसोटी लागली. त्यापूर्वी उदंड साधन सामूग्रीतील थोडंसंच खाणं उरकलं. घरच्यांनी चमचमीत भरपूर तयारी करून दिली होती; पण गड उतरायचाय या कल्पनेने चवच गेली होती. अगदी लहान मुलाला चालायला शिकवताना जसे 'इथे पाय ठेव, हं बोट धरा' असे शिकवावे लागते अशीच अवस्था तिथे होत होती. उतार तीव्र हातात धरायला झुडपच काय, गवतपण नाही. पाय ठेवल्यावर तो स्थिर राहील का सरकेल याची खात्री नव्हती. अखेर कातळकड्यात दोन पिटॉन ठोकून दोर बांधला. त्याला पकडून सर्व मंडळी जी नुसतीच घसरत होती त्यांना वाटेवर घसरता येऊ लागलं.

पदरात पोहोचताच पाहिलं तर गोपाळराव अन् लक्ष्मणराव तिथे केव्हाच येऊन झाडाखाली निद्राधीन झाले होते. उतरणीवरचं नाट्य संपलं होतं. पुढची उतरण दमणूक करणारी होती एवढीच. राजेन्द्र वाघ, पराग शिरगावकर, रवींद्र माथूर ही युवा तुकडी चौखूर उधळून केव्हाच खाली पोहोचली. नरेन्द्र आणि राजेन्द्र कल्याणकर, विनायक ढवळे आणि आम्ही अन्य बऱ्याच वेळाने घरंघळत, बसकण मारत पायथ्याशी पोहोचलो.

मोरगिरीचा ऐतिहासिक उल्लेख अद्याप सापडलेला नाही. तिथे मिळालेल्या शिशाच्या तुकड्यांचा आणि खापरांचा अन्वयार्थ अजून कळायचा आहे. मात्र तोही मोठा रोमहर्षक विक्रम ठरावा. कारण त्यासाठी भुतावर भ्रमण करण्यास उपयोगी पडणाऱ्या 'मोडी' वाहनाचा उपयोग करता आला पाहिजे. पेशवे दप्तर, भारत इतिहास संशोधक मंडळ येथील अनेक कागदपत्रांच्या जंजाळातून नेमका उल्लेख वेचता आला पाहिजे आणि भावनेवर न घसरता योग्य-अयोग्य पुराव्याची छाननी करून अचूक मंथनाने गाभ्यातील अमृत वर काढता आले पाहिजे.

अर्थात तोपर्यंत मोरगिरीच्या चढाईच्या आणि शोधाच्या आठवणीच वेगळ्या प्रकारचे समाधान देत राहणार आहेत.

••

आनंद पाळंदे
२/३, एरंडवन, कर्वे मार्ग, पुणे ४.

## बाजू

एकदा पंडित नेहरू एका गृहस्थाजवळ कसली तरी चर्चा करीत असताना तो म्हणाला, ''पण साहेब प्रत्येक प्रश्नाला दोन बाजू असतात ना?'' त्यावर नेहरूंनी उत्तर दिले, ''ते खरे हो! पण प्रत्येक वेळी तुम्ही चुकीचीच बाजू धरावी. ते ठीक आहे का?''

# आकर्षक शुभेच्छापत्रे

नीला कवडे

एखाद्याच्या वाढदिवसाला किंवा आजारी माणसाला लवकर बरे वाटावे यासाठी आपण जेव्हा त्या व्यक्तीला शुभेच्छापत्र किंवा पुष्पगुच्छ देतो, तेव्हा त्याला जेवढे प्रसन्न आणि बरे वाटते तसेच/तेवढेच आपल्यालाही छान वाटते. एक वेगळीच भावना त्यामागे असते. ही शुभेच्छापत्रे केवढी आकर्षक रंगसंगतीची, तऱ्हेतऱ्हेची, असतात!ती फुलांची आकर्षक मांडणी किंवा पुष्पगुच्छातील फुलांची मांडणी आपल्याला मोहवून टाकते. यांचा हेतू एवढाच आणि महत्वाचा की,तुम्ही सदोदित असेच टवटवीत, हसरे आणि प्रसन्न रहा!

पण तुम्हाला हे माहिती आहे का की, ही शुभेच्छापत्रे कशी तयार करतात? अनेक प्रकारे ही शुभेच्छापत्रे तयार करता येतात. उदा.एम्बॉसिंग, स्टेन्सिल प्रिंटिंग, मार्बल प्रिंटिंग,वेल्वेट आणि इतर रंगीत कागद वापरून, पोस्टर आणि वॉटर कलर वापरून आणि अजून कितीतरी आकाराची, प्रकाराची, रंगीबेरंगी असतात. अशी शुभेच्छापत्रे तुम्हाला करायला आवडतील ना? आता आपण ती कशी तयार करतात ते पाहू.

**१. एम्बॉसिंग :** या शुभेच्छापत्रासांठी लाकडी साहित्याचा प्रामुख्याने उपयोग केला जातो. ही लाकडी साधने बाजारात ‘वुडन टूल्स या नावाने ओळखली जातात.ही टूल्स गुळगुळीत आणि बोथट असतात. अशाप्रकारचे लाकडी साधन तुम्ही घरीही तयार करू शकाल. वाया गेलेले लाकडी बॉलपेन, सुतारकामातून राहिलेल्या बारीक लाकडी पट्ट्या इ.ची टोके वा कड सँडपेपरवर घासून गुळगुळीत करून घेता येतील. अगदी सोपे आणि सुटसुटीत साधन म्हणजे आईक्रीमच्या काड्या किंवा चमचे ह्याचाही उपयोग करता येईल. ही साधने गुळगुळीत करण्याचे कारण म्हणजे कागद फाटू नये हे असते. अशा प्रकारचे शुभेच्छापत्र मशिनच्या साहाय्याने सुद्धा करतात. कागदावर तुम्हाला हवे ते डिझाईन काढा. आता जे डिझाईन काढले आहे त्याच्या मागील बाजूने म्हणजे उलट बाजूने Wooden Tools च्या साहाय्याने तो भाग हळूहळू दाब देऊन वर आणा. अशाप्रकारे संपूर्ण डिझाईन एम्बॉस करा व नंतर वॉटर कलर आणि चमचम यांचा वापर करून त्याला आकर्षक रंगसंगतीने सजवा.

**२. स्टेन्सिल प्रिंटिंग :** यासाठी जाड प्लॅस्टिक पेपर घ्या. त्यावर तुम्हाला आवडेल ते चित्र पेनाने काढा व त्यातील जो भाग किंवा चित्र हवे आहे तो भाग कटरच्या साहाय्याने कापून काढा. नको असलेला भाग तसाच ठेवा. नंतर पॅलेटमध्ये किंवा जुन्या बशीत रंग बऱ्यापैकी पातळ करून घ्या. (ह्यासाठी पोस्टर किंवा वॉटरकलरसुद्धा चालतात.) नंतर एक स्पंजचा तुकडा घ्या. तो स्पंज त्या रंगात बुडवून, थोडा हाताने दाब देऊन पिळा म्हणजे आपल्याला हवा तेवढाच रंग त्या स्पंजमध्ये राहील आणि मग प्लॅस्टिक पेपर डिझाईन काढलेला- ज्यावर शुभेच्छापत्र तयार करायचंय, त्या कागदावर यू पिनने घट्ट बसवून घ्या आणि त्यावर रंगाच्या स्पंजने हलक्या हाताने टॅपिंग करून ते चित्र रंगवा.



**३. मार्बल प्रिंटिंग :** या शुभेच्छापत्रासाठी एक जुनं-मोठं पण पसरट भांडं (वापरात नसलेले) घेऊन त्यात पाणी घाला. ऑइलपेंटचे वेगवेगळे तीन-चार रंग घेऊन त्यांचे थेंब पाण्यात घाला म्हणजे आपोआपच ते पसरतात व त्यातच एक डिझाईन तयार होतं आणि नंतर आपल्याला जेवढा ग्रिटींग डिझाईनचा भाग हवा आहे (लहान, मोठा)त्या शुभेच्छापत्राची पुढची बाजू त्या पाण्यावरून फिरवा. अशा तऱ्हेने शुभेच्छापत्रे आपण तयार करू शकतो. तुमचीही स्वत:ची कल्पना लढवून एखादे शुभेच्छापत्र तुम्हाला तयार करता येईल आणि आपण तयार केलेली शुभेच्छापत्रे देताना आपल्याला एक वेगळा आनंद व समाधान मिळेल, ते मात्र निश्चित! आणि त्यावर मजकूरही आपण स्वत:च तयार करावा. त्यासाठी कदाचित या अंकातील पानांखालील ओळींचाही उपयोग करता येईल.

••

**नीला कवडे**
नित्यानंद सोसायटी पुणे-सातारा रोड,
धनकवडी पुणे ४३

(पान १० वरून पुढे चालू)


''अच्छा, अजय बेटा, आता आम्ही प्रयोगाला सुरुवात करणार आहोत. त्या आधी तुला गुंगीचं इंजेक्शन दिलं जाईल. प्रयोग संपल्यानंतर आम्ही तुला पृथ्वीवर तुझ्या घरी पाठवू. तर आता गुडबाय''.

''गुडबाय, काका, मला तुमची नक्की आठवण येईल.''

एका मदतनिसाने अजयला गुंगीचं इंजेक्शन दिलं. काही क्षणात अजयची शुद्ध हरपली.

अजयला जाग आली तेव्हा तो त्याच्या अभ्यासाच्या खोलीतील बिछान्यावर पडलेला होता. जाग येताक्षणी तो बिछान्यावर ताडकन उठून बसला. सुरूवातीला त्याला ते सगळं स्वप्नच वाटलं; पण दुसऱ्याच क्षणी इंजेक्शन दिलेल्या त्याच्या दंडातून कळ आली आणि त्याचबरोबर त्याला दुसरीही एक जाणीव होत होती. त्याला नेहमीपेक्षा जास्त उल्हसित आणि तजेलदार वाटत होतं. आपल्यात काहीतरी बदल झाल्याची स्पष्ट जाणीव होत होती. हा त्या सायनॅस्पिफायरचा परिणाम असल्याची त्याला खात्री पटली.अजयला खूप आनंद झाला. त्याची हुशारी आणि बुद्धिमत्ता लवकरच तो सगळ्यांना दाखवून देणार होता. एक नवा आत्मविश्वास अजयमध्ये निर्माण झाला होता. त्यातला न्यूनगंड दूर झाला होता. आता त्याला कोणालाही घाबरण्याची गरज नव्हती.

त्या दिवसानंतर अजयमध्ये आमूलाग्र बदल झाला. मनावरचा ताण नाहीसा झाल्यामुळे तो नेहमी प्रफुल्लित आणि उत्साही राहू लागला. स्वत:बद्दल नवा आत्मविश्वास निर्माण झाल्यामुळे त्याची



'सायनॅस्पिफायर'

मित्रांशी वागणूक सुधारली. थोड्याच कालावधीत तो शिक्षकांचाही आवडता विद्यार्थी बनला. हुशार मुलांच्या वर्तुळात त्याला सहज प्रवेश मिळाला. या सगळ्याचा परिणाम दिसला तो नववीच्या परीक्षेत. शिक्षक, मित्रमंडळी, प्रशांतमामा, अजयची आई या सगळ्यांना आश्चर्यांचा आणि आनंदाचा धक्का देत अजयने वर्गात पहिला क्रमांक पटकावला होता.

आजचा दिवस अजयसाठी अत्युच्च आनंदाचा दिवस होता. त्याच्यावर सगळीकडून आनंदाचा वर्षाव होत होता. सगळा दिवस धामधुमीत व मजेत गेला होता. संध्याकाळी तो प्रशांतमामाची वाट पाहात त्याच्या खोलीत बसला होता. आजच्या या सगळ्या आनंदात मधूनच एका विचाराने तो किंचिंत उदास होई. आजचं यश त्याला परग्रहवासीयांच्या मदतीमुळे मिळालं होत.यात त्याच्या प्रयत्नाचा भाग नगण्य होता ही गोष्ट आजपर्यंत त्याने सगळ्यांपासून लपवून ठेवली होती त्यामुळे कधी कधी त्याला किंचित अपराधी वाटे; पण आज सगळं काही प्रशांतमामाला सांगण्याचं त्याने ठरवलं होतं.

एवढ्यात, ''अभिनंदन अजय, वेल डन'' असं म्हणत प्रशांतमामा अजयच्या खोलीत शिरला.

''तू खरोखरच कमाल केलीस अजय!''

''मामा, मला तुला काही सांगायचंय्'' तो गंभीर स्वरात बोलू लागला, ''या यशाचं श्रेय माझं नाही. मी ही गोष्ट आजपर्यंत कुणालाच सांगितली नव्हती; पण फुकटचं श्रेय लाटणं मला आवडणार नाही..''

प्रशांतमामा त्याच्याकडे पाहू लागला. अजयच्या गंभीर चेहऱ्यावर प्रामाणिकपणा विलसत होता. त्या क्षणी तो खऱ्या अर्थाने मोठा विचारी आणि प्रगल्भ झाल्यासारखा वाटत होता.

''मामा! माझ्या यशाचं आणि माझ्यात एकूणच झालेल्या सगळ्या बदलाचं श्रेय टाग्लास्टिकावरील त्या वैज्ञानिककाकांना आहे...'' आणि मग अजयने सायनॅस्पिफायरची सगळी हकीकत प्रशांतमामाला सांगितली. ''आणि म्हणून मामा! या यशात माझा वाटा काही नाही.''

आता मात्र त्याचा स्वर किंचित रडका झाला. चेहराही काहीसा उदास दिसत होता.मान खाली झुकली होती.

एवढ्यात कुणाच्यातरी खो खो हसण्यामुळे त्याने चमकून वर पाहिले. हसणारा मामा होता. हसऱ्या डोळ्यांमध्ये अपार माया आणि कौतुक दिसत होतं.

''अजय, 'तू खरोखरच कमाल केलीस!' असं मघाशी मी जे म्हणालो ते अक्षरश: खरं आहे. मलासुद्धा एवढी अपेक्षा नव्हती; पण यशाचं शंभर टक्के श्रेय तुझ्या एकट्याचंच आहे. ते तू मिळवलंयस, तुझ्या प्रयत्नांनी आणि तुझ्यातील प्रबळ इच्छाशक्तीमुळे. त्याबद्दल तुझं अभिनंदन करायला तुझे वैज्ञानिककाका आलेयत.''

अजयचे डोळे आश्चर्याने विस्फारले. खरोखरच टाग्लास्टिकावरील वैज्ञानिककाका अजयचं अभिनंदन करत दारातून आत येत होते.अजयला काही कळेनासे झाले.तो आश्चर्याने मामाकडे पाहू लागला.

''अजय! तुला आठवतंय? तू जेव्हा मला त्या गोष्टीतल्यासारखं खरंच होऊ शकेल का? असं विचारलं होतस, तेव्हाच माझ्या मनात वेगळी कल्पना आली. खरं तर तू हुशार मुलगा होतास. तुझ्यात आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी काहीतरी उपाय करणं आवश्यक होतं. तुझा काल्पनिक गोष्टींवर चटकन विश्वास बसत असे. विशेषत: त्या सायनॅस्पिफायर गोष्टीबद्दल तू खूप विचार करीत होतास. मग आम्ही नाटक करायचं ठरवलं. अर्थात त्या नाटकात मला तुझ्या त्या वैज्ञानिककाकाची- म्हणजेच माझ्या मित्राची आणि ऑफिसमधल्या सहकाऱ्यांची छान साथ मिळाली. सगळ्यांनीच एक अभिनव प्रयोग म्हणून त्यात उत्स्फूर्तपणे भाग घेतला. तुझा टाग्लास्टिका हा ग्रह म्हणजे आमच्या कॉंप्युटर लॅबमधला एक हॉल! अर्थात तिथलं वातावरण आम्ही एखाद्या परग्रहासारखं वाटेल असं तयार केलं होतं आणि सगळ्यात उत्तम रोल केला तो तुझ्या वैज्ञानिककाकांनी. या प्रयोगाचा परिणाम मात्र आमच्या कल्पनेपेक्षाही जास्त चांगला झाला. तुझ्यावर सायनॅस्पिफायरचा प्रयोग केला अशा तुझ्या ठाम समजुतीमुळे तुझ्यात प्रचंड आत्मविश्वास निर्माण झाला. स्वत:बद्दलची कमीपणाची भावना नाहीशी होऊन तू स्वत:च्या प्रयत्नांनी आणि मेहनतीने हे यश मिळवू शकलास''

''पण मामा, ते सायनॅस्पिफायर यंत्र...

''अरे! तो देखील आमच्या नाटकाच्या नेपथ्यांचा भाग होता. ते यंत्र काही खरं नव्हतंच. त्याचा वापर करण्याचा प्रश्नच नव्हता. आम्ही तुला फक्त एक गुंगीचं इंजेक्शन देऊन माझ्या 'टाटासुमो'तून पुन्हा पृथ्वीवरील तुझ्या खोलीत आणलं'' प्रशांतमामा मिस्किलपणे हसत म्हणाला.

आता अजयच्या चेहऱ्यावरचा गोंधळ कमी होऊ लागला होता.''पण तो प्रकाशपुंजका, ते अवकाशयान..?

अजयने आपल्या मनातली शेवटची शंका विचारली.

''तेच कसं साधायचं हा आमच्यापुढे प्रश्न होता,'' आता वैज्ञानिककाका बोलू लागले,''पण त्या हॅलोजन लॅम्पने आमचं काम केलं.''असं म्हणत त्यांनी खिडकीतून बाहेर बोट दाखवलं. अजयने बाहेर बघितलं. बाहेरच्या अंधारात माडांच्या झावळ्यांमधून एक प्रखर प्रकाशपुंजका चमकत होता.

''त्या दिवशी तुझी तब्येत ठीक नव्हती. मनाच्या नाजुक अवस्थेत तुला कसलेकसले भास होत होते. त्यामुळे तो प्रकाश म्हणजे तुला गोष्टीतलं अवकाशयानच वाटलं आणि तुझी शुद्ध हरपली. अर्थात या छोट्याशा योगायोगामुळे आमचं पुढचं नाटक कमालीचं परिणामकारक ठरलं.''

''इतके दिवस ही गोष्ट अजयपासून लपवून नाटकातला माझा 'रोल' मीही चांगला पार पाडला!'' फराळाचा ट्रे घेऊन आत येत अजयची आई हसतहसत म्हणाली.

अजयला आता सगळ्या गोष्टींचा उलगडा झाला. सगळ्यांनी केलेल्या मदतीबद्दल त्याला कृतज्ञता वाटली. अगोदरच्या आपल्या बालिश विचाराबद्दल त्याला लाजल्यासारखं झालं. त्याने आईच्या कुशीत डोकं खुपसलं. तो खराखुरा बुद्धिमान होता. कुठल्याही जादूमुळे किंवा यंत्रामुळे त्याला ही बुद्धी मिळाली नव्हती. त्याच्या प्रयत्नांनी तो यशस्वी झाला होता.

मान वर करत त्याने प्रशांतमामाला विचारलं, ''मामा,असं सगळ्याच मुलांच्या बाबतीत होऊ शकेल नाही? माझ्या काही मित्रांना अभ्यासात नेहमी अडचणी येतात.''

''हो! का नाही? मनापासून प्रयत्न असले आणि पक्का निर्धार केला तर कोणीही आपला आत्मविश्वास वाढवू शकतो आणि यशस्वी होऊ शकतो. नीट समजावून सांगितलं आणि योग्य दिशा दाखविली तर कोणाही मुलाला आपल्यातील त्रुटींवर मात करता येईल. पण ते असू दे.तुला बक्षीस म्हणून तुझ्या वैज्ञानिककाकांनी आणि मीही विज्ञानकथांची दोन पुस्तके आणली आहेत- तुझ्यासाठी.'' प्रशांतमामानी बॅगमधून दोन सुंदर पुस्तके काढून अजयला दिली. सर्वांना नमस्कार करून, पुस्तके घेऊन तो ती मित्रांना दाखविण्यासाठी बाहेर पळाला. शिवाय त्याला त्याच्या मित्रांना सायनॅस्पिफायरची गोष्ट सांगायची होती!

••

**मुकुंद जोगळेकर**
२७, अनंत विजय अपार्टमेंट
हिरा विद्यालयाजवळ,विरार (प)
ठाणे.

# कविता पानोपानी....

## ते मोराचे पीस निळे


अजुनि तरळले दृष्टीपुढती ते मोराचे पीस निळे
झिळमिळत्या रंगाचे गारूड अजून मना पुरते न कळे

ती मुरली, ती तुडुंब यमुना, कदंब फुलले काठी
खरेच का तो होता तिथला गोकुळचा रहिवासी?
खरीच होती राधा, तो रास खरा होता का?
नवपरीच्या लीला त्याच्या, भासच तो होता का?
त्या अविनाशी मूलपणाचे रहस्यही पुरते न कळे ।।

तो तर होता गोपसखा, की तरूण प्रियकर होता?
धीट किती तो, लोकप्रिय किर्ती, नित्य अग्रणी होता
मधुवचनी तो मुरलीमनोहर, रूपवंत वेल्हाळ
समयज्ञही तो चतुर जाणता शत्रुंजय कळिकाळ
त्या नितनूतन शतरूपांचे रहस्यही पुरते न कळे ।।

तो बंधू, तो पती, पिता तो, परममित्र तो राजा
तो द्रष्टा, उपदेशक प्रेरक, आश्रय तो सकलांचा
सर्वांसाठी सहृदय तरीही तो तर त्या पलीकडचा
अलिप्त, सावध, निर्मम साक्षी सगळ्या सुखदुःखांचा
अपूर्व त्या जीवनयोगाचे रहस्यही पुरते न कळे ।।

सर्व मानवी नात्यांना अतिसुंदर केले त्याने
आयुष्याला अर्थ दिला रसभरल्या चैतन्याने
काय म्हणावे, काय नेमके, द्यावे त्याला नाव
काळाचा होता का स्वामी? तो होता का देव?
गुढ निळ्या त्या अस्तित्वाचे रहस्यही न कळे ।।



**अरूणा ढेरे**
'विदिशा', १०अभिराम,
तुळशीबागवाले कॉलनी, पुणे ९.

# पर्व ये नवे !

पर्व ये नवे
ऊठ ऊठ तरूण मुला चल युगासवे
पर्व हे नवे!

हे विशाल नील गगन
हा अधीर मुक्त पवन
उगवतील अरूण किरण
क्षितिजावर लक्ष सूर्य झळकती नवे!


जाति- धर्मभेद विसर
दु:ख आणि दैन्य विसर
लाचारी खेद विसर
विसर- विसर तिमिरातील मंद काजवे!

धरतीची कूस पिके
डुलती भरघोस पिके
नांदतील कृषिक सुखे
यापुढे न कोणाच्या नयनि असावे!

काळावर करति मात
झुंजव तू दोन हात
पसरि हर्ष दशदिशांत
हो उदार दे सकला ज्यांस जे हवे!
पर्व ये नवे!



**शान्ता ज.शेकळे**
प्लॉट नं १९, आदर्शनगर
पुणे- सातारा रस्ता, पुणे ३७



# शब्द जपावे

ओठावरले शब्द जपावे,शब्दांची वाणी
शब्दांमधुनी फुलासारखी फुलून येती गाणी.

शब्द प्रवाही नाजुकसे--
फूलपाखरापरी तसे--

हसती,रूसती, खेळत बसती मनात घप्पापाणी.
शब्दामधुनी फुलासारखी फुलून येती गाणी.

शब्द जिभेवरची घंटा--
उरात सलणारा काटा--

शब्दांच्या श्वासात झिरपती असंख्य गाऱ्हाणी
शब्दाधुनी फुलासारखी फुलून येती गाणी.

कधी बोलके, कधी मुके--
आप्त कधी, केव्हा परके--

काळाच्याही पुढे थांबती कोरून अक्षरलेणी
शब्दांमधुनी फुलासारखी फुलून येती गाणी!

**डॉ.कल्याण इनामदार**
३९/२,अर्चना सोसायटी
सी२७ एरंडवणे पुणे ३८.



# आम्ही

आम्ही केवळ अश्रू नसतो
दीनवाणी बापुडे
अम्हा ओळखा, अम्हा पारखा
आदरूनी यापुढे---
जगास दिसली जरी क्षणिकही
आम्ही अल्पायुषी
थोर तपस्या आमुची जैसा
तपास बैसे ऋषी
तुम्ही आजवर अम्हा वंचिले
मानुनिया बुडबुडे--
पाठराखिणी आम्ही; जाता
कन्येला सासरी
सत्यव्रती पौर्णिमेस कथिले
आमुची मातब्बरी
जग बुडवाया समर्थ आम्ही
अणु जेथे थोकडे---
नका मानु परि केवळ आम्हा
आवड दुःखाची
परिसीमा होउ द्या मानसी
सुखात हर्षाची
रंग बदलुनि उकलुनि दावू
सत्य स्वरूप उघडे...
आम्ही केवळ अश्रू नसतो
आम्ही केवळ अश्रू नसतो.

**गंगाधर महाम्बरे**
'शिवरंजनी', कलानिकेतन
सातारा रस्ता पुणे ४३

# पाखरांची चिवचिव!

पेरूच्या झाडावर पोपटाची स्वारी आली
पेरू पाहून पिकला, फार आनंदित झाली!

लाल चोचीने घेतला पहिला गोड घास
हिरव्या पानांआड पंखांची लसलस

येती चिमण्या-साळुंक्या शेजारच्या झाडावरी
एका सिताफळासाठी चाले चिवचिव सारी

गुलाबाशी मधमाशी हळू गुंजारव करी
मध घेऊन थोडासा मग फिरते माघारी

देवाजीने चोची दिल्या खाणे त्यानेच निर्मिले
सर्वांचीच चिंता त्याला असे नवल पाहिले

आम्ही आपुल्या दारात झाड एखादे लावावे
एखाद्या पाखराला घरटे बांधू द्यावे!

फूल एखादे वाहावे आपुल्या देवाजीला
हात जोडून नमावे घास घ्यायच्या वेळेला

पेरूच्या झाडावर पोपटाची स्वारी आली
मला नवे नवे काही भले शिकवून गेली!



**वि.म.कुलकर्णी**
'कमळवेल',६१/४८एरंडवणे, पुणे ४.



स्वप्न मनोरम आज उद्याचे विरून जाईल वाऱ्यावरती
आकाशाच्या क्षितिजाकडची दिव्य दिसे मज रेखा पुढती.

# जे जे करतो...


आकाशातुन पतंग कटले
त्याचे झाले पक्षी,
झोतभट्टितुन उडल्या ठिणग्या
त्यांची तारानक्षी.

कुणी हासले आनंदाने
फुले तयाची झाली,
गोड बोलले तेव्हा धरणी
दंवबिंदूनी न्हाली.


रागाने कुणी लाल लाल हो
त्याची झाली आग,
कुणि मायेने धरी उराशी
तेव्हा फुलली बाग.

कुणी कुणाला आश्रय देतो
त्याची होते छाया,
कुणी कुणाला घास भरवितो
त्या करूणेची माया.

आपण जे जे करतो त्याचे
असे उमटते बिंब,
उन्हात जाऊ आपण किंवा
होऊ पाऊसचिंब!



दत्ता हलसगीकर
२० अ, जवाननगर, विजापूर रस्ता, सोलापूर - १



# काजव्यांच्या या प्रदेशी

काजव्यांच्या या प्रदेशी सूर्य शोधू पाहते
अंधारल्या रात्रीत या तेज पूजू पाहते


उपभोग, आसक्तीत सारे शहर आहे गुंतले
माणसास्तव मी उगा आयुष्य उधळू पाहते

सारे विकाऊ चेहरे, कल्लोळ नाण्यांचा इथे
मी अशी का भावनाचे गीत गाऊ पाहते?

मोहिनी नगरी अशी मस्तीत आहे चूर अन्
या मनी का ज्ञानियाची शांत ओवी जागते?

दूर माझे गाव,होते मी अशी ही कोकिळा
आज या शिशिरात माझी तान कंठी गोठते!

राजलक्ष्मी देशपांडे
११चिरानी,आम्रपाली अपार्टमेंट
सर्व्हे नं ६६८बिबेवाडी पुणे ३७



# अश्राप

दिस ढळला जरासा शान्त जाहली काहिली
फांद्याफांद्यांतुन थोडी झाडे सैलावत गेली...
थबकला दिसभर वारा पाश्चिमेकडला
सांजवेळी मुक्त होई फिरे मोकळाढाकळा
शीतलशी चन्द्रकोर सावळ्याशा आभाळात
झाली हलके ठळक रात येताना भरात!

परतले खोपटयात चुना-मातीसंग पाय
मातीच्याच पाण्यामधील खंगाळले हातपाय.
चूल पेटती धडाडा लाल तापला न् तवा
माय रेखिते वर भला थोरला चांदवा!
वास कसा खरपूस भाकरीचा दरवळे
कधी व्हावे कोरडयास भूक पोटी कळवळे!!
पिले जमली सभोती जेवणाचा काय थाट?
भाकरीच्या संगे खाया लाल बुकणी तिखाट

लेकरांच्या भुकेला न् माये घातिला आवर
चुलीमागे दडविली तिने आरधी भाकर...
अशी कशी माय पोटासाठी झाली चोर?
मेघाआड दडविते मुख म्लान चंद्रकोर...!

'माफी करा रे बाळांनो भूक अजूनी ना ओठी?
परि अश्राप वाढती आणि एक माझ्या पोटी...!'
त्याच्यासाठी रे पोरांनो राखियला चतकोर
स्वत:साठी रे बाळांनो माय होईल ना चोर
माय होईल ना चोर...!'


प्रा.सुहासिनी देशपांडे
३,पुण्यश्री अर्पाटमेंट, रस्ता क्र.७
डहाणूकर कॉलनी कोथरूड पुणे २९


# ।।निसर्गगीत।।


स्वर्गपृथ्विनायका
अनामिका, अनामिका
सूर्य तूच, चंद्र तूच, तुझ्याच सर्व चांदण्या
डोंगरात वृक्ष तूच, सागरास साक्ष तूच
नदी इथे सांगते, चालण्याची प्रेरणा...

तुझ्यामुळेच ज्ञानज्योत अखंड आज तेवते
अपत्य होऊनी चरात विज्ञान पुढे चालते
प्रेम हीच संपदा नि प्रेम ही परंपरा...

झाड डोलते कधी सागराची गर्जना
नदी घालते इथे भावपूर्ण प्रदक्षिणा
लेकुरे तुझी आम्ही पावना दयाघना...

नष्ट-भ्रष्ट होऊ नये आमुची ही संहिता
नको आता मानवास युद्धजन्य विवशता
बुद्धि दे, शक्ति दे राखण्यास वसुंधरा...

स्वर्गपृथ्विनायका
अनामिका, अनामिका




प्रा.दामू वैद्य
बारबाले महाविद्यालय, दर्गा रोड,जालना



उजळ दीपमाला चल पातली दिवाळी, संहारी तम उरला भरून भवताली.

# दीपदेवते!....


दीपदेवते! तुला वंदना.
दीनदुर्बला, संत-सज्जना
रक्षिण्यास ये-पदी प्रार्थना!

पूर्वी जेव्हा दैत्य मातले
जन भिउनी दडूनिया बैसले
प्रभू आज्ञेने तूच तेधवा
प्रगटलीस गे असुरनाशना!


असुर अजुनि गुंडांच्या रूपे
भाबड्या जनां लुटति सारखे
गरिबां नाही अन्न, वस्त्र,घर,
अवश्य ते तरी पुरवी त्यांना

'शुद्ध मन,तसे शुद्ध आचरण'
लहानथोरां देई शिकवण
करूनि साजरा मंगल हा सण
दीपदेवते!-सुखवि जनांना

तुला प्रार्थना, तुला वंदना!




**संजीवनी मराठे**
पुणे

# नवदीपावली

दीप चेतले अवघी अवनी तेजोमय होउ दे!
नवतेजाची, मांगल्याची दीपावली येउ दे ||धृ. ||


सहकाऱ्यांनी,सखीजनांनी, रांगोळ्या रेखा |
कमळे,चक्रे, सुर्य चन्द्र अन् वेलींच्या शाखा |
बिंदू बिंदू सृजनाचे नित नवे वसन लेवु दे ||१ ||

धणी जिभेची पुरवू अवघ्या भारतमातेची |
नववस्त्रांकित वसुंधरेच्या कन्या-पुत्रांची |
जे जे सुंदर,उदात्त त्याने हृदयाला न्हाऊ दे ||२ ||

मनामनांच्या फुलवू ज्योती ज्ञानदीप चेतवू |
भवतालीच्या आतंकाला प्रेमरसे शांतवू |
त्या दीपाच्या आतिल गाभा नवोन्मेष होउ दे ||३ ||

आता पुढती नरकासूर ना कोठे निपजावा |
मानवातल्या माणुसकीतून ईश्वर प्रकटावा |
दीपावलीचे दीपदान हे अखंड तेवू दे ||४ ||


**रवीन्द्र भट**
सी ४६, विजय कॉम्प्लेक्स शास्त्रीनगर पुणे २९



# देश माझा

आम्ही शूर, आम्ही वीर, आम्ही धीट राजे
देश माझा,माती माझी, आकाशही माझे.....
एका पावलात शक्ती दुज्यामधे युक्ती
हृदयात धडधडे देशाशीच भक्ती
त्रिखंडात पराक्रम आमुचाच गाजे.....
देश माझा ....

द्रोही तस्करांना आम्ही कर्तृत्वाने चेचू
अतिरेकी कुभांडांचे थोबाडही ठेचू
उपटून फेकू आम्ही भ्रष्टाचारी बीजे....
देश माझा....

पुरे झाल्या विकासाच्या वांझोट्या घोषणा
नवे काही घडवू द्या तरूण (कुमार) हातांना
ढोल-ताशा आभाळात स्वागताला वाजे....
उद्योगाचे शिवालय इथे उभे करू
कष्ट घामाचाच देव त्याची कास धरू
सत्य-अहिंसेचा शब्द काळजात रूजे....
देश माझा....

आत्मविश्वासाने उभा राहील माणूस
बंदुकीत खोचु आम्ही शांतीचा संदेश
सुवर्णाच्या ओंजळीत स्वातंत्र्यही साजे....
देश माझा....

**किशोर पाठक**
विठ्ठल पार्क को.ऑ.सोसायटी,
श्रीरंगनगर, पंपिंग स्टेशन, गंगापूर रोड, नाशिक ५.


# आनंदाच्या रंगीत डोही

पाण्यावरती ओढित रेघा,जाइ पाखरू सुळुकू
तरंगातुनी तरंग उमले, भवती हळवी झुळुकू

पाउलवाटा जरा ओलसर त्यावर निळसर तुरे
पिवळ्या हळव्या पाकोळ्यांचा रास भोवती फिरे
घुंगुर बांधुन झरे धावती नादही रूणझुण झुणुकू
पाण्यावरती ओढित रेघा,जाइ पाखरू सुळुकू

इंद्रधनूचा झुला रेशमी झोके घेऊ चला
त्यावर कोणी रत्नकांचणी चुरा पहा सांडला
वनराणीच्या स्पर्शखुणांची दिसे भर्जरी चुणुकू
पाण्यावरती ओढित रेघा,जाइ पाखरू सुळुकू

स्वैर पांघरूनी आभाळाला कुठे चालले थवे
बालपणाची हळवी माया गाण्यातुन पालवे
आनंदाच्या रंगीत डोही, बुडी मारूया डुबुकू
पाण्यावरती ओढित रेघा, जाइ पाखरू सुळुकू



**प्रवीण दवणे**
ब/३०३,राजहंस,लुईसवाडी,
ठाणे (पश्चिम) ४००६०४



एकदा चालले वाट रंगीत शैशवगाणी, हुंगत मातीचा गंध, तान्हेल्या पाखरावाणी.




**जगाच्या वाङ्‌मयात तात्पर्यकथांची वाण नाही. विष्णुशर्मा, इसाप, गिब्रान इत्यादि थोर तात्पर्यकथाकारांचे लहानथोरांवर मोठेच ऋण आहे, यात शंका नाही.या कथा लहानांसाठी असतात– म्हणजे मोठ्यांसाठी नाहीत असे नाही. आपल्या ज्ञानात अनेक अंधारलेले भाग असतात आणि अनेकदा ते तसेच राहून जातात. निदान त्यातले काही खासच. अशा अंधाऱ्या कोपऱ्यांना उजळून टाकत, अथांग मानवी स्वभावाविषयी कधीच लक्षात न आलेली एखादी छटा आपल्याला दाखवून देणाऱ्या या कथा आपल्याला एक नवाच सुखद अनुभव देतात असे आढळून येईल.**
**आधुनिक काळाचा संदर्भ घेत अशाच काही तात्पर्य कथा, विनोदी शैलीत,आपल्यासाठी प्रा.बाळ गाडगीळ यांनी येथे सादर केल्या आहेत.**

**बाळ गाडगीळ**

# एखाद्याचे नशीब

**आ.** झकासराव यांच्या मतदारसंघात एकदा एक प्रचंड नैसर्गिक आपत्ती कोसळली. मुसळधार पर्जन्यवृष्टी झाली. एकदा पावसाने जो धो धो अभिषेक सुरू केला तो थांबेचना. हां हां म्हणता नद्यांना पूर आले, नाल्यांच्या नद्या झाल्या. अनेक घरे आणि माणसे पुरात वाहून गेली. त्यात आणखी एक धरण फुटले. मग तर प्रचंड हा:हाकार झाला. या धरणफुटीमुळे काय नुकसान झाले, किती मुले-माणसे दगावली, किती शेते आणि घरे बुडाली, कशाचा अंदाजच लागेना.

सगळे देव आणि देवता यांचा या भूभागावर प्रचंड कोपच झाला होता असे दिसले.

ही भयानक प्रलयाची बातमी वणव्यासारखी पसरली. देशभरात तर ती गेलीच; पण परदेशातही पोचली. अगदी हजारो मैल दूर असलेल्या देशांतही ही बातमी जाऊन धडकली.

सगळ्यांची हृदये द्रवली. कोणीकोणी म्हणून मदतीसाठी काय काय पाठविले यांची मोजदाद राहिली नाही. कोणी पैसा, कोणी कपडा, कोणी भांडीकुंडी, कुणी अन्नधान्य, कुणी घरबांधणीचे साहित्य, कुणी तंबू, कुणी औषधे, मुलांना खाऊ-सगळे सगळे कल्पना न करता येईल इतके पाठविले. एका धनाढ्य, बलाढ्य देशाच्या प्रमुखांनी तर विमानेच्या विमाने भरून मदत पाठविली. लहानसान, कोनाकोपऱ्यातल्या देशांतूनही कोरडे सहानुभूतीचे संदेशच नव्हे, तर नाना प्रकारच्या वस्तू पाठविल्या. कुणी डॉक्टरांची आणि सेविकांची पथके पाठविली. नकाशावर शोधून एरवी सापडला नसता अशा त्या प्रदेशाचे नाव जगभर दुमदुमले.

आ. झकासराव फार दु:खीकष्टी झाले; पण या प्रलयाची बातमी कळताच ते जातीने दुर्घटनेच्या जागी उपस्थित झाले. कंबर कसून पुन:स्थापनेच्या कामाला लागले. त्यांनी लोकाचे अश्रू पुसले, त्यांना दिलासा दिला, आधार दिला. खूपखूप आश्वासने दिली.

पण देव आणि दैव ही दुक्कल किती दुष्ट आहे पहा. इथे इतके रामायण, महाभारत घडले पण या मतदारसंघाच्या अगदी जवळच असलेल्या प्रदेशात मात्र काही म्हणजे काहीच घडले नाही.

इकडे आ. झकासराव सगळीकडे हिंडत होते आणि पेपरवाले त्यांचे फोटो सगळीकडे झळकावित होते. त्यांची वारेमाप स्तुती करीत होते 'असा आमदार झाला नाही आणि होणार नाही!' असे छापत होते. त्यांच्या स्तुतीने पेपरांचे रकानेच्या रकाने दुथडी भरून वाहत होते. मग मुख्यमंत्री, राज्यपाल, राजधानीवाले कोणी बडे नेते यांनीही झकासरावांना प्रशस्तिपत्रके



दिली, त्यांचे गुणगान केले.

झकासराव एकदम खूष झाले. सर्वांवर आणि स्वत:वर. आपल्याच बाजूला पूर आला, आपल्याकडचे धरण फुटले याचा त्यांना जवळजवळ आनंदच झाला की काय कुणास ठाऊक!

पण झकासरावाचे काहीही असो, पलीकडच्या मतदारसंघातले आ. पोटदुखे मात्र फार दु:खी झाले. तसे दु:ख करण्याचे त्यांना काही कारण नव्हते म्हणा. कारण त्याच्या भागातल्या नद्या सगळ्या व्यवस्थित, मर्यादाशीलपणे वाहात होत्या. कुठे पूर नाही, अवर्षणही नाही.सगळीकडे सारे व्यवस्थित.यंदा पीकही गतवर्षीपेक्षा चार आणे जास्तच असा अंदाज कृषिविद्यापीठवाले व्यक्त करीत होते. कुटुंबनियोजन व्यवस्थित होते, देवीचे रोगी कळविले जात होते, प्राथमिक शिक्षक शाळेत शिकविण्याच्या मुख्य कामाखेरीज इतर सर्व काही करीत होते.

सगळे गुण्यागोविंदाने चालले होते.

'मग आ. पोटदुखे यांनी इतके दु:खी का व्हावे बरे? असा प्रश्न कोणीही विचारील– तुम्हीही विचाराल.

तर त्या प्रश्नाचे उत्तर तुम्हाला पुढे देत असलेल्या प्रसंगातूनच कळेल.

–त्यादिवशी आ. पोटदुखे यांनी आपल्या देव्हाऱ्याच्या खोलीची सर्व दारे नीट लावून घेतली. आतून कड्या घातल्या. मी कामात आहे, मला 'डिश्टब' करू नका. असा सज्जड दम सर्व नोकरांना आणि घरच्या माणसांना दिला.

मग ते अत्यंत नम्रपणे देवाच्यापुढे वाकले. मग भूईवर लोळण घेऊन त्यांनी देवापुढे डोके टेकले. वारंवार नाक घासले. नाक घासूनघासून लालसुद्धा झाले. मग देवाला फुले वाहून त्यांनी त्यापुढे उदबत्ती लावली.

मग देवाला आळवीत ते म्हणाले, ''विठ्ठला, पांडुरंगा का रे बा माझ्यावर असं कोपलास? तो झक्या बघ, कुठल्याकुठे गेला आणि मी होतो तिथेच आहे. त्या झक्याच्या भागात महामंत्री, मुख्यमंत्री, राज्यपाल, मोठेमोठे नेते यांची अहोरात्र वर्दळ आणि माझ्याकडे चिटपाखरूही नाही. त्याची सगळीकडे वारेमाप स्तुती, माझा मात्र काहीच नाही. अरे! कोणी मला भरपूर शिवीगाळ केली तरी मला प्रसिद्धी मिळेल देवा!'

'आम्हाला शेजारीशेजारी ठेवून तू असा दुजाभाव आमच्यात करावायास हे काही खरं नाही. देवा– इट्ठला, अरे, तू, दयावंत आहेस, भक्तांचा वाली आहेस, त्यांच्या मदतीला धावून जातोस, तर आता माझी प्रार्थना ऐक बाबा. माझ्या या मतदारसंघात काहीतरी अक्रीत घडू दे... कसलीतरी घोर आपत्ती इथे कोसळू दे... देवा, अरे तुला वाटेल हा किती कठोर हदयी मनुष्य आहे! माणूस कसला पत्थर आहे! पण देवा तसं नाही. अशी काहीतरी मोठी आपत्ती कोसळल्याशिवाय मी जनतेची शेवा तरी कशी करू शकीन? हे तुला कसे समजत नाही पांडुरंगा? अजूनही उशीर झाला नाही. उद्या सकाळीच माझ्या भागावर आपत्ती कोसळव. अस्मानी सुलतानी आण आणि मला लोकशेवा करायला संधी दे. देवा ऐकतोस ना तू हे सारं? सर्वसाक्षी परमेश्वरा! माझ्यावर कृपा कर... नाही तर माझी काही धडगत नाही...

असे म्हणताना आ. पोटदुखे यांनी इतके वेळा देवापुढे डोके आपटले की, शेवटी त्यांच्या डोक्याला भलेमोठे टेंगूळ आले! त्यांचे नाक कधीच लालबुंद झाले होते.

तात्पर्य: तात्पर्य काय सांगणार डोबलं!

# एक शहाणा आणि दोन दीडशहाणे

एका गुरूला तीन शिष्य होते. तिघेही हुशार होते. मुळातच ते हुशार खरे; पण शिवाय घरचे वातावरण शिक्षणप्रेमी. मग काय विचारता? गुरुगृही राहून ते अधिकच हुशार झाले. त्या तिघानींही अगदी कसून अभ्यास केला. ते गुरुजींच्या सदैव आज्ञेत राहिले. गुरूही त्यांच्यावर प्रसन्न होते. गुरुजींनी घेतलेल्या सगळ्या परीक्षांतून ते तिघेही नुसते पार पडले एवढेच नव्हे तर चांगले यश मिळवून पार पडले. गुरुजींनी त्यांची खूप प्रशंसा केली. त्यांना उत्तम प्रशस्तिपत्रके दिली आणि ते घरी जायला निघाले, तेव्हा त्यांना यशस्वी व्हा, पराक्रमी व्हा'असा भरघोस आशिर्वादही दिला.

अतिशय आनंदात या तिघांनी आपापल्या घरी जाण्यासाठी परतीचा प्रवास सुरू केला वाटेत एक नदी लागली. नदीला पूर आलेला होता. होडीतून गेल्याशिवाय पैलतटावर जाणे अशक्य होते, तेव्हा त्या तिघांनी होडीवाल्याला द्रव्य देऊन पैलतटावर नेण्यास सांगितले.

तिघे आत बसले आणि होडी पलीकडच्या तीराकडे जाऊ लागली.


आपण विज्ञानाच्या सागरात इतक्या खोल बुड्या मारल्या आणि एवढे अगाध ज्ञान मिळविले त्याचा उपयोग तरी कसा करायचा; या प्रश्नावर या तिघांत चर्चा सुरू झाली. एकाचे म्हणणे हे की, जग एवीतेवी विनाशाकडे चाललेच आहे, तर आपण हा विनाश सत्वर पूर्ण होण्यासाठी जे आवश्यक ते सर्व करावे. दुसरा तेच म्हणाला, तिसरा म्हणाला, 'पण मला वाटते हा संपूर्ण विनाश टाळता येणार नाही का? विज्ञानाचा उपयोग या विनाशकारी शक्तीशी मुकाबला करण्याकरिता करता येणार नाही का? करता येईल, करता यावा असे मला वाटते'.

तू मूर्खच आहेस. अरे आर्किमिडीज् काय म्हणाला आठवतंय? या जगाच्या बाहेर मला एक जागा द्या. या जगाला चेंडूसारखा उडवीन' पहिला शिष्य म्हणाला.

'होय हे अगदी बरोबर आहे. तसंच करायला पाहिजे, जोरदार काहीतरी. सनसनाटी...' दुसरा शिष्य म्हणाला.

पण तिसऱ्याला काही ते पटेना.

'छे बाबा. काय वाटेल ते करून



प्रसिद्ध पुरुष बनावे, या सुभाषितातल्या सारखे तुम्ही बोलता आहात. मला हे बिलकूल मान्य नाही.' तिसरा म्हणाला.

'नाही! पण तुला हे मान्य केलेच पाहिजे. आम्ही दोघं एका बाजूला तर तू एकटा दुसऱ्या बाजूला. पहिला आणि दुसरा शिष्य ओरडले.

'पण मी नाहीच मान्य केलं तर काय होईल?' तिसरा हट्टाने बोलला.पहिले दोघे एकत्र आले. ते बोलले काहीच नाहीत; पण दोघांनी मिळून तिसऱ्याला उचलले आणि त्या नदीच्या वेगवान प्रवाहात फेकून दिले. 'होईल बरं' ते ओरडून त्याला म्हणाले.

तात्पर्य : दोन दीडशहाणे मिळून एक सबंध शहाणाही होत नाही!

# फुलपाखरू आणि मधमाशी

एका सुंदर सकाळी एक फुलपाखरू स्वच्छंदाने एका फुलबागेत विहार करीत होते, तेवढ्यात त्याला एक मधमाशी भेटली. आपल्या मध गोळा करण्याच्या उद्योगात ती मग्न होती.

'काय ग मधू, इतक्या घाईनं कुठं चाललीस? जरा थांब. आजची सकाळ किती सुंदर आहे. ऊबदार ऊन पडले आहे. कसे छान वाटते आहे. मंद वारा सुटला आहे आणि ही या बागेतली फुलझाडेसुद्धा कशी एकापेक्षा एक सुंदर आहेत, तिकडे ते कारंजे थुईथुई नाचते आहे आणि जलकणांना हवेतल्या हवेत पकडून सूर्यकिरणांनी किती सुंदर, इंद्रधनुष्यासारखे रंग उधळले आहेत.जरा थांब तर खरी. ये, या गुलाबाच्या फांदीवर बसू या आपण. जरा गप्पा छाटू या ना!' फूलपाखरू म्हणाले.

'छे छे. नको ग बाई. तुझ्यासारखा इकडे- तिकडे करून मजेत वेळ घालवायला मला सवड नाही. अरे, मी सकाळपासनं निघाले खरी; पण अजून काहीच मध गोळा झालेला नाही आणि तू म्हणतोस त्याप्रमाणे उनाडक्या करण्यात वेळ घालविला तर राणीमाशी काय म्हणेल मला? तुझं मन मोडायला वाईट वाटतं मला; पण करणार काय? कर्तव्य कुणाला चुकलेलं नाही ना बाबा!'


फूलपाखरू म्हणाले,

'समजलं, समजलं बरं, मला पण काय ग, हे मध गोळा करीत बसायचं कसलं आलं काम तुझं? आणि मी म्हणतो की, इतकं भरभर करून एवढा मध गोळा करायचा आणि काय ग मिळणार त्यातून? सगळी त्या माणसांचीच धन ना? मधाचा एखादा थेंब तरी पडतो का ग तुझ्या तोंडात दिवसाकाठी?'

मधमाशी फुलपाखराकडे रोखून पाहत म्हणाली,

'मला वाटलंच होतं, तू असं काहीतरी बोलशील म्हणून. मी दिवसभर मध गोळा करण्याचं काम करीत असते हे खरंच आहे. काम काम आणि काम. पण मी तुला मनापासून सांगतेय की, मी गोळा करीत असल्यापैकी मधाचा एकही थेंब मिळत नसला तरी मला वाईट वाटत नाही त्याचं. तो मध कुणाला तरी उपयोगी पडतोच ना आणि त्याच्यात औषधी गुणसुद्धा आहेत बरं.'

मधमाशी थोडावेळ थांबली मग




परत गुणगुणली.... 'एकंदरीत काय, काम करीत राहणं यातसुद्धा आनंद असतो... शिवाय मी तुला दोष देत नाहीये. अरे तुझ्यासारख्या सुंदराला पाहूनच किती आनंद होतो! आमच्या सारख्यांच्या डोळ्यांना सुखं व्हावं म्हणून तुझ्यासारखं रंगीत स्वप्न वनदेवीनं निर्माण केलं ना? इतरांच्या डोळ्यांना तू सुख देतोस हेही तू करीत असलेलं काम आहे की! आणि तुझा मोठेपणा हाच की, तुझ्या मोठेपणाविषयी बोलायचे तुझ्या मनात येत नाही!'

क्षणभर स्तब्ध राहून फुलपाखरू हे ऐकत राहिले आणि इकडे आपले गीत गुणगुणत मधमाशी आपल्या उद्योगाला निघून गेली. ••

**बाळ गाडगीळ**
ई १भरतनगर,

**A व B च्या जागी योग्य अंक घाला.**




उत्तरे : A-२०, C-३५
कसं ते तुम्हीच शोधा

**जरा डोके चालवा –उत्तरे**

**मेंदूला झिणझिण्या –** १८९ पैकी १४० पुरूषसदस्य आहेत, म्हणजे स्त्रीसदस्यांची संख्या ४९ आहे. या सर्व स्त्रीसदस्या चष्मा वापरतात असे मानले तर (७०-४९)=२१ चष्मा वापरणारे पुरूषसदस्य किमान असलेच पाहिजेत. या २१मध्ये वीस वर्षापेक्षा लहान असलेले ११सदस्य आहेत असे मानले तर (२१-११)=१० सदस्य वीस वर्षापेक्षा मोठे, चष्मा वापरणारे पुरूषसदस्य किमान असलेच पाहिजेत. या १०सदस्यांमध्ये तीन वर्षापेक्षा कमी काळ असलेले सर्व ८सदस्य आहे असे मानले तर (१०-८)=२ हे सदस्य दिलेल्या सर्व अटी पूर्ण करणारे किमान सदस्य असले पाहिजेत.

ज्यांचे किमान वय २० आहे, जे ३ वर्षांपेक्षा जास्त काळ सदस्य आहेत, जे चष्मा वापरतात व जे पुरूष आहेत असे किमान २सदस्य असले पाहिजेत.

धोंडिबा की कोंडिबा!- प्रत्येक बाजूला ३०झाडे आहेत असे मानू या(कोणतीही संख्या धरली तरी चालेल.) कोंडिबाने काम सुरू केले तेव्हा ३झाडाच्या फांद्या अगोदरच तोडलेल्या होत्या. म्हणजे त्याने उजव्या बाजूच्या २७ झाडांच्या फांद्या तोडल्या. हे काम संपवून त्याने डाव्या बाजूच्या ६ झाडांच्या फांद्या तोडल्या.

कोंडिबाने तोडलेली झाडे २७+६=३३

धोंडिबाने तोडलेली झाडे उजव्या बाजूची ३झाडे व डाव्या बाजूची २४ झाडे =२७ झाडे

उत्तर: कोंडिबाने ६ झाडांच्या फांद्या जास्त तोडल्या. किंवा

प्रत्येक बाजूची क्ष झाडे धरली तर कोंडिबाने तोडलेली झाडे:उजवीकडील (क्ष-३)+डावीकडील ६=क्ष-३+६=क्ष+३

क्ष-३पेक्षा क्ष+३ ही संख्या ६ ने मोठी आहे.

घनाच्या विरूद्ध बाजू ओळखा-अ) २,३,४,५या बाजू दुमडून एक चौकोनी पिंजरा तयार करता येईल. या पिंजऱ्याचे झाकण म्हणजे क्र.१व पिंजऱ्याचा तळ म्हणजे क्र.६ होय. विरुद्ध बाजूचे पृष्ठभाग (१,६),(२,४),(३,५)

ब) आकृती१विरुद्ध पृष्ठभाग (१,४),(२,५),(३,६)

आकृती २: पासून घन करता येणार नाही. कारण २,३,४,५या बाजूनी पिंजरा तयार होईल. पण १आणि ५ हे पृष्ठभाग एकाच बाजूला येतील. त्यामुळे घन होत नाही.

आकृती ३ : विरुद्ध पृष्ठभाग (२,४), (१,५), (३,६)

खुनी कोण?

जर काळूने खून केला असेल तर झिया व दारा या दोघांचे विधान खरे ठरेल.

जर बाळूने खून केला असेल तर काळू, झिया,व दारा या तिघांची विधाने खरी ठरतील.

जर दाराने खून केला असेल तर बाळू व झिया यांची विधाने खरी ठरतात.

जर झियाने खून केला असेल तर फक्त दाराचे विधान बरोबर ठरते.

झिया हा खुनी होय; दाराचे विधान बरोबर आहे.

गोविंदाप्पाच्या घराचा क्रमांक कोणता?

दिलेल्या तीन प्रश्नांपैकी प्रत्येक प्रश्नाचे उत्तर होय किंवा नाही असे असू शकेल. पुढील विविध प्रकारे प्रश्नांची संभाव्य उत्तरे विचारात घेता येतील.

प्रश्न १ : उत्तर होय असेल तर घराचा क्रमांक १ ते ४१ यामधील असणार.

प्रश्न २ : होय : क्रमांक ४,८,१२,१६,२०,२४...

नाही : क्रमांक १,२,३,५,६,७,९,१०,११...

प्रश्न ३: होय : ४,१६,३६ होय १,९,२५

निश्चित क्रमांक सांगता येत नाही.

प्रश्न १: उत्तर नाही असे असेल तर घराचा क्रमांक ४२ ते ८१ यामधील असणार.

प्रश्न २: होय : क्रमांक ४४, ४८,५२,५६...

नाही : ४२,४३,४५,४६,४७,४९,५१...

प्रश्न ३: होय. फक्त ६४ होय : ६४

पहिल्या प्रश्नाचे उत्तर 'नाही', दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर 'होय', तिसऱ्या प्रश्नाचे उत्तर 'होय' याप्रकारे तीन प्रश्नांचे उत्तर देऊन घराचा क्रमांक ६४ हा निश्चित करता येईल. गणाधीशला 'नाही,होय,होय याक्रमाणे उत्तरे मिळाली असणार.


गाळलेली संख्या ओळखा- प्रत्येक वर्तुळातील दोन मोठ्या संख्येची बेरीज करून तिसऱ्या संख्येने भागले की भागाकार ५ येतो (५६+७९) भागिले २७=५, (८८+२७) भागिले २३=५ (५६+?) भागिले १६=५

उत्तर ३४.



**परंपरा, प्रगतता, जगण्याची सत्पात्रता । तया अंगी थोरपण संस्कृतीचा जो निर्माता.**

# फुलांची भाषा



***कांचनगंगा गंधे***

**डोंगर, दऱ्या, पशु-पक्षी, झाडे, फळे यांच्याबरोबरच निसर्गाचे वेड लागण्यामागे फुलांचा फार मोठा हातभार असतो.विविध ऋतूंमधील त्याचं बदलतं सौंदर्य आपल्याला मंत्रमुग्ध करतं. निसर्गातील प्रत्येक गोष्टीला आपलं असं व्यक्तिमत्व असतं. प्रत्येकाला गोष्टीला आपली 'भाषा' असते. विविधरंगी विविध-ढंगी अशा फुलांच्या भाषेची तुम्हाला ओळख करून सेत आहेत कांचनगंगा गंधे. चला बघूया! या 'भाषे'च्या साहाय्याने तुम्हाला फुलांशी संवाद साधता येतोय का?**

कुठल्याही आनंदाच्या प्रसंगी, कुणाचा आदर-सत्कार किंवा कुणाविषयी प्रेम व्यक्त करायचं असेल, तर आपण त्यांना फुलं देतो. तेव्हा ही फुलं न बोलताच सर्व काही सांगून जातात. फुलांची भाषा मानवापेक्षा पक्षिगण, फुलपाखरं, भुंगे, मधमाशा, किडे, कीटक यांना चांगलीच परिचित आहे. फुलांमध्ये विविध रंग, आकार, प्रकार, त्यांच्यात निसर्गानेच केलेल्या क्लृप्त्या, फुलांचा वास ह्या उपभाषांची त्यांना चांगलीच जाण असावी आणि म्हणूनच फुलं फुलली, ऐन बहरात आली की, ही तमाम मंडळी फुलातला मधुर रस आकंठ पिण्यासाठी झाडावर गर्दी करतात. ह्या मंडळीचं स्वागत करण्यासाठी फुलाफुलांच्यात चढाओढ लागलेली असते. परस्परांच्या सहकारातून कळत-न कळत जीवनसृष्टीत चेतना येते, नवनिर्माणाचं कार्यही विनासायास पार पाडलं जातं! फुलां-मधलं रूपवैभव, निसर्गाच्या ऐश्वर्याचा खजिना पाहायला सुरूवात करावी ती वसंतऋतूपासून! तसं पाहायला गेलं, तर प्रत्येक ऋतूतल्या खजिन्याचं सौंदर्य काही वेगळचं!पण वसंतऋतू म्हणजे सौंदर्याची परिसीमा! निसर्गातल्या सर्व रंगाची आणि रंगछटांची उधळण ह्याच ऋतूत बघावी! फुलांच्या रंगांबरोबर आतल्या मधुर रसाचे घटही ओतप्रत भरलेले असतात. ह्या मधुरघटातला रस फक्त आपल्यालाच मिळाला पाहिजे यासाठी पक्षी, भुंगे, मधमाशा यांच्यात चढाओढ लागते. फुलांची 'अबोल' भाषा पक्ष्यांच्या गोंगाटानं, आणि भुंगे मधमाशांच्या घोंघावण्यानं एकदम 'बोलकी' झाल्यासारखी वाटते.

रखरखीत आणि जीवघेण्या उन्हाळ्यात, वसंतऋतूच्या ऐन बहरात अंगार फुलल्यासारखा पळस फुललेला दिसतो. मखमली-गडद-तपकिरी रंगाच्या पेल्यातून मऊ, मखमली भगव्या रंगांची फुलं जेव्हा फुलतात, तेव्हा रानात काहीतरी पेटल्यासारखं वाटतं म्हणून त्याला 'जंगलज्योत' असंही नाव बहाल केलं आहे.झाड ऐन बहरात असतं, तेव्हा फुलांनी नखशिखान्त लगडलेलं असतं! जणू झाडांवर, भगव्या रंगाची फुलपाखरं पंख मिटून बसलेली आहेत! पाच पाकळ्यांपैकी एक पाकळी सर्वात मोठी बाहेरची थोडी उमललेली. आतल्या मधुघटातला रस पिण्यासाठी भुंगे, मधमाशांनी हजेरी लावलेली असते. उरलेल्या चार पाकळ्यांपैकी सर्वांत दोन लहान पाकळ्या मिटलेल्या असतात. वयात येण्याआधीच 'शील'भ्रष्ट होऊ नये म्हणून कळा आणि अंडाशय ह्या दोहोंना दहा परागकोशांनी वेढलेलं असतं! दहापैकी नऊजण एकमेकांना अगदी चिकटून उभे असतात आणि दहावा वेगळा राहून खडा पहारा देत असतो. तांबडा-पांढरा पांगारा, निळा गोकर्ण, बदामी रंगाचा हादगा, पिवळ्या पाकळ्यांचा तूर आणि अशी अनेक पळसाच्याच जातीतली फुलं फुलली की, फुलपाखरं झाडांवर निमूटपणे बसली असावीत असा भास होतो!

लाल सावरीची फुलं फुलली की, चिमण्या, कावळे, साळुंक्या, भोरडे एवढेच नव्हे, खारूटलीसुद्धा मध खायला येते आणि पक्ष्यांच्या ओरडण्यात आपलाही सूर मिसळते. गोल वाटीसारखी काटसावरीची फुलं


आभाळाकडे तोंड करून उमलेली दिसतात. फुलातला मध खाण्यात सर्व पक्ष्यांमध्ये हुशार कोण असेल तर ते फुलचुखे! सर्व पक्षी फुलाच्या वरून चोच आत घालून मध खातात तर हे फुलचुखे फुलाच्या तळाच्या बाजूला आपली अणकुचीदार चोच मारून मध मटकवत असतात. पिवळ्या सावरीच्या पाकळ्या इतक्या तलम असतात की पक्षी फारसे त्याच्या वाटेला जात नाहीत; पण मधमाशा, भुंगे, किडे मात्र त्या फुलाकडे आकर्षिले जातात. पिवळ्याधमक पाकळ्यांच्या मध्यभागी असलेले तांबूस -लाल, अगदी तापते बावनकशी सोन्यासारखे परागकोश त्यांना आकर्षून घेतात.चेंडूफळ,फायरबॉल, यांची लहानलहान फुलं एकेकटी असली तर नजरेत भरत नाहीत आणि म्हणून बरीच फुलं एकत्र येऊन त्यांचा एक नजरेत भरण्याइतका गुच्छ तयार होतो. किडे, कीटक- की ज्यांची 'तोंडं' लहान आहेत, असेच त्यांच्यातला मध खायला येतात.

सीतेच्या अशोकाची फुलं आणि त्यांचे रंग आकर्षक असतात. ती गुच्छात येत असल्यामुळे हिरव्या पानात दडली तरी उठून दिसतात. भगव्या तांबड्या रंगाची फुलं बारीक नळीसारखी असतात. ही नळी म्हणजे फुलांच्या पाकळ्याच व नळीच्या वरचा भाग, ज्याला पाकळी म्हणता येईल अशा आकाराची!नळीच्या तळाशी असलेला मध घ्यायला लांब चोचीचे फुलचुखेच येतात,इतरांना साहजिकच मज्जाव असतो. घंटेच्या आकाराची निळी घंटी, गारवेल तर आपल्या रोजच्या परिचयाची. फुलांचा तळ गोलाकार आणि वरचा भाग थोडा थोडा मोठा होत गेलेला! नरसाळ्याच्या आकाराची फुलं असलेला पांढरा धोत्रा, पेट्युनिया तर आपल्या माहितीतला! काटेरिंगणी, वांग्यांची फुलं वरून बघितली तर एखादं छोटं जांभळाच्या रंगाचं चाक वाटावं आणि त्याच्या मध्यभागी पाच परागकोश हात जोडून उभे असल्यासारखे दिसतात. पांढरा, केशरी- भगव्या रंगाच्या एक्झोराच्या पाकळ्यांची लांब नळी अगदी दांड्यासारखी आणि त्यावर आणखी चार पाकळ्या फुटल्यासारख्या दिसतात. मोहरी, आयबेरिस यांची फुलं म्हणजे एक प्रकारचा 'क्रूस'! या फुलाच्या चार पाकळ्यांची रचना अगदी क्रुसासारखी,चारही पाकळया काटकोनात उभ्या असल्यासारख्या! हॅमेलियाची फुलं कधीच फुलत नाहीत असं वाटतं, लांब नळीसारखी, पाकळ्या न उमलणारी! फुलांचा आकार अगदी खेळण्यातली छोटी कपबशीच वाटावी असा! बशीच्या आकाराचा बाहेरचा भाग कधी वेगळ्या रंगाचा तर कपाचा (पाकळ्यांचा) रंग वेगळा! कप-बशी वेगवेगळी ओळखू नये म्हणून कधीकधी दोन्हींचा रंग सारखाच-पण आकर्षून घेणारा!


स्पॅथोडियाच्या कळीत पाणी साठवलेलं असल्यामुळे बरेच पक्षिगण, फुलं उमलायच्या आतच कळीला चोची मारून, आतलं पाणी पिऊन तहान भागवतात. कळी उमल्यावरही आतला मध, परागकण, खाणारे पक्षी, या झाडावर दिसतात. साल्व्हिया, तुळस, यांच्या फुलांची रचना वैशिष्ट्यपूर्ण आहे. याच्या पाच पाकळ्यापैकी तीन पाकळ्या एकत्र जोडलेल्या असतात. यांची रचना उघडलेल्या ओठांसारखी (द्विओष्ठी) दिसते. त्यामुळे ज्या कीटकांना, मधमाशांना आत जाता येते, त्यांनाच त्यातला मध चाखता येतो. साल्व्हियाच्या फुलातली आतली मांडणी आणि रचनाही वैशिष्ट्यपूर्ण आहे. पूंकेसराच्या दोन परागकोशांपैकी एक कोश परागीभवनाच्या दृष्टीनेही 'नाकाम' असतो, तो पाकळ्यांच्या खालच्या ओठाच्या बाजूला राहून मधमशांसाठी 'खुर्चीचे' काम करीत असतो. दुसरा 'कामसू' परागकोश पाकळ्यांच्या वरच्या ओठात लपलेला असतो. हे दोन्ही परागकोश एकमेकांना लांब पण थोड्या गोलाकार काडीने बांधलेले असतात.ह्या सर्वांना आणखी एका काडीने तोललेले असते. ही निसर्गातली तरफ खरोखरच वर्णनीय आहे. मधमाशी मध खाण्यासाठी फुलात शिरली की, तिची भेट होते प्रथम 'नाकाम' परागकोशाशी! ती त्या 'खुर्चीवर' बसली की तरफ आपले काम बजावते. अगदी'सीसॉ खेळल्यासारखे! वरच्या ओठातला 'कामसू' दाबला जातो त्यामुळे आतले परागण मधमाशीच्या अंगाला चिकटतात. ह्या फुलातला 'कळा' अजून यौवनावस्थेत आलेला नसल्यामुळे स्वपरागीभवन होत नाही. दुसऱ्या फुलात मध गोळा करायला गेली की तिच्या अंगाला चिकटलेले परागकण यौवनावस्थेत आलेल्या 'कळ्या'वर पडतात. परस्परांच्या सहकारातून न कळत असं नवनिर्माणाचं कार्य घडत असतं.

अळू, सुरण, ॲलोकॅशिया या जातीतल्या फुलांतला मध खायला 'डिप्टेरा' सारख्या छोट्या माश्या,किडे येतात; पण 'मध' हवा असेल तर प्रथम त्यांना 'तुरूंगवास' भोगावा लागतो. ह्या जातीतली फुलं लांब, मांसल दांडोऱ्यावर येतात. नरपुष्पे आणि मादीपुष्पे वेगवेगळी पण एकाच दांड्यावर असतात. ह्या

साल्व्हिया




अळू जातीतील फुले



दांडोऱ्यावर एक आकर्षक आवरण असतं. ह्या आवरणाचा रंग प्रत्येक प्रकारातल्या फुलांत वेगवेगळा असल्यामुळे आणि रात्रीच्या वेळेस त्यातून एक प्रकारचा 'दर्प'येत असल्यामुळे माश्या, किडे, फुलांकडे आकर्षिले जातात. हे आकर्षक आवरण वरच्या बाजूला उघडे असते; पण खालच्या बाजूला मिटलेले असते आणि त्यात फुलं असतात. मध्यभागी हे आवरण थोडं चिमटलेलं असतं.जणू 'सिंहकटी'! ह्या कमरेच्या थोडं खाली, दांडोऱ्यावर छोटे पण खालच्या बाजूला वळलेले 'कड केस' असतात आणि त्यांच्या खाली थोड्या-थोड्या अंतरावर नरपुष्पे आणि मादीपुष्पे असतात.लहान किडे कडक केसांवरून सरळ खाली येतात आणि त्यात अडकतात. हे'ताठर-कडक केस' त्यांना बाहेर पडू देत नाहीत.दुसऱ्या फुलांतील मधले परागकण मादीपुष्पावर पडतात थोडे हिंडल्यावर हे किडे फुलांच्या बाहेर पडण्यासाठी धडपडायला लागतात; तेव्हा त्यांना समजतं की, आपण 'ताठर केसांच्या'तुरूंगात 'बंदिवान'झालो आहोत थोड्याच कळात मादीपुष्पांचा 'कळा' कोमेजतो; पण त्यातून जो मध बाहेर पडतो त्यावर हे'बंदीवान' किडे आपली 'गुजराण' करतात. काही दिवसांतच 'नरपुष्पं'वयात येतात. त्यांच्यातले परागकण तुरुंगात अडकून पडलेल्या किड्यांना चिकटतात. आतापर्यंत ताठर भूमिका घेतलेल्या केसांचं 'अवसान' गळून पडतं,'सिंहकटी'थोडी 'सुटलेली' असते. किड्यांचा 'तुरूंगवास' संपलेला असतो. त्यामुळे ह्या तुरूंगातून 'आझाद' झालेले किडे परत दुसऱ्या तुरूंगाकडे धाव घ्यायला जातात; पण जाताजाता फुलांच्या 'नवनिर्माणाच्या' कार्याला हातभार लावून जातात. बदकवेलाच्या फुलातही थोड्याफार फरकाने अशाच प्रकारचा 'तुरूंगवास' किड्यांना पत्करावा लागतो.

आर्किड्सची फुलं म्हणजे सगळ्यांनाच मोहात पाडणारी!फुलांचे आकार रंग, त्यावरच्या पट्या,ठिपके, त्यांच्यातला नाजुकपणा सर्व सर्व भुरळ पाडणारं! दुसऱ्यांना आकर्षून स्वत:चा 'कार्यभाग साधण्यामध्ये आर्किड्सचा प्रथम क्रमांक लागेल!स्वत:चा 'कार्यभाग' साधण्यासाठी त्यांनी दिमाखदार मांडणी केलेली असते. दोन वलयांमधे ह्यांच्या पाकळ्या असतात. आतल्या वलयातली एक पाकळी आकर्षक आणि ओठासारखी असते. त्याला लॅबेलम्' म्हणतात. पंखवाल्या किड्यांचे ते 'उतरण्याचे' ठिकाण! लॅबेलम्'च्या पाठीमागे 'छोट्या पिशवीत' मध लपलेला असतो.ह्या फुलातला एकच 'कामसू' परागकोश पण त्याने परागकण एकत्र जमवून दोन पिशव्या तयार केलेल्या असतात. ह्या पिशव्या तीन प्रकारच्या 'कळा'पैकी एका फुगीर टपोऱ्या कळ्याला चिकटलेल्या असतात. त्याला 'रोस्टेलम्' म्हणतात.'रोस्टेलम्'मधून जो चिकट स्त्राव बाहेर पडतो त्यामुळे ' परागपिशव्या' रोस्टेलम्ला पक्क्या चिकटून बसतात. पंखांतले किडे मध शोधायला लॅबेलमच्या मागच्या बाजूला धावतात, तेव्हा ह्या किड्यांचं 'कपाळ' रोस्टेलम्च्या जवळ येतं.'रोस्टेलम्' परागकोशांच्या पिशव्या 'कपाळावर' चिकटवून त्यांचं स्वागतच करतं. मध मिळाला की परागकोशाच्या पिशव्यांसकट पंखवाले किडे दुसऱ्या फुलाकडे जातात, तेव्हा त्या फुलातला 'चिकट कळा' ह्या 'पिशव्या' अलगद ओढून घेतात, किड्यांना त्याचं सुखदु:ख काहीच नसतं.कारण सरतेशेवटी 'पराया माल' 'हपापाचा माल गपापाच झालेला असतो. पण ह्याचबरोबर 'मधाची'




बेगमी त्यांनी केलेली असतेच.


रूई चित्रक यांसारख्या जातीतही थोड्याफार फरकाने अशाच प्रकाराने 'परागपिशव्या' एका फुलातून दुसरीकडे किड्यामार्फत नेल्या जातात.यात कळा चिकट नसतो, फुलांमध्ये बसायला 'प्लॅटफॉर्म' ही नसतो. फुलात जिथे मध असतो तिथला बराचसा भाग निसरडा असल्यामुळे किड्यांना फार काळ त्यांचे 'बस्तान' बसवता येत नाही. म्हणून हे किडे पंचकोनी कळ्यांच्या खाचेमध्ये 'पाय' रोवायला बघतात. ह्या खाचांमध्ये 'पराग पिशव्या' असतात, किड्यांनी पाय रोवले की, त्यांच्या पायांना या 'पिशव्या' चिकटतात आणि दुसऱ्या फुलांकडे जातात.

पारिजातक, जाई, जुई, निशिगंध, युक्का,रातराणी ह्यासारखी फुलं आपल्या वासांनी किड्यांना आकर्षून घेतात. 'प्रोन्युबा'नावाचा छोटा 'पतंग' (मॉथ) युक्कांच्या फुलात अंडी घालतो. अंड्यातून अळी, नंतर त्याचा 'पतंग' होऊन बाहेर पडताना फुलातले परागकण त्याला चिकटतात आणि दुसऱ्या फुलाकडे पाठवले जातात. ह्याच प्रकारचे परागीभवन अंजीर, उंबर, वड ह्यांच्या फुलात पण वेगळ्या माशी (ब्लॅस्टोफॅगावास्प) होते. रानातला 'अग्निशिखा' (ग्लोरिओसा) आपल्या लाल-तांबड्या पाकळ्यांनी जेव्हा आकर्षून घेतो, तेव्हा कधीकधी पाकळ्या 'उलटच्या संगिनी' सारख्या होतात. अंडाशय पाकळ्यांच्या खाली लपतं; पण कळा आणि त्यांची काठी मात्र 'काटकोनात' आडवी होन नवीन 'सावज' हेरत असते. कारण सावजाकडून त्यांना हवी असलेली 'सामुग्री' (परागकण) मिळवायची असते. भारंगीसारखी फुलं एका दांडोऱ्यावर लहानलहान चांदण्या बसवल्यासारखी फुललेली असतात, तर त्यांच्यातले पुंकेसर आणि कळा पाकळ्यांच्या बाहेर 'आजोबांच्या काठीसारखे' वाकडे पण आकर्षक रितीने उभे असतात. शिवलिंगीच्या फुलाचा मंद सुवास किड्यांना सहज आकर्षून घेतो. पाकळीचा बाहेरचा रंग तकतकीत मोतिया रंगाचा तर आतला किरमिजी तांबडा. ह्यातले अंडाशय आणि पूंकेसर यांची रचना शिवलिंगाप्रमाणेच दिसते म्हणून या झाडाला 'शिवलिंगी' नाव दिलं आहे.नागफणीची फुलं म्हणजे फणा उभारलेला नागच!

निसर्गात अशी कितीतरी प्रकारची फुलं आहेत. प्रत्येकाची भाषा निराळी! ठराविक फुलांची भाषा ठराविक जणांनाच माहीत. प्रत्येक फुलात 'मधुघटाची' वाट दाखवणारा 'वाटाड्या'असतोच. 'व्यक्ती तितक्या प्रकृती'प्रमाणे जितक्या प्रकारची फुलं तितक्या प्रकारचे 'वाटाडे'. कुणी आकर्षक 'आकारवाले', 'रंगवाले'. 'आकार आणि रंगवाले दोन्ही', 'सेंटवाले! कुणाचा उग्र दर्प तर कुणाचा मादक, मंद गंध! 'पानचेटी'सारखी काही फुलं स्वत:च्याबाहेरच अगदी सहजी दर्शनी पडून विनासायास मधुघटातला मध घेता येईल अशी रचना असणारी! न बोलता आपल्यातला 'मधुर'भाग दुसऱ्यांना देऊन स्वत:चे काम बिनबोभाट करणारीही फुलं म्हणजे 'बोलके मौनच'!

●●

**डॉ. कांचनगंगा गंधे**
४१/६६७ लोकमान्यनगर
पुणे ३०.



# लुई अगासी (१८०७-१८७३)

वीणा गवाणकर

**हाताशी कोणतीही आधुनिक उपकरणं नसताना, एका खेड्यातला एक विद्यार्थी एक छंद जोपासतो.... त्याचा निष्ठापूर्वक अभ्यास करतो.. डोळसपणे निरीक्षणं नोंदवतो.. स्वत:ची उत्सुकता शमविण्यासाठी अपार धाडसं करतो..ज्ञानाची नवी दालनं अभ्यासाठी खुली करून देतो..त्याचा हा अल्पपरिचय...**

''**हं,** हे छान लिहिलं आहेस. अक्षरही छान बारीक नि कोरीव काढलंस.. बरं, आता काल नेमून दिलेला उतारा पाठ झाला का? म्हणून दाखव-''

लुईनं ग्रीक भाषेतल्या एका पुस्तकातला उतारा म्हणून दाखवायला सुरूवात केली ''..आणि ग्रीक सौनिक आनंदानं ओरडले 'समुद्र! समुद्र! समुद्राच्या लाटांचाच आवाज हा!''या वाक्याशी पाठांतराची गाडी थांबली.

''का रे, थांबलास का? विसरलास का पुढचं!''

''नाही, हो, बाबा विसरलो नाही.. पण समुद्र कसा असतो हो? पाहिलाय तुम्ही? मला पाहायचाय'

''छे रे! मी नाही पाहिलेला... आणि तुला तरी तो कुठून पाहायला मिळणार... खूप दूर आहे तो.''

स्वित्सर्लंड देश अगदी एवढासा, सव्वाशे मैल रुंद नि सव्वादोनशे मैल लांब; पण प्रदेश डोंगरदऱ्यांचा. नऊ महिने बर्फ नि तीन महिने गारठा. या प्रदेशात एका गावाहून दुसऱ्या गावी जायचं झालं तर पायी किंवा घोडागाडीतून! वेगात जायचं असलं तर पायाला स्केटस् बांधून बर्फावरून घसरत जायचं. या दऱ्याखोऱ्यांत ठिकठिकाणी छोट्याछोट्या गावांतून लोक राहात. त्यांचा फारसा संबंध येत नसे. त्यांचे रीतिरिवाज, पोशाख, भाषाही भिन्न असे. काही भागात फ्रेंच बोलत तर काही भागात जर्मन.

अशा या देशात एका छोट्याशा खेड्यात अगासी राहात. ते तिथल्या चर्चचे पाद्री होते नि तिथल्याच प्राथमिक शाळेत शिक्षकही. त्यांना चार मुलं. मोठा लुई. त्याचा जन्म २८ मे १८०७ चा. त्याच्या पाठीवर भाऊ ऑगस्टस् नि नंतर दोन बहिणी.

श्री.अगासींनी लुईला अगदी बालपणापासून मातृभाषा फ्रेंचबरोबर ग्रीक नि लॅटिन भाषांचे धडे दिले. नऊ वर्षांचा लुई तिन्ही भाषा उत्तम बोलू-वाचू लिहू शके. वडिलांनी नेमून दिलेला अभ्यास तो चोख करी आणि फावल्या वेळात आपले छंद पुरे करी.

आपल्यापेक्षा वयानं मोठ्या असणाऱ्या कोळ्यांशी त्यानं मैत्री केली होती. त्यांच्याबरोबर तो गावालगतच्या सरोवरात शिडीच्या होडीतून मासेमारीसाठी जाई. लाकडी बादलीत पाणी भरून तिच्यातून जिवंत छोटेछोटे मासे घरी आणी. मासे बहुधा मरतच. या मेलेल्या माशांचं काय करावं हे त्याला कळत नसे. तो नि त्याची धाकटी बहीण त्या माशांची हुबेहूब चित्रं काढत. अगदी खवलेसुद्धा न चुकता नेमकेपणानं रेखत.

एकदा त्याला सरोवराकाठी एक आख्खा शाबूत असा माशाचा सांगाडा सापडला. त्यानं तो सांगाडा घरी आणला नि खूप प्रयत्न करून एका पुठ्ठ्यावर चिकटवला.

आता त्याचा नवाच उद्योग सुरू झाला. मेलेल्या माशांचे मांस काढून सांगाडा अलगद वेगळा करायचा नि मग तो सुकल्यावर पुठ्ठ्यावर चिकटवायचा. असं करताकरता त्याच्या लक्षात आलं, माशाचे रंग कितीही विविध असोत, आकारही लहानमोठा कसाही असो- अंतर्रचना मात्र सर्वांची सारखीच असते.

त्याचा हा नवा उद्योग वडिलांच्या लक्षात आल्यावर ते त्याच्यावर चिडलेच. त्यांची आर्थिक परिस्थिती बेताची होती. त्यात चार मुलं वाढवायची. त्यांची इच्छा होती, लुईनं चार भाषा शिकाव्यात, जमाखर्च मांडण्यात तरबेज व्हावं, पुढे एखाद्या व्यापाऱ्याकडे मुनिम- दिवाणजी व्हावं.

श्रीमंत नाही झाला तरी सुखाने जगू शकेल तो. त्यांनी आपले विचार त्याला ऐकवले आणि त्याची मासेमारी बंद केली. लुईला फार वाईट वाटलं.

आत्तापर्यंत किती छान संग्रह केला होता त्यानं! निरनिराळ्या आकाराचे नि रंगाचे दगड, पिसं, फांद्या,पक्ष्यांची घरटी, सापाची कात... त्यात आता या माशांच्या सांगाड्यांची भरही छान पडली होती.

वडिलांनी कोळी मित्रांबरोबर मासेमारीला जायची बंदी केली खरी; पण लवकरच लुई नि ऑगस्टस् सरोवराकाठच्या उथळ संथ पाण्यात निश्चल उभं राहून, नुसत्या हातांनी जिवंत मासे एका झेपेत पकडण्यात तरबेज झाले. त्यांचं ते कौशल्य पाहून त्यांच्या कोळी मित्रांनाही अचंबा वाटे.

घरी शिकण्यासारखं होतं ते शिकून झाल्यावर वयाच्या दहाव्या वर्षी त्याची पाठवणी वीस मैलांवरच्या बिएन गावी तिथल्या शाळेत झाली.

त्या शाळेतला अभ्यासक्रम पार पाडताना त्याला कसलाच त्रास झाला नाही. वडीलांच्या कठोर शिस्तीत तो भाषा शिकत होता. त्याचा फायदा इथे इटालियन, जर्मन भाषा शिकताना झाला. भाषा शिकताना त्याला जेवढा उत्साह नि आनंद वाटे तेवढाच कंटाळा नि निरूत्साह नावडता जमाखर्च शिकताना असे. पण करणार काय वडिलांचा शब्द कसा मोडणार?

त्याचं आजोळ बिएन गावापासून जवळच होतं. त्याचे आजोबा डॉक्टर होते. त्या पंचकोशीतले ते एकमेव डॉक्टर. ते रुग्ण तपासायला घोडागाडीतून निघाले की लुई त्यांच्याबरोबर जाई. त्या वेळी त्यांच्या गप्पा चालत, त्यावरून आजोबांच्या लक्षात आलं की, हा नातू थेट आपल्यावर गेलाय.. यालाही अगदी आपल्यासारखेच छंद आहेत... दोघांची अगदी पक्की मैत्री झाली. त्यांनी त्याला मृत प्राण्यांचं विच्छेदन कसं करतात ते दाखवलं आणि एक धारदार चाकू भेटही दिला.अस्थी, सांगाडे याचं जतन कसं करावं ही विद्याही तो त्यांच्याकडून शिकला.

बिएनच्या शाळेत तो चार वर्ष होता. तिथलं शिक्षण संपल्यावर एखाद्या व्यापाऱ्याकडे त्यानं उमेदवारी करावी अशी अगासींची इच्छा; पण लुईने कळवलं, पुढची चार वर्ष जर्मनीत नि तिथून पुढं पाच वर्ष फ्रान्सच्या पॅरिसमध्ये विज्ञानशास्त्राचा अभ्यास करायची आपली इच्छा आहे.

मुलाची इच्छा पाहून वडिलांना आनंद झाला. कौतुकही वाटलं पण प्रश्न होता पैशाचा. त्यामुळे त्यांनी त्याला कळवलं, ''सध्या तो विचार बाजूला ठेव आणि स्वप्नरंजनात न रमता नोकरी शोध.''

दरम्यान लुईच्या शाळेतून अगासीला पत्र आलं. त्यात लुईला परीक्षेत उच्चशिक्षणासाठी विद्यापीठात पाठवावं असं मुख्याध्यापकांनी सुचवलं होतं.

लुईचे आजोबा, मामा नि वडील यांनी या पत्रावर विचार केला.लुईच्या मामानं- तोही डॉक्टरच होता-पुढाकार घेतला.लुई नि ऑगस्टस्च्या पुढच्या शिक्षणाची जबाबदारी त्यानं घेतली. लॉसेन विद्यापीठात लुईचं नाव दाखल केलं नि ऑगस्टस्ही तिथल्या एका शाळेत जाऊ लागला.

खडतर मेहनत घेऊन अभ्यास करण्याची सवय लुईला इथेही उपयोगी पडली. इथं तो इंग्रजी ही नवी भाषा शिकला. या लॉसेन शहरात अनेक छोट्यामोठ्या इमारती होत्या. अशाच एका छोट्या इमारतीत 'निसर्ग इतिहास संग्रहालय' होतं. त्याने आयुष्यात पाहिलेलं ते पहिलंच संग्रहालय. तिथली विविध फडताळे, त्यात ठेवलेले खनिज नमुने, खडकांचे नमुने, प्राण्यांची हाडे, सांगाडे वगैरे पाहून तो विस्मयचकित झाला. तिथे एका काचेच्या पेटीत वाटाण्याच्या आकाराचे काळे-कुळकुळीत छोटे गोटे होते. त्यानं त्या संग्रहालयाचे कामकाज पाहणाऱ्या गृहस्थाला त्या गोट्यांसंबंधी विचारलं.

''तुला काय वाटतं! काय आहेत ते!''

''फार मोठ्या माशांचे दात असावेत असं वाटतं त्यांना पाहून. माझ्याकडे पण असले गोटे आहेत!'' लुई उत्तरला.


मग त्या दोघांच्या खूप गप्पा झाल्या आणि गंमत म्हणजे तो गृहस्थ लुईच्या मामाचा नि आजोबाचा स्नेहीच निघाला.त्याने सर्व संग्रहालय लुईला नीट दाखविले.

लुईने मनोमन ठरवलं, की आपणही पुढे अशाच एखाद्या संग्रहालयाचा संचालक व्हायचं.

मामाच्या घरी लॉसेनमधल्या अनेक प्रतिष्ठित लोकांची ऊठबस असे. त्यातल्या प्रत्येकाला कसल्या ना कसल्या अभ्यासाचा छंद होता. या छांदिष्ट लोकांच्या गप्पांत लुईचाही शिरकाव झाला. त्याची माशांच्या बाबतीतली निरीक्षणं,अनुमानं ऐकून ते म्हणत 'आपल्याकडे कोणी मत्स्यजगताचा अभ्यासक नाहीए.

लुईनेच तो विषय हाती घ्यावा, हे बरं. त्याला त्यात चांगली गती आहे.’

चौदा वर्षांच्या लुईनेही मनोमन ठरवलं, आपण मत्स्यजगताचा सखोल अभ्यास करायचा. जलचरांचं वर्गीकरण करायचं. ज्या मत्स्यजाती आजवर अनाम-अज्ञात राहिल्या असतील त्यांना लॅटिन भाषेत शास्त्रीय नावं द्यायची आणि हो, ती जात आपण शोधल्याचं नोंदलं जावं म्हणून त्या नावाच्या जोडीला आपलंही नाव लॅटिन पद्धतीनुसार Agassii असं जोडायचं, असंही त्याने नक्की केलं.



आजवर या विषयात काय संशोधन झालंय हे नीट माहीत असल्याखेरीज नव्यानं काय शोधायचं हे कसं समजणार? ही माहिती असते मोठमोठ्या नि महागड्या पुस्तकांत. ती पुस्तकं विकत घ्यायला कशी परवडणार? मग, असं अख्खं पुस्तकच हातानं नकलून घ्यायचं म्हटलं तर कागद तर कितीतरी लागणार! त्याला पैसे? शेवटी त्या दोघा भावांनी रद्दीवाल्यांकडून जुन्या जमाखर्चाच्या वह्या स्वस्तात मिळवल्या आणि त्या पाठकोऱ्या कागदांवर बारीक, सुवाच्य अक्षरात पुस्तकातील महत्त्वाचा मजकूर नक्कल करून घ्यायला सुरुवात केली आणि लवकरच लुईने स्वत:साठी अशी बरीच पुस्तकं ऑगस्टस्‌च्या मदतीने तयार केली.

वडिलांना अजूनही वाटत होतं, लुईने हा नाद सोडावा. गावी परतून चार पैसे कमवावेत;पण लुईची चौकस बुद्धी, ग्रहणशक्ती नि परिश्रम घेण्याची तयारी पाहून त्याच्या मामाने त्याला पाठिंबा दिला. एवढचं नव्हे, तर त्याला एक सूक्ष्मदर्शक यंत्र भेट दिलं. ते कसं वापरायचं तेही शिकवलं.

त्याकाळी वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्यांना औषधोपचारासाठी वनस्पतींचाही अभ्यास करावा लागे. लुई मामाच्या मार्गदर्शनाखाली आधीपासूनच तसा अभ्यास करत होता.

पुढच्याच वर्षी लुई वैद्यकीय शिक्षण घेण्यासाठी झूरिच विद्यापीठात गेला. तिथं दोन वर्षं शिक्षण घेतल्यावर तो जर्मनीत हायडेलबर्ग विद्यापीठात दाखल झाला. ऑगस्टस्‌ मात्र शालांत परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर गावी परतला नि वडिलांना घरगृहस्थी चालवण्यात मदत करू लागला.

१८२७ मध्ये सुट्टीत तो आपल्या गावी आला. सुट्टीतही त्याचे काही ना काही उद्योग चालतच. आजवर कोणी न अभ्यासलेली एक गोष्ट त्यानं प्रथमच केली. सरोवरातलं पाणी एका काचेच्या भांड्यात ठेवलं त्यात बेडकाची काही अंडी होती. तो नि त्याची बहीण त्यावर लक्ष ठेवून असत.अंड्यापासून पूर्ण बेडूक अवस्थेपर्यंत बेडकाच्या सर्व जीवनावस्था त्यांनी चित्रबद्ध केल्या. असं निरीक्षण नोंदवणारा तो पहिलाच!

सुट्टी संपल्यावर लुई जर्मनीतल्याच दुसऱ्या एका ‘म्युनिच विद्यापीठा’त दाखल झाला. तिथं त्याला त्याच्यासारखा छंद असणारा अलेक्झांडर ब्राऊन नावाचा मित्र लाभला. दोघं मिळून फावल्या वेळात वनस्पती, फुलं, पानं, घरटी, खनिजं, शंख, शिंपले, वगैरेचे नमुने गोळा करीत, गरजू वनस्पतीशास्त्र अभ्यासकांना ते विकत आणि आपल्या गरजेपुरता पैसा मिळवत.

म्युनिचमधल्या एका अभ्यासकाकडे जीवाश्म आणि सागरी शंख शिंपल्यांचा मोठा साठा होता. त्याचं वर्गीकरण करून नि संग्रह नीट लावून देण्याचं काम त्यानं या दोघांवर सोपवलं.त्यांनी ते काम मोठ्या उत्साहानं पार पाडलं. कामाच्या मोबदल्यात त्याच्याकडून मिळवले शंख-शिंपले.

म्युनिचच्या मासळीबाजारात सुप्रभाती फेरी मारणं हा त्या दोघांचा आवडता दिनक्रम. एखाद्या नवीन जातीचा मासा आढळतोय का ते शोधण्याची त्यांची धडपड आणि खरंच, एके सकाळी त्यांना एक आगळावेगळा मासा सापडलाही, त्यांनी तो विकत घेतला आणि आपल्या खोलीवर आणला. जवळचे सर्व संदर्भग्रंथ लुईने शोधले; पण त्यात कुठेही त्याने विकत आणलेल्या माशाच्या वर्णनाचा मासा सापडेना. विद्यापीठात प्राणिशास्त्र शिकवणाऱ्या प्राध्यापकांनाही त्या माशाविषयी काही सांगता येईना.

मग लुईनं बैठक मारली नि त्या माशाचं बारकाईनं वर्णन करून त्यावर लेख लिहिला, त्याची जातकुळी ठरवली आणि त्या मत्स्यजातीला शास्त्रीय नाव देऊन सोबत आपल्या नावाची Agassi ची जोडही दिली.

त्याचा हा लेख सृष्टिविज्ञानाच्या मासिकात छापून आला. वयाच्या एकविसाव्या वर्षी लुई अगासीनं नवीन मत्स्यजाती शोधली होती. (पुढेही त्याने अनेक मत्स्यजाती शोधल्या आणि त्यांच्या शास्त्रीय नावापुढे आपलेही नाव Ag, Agass किंवा Agassii या पद्धतीने जोडले).

त्याच्या या लेखाचा परिणाम म्हणजे त्याच्याच विद्यापीठातल्या प्रा.मारशस् यांनी त्याला बोलावून घेतलं. ते नुकतेच ब्राझीलच्या दौऱ्यावरून परतले होते. येताना त्यांनी तिथून खूपसे कीटक, शंख, शिंपले जमवून आणले होते. त्यांचं वर्गीकरण करून त्यावर त्यांना लॅटिन भाषेत शास्त्रीय पुस्तक लिहायचं होतं. लॅटिन भाषेत पुस्तक लिहिणं हे त्या काळी प्रतिष्ठेचं मानलं जाई. लुईला त्यांनी या कामी सहभागी करून घेतलं हा त्याचा गौरवच म्हणायचा.

पुस्तकाची तयारी चालू असताना प्रा.मारशस् त्याला म्हणाले, ''पुस्तकाच्या मुखपृष्ठावर लेखक म्हणून माझ्या खालोखाल तुझं नाव येणार; पण नुसत्या नावाला काय किंमत! काही तरी पदवी हवीच. ती मिळवशील तर बरं''.

लुईनं पदवीपरिक्षा घ्यायची ठरवलं. त्यासाठी आधी लेखी परिक्षा द्यावी लागे. नंतर तोंडी परीक्षा. लुईने लेखी परीक्षा इतकी उत्तम दिली की त्याचे गुण पाहून परीक्षकांनी त्याला तोंडी परीक्षेची सूट दिली. त्याला डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी (Ph.D) ही पदवी मिळाली. वैद्यकीय परीक्षा देऊन डॉक्टर ही पदवी मिळविण्याआधीच वयाच्या एकविसाव्या वर्षी Ph.D. पदवी त्याच्या नावापुढे लागली आणि एका पुस्तकाचा तो सहलेखकही झाला.

त्याच्या या यशाचा वडिलांना खूप आनंद झाला; पण तरीही त्यांच्या पोटात भीती होतीच, शास्त्रशाखेचा डॉक्टर होऊन पोट कसं भरणार? माणसांवर शस्त्रक्रिया करणारा डॉक्टर झाला तर उपाशी तरी मरणार नाही! मुलाने वडिलांच्या इच्छेखातर वैद्यकीय अभ्यासक्रम पूर्ण करायचं कबूल केलं नि तो अभ्यासाला लागला.

प्रा. मारशस् यांच्या तोडून ब्राझील मोहिमेची माहिती ऐकल्यापासून आणि त्यांनी तिथून आणलेला प्राणी नमुना संग्रह, जीवाश्मसंग्रह पाहिल्यापासून आपणही अशा एखाद्या शोधमोहिमेवर जायचं असं त्याच्या मनानं घेतलं आणि या मोहिमेची आवश्यक ती पूर्वतयारी म्हणून विविध प्राण्यांची शरीरं जतन करणं, विच्छेदन करणं वगैरे धडे त्यानं घेतले.या कामी आवश्यक ती हत्यारे बनवून घेण्यासाठी त्यानं लोहाराच्या हाताखाली काम केलं. पाण्यात बराच काळ टिकून राहाता यावं म्हणून पोहण्याचा सराव ठेवला. रोज तीस मैल याप्रमाणे सलग आठ दिवस चालण्याची सवय केली. अशा सरावातही त्याच्या पाठीवर भक्कम पोतडी असे. रस्त्यात दिसणारे दगडांचे, वनस्पतींचे नमुने गोळा करून तो पोतडीत टाके. त्यानं त्याची पोतडी चांगलीच वजनदार झालेली असे.

लुईचा अश्मिभूत मत्स्यांचा बराच अभ्यास आहे, असं प्रा. मारशस् यांच्या लक्षात आलं होतं. आपल्या पुस्तकाचं काम पूर्ण होताच ते त्याला म्हणाले, ''अश्मिभूत माशांविषयी तुला खूप माहिती आहे. ती तू लिहून प्रकाशित कर.''

लुईनं गुरूचं म्हणणं मनावर घेतलं. डॉक्टरीचा अभ्यास करताकरता तो अश्मिभूत मत्स्य या विषयावर पुस्तक लिहिण्याच्या तयारीला लागला.

उकळत्या पाण्यात मासा टाकून त्याचे मांस सांगाड्यापासून अलग होईपर्यंत मंद आंचेवर तो शिजवायचा. मग त्या सांगाड्याचा अश्मिभूत सांगाड्यांशी तुलनात्मक अभ्यास करायचा आणि ती निरीक्षणं खोलीच्या पांढऱ्या चुन्यानं रंगवलेल्या भिंतीवर नोंदवायची, आकृत्या काढून ठेवायच्या असा क्रम सुरू झाला.

त्याच्या या अभ्यासाची लागण त्याच्या समवयस्क मित्रांना तर झालीच; पण अनेक जाणते प्राध्यापकही त्याच्या खोलीला भेट देऊन तो काय करतोय ते समजून घेत.

दिवसा मत्स्यजगताचा अभ्यास नि रात्री वैद्यकीय पदवीसाठीचा अभ्यास चालू असे.

पुस्तकाचा मजकूर तयार झाला. ते पुस्तक सचित्र काढायचं होतं. त्या काळी छायाचित्रणाचा शोध लागलेला नव्हता. पुस्तकातली चित्रं हातानेच काढलेली असत. हे खूप खर्चाचं काम;पण त्याची ही अडचण म्युनिचच्या कलाविद्यालयात शिकणाऱ्या चित्रकलेच्या एका विद्यार्थी मित्राने सोडवली. लुईला हवी असलेली सर्व चित्रे त्यानं काढून दिली.

१८३० च्या एप्रिल महिन्यात त्यानं वैद्यकीय अभ्यासक्रम पूर्ण केला व 'डॉक्टर' पदवी मिळवली.

अश्मिभूत मत्स्य या विषयावरचं त्याचं पुस्तक तयार झालं. एकूण पाच खंडांत त्याने समग्र माहिती दिली होती. स्वत:ला सापडलेले आणि इतरांना सापडलेले जीवाश्म यावरची सांगोपांग


माहिती त्यात होती.

हे पुस्तक हातावेगळं होताच तो नव्या पुस्तकाच्या तयारीला लागला. स्वित्झर्लंड, फ्रान्स नि जर्मनीमधली गोड्यापाण्यातील माशांवर त्यानं पुस्तक लिहायला घेतलं.

"The Natural History of Fresh water Fish of Central Europe.'

प्रसिद्धी पावलेला कुव्हिअर पॅरिसमध्ये होता. तो स्वत: जीवाश्मांवर पुस्तक लिहिण्याच्या तयारीत आहे असं लुईला पॅरिसमध्ये येताच कानी आलं.

काहीशा साशंक मनाने लुई त्याला भेटायला गेला. सोबत जीवाश्मांवरच्या आपल्या नोंदीही त्याने सोबत नेल्या होत्या. कुव्हिअरनं त्या नोंदी ठेवून



घेतल्या नि दोन दिवसांनी पुन्हा यायला सांगितलं.

लुई पुन्हा गेला. त्यावेळी कुव्हिअर त्याला म्हणाला– ''तू तर या क्षेत्रात माझ्याही पुढे आहेस. माझ्या घरी ये. त्या सर्व साधनांचा वापर कर नि तूच पुस्तक लिही.''

लुईचे दिवसाचे पंधरापंधरा तास काम चाले. वर्ष असं गेलं. तेवढ्यात कुव्हिअर वारला.

पुस्तकाचं काम अर्धेमुर्धे झालेलं, जवळचे सर्व पैसे संपलेले; पण अशी हार मानायला लुई तयार नव्हता. नेटानं आपलं काम त्यानं चालू ठेवलं.

एके दिवशी सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ हंबोल्ट त्याला भेटायला त्याच्या खोलीवर आला. लुई अगासीची ती पुस्तकांनी नि विविध जीवाश्मांनी खच्चून भरलेली खोली पाहून तो आनंदला. त्या पुस्तकाच्या राशीत, आपल्या महागड्या पुस्तकातील महत्त्वाचा मजकूर हाती लिहून तयार केलेल्या, पाठकोऱ्या कागदाच्या वह्या पाहून त्याला या तरूणाच्या जिद्दीचे, निष्ठेचे विशेष कौतुक वाटले.

हंबोल्ट श्रीमंत सरदार होता. स्वत:च्या पैशाच्या जोरावर सागरी मोहिमा पार पाडण्याची ऐपत होती. त्याच्या विरुद्ध लुईची परिस्थिती. विद्यार्थीदशेत संशोधकवृत्तीनं काम करणाऱ्या लुईच्या प्रयत्नांना हंबोल्टनं दाद दिली. त्याला सर्व आर्थिक मदत दिली. त्यामुळे लुई पॅरिसच्या जीवाश्म संग्रहालयात अभ्यास करू शकला.

त्याच सुमारास त्याला ऑगस्टस्‌चं पत्र आलं तो ज्या न्युकॅटल गावी नोकरी करीत होता तिथं कनिष्ठ महाविद्यालय सुरू होत होतं. महाविद्यालयात सृष्टिविज्ञान शिकविण्यासाठी प्राध्यापकाची जागा भरायची होती. तिथं लुईनं यावं असं ऑगस्टस्‌ने सुचवलं.

लुईला ऑगस्टस्‌चा विचार पटला आणि तो निघाला. पगार थोडा होता. वार्षिक तीनशे डॉलर्स; पण हाती घेतलेलं काम पार पाडायला निर्वेध नि मुबलक वेळ मिळणार होता ही गोष्ट महत्त्वाची. त्या न्युकॅटलजवळून खडकांची रांग जाते आणि प्रागैतिहासिक कासवं नि महाकाय मासे यांचे अश्मिभूत अवशेष आढळतात, ही गोष्ट तर त्याला अतिमहत्वाची वाटत होती.

लुईनं अभ्यासासाठी घर सोडल्याला आता दहा वर्ष झाली होती. डॉक्टरी पदरात पडताच तो आईला भेटायला गावी आला.आपल्या या मुलाचं डॉक्टरी करण्यात मन नाही हे तिच्या लक्षात यायला वेळ लागला नाही.

मामाने आणि त्याच्या काही मित्रांनी पुढाकार घेतला, पैसे जमवले आणि त्याला पॅरिसला पाठवायची तयारी केली. तिथल्या जीवाश्मांच्या मोठ्या संग्रहालयात अभ्यास करायची त्यांनी सोय केली.

लुई पॅरीसला गेला.

युरोपातला पहिला शास्त्रज्ञ म्हणून

सरपटणाऱ्या महाकाय प्राण्यांच्या प्रागैतिहासिक काळाला आज आपण 'ज्युरासिक काळ' म्हणतो. न्युकॅटलजवळची चुनखडीच्या खडकांची रांग 'ज्युरा' पर्वतातून जाते, त्यावरून हे नाव पडलं. लुई आगासीने इथे प्राचीन जीवाश्मांचा अभ्यास केला. ज्युरासिक काळातील प्राण्यांच्या अभ्यासाची सुरूवात लुई आगासीने करून दिली.

त्याचा हा अभ्यास चालू असतानाच त्याच्या पंचखंडात्मक पुस्तकाला 'वोलास्टोन पुरस्कार मिळाला आणि त्याच्या विद्वत्तेचा बोलबाला वाढला. त्याची गणना युरोपातील 'श्रेष्ठ मत्स्यतज्ज्ञ' (Ichthyologist) म्हणून होऊ लागली. स्वित्झर्लंडमधलं छोटसं आडगाव 'न्युकॅटल' लुईमुळे सर्व जगाला माहीत झालं. प्रसिद्धीला आलं. लुई अगासीचा विद्यार्थीवर्ग वाढला. विद्यार्थीच काय, पुष्कळ वेळा गावकरीही त्याच्या वर्गात येऊन बसत. लुई केवळ मत्स्यजगताविषयी बोले असं नाही. निसर्गशास्त्रातला कोणताही विषय त्याला वर्ज्य नव्हता. आपल्या भोवतीच्या परिसराचा, निसर्गाचा इतिहास समजून घेणं, भौगोलिक घडामोडीचं निरीक्षणं करणं याची ओढ त्यानं आपल्या विद्यार्थ्यांना लावली तशीच परिचितांनाही लावली.

(लेखाचा उत्तरार्ध पुढील अंकात)

••

---


**वीणा गवाणकर**
'राधा'भास्कर आळी,
वसई (जि.ठाणे) ४०१२०१


# हसा ऽ ऽ हसा ऽ ऽ

### *मुलाचा अंदाज*

*वडील व मुलगा बाहेरच्या खोलीत बसले होते. आतून काचेचे भांडे फुटल्याचा आवाज आला. वडील म्हणाले "सांग बरं, भांडं कोणी फोडलं असेल?" मुलाने उत्तर दिले, "बाबा, भांडे नक्की आईने फोडले. दुसरे कोणीही नाही." मुलाचे उत्तर ऐकून वडिलांना आश्चर्य वाटले ते म्हणाले, "घरात दहा बारा माणसे असताना तू नेमके कसे काय हे सांगू शकतोस?"' 'कारण, दुसऱ्या कुणाच्या हातून ते फुटले असते तर पाठोपाठ आईच्या ओरडण्याचाही आवाज आला असता." मुलाने उत्तर दिले.*

### *अभिनव शिक्षा*

*एका वक्त्याचे वसंत व्याख्यानमालेत रटाळ भाषण चालू होते. त्यामुळे हळूहळू एकेक जण उठून जात होता. शेवटी फक्त दहा बारा लोक उरले. ते मात्र शेवटपर्यंत टिकून होते.*

*भाषण संपल्यावर सन्माननीय वक्ते त्या श्रोत्यांना म्हणाले, "आपण सर्वजण खरे रसिक, गर्दीपेक्षा भाषणाला आपल्यासारखी दर्दी मंडळीच हवीत. आपल्या साऱ्यांचा मला परिचय करून घ्यायचाय. आपण सर्वजण कोण आहात?" एकजण उभा राहून म्हणाला, "आम्ही सर्व येरवड्याच्या तुरूंगातील कैदी आहोत."*

*आश्चर्याने त्यांनी विचारले "मग येथे कसे आलात?"*

*"आपलं भाषण ऐकणं हा आमच्या शिक्षेचाच एक भाग आहे."*

### *सार–ग्रहण*

*म. गांधी एकदा बोटीतून इंग्लंडला चालले होते. प्रवासात त्यांचा एका इंग्रज माणसाबरोबर परिचय झाला. हा इंग्रज माणूस जरा छद्मी होता. तो सारखी म.गांधींची टिंगल करीत असे.*

*एक दिवस त्याने म.गांधींवर एक उपहासपर कविता लिहून ती त्यांना वाचावयास दिली. कविता चारपाच पानांची होती. म.गांधींनी कविता न वाचताच कागद केराच्या टोपलीत टाकले व टाचणी तेवढी डबीत काढून ठेवली.*

*"आहो, कविता फेकलीत कशाला? कागद गोळा करून परत वाचा, तुम्हाला तीत खूप सार सापडेल." तो छद्मी इंग्रज गांधींजींना सांगू लागला. "सार तर मी काढून डबीत ठेवले आहे." म.गांधीनी हसत त्याची फिरकी घेतली.*

### *जादूगार*

*एकदा एका जादूगाराने हात न लावता लिंबाचा रस काढला. त्यानंतर तो प्रेक्षकांना उद्देशून म्हणाला, "असेल कोणी हरीचा लाल तर त्याने हे लिंबू पिळून रस काढून दाखवावा. एक थेंब जरी रस निघाला तरी मी त्याला एक हजार रूपये बक्षीस देईन."*

*एक किरकोळ शरीरयष्टीचा प्रेक्षक पुढे आला. त्याने लिंबू हातात घेऊन पिळले तर चक्क दहा थेंब रस निघाला.*


*जादूगारावर आता आश्चर्यचकीत होण्याची पाळी आली.तो म्हणाला, "आपणही माझ्यासारखे महान जादूगार दिसता!"*

*"नाही, मी इन्कम टॅक्स ऑफिसर आहे." त्याने उत्तर दिले.*


••

# डमी

**डॉ. आश्विनी धोंगडे**



**'मला बदल हवा आहे!' असा विचार नेहमीच सगळ्यांच्या मनात येत असतो. त्याच त्याच चक्रातून घाण्याला जोडलेल्या बैलासारखं रोज तेच तेच कंटाळवाणं आयुष्य जगण्याचा आपल्याला कंटाळा येतो. मग कामाला दांडी मारणं, फिरायला जाणं, बाहेर खाणं, बाहेरगावी फिरायला नातेवाईकांकडे जाणं, जवळपास सहली काढणं असे पर्याय आपण शोधत राहतो. आपण कल्पनाही करू शकणार नाही असा एक पर्याय आपल्या 'यश'ने शोधला आहे. या पर्यायामुळे यश रोजच्या कंटाळवाण्या चक्रातून बाहेर पडू शकला का? ते वाचू या, अश्विनी धोंगडे यांच्या कथेत!**



'आठ वाजले, ऊठ आता. अजून सगळा गृहपाठ व्हायचाय ना?' आई, यशला गदगदा हलवून उठवत होती; पण यशला अजूनही उठावंसं वाटत नव्हतं. थंडी पडली होती, अंथरुणात रगाखाली कसं मस्त उबदार वाटत होतं आणि इकडे आईच्या तोंडाचा पट्टा सुरू झाला होता. यशला पक्क ठाऊक होतं, की आता जर पाच मिनिटांत तो उठला नाही तर आईचा हात आणि त्याची पाठ यांची नक्की गाठभेट होणार!

पण रोजच सकाळी यशला उठण्याचा जाम कंटाळा यायचा. उठलं की लगेच आपल्या पांघरुणाची आपणच घडी करायची. गादीवरची पहिली चादर काढून त्याची घडी करायची. दोन्ही घड्या कपाटात ठेवायच्या. पलंगावर दुसरी चादर घालायची. मग आदल्या रात्रीचा अभ्यासाचा सगळा पसारा आवरून ठेवायचा. आईला वेळ नसला तर–आणि तो बऱ्याचदा नसायचाच–आपल्या खोलीचा केर आपणच काढायचा. या सगळ्या गोष्टींना जरा का उशीर झाला की लगेच, 'यश तुला काही शिस्तच नाही, अगदी एक नंबरचा आळशी मुलगा आहेस तू...' असं एकदा आईनं सुरू केलं की, दिवसभर मग बारीकसारीक गोष्टीसाठीही आई त्याला फटकारत राहायची. 'कंटाळा!' यशला भारी प्रिय होता हा शब्द! कशाला करायला पाहिजे उठल्यावर हे सगळं. रात्री पुन्हा झोपायचंच असतं की त्याच गादीवर. मग राहिलं अंथरूण पांघरूण, तर बिघडलं कुठे? आणि केर तरी रोज नाही काढला तर काही बिघडत नाही; पण ही मोठी माणसं वैताग आणतात नुसती.

दूध प्यायलं की कपबशी विसळून जागेवर ठेवा, नऊ वाजायच्या आत आंघोळ करा, कपडे साबणात भिजवून ठेवा. आई ऑफिसला जाण्यापूर्वी जेवून घ्या. नाहीतर मग आपलं आपण वाढून घ्या. दारं–खिडक्या व्यवस्थित बंद करा, अन्न झाकून ठेवा. आपले कपडे आपणच शोधून घ्या. कुलूप लावा,

किल्ली शेजारी ठेवा आणि मग धावतपळत जा शाळेला! किती ही एकापाठोपाठ एक कामाची गर्दी! वैताग नुसता, आणि सगळ्या भाऊगर्दीत एक जरी चूक झाली तरी मग आई...

आणि शाळेत तरी थोडाच आराम आहे? शाळा सुरू होण्यापूर्वी थोडा वेळ खेळावं म्हटलं, तर इंग्रजीचे सर जादा तास घ्यायचे. ऑफ तास असला की गणिताच्या बाई जादा गणितं सोडवायला द्यायच्या.एकामागोमाग एक सहा सात तास नुसता अभ्यास एके अभ्यास. पी. टी.च्या तासालासुद्धा कवायत नाहीतर व्यायाम. कोणी म्हणून हवं तसं खेळू द्यायचे नाहीत. खिशातल्या गोट्या आणि चेंडू खिशातच राहायचे, त्यांना हवा म्हणून लागायची नाही.

शाळा सुटल्यावर बसची लांबलचक लाईन, गर्दीत लोबकळायचं, घरी जायचं ते सुद्धा, सूर्य त्याच्या घरी गेल्यावर. कित्येकदा आई घरी आलेली नसायची. जरा टी.व्हीपुढे बसून मॅच किंवा कार्टून पाहावं म्हटलं तर गृहपाठाच्या वह्या, आठवड्याची चाचणी-परीक्षा डोळ्यांपुढे नाचायला लागायची.रात्री पेंग येईपर्यंत गणितं सोडवायची. शास्त्राचे प्रयोग लिहून काढायचे. पुन्हा दुसऱ्या दिवशी सकाळपासून आहेच सगळं.खरं तर अभ्यासाचा यशला मनापासून कंटाळा यायचा. निबंध लिहायचा तर विचार करायचा, गणित नाही सुटलं तर डोकं खाजवत बसायचं. इतिहास म्हणजे सगळं जुन आठवत बसायचं. आवडती हिंदी गाणी सोडून पुस्तकातल्या डबड्या हिंदी कविता पाठ म्हणत बसायच्या. गोष्टीची पुस्तक सोडून मराठीचे लांबलचक बोअर धडे वाचत बसायचे. कुणी लावलाय हा अभ्यासाचा लकडा मुलांच्या मागे! आणि प्रत्येकानं कशाला शाळेत जाऊन शिकायचं?

खरंच जायलाच पाहिजे का रोज शाळेत? त्याच त्याच चक्रातून घाण्याला जोडलेल्या बैलासारखं, रोज तेच तेच कंटाळवाणं आयुष्य जगायचं! त्यापेक्षा रोज दिवसभर क्रिकेटची बॅट घेऊन खेळत बसावं. सचिनसारखं मैदान गाजवावं. नाहीतरु मस्तपैकी मॅरेथॉन शर्यतीत भाग घेण्यासाठी पळण्याची प्रॅक्टिस करावी, विश्वनाथ आनंदसारखं होण्यासाठी बुद्धिबळ शिकावं, नाहीतर खिशात भाजलेल्या शेंगा घेऊन पावसात मस्त रानोमाळ भटकावं. डोंगर,दऱ्या पालथ्या घालाव्यात, रानझऱ्यात डुंबावं, झाडाची फळं तोडून खावीत आणि झाडाखाली झोपून जावं, झाडाच्या फांदीला झोके बांधून पक्ष्यांसारखं उंच आकाशात जावं आणि भऽऽर्रकन खाली यावं, नाहीतर दिवसभर मस्तपैकी टी.व्ही.पुढे बसून सिनेमा पाहावा आणि गरम गरम चहा पीत गोष्टीचं पुस्तक वाचत राहावं. सकाळ संध्याकाळ यश अशा मनसोक्त आयुष्याचाच विचार करीत राही आणि मग घर आणि शाळा, शाळा आणि घर, काम आणि अभ्यास, अभ्यास आणि काम या चक्रातून आपली कधीच सुटका होणार नाही याचं त्याला वाईट वाटे.

'अमिताभ कसलं सॉलिड फायटिंग करतो रे' एक दिवस टि.व्ही.वरचा सिनेमा पाहून आल्यावर यश मल्हारला म्हणत होता. खरं तर सिनेमा पाहिल्यापासून त्याला आपण एकदम अमिताभच व्हावं असंच वाटायला लागलं होतं.

'अमिताभ कुठला फायटिंग करतोय? त्याला साधी उडीसुद्धा मारता येत नाही' मल्हार म्हणाला.

'अमिताभबद्दल काही वेडंवाकडं बोलू नकोस हं. आपला आवडता हीरो आहे तो.'

'म्हणून काय झालं? हीरो कधी फायटिंग करतो होय रे? 'मल्हार म्हणाला, 'फायटिंग डमी करतो आणि हीरो भाव खातो!' मल्हारनं माहिति पुरविली.

'डमी? म्हणजे काय रे?'

'हात्तीच्या! एवढं साधं सुद्धा माहिती नाही होय रे तुला!' त्याच्या अज्ञानाची कीव करीत मल्हार म्हणाला, डमी म्हणजे त्याच्यासारखा दिसणारा दुसरा माणूस. अमिताभचे कपडे घालून मारामारी, पळापळ, फायटिंग सगळं तोच करतो, अमिताभ फक्त डायलॉगबाजी करतो...'

मल्हार आणखी काय काय सांगत होता आणि यश अगदी मनापासून सगळं ऐकत होता. त्याला वाटलं, काय मजा आहे नाही अमिताभची, त्याला नको असलेली सगळी कामं त्याचा डमी करणार, म्हणजे त्याला हवी असलेली सगळी कामं करायला अमिताभ रिकामाच की! डमी, डमी या शब्दानं यशला अगदी वेडच लावलं. किती गमतीशीर कल्पना आहे नाही? आपल्याही एखादा डमी मिळाला तर काय बहार येईल. रात्रंदिवस मग डमीचेच विचार यशच्या मनात घोळू लागले.

'आठ वाजायला आले यश, ऊठ आता, आवर लवकर लवकर' स्वयंपाक-घरातून आईचा आवाज ऐकू आला;पण यशला खरंच उठावंसं



आजच्या क्षणाचा उपयोग करूनी घ्यावा. रे काय भरोसा उद्याचाच कुणी द्यावा.

वाटेना. इतक्यात त्याच्या खोलीच्या दारावर कोणीतरी थाप मारली.

'यश, ए यश, दार उघड लौकर!' आईचा आवाज नव्हता, मग इतक्या सकाळी कोण बरं आलं असेल? यशनं दार उघडलं, तर दारापुढे आरसा लावलाय की काय? असंच त्याला वाटलं. त्याच्याएवढाच दिसणारा, आणि हो! अगदी त्याच्यासारखाच दिसणारा एक मुलगा दाराशी उभा, गोष्टीतला जणू जुळा भाऊ.

'कोण रे तू?' यशनं विचारलं.

'ओळखलं नाहीस? मी तुझा डमी. मी हवा होतो ना तुला? म्हणून मुद्दाम आलो!'

'डमी? माझा डमी?' यशचा विश्वासच बसेना; पण यशनं त्याला पटकन आत घेतलं आणि दार लावून टाकलं.

'अगदी माझ्यासारखाच दिसतोस रे तू!'

'अरे मग तुझा डमी तुझ्यासारखाच दिसणार!'

'हो खरंच की, आता राहणार का तू इथे?

'हो राहायलाच आलोय मी.'

'छान, मग आता मी सांगतो तसं करायचं.' असं म्हणून यशनं आपला सगळा बोअर दिवस डमीच्या हवाली केला. 'आणि हो भरपूर अभ्यास करायचा, खेळायचं काम तू करायचं नाही, ते मी करीन. तू बाकीची सगळी कामं करायचीस. मी करतो ती घरातली आणि जी आई सांगते, पण मी करत नाही तीसुद्धा!'

'म्हणजे!'

'म्हणजे, भाजी आणणं, कधी कधी दळण आणणं, लायब्ररीतून आईचं पुस्तक आणणं, सामान आणणं वगैरे! नाही रे! इतकं काही वाकडं तोंड करू नकोस, मजा असते त्या कामातसुद्धा.' यशनं डमीला समजावलं.

'मग तू का नाही करत ही कामं?'

'हे बघ, तू माझा डमी आहेस ना? मग मी सांगेन तसं करायचं. हे घे माझे कपडे. ती बघ आई हाका मारायला लागलीय, पळ लौकर!'

डमीनं ओ दिली आणि स्वयंपाक घरात गेला. वा कसं जुंपलं एका माणसाला मस्तपैकी कामाला! आता मी मस्त लोळत राहणार दुपारपर्यंत!

त्या दिवशीपासून वारा प्यायलेल्या वासरासारखा हुंदडायला यश रिकामा झाला. पहिला दिवस डमी शाळेत गेल्यावर आणि आई ऑफिसला गेल्यावर यश आरामात उठला आणि दात न घासता सरळ बॅट चेंडू घेऊन मैदानात गेला. आज दिवसभर क्रिकेटच. बस्स! एवढंच वेळापत्रक; पण मैदानावर कुणीच नव्हतं. सगळे शाळेत गेलेले. यश मनातून सगळ्याच मित्रांवर चिडला. एवढा क्रिकेट खेळायचा मूड होता, पण सगळी कंपनी ॲबसेंट! मग त्यानं स्वत:च दहा वीस वेळा सचिन स्टाईलनं बॅट फिरविली, मग धावत-पळत येऊन चेंडू टाकण्याचा सराव केला; पण पराक्रम पहायला आसपास कुत्रंसुद्धा नव्हतं, त्यामुळे खेळात काहीच गंमत वाटेना. कसाबसा इकडे-तिकडे वेळ काढून तासाभरात तो घरी आला आणि टी.व्ही.वरचा सिनेमा पाहात बसला; पण सिनेमासुद्धा कसलातरी भिकार-रडका होता, त्याचाही कंटाळा आला. गप्पा मारायलाही घरात कुणी नाही, आसपासची सगळी मुलं शाळेत गेलेली. मग पांघरूण घेऊन अंथरूणात पडून राहिला, पण दुपारी झोपायची सवय नसल्यानं झोपही येईना. बाप रे, पहिल्याच दिवशी इतकं बोअर झालं. नाही, नाही, उद्या तडक गावाबाहेर फिरायला जायचं आणि मनसोक्त भटकायचं!

दुसऱ्या दिवशी सकाळपासूनच



पाऊस पडत होता; पण डमी मात्र पहाटेच उठला. शहाण्या मुलासारखा त्यानं अभ्यास केला, घर आवरलं, दात घासून आंघोळ करूनच दुध प्यायला आला. आईला यशमधला हा फरक पाहून आश्चर्यच वाटलं. दुधाबरोबर बक्षीस म्हणून तिनं दोन बिस्किटं जास्तच ठेवली, काम करताकरता मधेच येऊन तिने यशला कुरवाळलं, 'शहाणा माझा बाळ तो, असाच रोज वागत जा, मग बघ पहिला नंबर येतोय की नाही!' असं म्हणून पाठीवर थोपटलं. खोलीतून खरा यश हळूच पाहात होता, त्याला डमीचा हेवा वाटला, हल्ली किती दिवसात आईनं त्याचे असे लाड केलेच नव्हते आणि या डमीनं मात्र एक दिवसात आईचं प्रेम मिळवलं. १ मग

**वारा जरी नसला तरी हलत रहा, धारा जरी नसल्या तरी भिजत रहा, जीवनाचा ध्यास घेऊन भूमीमध्ये रुजत रहा.**

त्या दिवशी यश लौकर बाहेर पडला आणि रस्त्यावरून रमतगमत भटकत राहिला. कितीतरी दिवस तो गावाबाहेर फिरायला आलाच नव्हता शाळेच्या सहलीलाही आईनं पाठवलं नव्हतं. नाचत-बागडत यश जवळच्या टेकडीवर चढला. शंकराच्या देवळात गेला. खालून रेल्वेच्या रूळावरून एक गाडी जात होती. ती बघून त्याला गंमत वाटली. मग फिरतफिरत तो नदीकाठी



आला व पाण्यात पाय टाकून बसला. अचानक समोरच्या रस्त्यावरून त्याला गणिताचे सर जाताना दिसले. तो घाबरलाच. सर चांगलेच रागीट होते आणि शाळा बुडवून तो इथे बसला हे त्यांनी पाहिलं असतं, तर शाळेत आल्यावर चांगलं छडीनच ठोकलं असतं त्याला. सरांकडे आपलं लक्ष नाही असं दाखवून तो थोडी मान फिरवून बसला. पण त्यांनी त्याला पाहिलंच आणि हाक मारली. तो तिथून सरळ उठला आणि त्याने धूऽम ठोकली. मग मात्र कुठे न रेंगाळता तो तडक घरी आला. दोन दिवस अभ्यास न करता शाळा बुडवून घरी असल्याचा खरं तर त्याला कंटाळा आला होता; पण मन मात्र हा कंटाळा मानायला तयारच नव्हतं. ते तर म्हणत होतं, 'बरं झालं- शाळा बुडली, अभ्यास बुडला.'

संध्याकाळी डमी घरी आला. तेव्हा आई चांगलीच रागावली होती. 'शाळा बुडवून कुठं उंडारत होतास दिवसभर? आईनं विचारलं.

'कुठं नाही शाळेत तर होतो!'

'वर आणखी खोटं बोलतोस! तुझ्या देशपांडेसरांनी फोन करुन सांगितलं मला, नदीकाठी भटकत होतास म्हणून!'

डमीच्या लक्षात खरी गोष्ट आली, पण डमी काहीच बोलला नाही. मग आईनं डमीचा कान धरला.आणि पाठीवर एक चांगला रट्टा हाणला.

'बरं झालं सकाळी शाबासकी मिळाली होती ना-' यश मनात म्हणाला,

पण खरं तर आपल्या चुकीनं डमीनं मार खाल्ला याचं त्याला वाईट वाटलं. डमी त्याच्या खोलीत आला, तेव्हा तो चांगलाच रागावलेला दिसला.

'तू भटकत जाऊ नकोस उद्यापासून बाहेर. नाहीतर मी आईला सगळं सांगेन! डमीनं यशला धाक घातला.

'पण मी घरात बसून काय करू?'

'काही कर, आणि तुला घरात करमत नसेल तर तू शाळेत जा, मी घरात बसतो'-डमी म्हणाला.

'वारे वा! मला शाळा नको म्हणून तर तुला आणलंय.'

'मग मुकाट्यानं घरात बैस.'

पुढचे पाच-सहा दिवस यशने कसेबसे घरात काढले; पण मग त्याला तुरुंगात डांबून ठेवल्यासारखं वाटायला लागलं. डमीला शाळेत कसल्यातरी स्पर्धेत पहिला आल्याबद्दल बक्षीस मिळालं. मेघनाच्या वाढदिवसाच्या पार्टीला शाळेतून परस्पर डमीच गेला आणि मुख्य म्हणजे यशला दिवाळीत आईनं नवा आणलेला ड्रेस घालून! शिवाय शाळेच्या गॅदरिंगच्या नाटकासाठी शिवाजीचं काम करायला डमीची निवड सरांनी केली कळलं तेव्हा मात्र यशची झोपच उडाली.घरात एकट्याला करमत नव्हतं, खेळताही येत नव्हतं. सारखी शाळेची-मित्रांची आठवण येत होती. शेवटी न राहवून यशनं दाराला कुलूप लावलं आणि तो तडक शाळेत गेला.

'काय रे? तब्येत बरी आहे का तुझी? सरांनी वर्गाच्या दारातच विचारलं.

'हो बरी आहे की!'

'मग शाळेत का आला नाहीस पाच सहा दिवस?

'तो दुसरा यश येत होता न...'

गुळमुळीत आवाजात यश काहीतरी म्हणाला, त्याचे डोळे बाकावरच्या डमीला शोधत होते; पण डमी काही दिसत नव्हता. यश आपल्या जागी जाऊन बसला आणि हळूच शेजारच्या मल्हारला म्हणाला,

'माझा डमी? कुठे गेला रे?

'तुझा डमी?' मल्हार हसायलाच लागला. 'अरे तुझा डमी असायला तू काय अमिताभ बच्चन आहेस का शाहारूख खान?'


खरंच काय उत्तर देणार होता यश यावर! कारण त्याच्या डमीची गंमत फक्त त्यालाच ठाऊक होती.

••

**अश्विनी धोंगडे**
शरण्य ४७,
स्वेदगंगा सोसायटी
वारजे, पुणे ३



**रंग दिवसाचे बदलत जातात, शेवटी संध्यारंग दिसतो.**
**निसर्गाच्या या रंगपंचमीत चित्र सौख्याचे फुलवितो.**



# आणि मी लेखक झालो!

*मधु मंगेश कर्णिक*

**आणि त्याच वेळी मी मनोमन निश्चय केला.
मला आयुष्यात पुढे कोण व्हायचंय?
डॉक्टर? इंजिनियर? वकील?
यापैकी कोणीच नाही!
मी लेखक होईन!सोपं सरळ,मनाला भिडणारं साहित्य
लिहिण्याचा प्रयत्न करीन.माझ्यापरीनं,माझ्या पद्धतीनं; पण
मी लेखक होईन...आणखी मला कोणीही व्हायचं नाही'
प्रख्यात लेखक मधु मगेंश कर्णिक यांच्या बालपणी असा
कोणता बरं प्रसंग घडला, की ज्यामुळे 'लेखक'होण्याची प्रेरणा
त्यांच्या बालमनाला मिळाली? वाचा त्यांच्या शब्दात ही
हृदयस्पर्शी आठवण!**

**म**ला लेखक म्हणून प्रसिद्धी मिळाल्यानंतरच्या काळात अनेक जणांनी विचारले, ''तुम्ही लेखक कसे झालात? तुम्हाला लेखक कोणी केले? तुमची प्रेरणा कोणती?''

हे प्रश्न मीही अनेकदा स्वत:ला विचारलेले आहेत. खरंच, 'मी लेखक कसा झालो?'

'लेखक व्हावं, असं मला केव्हा आणि का वाटलं?'

हे प्रश्न मनात आले की खूप वर्षांपूर्वीची आठवण होते. त्या आठवणींमध्ये कदाचित माझ्या भावी आयुष्यांतील लेखकांची बीजे रुजलेली असावीत.

कणकवलीच्या हायस्कूलमध्ये मी तेव्हा शिकत होतो. वय तेरा-चौदा वर्षांचं. माझा गाव वरूळ, कणकवलीपासून सहा मैलांवर आहे. हा सहा मैलांचा रस्ता मी आणि माझ्या बहिणींनी (मला सगळ्या बहिणीच होत्या) लहानपणी असंख्यवेळा पायी तुडवलेला. त्या काळात एस्.टी. नव्हती. सर्व्हिस मोटारी असत. सहा आणे भाडे कणकवलीपर्यंत द्यावे लागे. तेवढे पैसे आमच्यापाशी नसल्यामुळे आम्ही चालतच जायचो. पाय दुखत. अंतर तुटता तुटत नसे. मग चाल मंदावू लागे. शाळेत पोहोचेपर्यंत अर्धा-पाऊण तास तरी उशीर होई. हा उशीर टाळण्यासाठी आम्ही खूप धावपळ करायचो. तरीही पाय दुखू लागले म्हणजे चालणे हळूहळू होई.

असाच त्या दिवशी शाळेत उशीरा पोहोचलो होतो. सरांनी डोळे रोखून पाहिलं. माझ्यावर सगळेच सर डोळे वटारीत. उशीरा यायचो हे कारण खरेच होते; पण एरवीसुद्धा कारण नसताना मला शिक्षकांच्या रागाचा धनी व्हावे लागे...कारण मी अभ्यासात फारसा हुशार नव्हतो आणि मराठी भाषा, कविता, चित्रकला, खेळ याशिवाय अन्य विषयामध्ये माझी 'ढ' म्हणण्याएवढी प्रगती होती! मी जेमतेम काठावर पास होई. त्यामुळे आणि माझ्या खोडकर, व्रात्य स्वभावामुळे मी सवंगड्यांमध्ये आवडता असलो तरी शिक्षकांमध्ये नावडता होतो. कुणाही शिक्षकाने माझ्यावर डोळे वटारावे, कुणीही मला टाकून बोलावे. मी होतोच तसा अवगुणी.

म्हणून सहा मैलांचा रस्ता अनवाणी पावलांनी, उन्हातान्हातून चालत शाळेला येताना शाळेला उशीर झाला तर मला क्षमा नव्हती. सर डोळे रोखून पाहणारच. नशीब, मला त्यांनी वर्गाबाहेर उभे करून ठेवले नव्हते.

शेजारी माझ्या बाकावर बसणारा माझा मित्र म्हणाला,

''तू उशीरा आलास म्हणून तुझी नोटीस चुकली. उद्या सानेगुरूजी येणार आहेत. त्याबद्दल नोटीस होती.''

''खरंच?''

''तू त्यांच्याबद्दल सांगत होतास ना?'शामची आई' पुस्तक तुला खूप आवडलेले! ते त्यांनी लिहिलेय ना?''

मित्राच्या बोलण्याकडे माझं लक्षच नव्हतं. मला सारखी रुखरूख लागून

राहिली होती, वेळेवर येतो तर नोटीस ऐकायला मिळाली असती! 'शामची आई' लिहिणारे सानेगुरूजी येणार आहेत? खरंच?

माझा जीव सुपाएवढा झाला. मला इतका आनंद झाला होता की विचारू नका. नुकतेच मी 'शामची आई' हे पुस्तक वाचून काढले होते. मला अभ्यास करायला आवडत नसला तरी गोष्टींची पुस्तकं वाचायला खूप आवडे. त्यात शाळकरू. त्यातही मी खूप पुस्तके वाचलेली होती. आमच्या करूळच्या माळ्यावर माझ्या वडिलांच्या वेळची पुस्तके होती. ती मी अधाशासारखा वाचून त्यांचा फडशा पाडला होता. पण शाळेच्या वाचनालयात मिळालेल्या, 'शामची आई' ची त्यांना सर नव्हती. शामची आई हे पुस्तक मला आवडण्याचे कारण म्हणजे त्यात वर्णन केलेले कोकण. तोपर्यंत मी वाचलेल्या कोणत्याही पुस्तकामध्ये कोकणचे एवढे तपशीलवार आणि सुरेख वर्णन नव्हते. मला वाटे, आमचे हे कोकण किती सुंदर आहे! इथला निसर्ग, समुद्र, डोंगर, रानोमाळ, कुरणे, झरे, पाने, फुले, फळे-आंबे, फणस, काजू, नारळ, पोफळी, सातव, गणपती-होळीसारखे सण, पालख्या, दशावतार, गुरे-वासरे, पाखरे, हे सगळे किती सुंदर, किती प्रेक्षणीय आहे? याचे वर्णन कुठेच का नाही? आणि 'शामची आई' मध्ये मात्र मला सगळे कोकणच नव्याने जणू भेटावे? आणि मी मंत्रमुग्ध झालो. नुसता निसर्ग, गुरे, पक्षी, याने मी मोहून गेलो होतोच. पण 'शामची आई' सुद्धा मला माझ्या आईसारखीच वाटली होती आणि 'शाम' म्हणजे जणू काही मी. साने गुरूजींचा शाम माझ्यासारखा खोडकर, उनाड नव्हता, तो फार हुशार होता, सोशिक होता. त्याला परिस्थितीची जाणीव होती. त्याच्यात नि माझ्यात एक साम्य होते, ते म्हणजे वयाचे, मीसुद्धा शामच्या वयाचा होतो.

'शामची आई' हे पुस्तक मी शाम होऊन वाचले आणि त्यामध्ये गुंतून पडलो. ते पुस्तक लिहिणारे सानेगुरूजी म्हणजेच शाम ना? मग ते आता कसे दिसत असतील? मला त्यांना कधी पाहायला मिळेल? असे सारखे वाटत होते. तोपर्यंत मी एकही लेखक पाहिला नव्हता.

आणि अकस्मात शाळेत नोटीस फिरली, की सानेगुरूजी येणार आहेत! मला अतिशय आनंद झाला. त्यांना पाहण्यासाठी मी अगदी अधीर होऊन गेलो. नोटीस जरी मला चुकली तरी उद्या सानेगुरूजी प्रत्यक्ष पहायला मिळणार, त्यांच्या तोंडून गोष्ट ऐकायला मिळणार, माझे शाळेत लक्ष लागेना. केव्हा एकदा उद्या दिवस उजाडतोय असे मला होऊन गेले.

शाळेत माइणकरसर सांगत होते ते सानेगुरूजीबद्दलच. ते मात्र मी लक्ष देऊन ऐकत होतो. माइणकरसर सांगत होते,

''मुलांनो, सानेगुरूजी आपल्या गावात का येणार आहेत ठाऊक आहे?'' कोणीही 'होय, मला माहीत आहे' असं म्हणेना. अगदी पहिल्या बाकावर बसणारी हुशार मुलेसुद्धा उत्तर देत नव्हती, मग माझ्यासारख्या 'ढ'ला काय सांगता येणार? मी आपला निमूटपणे ऐकत होतो. माइणकरसर सांगत होते-''पंढरपूरचा विठोबा माहीत आहे ना? अस्पृश्यांना त्याच्या पायावर डोके ठेवून नमस्कार करता येत नाही.देवालासुद्धा तेथील बडव्यांनी कैदेत ठेवलेले आहे. त्यांच्या परवानगीशिवाय प्रत्यक्ष विठोबासुद्धा पराधीन होऊन उभा आहे. त्या विठोबाला सर्वांना-हरिजनांनासुद्धा भेटता यावे, यासाठी सानेगुरूजींनी आंदोलन सुरू केले आहे. त्या आंदोलनाचा भाग म्हणून ते गावोगाव दौरा काढून जनजागृती करत आहेत. त्यासाठीच ते कणकवलीला येणार आहेत. इथे देशभक्त आप्पा पटवर्धन-कोकणगांधी राहतात. त्यांना भेटायला ते थांबणार आहेत. त्यांचे भाषण होणार आहे. आपल्याला एक थोर देशभक्त, स्वातंत्र्यसैनिक आणि मोठा लेखक पाहायला, ऐकायला मिळणार आहे.''

मी लक्षपूर्वक ऐकत होतो.उद्या सानेगुरूजी भेटणार... लेखक सानेगुरूजी शामच्या आईचा शाम-सानेगुरूजी!

दुसऱ्या दिवशी आम्ही सगळे विद्यार्थी सानेगुरूजींच्या भाषणासाठी गेलो. गावातील खूप लोक जमले होते. आम्हाला नेहमी दिसणारे दे.भ.आप्पा पटवर्धनही आपल्या हडकुळ्या देहयष्टीने, बारीक काळ्या काड्यांच्या चष्म्यातून पाहात संथपणे हालचाली करीत होते.

मग सानेगुरूजी आले. सगळेजण उठून उभे राहिले. मीही उठलो व डोळ्यांत प्राण आणून त्यांना न्याहाळू लागलो आणि माझी अगदी निराशा झाली. सानेगुरूजी अगदीच साधेसुधे दिसत होते. अंगावर प्रवासाने मळलेले चुरगाळलेले अंगरखा-धोतर डोक्यावर खादीची टोपी, पायात जाडजूड वहाणा

आणि मान खाली घातलेली. मला वाटले होते, 'लेखक कसा राजबिंडा, देखणा असेल आणि सानेगुरूजींही तसेच राजपुत्रासारखे दिसत असतील! पण इथे तर एक सामान्य खेडवळ वाटणारा माणूस! मी हिरमुसलो.

मग सानेगुरूजी खाली बसले. गुडघे मुडपून, एका गुडघ्यावर हात ठेवून ते बसले आणि बोलू लागले. हळूहळू बोलताबोलता त्यांचा स्वर वाढला. पंढपूरच्या मंदिरातील अस्पृश्यांना असलेल्या बंदीबद्दल ते आवेशाने बोलत होते. माझे लक्ष त्यांच्या बोलण्यापेक्षा त्यांच्या चेहऱ्याकडे होते. गुरूजींचे डोळे विलक्षण बोलके होते. जणू ते डोळ्यांनीच बोलत होते. त्यांचे मोठ्या माणसांना उद्देशून केलेले भाषण आटोपल्यावर त्यांनी समोर बसलेल्या विद्यार्थ्यांकडे पाहून म्हटलं, ''बालमित्रांनो! आता मी तुम्हांला एक लहानशी गोष्ट सांगणार आहे. सगळेजण सरसावून ऐकू लागले. मीही. आता गुरूजींचा आवाज बदलला होता. मघाशी आवेशाने, मोठ्या आवाजात बोलणारे गुरूजी शाम होऊन, शामची आई होऊन हळुवारपणे, मृदु स्वरात बोलू लागले, त्यांचे आमच्याकडे पहाणारे डोळे थेट गाईच्या डोळ्यांसारखे मायाळू, वत्सल आणि करूणार्द्र वाटत होते. त्यांच्या त्या डोळ्यांनीच मी विरघळून गेलो व त्यांच्या तोंडचे शब्द असोशीने ऐकू लागलो. 'शामची आई' मधील 'थोर अश्रू' हीच गोष्ट गुरूजी सांगत होते.आंघोळ करून आलेला लहानगा शाम हट्टीपणाने आईला म्हणतो; ''माझे तळवे ओले आहेत. त्यांना माती लागेल. माझे तळवे पूस!'' कशाने पुसू? आईने विचारले. तिच्याजवळ टॉवेल, पंचा नव्हता. तसे शाम म्हणाला,''तुझे ओचे पसर. मी त्याच्यावर पाय ठेवतो व उडी मारून घरात येतो. मग माझ्या तळव्यांना माती लागणार नाही'' शामच्या आईचे त्याच्यावर फार प्रेम होते. तिने त्याचा हट्ट पुरवला. आपले ओचे पसरले. त्यावर पाय ठेवून शाम घरात आला.तेव्हा त्याची आई म्हणाली. ''शाम, पायाला घाण लागू नये म्हणून जपतोस, तसाच मनाला घाण लागू नये म्हणून जप हो! देवाला म्हणावं माझं



शरीर मळलं तरी चालेल, ते मी पुसू शकेन पण मनाला मळ लागू देऊ नकोस. त्यासाठी माझं मन शुद्ध राहू दे-स्वच्छ राहू दे.''

पुस्तकातील ही साधीसुधी गोष्ट गुरूजींनी अशा काही आकर्षकपणे खुलवून सांगितली की आमच्या डोळ्यांत पाणीच उभे राहिले! मला भानच उरले नाही. कुठेतरी मागे बसलेला मी, गोष्ट ऐकण्याच्या नादांत, गुरूजींच्या जवळ सरकू लागलो आणि त्यांची गोष्ट सांगून होताच मी भानावर येऊन पाहिले, तर नकळत मी गुरूजींच्या अगदी पुढ्यात येऊन थडकलो होतो..! आता जवळून गुरूजींनीसुद्धा पाहता येत होते आधाशासारखा मी त्यांना पाहात होतो. तोच गुरूजींनीसुद्धा माझ्याकडे पाहिले. ते मंद हसले. मग माझ्या खांद्याचा आधार घेऊन ते उठले,उठता-उठता त्यांनी हळूच मला विचारले,

''बाळ, तुझं नाव काय?

मी धीर करून उत्तर दिले.

'माझं नावं मधू.'

'मधू! छान नाव आहे.'

एवढे चार शब्द उच्चारून गुरूजींनी पुन्हा मान खाली घातली आणि बरोबरच्या माणसांबरोबर ते चालत-चालत आपल्या मोटारीकडे गेले.

माझ्या मात्र सर्वांगावर मोरपीस फिरत असल्याचा भास मला होत होता. आज मी आयुष्यात प्रथमच 'लेखक-पाहिला होता, तोही माझा आवडता लेखक, त्याने सांगितलेली गोष्ट ऐकली होती.किती साधे,सोपे पण मनाला भिडणारे शब्द. त्या शब्दांमध्ये केवढा ओलावा! अश्रूंची थोरवी सांगतासांगता, डोळ्यांत अश्रू अणणारे गुरूजींचे शब्द आणि त्या गुरूजींनी मला माझं नाव विचारलं, माझ्या खांद्याला स्पर्श केला. माझ्याशी माझा आवडता लेखक बोलला! चार शब्द का होईना, पण गुरूजी माझ्याशी बोलले, त्यांनी मला स्पर्श केला!

त्या रोमांचित अवस्थेतच मी घरी आलो. आई आजारी होती. तिला माझी सारखी काळजी वाटायची.या अभ्यास न करणाऱ्या, खोड्या काढणाऱ्या, गोष्टींची पुस्तके वाचत वेळ घालवणाऱ्या आपल्या पोरक्या मुलाचे पुढे कसे होणार? इतर मुलांना आधाराला असतात, तसे आपल्या मुलाला वडील नाहीत.

माझी आई माझी खूप काळजी करायची. त्यातच तिची खालावलेली प्रकृती.

मी हुरुपाने तिला सानेगुरूजींच्या भेटीबद्दल सांगितलं. तिने नीट ऐकून घेतले. मग विचारले,''तू आज लेखकाला भेटलास? लेखकाने सांगितलेली गोष्ट ऐकलीस? कसली गोष्ट सांगितली सानेगुरूजींनी?''

मी तिला गुरूजींनी सांगितलेली गोष्ट सांगितली.

''मग पुस्तकाला शाम त्यानंतर चांगला वागू लागला, तसा तू वागशील ना? चांगलं वागणं, अभ्यास करणं, आईचं-शिक्षकांचं ऐकणं म्हणजेच मन स्वच्छ ठेवणं.तसं न वागणं म्हणजे मनाला माती लागणं. तुझ्या मनाला शामसारखं वळणं लाव.त्याला मातीचा स्पर्श नको.ती माती कोण पुशील? आईच्या पदरानं ती पुसता येत नाही, बाळ, ती पुसायला आई नसेल!'' बोलता बोलता माझ्या आईला हुंदका फुटला.

...आणि मलाही.मी आईला घट्ट मिठी मारून म्हणालो,''आई, आजपासून मी शामसारखा चांगला वागेन बघ.''

पण माझं चांगलं वागणं पहायला माझी आई फार दिवस राहिली नाही.शामची आई त्याला सोडून गेली, तशीच माझी आईही मला सोडून गेली.

शामच्या आईने, 'शामची आई' पुस्तकाच्या लेखकाने माझ्यामध्ये आमूलाग्र बदल घडवून आणला. माझ्या आईला वचन दिल्याप्रमाणे मी खरोखरच नंतर माझं वागणं सुधारलं. अभ्यासात लक्ष गुंतवलं. त्यानंतरच्या प्रत्येक परीक्षेत उत्तम गुणांनी वरच्या क्रमांकाने उत्तीर्ण होत गेलो.

आणि त्याचवेळी मी मनोमन निश्चय केला-

मला आयुष्यात पुढे कोण व्हायचंय्?

''डॉक्टर? इंजिनियर? वकील?-

यापैकी कोणीही नाही!

मी लेखक होईन!मला लिहायला वाचायला आवडतं.सानेगुरूजी लेखकच होते. त्यांनी माझा संपूर्ण मनोपालट केला. तेवढा मला कुणाचा करता येवो न येवो, पण त्यांच्यासारखं सोपं,सरळ,मनाला भिडणारं साहित्य लिहिण्याचा मी प्रयत्न करीन.माझ्या परीनं,माझ्या पद्धतीनं.पण मी लेखकच होईन! आणखी मला कोणीही व्हायचं नाही.

आणि मी लेखक झालो!

••

**मधु मंगेश कर्णिक**
४०१/एक्स-१८, मार्व्हल,
शास्त्रीनगर, चार बंगला
अंधेरी (प),मुंबई-५८



**प्रात:काळी गगनपुष्प की सूर्याचे फुलले? सुगंध मकरंदांचे रस हे चहूकडे झुकले?**



# भूतकाळाचा आरसा

**प्र. के. घाणेकर**

**माणूस म्हटला, की प्रत्येकाच्या स्वभावानुसार वेगवेगळ्या आवडी-निवडी या आल्याच. प्रत्येकाच्या आवडीप्रमाणे आपले विविध छंदही असतात; अगदी वेगवेगळे पदार्थ खाण्यापासून ते प्राणी पाळण्यापर्यंत विविध देशांचे स्टँप जमविणे हा तर तुम्हा मुलांचा आवडता छंद! खिशात खुळखुळणारी नाणी तर कायम मोहात पडतात. स्टँप प्रमाणेच विविध देशांची वेगवेगळी नाणी असतात. काही खास दिनविशेषांच्या वेळी खास नाणी काढली जातात.नाणी जमविण्याचा थोडासा वेगळा छंद जोपायला तुम्हाला नक्कीच आवडेल नाही? अशा वेगवेगळ्या छंदाशी तुमची ओळख करून देत आहेत, प्र.के.घाणेकर.**


एकदा घरातील आम्ही काहीजणं गप्पा मारीत बसलो होतो, तेव्हा बोलण्यात चवली-पावली-पै असे काही शब्द आले. लहानग्यांना त्यातून काही अर्थबोधच झाला नाही. माझ्या वडिलांनी त्यांच्या कर्त्या काळात नवी नाणी बाजूला काढून एका छोट्या पेटीत ठेवली होती. जुनी असूनही आजही कोरी करकरीत दिसणारी ती नाणी आमच्या घरात आहेत. ती पेटी बाहेर काढून त्यातील नाणी मुलांना दाखविली. ब्रिटीश राजे-राण्यांचे मुखवटे असणारे चांदीचे रुपये, पै-पैसा-ढब्बू-आणा-चवली-पावली-अधेली अशी सगळी नाणी त्यांना दाखविली आणि त्याचा अर्थविनिमयही समजावून सांगितला. माझ्या कळत्या वयात वडिलांचा नाणी जमा करायचा हा नाद मलाही लागला होता. कधी किल्ल्यावर हिंडताना किंवा जुन्या बाजारात चक्कर मारताना मिळालेली नाणी माझ्या संग्रहात भर घालू लागली. अगदी सात वाहन काळापासूनची नाणी माझ्या गाठी जमा आहेत. माझ्या परदेशी जाणाऱ्या मित्रांकडून आणि नातेवाईकांकडून त्या देशामधील लहानमोठ्या नाण्यांची दुनिया माझ्या दप्तरी दाखल झाली आहे.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर स्वतंत्र हिंदुस्थानच्या सरकारने काढलेली पाच रूपये, दहा रुपये, वीस रुपये, पन्नास रुपये, शंभर रुपये अशा भारी किंमतीची नाणी तर सर्वसामान्यांच्या पाहाण्यात सुद्धा आलेली नसतात. अलिकडे तर, एक पैसा, दोन पैसे, तीन पैसे, पाच पैसे, दहा पैसे, वीस पैसे ही नाणी वापरातही राहिलेली नाहीत. अशी नाणी आहेत हेही अनेकांच्या गावी नसते.

सध्या वापरात असणाऱ्या एक रुपया, पन्नास पैसे, पंचवीस पैसे या नाण्यांच्या साताठ तऱ्हा तर आपल्याही पहाण्यात असतात. त्यातील काही क्वचित मिळतात, तर काही नेहमी आढळतात. वेगवेगळ्या छापांची पण एकाच किंमतींची नाणी कशासाठी काढतात? चलन म्हणून वापराव्यतिरिक्त त्यांचे काही उपयोग आहेत; पण ''अति परिचयात् अवज्ञा'' असंच काहीसं झालं आहे.

आपल्या जन्मवर्षाची नोंद असणाऱ्या नाण्यांचा संग्रह आपल्याला कोणी भेट म्हणून दिला किंवा आपण दुसऱ्याला दिला, तर होणारा आनंद वेगळ्याच कोटीतील ठरतो. अशी अभिनव भेट आगळीवेगळी ठरेल हे निश्चित.

स्वतंत्र भारताच्या सरकारने दशमान-शतमान पद्धतीची परिमाणं वापरायचा निर्णय घेतला. १ एप्रिल १९५७ पासून तो अमलात पण आणला. अर्थात त्या आधीच १९४४ मध्ये मिंट मास्टर म्हणजे टाकसाळ-प्रमुखाने अशा दशमान पद्धतीची नाणी काढण्याबद्दल सरकारला सुचवलं होतं; पण तत्कालीन राजकीय अस्थिरतेमुळे सरकारने त्याबद्दल गंभीरपणे विचारच



केला नव्हता. पुढे स्वतंत्र भारताच्या सरकारने नाण्यांवरील ब्रिटिश सत्ताधीशांचे मुखवटे घालवून त्या जागी तीन सिंहांची राजमुद्रा प्रतिष्ठापित केली. नंतर १९५७ मध्ये पै-पैसा-आणा-रुपया ही चलनपद्धत रद्द करून रुपया आणि त्याचा शंभरावा भाग असणारा नया पैसा ही विनिमय पद्धती अमलात आणली. १ एप्रिल १९५७ या दिवसापासून १ नया पैसा, २ नये पैसे, ५ नये पैसे, १० नये पैसे,२५ नये पैसे, ५० नये पैसे अशी नवी नाणी प्रचारात आली. आपल्या देशाच्या इतिहासातील ही एक ऐतिहासिक महत्त्वाची घटना आहे. तिचं स्मरण या दशमानपद्धतीच्या नव्या नाण्यांमुळे होते. स्वातंत्र्याच्या रौप्य-महोत्सवानिमित्त १९७२ मध्ये काढलेली १० रु. आणि पन्नास पैशांची नाणी ही ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाची ठरतात. आता स्वातंत्र्याला पन्नास वर्षे पूर्ण होतानाही नवी नाणी बहुधा काढली जातीलच. नेहरू-गांधी-इंदिरा गांधी-राजीव गांधी-बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमा असणारी नाणी आपल्या अर्वाचीन इतिहासाच्या पाऊलखुणाच मानायला हव्यात.

''अधिक धान्य उगवा'' संदेश देणारं पहिलं वीस रुपयाचं नाणं, ''कुटुंबनियोजन आणि सर्वांसाठी अन्न'' हा संदेश देणारं पहिलं पन्नास रुपयाचं नाणं,'' ''ग्रामीण महिलांची प्रगती''-बाबत संदेश देणारं पहिलं शंभर रुपयांचं नाणं यांनाही महत्त्व आहेच.

छत्रपती श्रीशिवाजी महाराज हे तर राष्ट्राभिमानी आणि स्वातंत्र्यप्रेमी लोकांचं आराध्यदैवतच आहे. या कर्तृत्ववान महामानवानं इतिहासावर तर आपला ठसा उमटवलाच;पण त्याचं नाव असणारी तांब्याची ''शिवराई''आणि सोन्याचा होन''अशीही नाणीही प्रचारात आणली. जाड शिवराया बऱ्याच प्रमाणात उपलब्ध आहेत;पण शिवरायांचे होन अगदी दुर्मिळ आहेत. मुंबईच्या श्री.पावसकरांनी त्या सुवर्णहोनांच्या प्रतिकृती लोकांना अल्प किंमतीत उपलब्ध करून दिल्या आहेत.

ब्रिटिशांच्या काळात काही संस्थानांची स्वत:ची नाणी काढली जात होती. आजमितीस ती दुर्मिळ झाली आहेत; पण अनेक संग्राहकांकडे ती पहायला मिळतात.

जगातील सर्वाधिक किंमतीचं नाणं जहांगीर बादशहानं काढलं होतं.१३ से.मी. हून जाड आणि १२ किलो वजनाचं हे सुवर्णनाणं आहे. १६१३ मध्ये हे नाणं तयार करण्यात आलं. ह्या सोन्याच्या नाण्याचं सोनं म्हणून मुल्य आहेच; पण अतिदुर्मिळ म्हणूनही त्याचं महत्त्व जास्त आहे. १६३९ मध्ये शंभर मोहोर किंमतीचं १ किलो साडेचौऱ्याण्णव ग्रॅम वजनाचं सोन्याचं नाणं शहाजहानने काढलं होतं या दोन्ही नाण्यांना ऐतिहासिक मूल्य तर आहेच; पण 'दुर्मिळता'हा त्यांचा विशेष गुण आहे.

वृत्तपत्रांमधून अनेकदा जुन्या नाण्यांनी भरलेलं मडकं किंवा घागर सापडल्याचं वाचनात येत. मग तज्ज्ञ नाणकशास्त्रज्ञांकडून त्या नाण्यांची तपासणी करतात. ही तांबे-चांदी-सोने धातूंची नाणी नेमकी कोणत्या काळातली ह्याबद्दलचं त्यांचं मत ग्राह्य धरलं जातं.

नाणीअभ्यास आणि नाणीसंग्राहक अशी जुनी दुर्मिळ नाणी मिळवण्यासाठी, त्यांचा अभ्यास करण्यासाठी खूप धडपड करीत असतात.अशा नाण्यांची माहिती देणारे सचित्र संग्रह (कॅटलॉग्ज) प्रसिद्ध केली जातात.

आपल्या डोळस नी चौरस भटकंतीत निरनिराळी संग्रहालये, मुंबई- कलकत्ता येथील टाकसाळी, खाजगी नाणी संग्राहक आणि अभ्यासक याच्या मदतीने आपल्याला नाण्यांमधून अधिक माहिती मिळवता येते. नाण्यांचा अभ्यास अनेक दृष्टिकोनांतून करता येतो. नाणी तयार करण्यासाठी वापरलेले धातू-मिश्रधातू व त्यातील धातूंच्या प्रमाणांची अचूकता यांतून मिळणारी तत्कालीन धातुविद्येतील प्रगतीची अन् समृध्दीची माहिती हा एक पैलू झाला. नाण्यांवर लिहिलेला मजकूर-त्यातील लिपी-आकडे यांमधून पुराभिलेख-विद्येच्या दृष्टिकोनांतून बरीच माहिती मिळवता येते. नाण्यांवर उल्लेख केलेले राजे-राजवंश आणि त्याचे कालोल्लेख यांमुळे इतिहासातील निखळलेले दुवे मिळवून सलग इतिहास उभा करता येतो. नाण्यावर कोरलेले प्राणी, वनस्पती, भौमितिक आकृती यांचे संदर्भही महत्त्वाचे ठरतात. काही दुर्मिळ प्राण्यांच्या आकृत्या नाण्यांवर अंकित केलेल्या दिसतात. त्यातून त्या देशाच्या जैववैविध्याची माहिती मिळू शकते. असंख्य भाषा आणि लिप्या यांचा परिचय नाण्यांच्या अभ्यासावरून होतो. देशांच्या नावात झालेले बदल साम्राज्यांतर्गत असणाऱ्या वसाहती यांचाही बोध नाण्यांच्या अभ्यासावरून होतो. आधुनिक काळाप्रमाणेच पूर्वीही नाण्यांच्या वजनात अचूकता होती. कमी-अधिक किंमतीच्या नाण्यांत

चांदी-सोन्यासारखे धातू वापरताना त्यांचे विनिमयमूल्य आणि धातूची किंमत यांची सांगड कशी घातली जात असे याचाही अभ्यास नावीन्यपूर्ण ठरतो.

राष्ट्राच्या किंवा राजाच्या संदर्भात घडणाऱ्या अतिमहत्त्वाच्या ऐतिहासिक घटनांच्या नोंदी अनेकदा नाण्यांमुळे कळतात.

नाण्यांना तीन बाजू असतात.हे विधान कदाचित चुकीचं वाटेल;पण नाण्यांच्या दोन बाजूंप्रमाणे त्या नाण्याची कड ही तिसरी बाजूच असते.त्यावर असणाऱ्या उभ्या बारीक रेषा आणि एक जगप्रसिद्ध शास्त्रज्ञ यांचा संबध समाजाच्या उपयोजिता या अंगावर प्रकाश टाकतो. क्रिकेटच्या खेळात डाव सुरू करण्यापूर्वी केली जाणारी नाणेफेक अनेकदा महत्त्वाची ठरते. विविध प्रकारच्या कालगणनांची उकल नाण्यांवर कोरलेल्या कालोल्लेखांवरून होऊ शकते. नाण्यांवर असलेली चिन्हे आणि आकृत्या यांवरून धार्मिक आणि सामाजिक परंपरांचे ज्ञान होते. टांकसाळी असणारी ठिकाणे आणि त्यांची चिन्हे हा देखील अभ्यासाचा विषय आहे. नाण्यांचा ओबडधोबडपणा जाऊन वाढत गेलेली सुबकता-प्रमाणबद्धता आणि अचूकता यांचा कला व शास्त्र यांच्याशी असणारा संबंध आपल्याला वेगळ्याच विश्वात घेऊन जातो.

त्यामुळे 'भूतकाळाचा आरसा' असं नाण्यांना म्हणतात. ते काही खोटे नाही. भाषाविज्ञानात व्याकरण आणि नाण्यांवरून आलेल्या म्हणी हा एक आनंददायी अभ्यासाचा विषय ठरू शकतो.

नाणीसंग्रह करणे हा जरी थोडा खर्चिक छंद असला,तरी त्याचे बहुआयामित्व लक्षात घेतले,तर ज्ञानाची उघडी खिडकी हे स्वरूप विसरून चालणार नाही.

नाशिकजवळची अंजनेरी येथील नाणाशास्त्र विषयाचा सांगोपाग अभ्यास करणारी संस्था आपण केव्हातरी जाऊन पहायला हवी. जमलं तर त्यांचा अल्प मुदतीचा अभ्यासक्रमही पुरा करायला हवा.

भारतीय नाण्यांचा साग्रसंगीत सचित्र परिचय करून देणारं ''इंडियन कॉईन्स''हे श्री.दीपक चक्रवर्ती यांचं कलकत्याहून प्रकाशित झालेलं उत्कृष्ट-सचित्र पुस्तक आपल्या संग्रही ठेवलं तर किमान भारतीय नाण्यांपुरतं आपलं ज्ञान वाढेल. त्या पुस्तकाप्रमाणे सगळी भारतीय नाणी गोळा करण्यासाठी प्रेरणा मिळेल. अशा नाण्यांचा संग्रह करून एक छांदिष्ट म्हणून तुम्हाला नाव मिळवता येईल. एक चांगला ज्ञानदायी छंद तुमच्या आयुष्यात बऱ्याच नव्या गोष्टींची सुरूवात करून देईल.

●●

**प्र.के.घाणेकर**
१०५ नारायण पेठ,पुणे ३०

## छात्र प्रबोधनसंबंधी थोरांचे अभिप्राय

■ *छात्र प्रबोधनचा अंक नियमितपणे येत असतो. गणितापासून इतिहासापर्यंत सर्व विषय छात्र प्रबोधन समर्थपणे हाताळते. जीवनविकासाच्या सर्व छटा सामावून घेण्याचा मासिकाचा सतत प्रयत्न असतो. या प्रयत्नाच्या सातत्याचे खरे महत्व आहे मुलामुलींच्या गुणविकासात पोषक असं लिखाण मनोरंजक पद्धतीने छात्र प्रबोधनमध्ये लिहिले जाते. याबद्दल मासिकाशी संबंधित सर्वांचे मी मन:पूर्वक अभिनंदन करतो. अशा प्रयत्नातून गुणविकासाच्या यशाची वेगळी मोजपट्टी नसते. ती असूही नये. प्रयत्नाचे सातत्य व तीव्रता या निकषावर छात्र प्रबोधन मोठे काम करीत आहे असं आम्हां दोघांनाही वाटतं. मासिकाला आम्ही दीर्घ आयुष्य व चढत्या कमानीचे यश चिंतितो.*

**डॉ.वसंत गोवारीकर**
कुलगुरू, पुणे विद्यापीठ

*छात्र प्रबोधनचा प्रत्येक अंक दर्जेदार असतो. वाचकांच्या वयोगटाचे भान ठेवून ज्ञान रंजन इतकेच नव्हे तर संस्कार रुजविण्याची गरज लक्षात घेऊन अंकातील लेखन विषयांची व लेखकांची निवड केली जाते. याशिवाय विविध सदरे, कविता व गीते यांचा दर्जाही वाखाणण्यासारखा आहे. विविध क्षेत्रातील वैशिष्ट्यपूर्ण कार्य केलेल्या व्यक्तींचा परिचय किशोर वयातील मुलामुलींना नक्कीच प्रेरक व मार्गदर्शक ठरतो. शिबिरासंबंधीच्या सूचना-वृत्त आपल्या संपादन कौशल्या-बरोबरच संघटना कौशल्याची साक्ष देतात. नावाला साजेसा छात्र प्रबोधनचा प्रत्येक अंक आल्याबरोबर हातात घ्यावासा व पूर्ण वाचून काढावा असे वाटते. छात्र प्रबोधनच्या पुढील वाटचालीस माझ्या मन:पूर्वक शुभकामना!*

**वि. वि. चिपळूणकर**
माजी शिक्षण संचालक

*मने विकसित होत असलेल्या मुलांचे मनावर संस्कार करण्याच्या दृष्टीने सर्वच अंक चांगले असतात व मजकूर योजनाबद्ध पद्धतीने संपादन केला आहे असे जाणवते. विशेष दिनांना अनुरूप आवर्जून लेख असतो हे फार चांगले आहे. उत्कृष्ट प्रयास आहे. तो तसाच चालू ठेवावा व मुलांवर संस्कार व्हावेत ही इच्छा.*

**न्या. बा. न. देशमुख**
निवृत्त मुख्य न्यायाधीश

*अंक चांगला निघतो.*

**कवी कुसुमाग्रज**

# तीन रूपककथा!

**मल्हार अरणकल्ले**

***कधीकधी छोट्या कथा कमी शब्दात खूप काही बोलून जातात. प्रसंग असतात रोजच्या अनुभवातले-पण सांगून जातात काही शाश्वत सत्य. अशाच तीन रूपककथा तुमच्यासाठी सादर केल्या आहेत, मल्हार अरणकल्ले यांनी! कथा वाचा आणि जाणून घ्या त्यात दडलेला अर्थ!***

## हट्ट




अंधार असतो ना अंधार, तर त्याचा एक मुलगा होता. छोटा, गोंडस आणि हो, चौकस मात्र भयंकरच.

त्याला आकर्षण होतं ते प्रकाशाचं. त्यानं वडिलांकडे हट्ट धरला. ''मला प्रकाश दाखवा,मला प्रकाश दाखवा.''

सुरूवातीला लहान मूल म्हणून अंधारानं दुर्लक्ष केलं; पण मुलाचा हट्ट जाईना.

वडील त्याची परोपरीनं समजूत घालत; पण छे! मुलगा काही ऐकेना.

होताहोता बरेच दिवस निघून गेले. मुलगा प्रौढ झाला. वडील एके दिवशी देवाघरी गेले.

मुलांचा मुलगा चालू-बोलू लागला.त्यानंही हट्ट धरला. तोच. प्रकाशाचा.


हा मुलगा हसला. त्यानंही आपल्या वडिलांचाच कित्ता गिरवला. आधी दुर्लक्ष, मग समजूत....वगैरे

कालचक्र फिरलं.

आधीचा मुलगा थकला त्याचा मुलगा प्रौढ झाला. त्यालाही मुलगा झाला. पुन्हा त्याचा हट्ट तोच... प्रकाशाचा...

काही शोध असंच चकवीत राहतात. तरी त्यांचा शोध मात्र संपत नाही!

## गुळाचा खडा



एक होती मुंगी. एका घराच्या अंगणातून ती चालली होती. वारूळ जवळच आलं होतं म्हणून झपझप पाय उचलत होती.

जाताजाता तिला एक गुळाचा खडा सापडला. तिनं जोर लावून तो उचलायचा प्रयत्न केला; पण गुळाचा खडा काही जागचा हलेना.

काय बरं करावं?

खडा तिथंच टाकून ती वारुळाकडे निघाली. वाटेत तिला दुसरी मुंगी भेटली. काही क्षण दोघी एकमेकींशी भिडल्या आणि लगबगीनं गुळाच्या खड्याकडे आल्या. तो खडा दोघींनी उचलायचा प्रयत्न केला; पण छे! तो काही हलेनाच.

एक-एक करतकरत त्या गुळाच्या खड्याभोवती कितीतरी मुंग्या जमल्या. साऱ्या सर्व शक्तीनिशी खडा ओढू लागल्या. त्या जिंकल्या. खडा पुढे सरकू लागला.


हळूहळू त्यांचा प्रवास वारुळाच्या दिशेनं सुरू झाला. खडा ओढून नेताना कुणीही दमल्या नाहीत. कंटाळल्या नाहीत. कुणी कामात कुचराई केली नाही.

झाडावरच्या एका कावळयानं गुळाचा खडा पहिला. त्याच्या तोंडाला पायी सुटलं. तो झपकन खाली झेपावला अन् क्षणात खडा उचलून उंच उडला.

मुंग्या सैरभैर झाल्या. भांबावल्या.

कावळे आहेत तोपर्यंत ते झडप घालून गुळाचे खडे उचलणारच, हे आपणही ध्यानात घेतलं तर!

## उपरती



एक होता दगड. आपल्या जगण्याचा त्याला खूप कंटाळा आला



**अजून उराशी धरली मी आस, मजला प्रकाश दिसणार,**
**काळोख आहे मागे पुढे दाट, परी त्यातूनही मार्ग काढणार.**

होता. त्याला वाटे, कसलं हे आपलं जिणं? काय रंग, काय आकार...कसलं रूप म्हणून नाही.

हे बदलायला तर हवंच!

काय करावं बरं?

विचार करताकरता त्याला एक कल्पना सुचली. त्यानं ठरवलं की, आपण देवाची भक्ती करू. कडक व्रत करू. मग देव प्रसन्न होईल नि आपल्याला म्हणेल, ''वत्सा, मी तुझ्या भक्तीवर खूश आहे. माग, काय हवं ते माग!''

दगडानं केवळ असं स्वप्नरंजनच नाही केलं. त्यानं खरोखरीच देवाची आराधना सुरू केली. वर्षामागून वर्ष उलटली. दगडाची तपश्चर्या फळाला आली. एके दिवशी देव दगडावर प्रसन्न झाला.

म्हणाला, ''वत्सा, मी तुझ्यावर खूश आहे. माग, काय हवं ते माग!''

दगड गडबडला. थोडासा घाबरलाही. हे असं कधी सत्यात येईल हे काही त्याच्या स्वप्नातही नव्हतं.

स्वत:ला सावरून, देवाला म्हणाला, ''हे प्रभो, मला माझ्या जिण्याचा अगदी वीट आलाय बुवा.मला दगड म्हणून जगणं नको आता. माझं आयुष्य बदलून टाका!''

देव म्हणाला, ''तुला कोण व्हायचं आहे?''

''फूल. छानसं, नाजुकसं, रंगेबेरंगी फूल.''

''का रे बाबा? फुलात आहे तरी काय एवढं?''

''काय आहे? अहो देवा, काय नाही फुलात?''

''फूल कसं प्रसन्न दिसतं सगळ्यांना हवंहवंसं वाटतं. त्याला रंग आहे, गंध आहे, कुणीही चटकन त्याच्याकडे आकर्षित होतं. मला हे असलंच फूल व्हायचंय!''

''नको रे, हा तुझा भ्रम आहे तू आहेस तोच बरा आहेस!''

–पण दगडाला काही ते पटेना. तो हट्ट काही सोडेना.

मग देवानं दगडाची समजूत घालायचं ठरवलं. तो म्हणाला, ''अरे,तू केवढा भक्कम आहेस. तुझा काळसर रंग पक्का आहे. तू जगाचा मूलाधार आहेस? माझ्याकडे तर बघ. काय दिसतं? तुझं रूप दिसतं ना! हो, अरे मीही दगडच की. आता लोक देव मानतात ते सोड; पण मी दगडच! तुला वाटतं, ते फूल माझ्या सेवेसाठी असतं बरं का! त्यांचा काय उपयोग? फुलाचं फूलपण पाहतापाहताच त्याचं निर्माल्य होतं. दगडांचं तसं कुठे असतं? त्यांना वार्धक्यच नाही. दगडाचं निर्माल्य होत नाही कधी. तू आहेस ना, तसाच चांगला आहेस. तुझं रूप नीट पाहा. मग बघ ते बदलायचं की कसं!''

दगडाची छाती फुगली. त्यानं हट्ट सोडून दिला.

दगडासारखीच उपरती साऱ्यांना कधी बरं होणार?


••

**मल्हार अरणकल्ले**
गुरूजन सोसायटी,शास्त्रीनगर,
कोथरूड,पुणे २९.

## शोधा म्हणजे सापडेल!

खालील चित्रामध्ये चार चुका आहेत. त्या तुम्ही शोधून काढा.





# चांदोबा चांदोबा भागलास तर?

**लहानपणी ज्या चांदोबाशी आपलं मामाचं नातं जडलेलं असतं असा हा चंद्र जर खरंच लिंबोणीच्या झाडामागे लपला तर... ही केवळ कविकल्पना नाही बरं! चंद्र नसला तर... एका खगोलशास्त्राच्या अभ्यासकाला या कल्पनेत कोणत्या शक्यता दिसतात हे जाणून घ्यायचंय? डॉ. प्रकाश तुपे आपल्यासमोर उभं करतायत, एक मनोरंजक तरीही शास्त्रावर आधारित शब्दचित्र!**

**डॉ.प्रकाश तुपे**

***चांदोबा चांदोबा भागलास का?***
***लिंबोणीच्या झाडामागे लपलास का?***

एखादे दिवशी खरोखरच चांदोबा आपल्या आकाशातून निघून गेला तर? फक्त लहान मुले, कवी आणि चंद्रोदयावर नजर ठेवून धार्मिक विधी पार पाडणाऱ्या लोकांना वाईट वाटेल काय? एकविसाव्या शतकात जाताना चंद्राचा आपल्याला काहीच उपयोग नाही, असे देखील काहींना वाटत असेल. मात्र सर्वसामान्यांना चंद्राशिवाय जीवन ही कल्पना भयानक वाटेल. निळेशार आकाश चंद्रबिंबाशिवाय सुनेसुने वाटेल. ग्रहणांचा आविष्कार आपल्याला कधीच पहावयास मिळणार नाही. आपल्या वाचून आश्चर्य वाटेल की, पृथ्वीवरचे आपले अस्तित्व चंद्रामुळेच शक्य झाले आहे. चंद्र नसता तर आज मानवजात पृथ्वीवर जन्मच घेऊ शकली नसती.

चंद्राचा पृथ्वीवर स्पष्टपणे दिसू शकणारा परिणाम म्हणजे समुद्राची भरती ओहोटी. समुद्रकिनारी राहणाऱ्यांना दर १२ तास २५ मिनिटांनी येणारी भरती चांगलीच परिचयाची असते. चंद्र त्याच्यासमोरील पृथ्वीच्या भागाला/समुद्राला गुरुत्वाकर्षणाने खेचतो. त्यामुळे चंद्राजवळचा पृथ्वीचा/समुद्राचा भाग ओढला जाऊन समुद्राला मोठी भरती येते. चंद्रच नाहीसा झाला तर मोठ्या भरती-ओहोटीचे चक्र थांबेल. सूर्य काही प्रमाणात छोटी भरती आणू शकतो, मात्र ही भरती चंद्राच्या भरतीपेक्षा निम्म्याहून छोटी असेल. भरती-ओहोटीच्या नाहीसे होण्याचा परिणाम समुद्रकिनारी असलेल्या सजीव सृष्टीवर होईल. तेथे निर्माण झालेली जलचर सृष्टी नाहीशी होईल. समुद्रकिनाऱ्यावरच्या दलदलीवर अवलंबून असलेले कीटक, प्राणी व पक्षी यांचे जीवन धोक्यात येईल.

भरती-ओहोटीचा एक अदृश्य व मोठा परिणाम म्हणजे समुद्राच्या पाण्याचे पृथ्वीशी होणारे घर्षण. या घर्षणामुळे पृथ्वी स्वत:भोवती ज्या विशिष्ट वेगाने फिरत आहे त्या वेगाला अडथळा निर्माण होतो. या अडथळ्यामुळे पृथ्वीचा वेग मंदावत आहे. पृथ्वीचा वेग दर शंभर वर्षांनी दोन लक्षांश सेकंदानी कमी होत आहे. चंद्राच्या जन्मापासूनचा काळ ध्यानात घेतल्यास त्या काळी पृथ्वीचा स्वत:भोवती फिरण्याचा काळ आजच्यापेक्षा निम्म्याने कमी असला पाहिजे.पृथ्वीची स्वांगपरिभ्रमणाची वेळ कमी होण्याने चंद्राचे पृथ्वीभोवती फिरणे जास्त वेगाने होत राहून चंद्र पृथ्वीपासून दूर जात आहे. जर चंद्र आकाशात नसता तर पृथ्वीचा स्वांगपरिभ्रमणाचा काळ अतिशय मंद गतीने कमी झाला असता, म्हणजेच बऱ्याच मोठ्या कालखंडात पृथ्वीवर छोट्या दिवस-रात्रीचे चक्र चालू राहिले असते. यामुळे कदाचित पृथ्वीवर वेगळ्याच प्रकारची सृष्टी अवतरली असती. आत्ता आपल्या भोवतालची सृष्टी बारा

तासांची दिवस रात्र सहन करू शकणारी सृष्टी आहे. तिला छोटा दिवस व छोटी रात्र मानवू शकणार नाही. कदाचित पुरातनकाळी पृथ्वीवर असलेल्या डायनोसॉर्सना छोट्या दिवस-रात्रीची सवय असावी. कालांतराने दिवस- रात्र मोठी होत गेल्याने त्यांना बदलत्त्या वातावरणाशी तोंड न देता आल्याने ते नामशेष झाले असावेत. चंद्र जर नसता तर कदाचित आजदेखील पृथ्वीवर डायनोसॉर्सचे राज्य राहिले असते! अशा परिस्थितीत मानव पृथ्वीवर जन्म घेऊ शकला नसता. म्हणजेच चंद्रामुळे पृथ्वीवर मानवजातीचा जन्म होऊ शकला, हे ध्यानात घेतले पाहिजे.

पृथ्वीच्या स्वत:भोवताच्या फिरण्याने वारे वाहतात. वाऱ्याची गती व दिशा या परिभ्रमणावर अवलंबून आहेत. हा वेग कमी जास्त झाला तर वाऱ्यांची दिशा व वेग बदलू शकतो. गुरू ग्रहावर अतिशय वेगाने वाहणारे वारे असून, तेथे उठलेली वादळे कित्येक वर्षे राहू शकतात. या प्रकारचे वातावरण पृथ्वीवर निर्माण झाले असते, तर सजीव पृथ्वीवर निर्माणच होऊ शकले नसते.


आपण चंद्राकडे दुर्बिणीतून किंवा बायनॉक्युलरमधून कधी पाहिले का? चंद्रावर भरपूर विवरे दिसतात. पृथ्वीवरून चंद्राचा आपणास न दिसणारा भाग अवकाशयात्रींनी पाहिला. त्यावर देखील प्रचंड विवरे आहेत. चंद्रावर कोसळलेल्या असंख्य दगड, धोंडे व अशनींमुळे ही विवरे निर्माण झालेली आहेत. चंद्र आकाशात नसता तर हे दगड, धोंडे पृथ्वीवर कोसळले असते. या अशनींनी पृथ्वीवर महाभयानक स्फोट व उत्पात घडवून आणला असता. साडेसहा कोटी वर्षापूर्वी पृथ्वीवर पडलेल्या अशनींमुळे डायनोसॉर्सचे पृथ्वीवरून उच्चाटन झाले व त्यामुळे उत्क्रांतीमुळे मानव पृथ्वीवर अवतरला असे शास्त्रज्ञांना वाटते. चंद्रच आकाशात नसता तर पृथ्वीवर या प्रकारचे अनेक प्रलयकारी स्फोट झाले असते व उत्क्रांतीला मोठी खीळ बसली असती. कदाचित यामुळे पृथ्वीवर वेगळ्याच प्रकारची जीवसृष्टी निर्माण झाली असती. थोडक्यात चंद्राने आत्तापर्यंत आपले अशनीपासून संरक्षण केल्याने आपण पृथ्वीवर जन्म घेऊ शकलो.

चंद्र नसल्याच्या सर्वात महाभयानक परिणामाचा आता आपण विचार करू. त्यासाठी चंद्राच्या जन्माविषयीच्या एका सिद्धांताची माहिती घेऊ या. या सिद्धांताला 'बिग स्प्लॅश' नावाने ओळखले जाते. चंद्राचा जन्म एका प्रचंड धडकेमुळे झाला असावा असे मत काही शास्त्रज्ञांनी मांडले. त्यांच्या मते साडेचार अब्ज वर्षांपूर्वी ग्रहमाला तयार होत होती. अनेक मोठमोठे दगड, धोंडे तप्तावस्थेत असताना एकत्र येऊन ग्रह जन्म घेत होते. या काळात पृथ्वीवर मंगळाच्या आकाराचा धोंडा आदळला. पृथ्वीचे कवच जे नुकतेच तयार होत होते, ते फुटले व खडकांचा द्रवरूपी प्रचंड भाग आकाशात फेकला गेला. याच भागातून कालांतराने चंद्राचा जन्म झाला. या धडकेचा पृथ्वीवर देखील फार मोठा परिणाम झाला.पृथ्वीच्या फिरण्याचा वेग व तिची कक्षा या महाभयानक धडकेने नक्कीच बदलवून टाकली असली पाहिजे. पृथ्वीचा वेग, कक्षा तिचे दिवस-रात्रीचे चक्र ठरवितो.

थोडक्यात, सजीवांना पोषक असे दिवस-रात्रीचे चक्र या महाधडकेने निर्माण केले असावे. या धडकेमुळे झालेल्या स्फोटात पृथ्वीवरच्या वातावरणात देखील मोठा बदल झाला असावा. कदाचित स्फोटापूर्वी पृथ्वीवर शुक्राप्रमाणे कर्बद्विप्राणिलवायू,नत्रवायू व पाण्याची वाफ यांचे घट्ट आवरण असावे. स्फोटामुळे वातावरणात बदल होऊन ते सजीवांना पोषक झाले असावे.थोडक्यात चंद्राच्या जन्माच्या वेळी पृथ्वीवर झालेला महास्फोट सजीवांना पोषक ठरला व उत्क्रांतीद्वारे पृथ्वीवर मानव अवतरला.

याप्रकारे चंद्राशी आपले एक अतूट नाते आहे. त्यामुळेच आपल्याप्रमाणेच पृथ्वीवरील सर्व जातीजमातींमधे चंद्राला अनन्यसाधारण महत्त्व दिले गेले आहे. कालगणनेच्या पद्धतीमुळे मानवी जीवनात चंद्राने आपल्याशी मोठी जवळीक साधलेली आहे. म्हणूनच आपण 'चंद्राशिवाय पृथ्वी' असा विचारच मनात आणू शकत नाही. लिंबोणीच्या झाडामागे लपलेल्या चंद्राला लगेच बाहेर येण्यास आपण सांगतो. कारण हा आपला जीवनाश्यक साथी आहे


**डॉ.प्रकाश तुपे**
८४१ सदाशिव पेठ, पुणे ३०



# मुका मन्दार

शैलजा राजे

**थोड्याच कालावधीत मुक्याने शारदाबाईचा विश्वास संपादन केला. इतका की,शारदाबाई स्वत:ची कचेरी साफसफाईसाठी निर्धास्तणे मुक्याच्या स्वाधीन करीत. मुक्याही मन लावून ते काम करी. तो कधीकधी दार लावून झाडलोट करी.तरी त्याच्याबद्दल कुणालाही संशय आला नव्हता.तो टेबलावरच्या फायली, कागदपत्रे बघत असे.मुक्याला यातून काय मिळवायचं होतं? कोण होता मुक्या?**



**एक** दिवस एक माणूस त्या अनाथ मुलाला आश्रमात घेऊन आला. त्या मुलाचे सारे कपडे मातीनं भरलेले होते. अंगावर दोन चार जखमाही दिसत होत्या. तेरा-चौदा वर्षाचा तो मुलगा कावराबावरा दिसत होता. डोळ्यात भीती मावत नव्हती. आश्रमात व्यवस्थापिका शारदाबाई त्याच्याजवळ आल्या, त्याच्या पाठीवरून हात फिरवीत त्यांनी विचारलं, ''बाळ तुझं नाव काय?''

त्याचा चेहरा निर्विकार होता. त्याला तो प्रश्न ऐकूही आला नव्हता की कळलाही नव्हता.तो नुसताच शारदाबाईच्याकडे पाहात उभा होता. भीतीनं तो थरथरत होता.

त्यांनी त्या मुलाला आणणाऱ्या माणसाला विचारलं, ''हा मुका आहे का? त्याचं नाव-गाव काय?''

तो माणूस हात जोडून म्हणाला, ''मला काहीच माहीत नाही मॅडम! हा रस्त्याच्या कडेला पडला होता.मला त्याची दया आली.मी त्याला प्यायला पाणी दिलं,थोडं खायला दिलं. तसंच नाव-गाव विचारलं पण त्याला काहीच कळत नाही हे लक्षात आलं न् मग इथं घेऊन आलो. आपली ही शाळा पंचक्रोशीत मशहूर आहे. गोरगरीब मुलांमुलींना आपण इथे ठेवून घेता, त्यांना मदत करता हे मीही ऐकून होतो,म्हणून याला इथे घेऊन आलोय. मला जाऊद्या आता. मी इथून बराच दूर राहातो. रात्र झाली म्हणजे मला नीटसं दिसतही नाही मॅडम!''

शारदाबाईंनी एकदा त्या मुलाकडे पाहिलं. बिचारा अगदीच केविलवाणा दिसत होता. हा मुलगा निरूपद्रवी आहे हे त्यांच्या ध्यांनी आलं. 'तुला मी मुक्या या नावाने हाक मारीन', असे म्हणून त्यांनी त्या माणसाला जायची परवानगी दिली. तो मुलगा भयभीत होऊन त्या माणसाच्या पाठीकडे पाहात होता.

मुक्या त्या आश्रमात राहिला. हा



दव मौक्तिक हे चमचमती ह्या पर्ण शिंप्यात, स्वच्छंदाने विहरति मासे लाटांवरि डौलात.

मुका-बहिरा काय काम करणार? शारदाबाईंनी त्याला कोठीवर पाठवलं. खाणाखुणा करून कसंबसं त्याचं काम त्याला समजावून दिलं. तिथं कोणी चोरी करायला आलं तर त्यानं घंटा वाजवायची.त्याच्या हातात त्यांनी घंटा दिली, ती कशी वाजवायची हे सांगितलं. मुक्या ते काम करायला उभा राहिला. रोज सकाळी पहाटे पाचला उठायचं, थंड पाण्यानं आंघोळ करायची पातळ, जवळजवळ बिनसाखरेचाच चहा शिळ्या भाकरीबरोबर प्यायचा आणि कामाला उभं राहायचं.

मुक्या पाहात होता. कोठीच्या खोलीत साखरेची पोती होती. रोज सकाळी पावाची गाडी येत होती; पण मुलांचा नाश्ता मात्र तो पातळ चहा नि शिळी भाकरी हाच असायचा.

मुक्या आश्रमात येऊन चार-पाच दिवस झाले होते. एक दिवस एक सरकारी अधिकारी शाळा तपासणीसाठी आले. पहाटे सहा-साडेसहाच वाजले होते. ते स्नानगृहात गेले. दोन मुलं गरमगरम पाण्यानं आंघोळ करीत होती. चांगला सुवासिक साबू अंगाला लावत होती. त्या दिवशी मुलांना चांगला दुधाचा चहा न् लोणी लावलेला पाव नाश्त्याला होता. अधिकारी मुक्याजवळ आले. शारदाबाईंनी त्यांची सारी हकिकत त्यांना कळवळून सांगितली-अगदी डोळ्यात पाणी आणून!

अधिकारी मुक्याजवळ आले, त्याच्या पाठीसरून, डोक्यावरून त्यांनी हात फिरविला.मुक्याचा हात त्यांनी हातात घेतला.त्याच्याबद्दल सहानुभूती व्यक्त करून व सगळी शाळा तपासून अधिकारी बाहेर पडले. शारदाबाई पटापटा कोठीकडे आल्या,उरलेले पाव त्यांनी पोत्यांत भरले, नेहमीची दोन माणसं उभीच होती. आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीनं त्यांनी ती पोती त्या माणसाच्या हवाली केली, हिशोब करून पैसे घेतले; आता मुक्याही थोडा रूळला होता,त्यानेही पोती न्यायला मदत केली. मुका-बहिरा असलेला मुक्या थोडा तिथंच घुटमळला तरी त्याचं कुणाला काहीच वाटलं नाही. त्याला यातलं काहीच कळणार नव्हतं. त्याच्यापासून कोणालाच धोका नव्हता.

मुक्या पहात होता, साखरेची पोती, गव्हाची पोती, तांदूळाची पोती शाळेसाठी सरकारकडलन येत होती. शारदाबाई स्वत:त्याची नोंद करीत होत्या, मुलांना काय द्यायचं, किती द्यायचं? कसं द्यायचं? हे सारं त्या स्वत: ठरवीत होत्या. अनाथ दुबळ्या मुलांच्या कनवाळू म्हणून त्यांची किर्ती सर्वदूर पसरली होती. मोठमोठे लोक येत होते, शारदाबाईचं गुणगान गात बाहेर पडत होते; शारदाबाईचं आगत-स्वागत, आदरातिथ्य याची नेहमीच भलावण होत होती. शारदाबाई निर्धास्त होत्या.

ते अधिकारी येऊन गेले. अन् शारदाबाई आपल्या नेहमीच्या उद्योगाला लागल्या. रोजचा दिनक्रम सुरू झाला. आता अधूनमधून शारदाबाई मुक्याला आपलं ऑफिस झाडायला सांगत. हा मुका-बहिरा, एक अक्षरही लिहिता वाचता न येणारा मुलगा! याच्यापासून कसालाच धोका नव्हता. मंदारला झाडायला सांगून त्या खुशाल आपल्या जवळच असलेल्या घरी जाऊन आराम करीत. शाळेतल्या दोन-चार मुलींना घरचं काम करायला लावीत. एखादी शिक्षिका त्या पाचपन्नास मुलामुलींना काहीतरी शिकवी, एखादा धडा लिहायला बसवून आपण आपलं भरतकाम नाहीतर विणकाम करण्यात दंग होई. कोण लिहितंय, का काही दुसरचं करतयं इकडे तिचं लक्षही नसायचं. आश्रमशाळेची ही अवस्था होती.

मुक्या शारदाबाईची ती कचेरी मन लावून साफ करी. सगळे कागद, फायली नीट लावून ठेवी. मुक्यानं साफसफाई केली की, सारं काही लखलखीत दिसायचं. शारदाबाई मुक्याच्या कामावर खूष होत्या. कधीकधी मुक्या दार लावून सारी झाडझूड करी, पण शारदाबाईंना त्याबद्दल काहीही चिंता वाटत नव्हती.

त्याच्याबद्दल कुणालाही कसलाही संशय आला नव्हता, येत नव्हता. मधल्या काळात दोन चार वेळा सरकारी अधिकारी येऊन गेले होते. शारदाबाईंनी त्यांची सरबराई केली होती. इतकी की नवीन आलेला अधिकारी म्हणे ''बाई परवाच्या साहेबांनी एवढी काही इथल्या एकूण पाहुणचाराची स्तुती केली की, अखेर न राहवून या वेळी साहेबांच्याकडे मी इथं येण्याची परवानगी मागितली''.

येणाऱ्या प्रत्येकाला मुक्याबद्दल अतिशय कणव वाटायची. ते त्याला जवळ घ्यायचे, 'बिचारा! कसं होणार हो याचं?'

''मी त्याला जन्मभर इथंच ठेवून घेणार आहे.'' बाई गहिवरल्या आवाजात बोलत.

अलीकडे अधिकारी वरचेवर तपासणीला येतात हे शारदाबाईंच्या ध्यानी येत होतं; २पण त्याबद्दल त्यांना

चिंता नव्हती. उलट त्या खूष होत्या, कारण येणारा प्रत्येक अधिकारी चांगले शेरे तर देत होताच; पण सरकारी मदत वाढवीत होता. शारदाबाईच्या एकूण नफ्यात वाढच होत होती. त्या बिनधास्त होत्या.

त्या दिवशी शाळेचं दैनंदिन जीवन सुरू झालं होतं हवेत थंडीचा थोडा गारवा अधिक जाणवत होता. थंडीनं कुडकुडतच सात-आठ मुलं हौदावर गारगार पाण्यानं आंघोळ करीत होती. कपड्याच्या साबूची एक वडी सारे अंगाला लावत होते. अंगावरच्या चड्डयांवरूनच साबू फिरवत होते.म्हणजे एकाच वेळी अंगाला आणि कपड्याला साबू लावला जातो अशी त्यांना शिकवण होती. आतल्या चुलीवर चहाचं पातळ पाणी उकळत होतं. एका परातीत शिळ्या भाकरीचे चतकोर ढिगांत ठेवले होते.सकाळच्या या काळ्या चहाबरोबर मुलांना दोन-दोन, तीन-तीन चतकोर मिळत होते.त्यावर मग फक्त भात आणि तळाशी डाळीचं अस्तित्व असलेलं वरण मिळायचं-तेही दुपारी दोनच्या सुमारास.

त्या मोठ्या लांबलचक खोलीत काही मुलं हातात भाकरीचे चतकोर घेऊन चहाची वाट पहात बसली होती. मोठ्या वयाच्या मुली चहा करीत होत्या. कुठलीच शिक्षिका किंवा पर्यवेक्षिका हजर नव्हती. शारदाबाई आपल्या घरात ढाराढूर झोपल्या होत्या. सात वाजून गेले होते आणि अचानक चार सरकारी अधिकारी आश्रमात शिरले. फाटकाशी पहाऱ्याला असणारा वॉचमन जागेवर नव्हताच.बहुधा तो कुठंतरी झोपला असावा.

सारे अधिकारी थेट हात



आले,त्यांनी उकळत असलेलं चहाचं भांडं आणि ते भाकरीचे तुकडे ताब्यात घेतले. सारी मुलं भीतीनं गांगरली होती. काहींनी हौदावरची मुलं आत आणली आणि एका सरकारी शिपायानं शारदाबाईच्या दारावरची बेल दाबली. बाई आतूनच खेकसल्या, 'कोण आहे? एवढ्या सकाळीच तडफडताय कशाला? मी येईन थोड्या वेळानं! उगाच त्रास देऊ नका कुणी'

''बाई, साहेब आले आहेत!''

''कोण साहेब? त्यांना म्हणावं दुपारी या!''

बाईना वाटतं होतं, गावातलंच कुणी आलंय! पण पुन्हा बेल वाजली, न् एक करडी, कडकडीत हाक ऐकू आली. बाई थोड्या धास्तावतच उठल्या.साडी सारखी करून त्यांनी दार उघडलं.समोर मोठे साहेब उभे होते. बाईंची जीभ टाळ्यालाच चिकटली.त्यांनी कसाबसा धीर गोळा केला आणि चाचरत विचारलं, ''साहेब आपण? असे अचानक? आणि यावेळी?''

''मुद्दाम आलो. म्हटलं, आपण शाळेचं एकूण काम किती करता हे प्रत्यक्ष पहावं!

''प-प-पण साहेब-''बाईंना काय बोलावं कळत नव्हतं.

भेदरलेल्या, घाबरलेल्या बाईंना घेऊन साहेब बाहेर आले. बाहेरच्या मधल्या मैदानात, बाईंची रोजची गिऱ्हाइकंही उभी होती-खाली मानेनं. मुलं हातात चहा आणि भाकरीचे चतकोर घेऊन बसली होती.त्या डोळ्यांत कुतुहल मावत नव्हतं. मुक्याही त्यांच्यात होताच,पण तो आज भेदरलेला, बावळट दिसत नव्हता. उलट तो ताठ उभा होता; आपल्याजवळ उभ्या असलेल्या मुलांशी काहीतरी बोलत होता. हसत होता. म्हणजे तो मुका-बहिरा नव्हता.

शारदाबाई आश्चर्याने मुक्याकडे बघतच राहिल्या. दोन क्षणातच सारा प्रकार त्यांच्या लक्षात आला. मुक्या आल्यापासून तर अधिकाऱ्यांच्या भेटी वाढल्या होत्या आणि या एवढ्याशा पोरामुळे आज आपले बिंग फुटले, याचा संताप अनावर होऊन त्या मुक्याला मारायला धावल्या. मात्र त्यांना मधेच अडवून साहेब जोरात म्हणाले, ''मॅडम, जरा धीरानं. आम्ही समोर असूनही तुम्ही त्याच्यावर हात उगारताय? आणि तो कोण आहे हे कळल्यावर तुम्ही काय कराल? आपल्या मिलिंद जोशी साहेबांचा तो मुलगा आहे. मंदार नाव त्याचं! शाळेच्या नाटकात त्याची मुक्याची भूमिका पाहूनच आम्हाला हे सुचलं. तुमच्या आश्रमाविषयी आम्ही बरंच काही ऐकून होतो;पण मला पुरावा मिळत नव्हता. तो मिळविण्यासाठी ह्या पोराच्या मदतीने आम्ही एक योजना



सोन्यापरि हा दिवस चालला तासातासाने घात आपुला कराल आपण उशिरा उठण्याने

आखली. मंदार आणि आम्ही मिळून एक सांकेतिक भाषा ठरवून घेतली. त्याच्या वडिलांनी त्याला विश्वासात घेऊन काय काम करायचं ते समजावून सांगितले. त्याच्या शाळेतील मुख्याध्यापक व शिक्षिकांनीही, नंतर अभ्यास भरून काढण्याच्या अटीवर परवानगी दिली. आणि एका मोठ्या गुन्ह्याचा शोध लागला.मंदार,आता काम कसं केलंस ते तू सांग.'' मंदार सांगू लागला, ''शारदाबाईंचा-मॅडमचा विश्वास संपादन केल्यामुळे त्यांच्या खोलीची साफसफाई मीच करायचो. मी दार लावून झाडलोट केली, तरी कुणाचेच माझ्यावर लक्ष नसायचे. त्यामुळे मी फायली उघडायचो, त्यातला नोंदी वाचायचो. त्यामुळे मॅडमचे दोन प्रकारचे हिशेब मला ठाऊक होते.आमच्या सांकेतिक भाषेत मी ते सर्व उतरून घ्यायचो. कारण मी अशिक्षित आहे असे वाटून, सर्व फायली, इतर कागदपत्रे मॅडमच्या टेबलावरच पडलेली असतं. आमच्या योजनेप्रमाणे सरकारी अधिकारी आले की, मी मुका म्हणून ते मला जवळ घेत. त्यांनी हात हातात घेतले की मी त्यांच्या हातात नोंद केलेले सारे कागद देत होतो.''

हे सर्व ऐकल्यावर आपण मंदारला, मुक्याला, दया म्हणून ठेवून घेतले आणि त्यानेच आपल्याला पकडून दिले म्हटल्यावर शारदाबाई मंदारकडे खाऊ की गिळू अशा नजरेने बघत होत्या.

आणि मग भराभर साऱ्या हालचाली सुरू झाल्या. मुलांच्या तक्रारी, फाईलीतल्या खऱ्या-खोट्या नोंदी, गावातले बाईंचे सारे सहकारी यांची तिथल्या तिथं चौकशी सुरू झाली. त्यांचा जबाब घेण्यात आला आणि शारदाबाई आणि त्यांचे या साऱ्या दुष्कृत्यातले सर्व मदतनीस यांना ताब्यात घेण्यात आले;

हे सारं मंदारच्या मदतीनंच घडलं होतं. मंदारचं एकजात सर्वांनीच कौतुक केलं. स्वत: मुख्यमंत्र्यांनी मंदाराची भरपूर मनापासून स्तुती केली. त्याच्या सर्व शिक्षकांनी आणि मित्रांनी त्याला बुडालेल्या अभ्यासात मदत करण्याचं आश्वासन दिलं. त्यामुळे मंदार एकदम खूष होता-आनंदात होता.

पण त्याला सर्वात आनंद झाला, तो आईनं त्याला जवळ घेऊन त्याच्या तोंडावरून हात फिरवला आणि या जगाच्या दृष्टीनं मोठा झालेल्या मंदारचा, 'माझं बाळ ते' असं म्हणून मुका घेतला न् कळवळून आई म्हणाली,''पोर सुकलं माझं या तीन-साडेतीन महिन्यांत! किती वाळलाय तो!''

आईचे हे बोल ऐकले न् तिच्या मुक्यानं काहीसा लाजलेला मंदार तिच्या कुशीतच शिरला.


••


**शैलजा राजे**
सी/२१, सुंदर नगरी
३०८ सोमवार पेठ पुणे १

# 'गुप्त निधी' कलश

**साहित्य :** एक आरसा, एक पारदर्शक काच, दोन चित्रे एक चौकोनी बॉक्स,अर्धी गोटी/मणी.

पुठ्याचा एक चौकोनी बॉक्स घ्या. तयार नसेल तर तयार करा. या बॉक्सला एकूण सहा चौरस बाजू आहेत.आकृतीत दाखविल्याप्रमाणे 'डक' व यर' या दोन कडांना आरशाच्या दोन कडा चिकटवा व त्याचा परिवर्तन करणारा पृष्ठभाग 'डकवल' या पृष्ठभागाच्या दिशेने ठेवा. यडव, रकल आणि □ कडवल वरती नक्षी वा चित्र असलेला कागद चिकटवा. □ यरलव च्या ठिकाणी पारदर्शक काच बसवा. आरशाच्या बरोबर मध्यावर एक मणी अथवा गोटी अर्धी करून चिटकवा. आता □ यरबअ च्या मध्यावर एक रूपयाचे नाणे जाईल एवढी खाच पाडा. आपल्याला मिळालेले खाऊचे पैसे त्यामध्ये साठवा. पैसे सोडल्याबरोबर गुप्त होतील. समोरच्या पारदर्शक काचेतून पैसे बाहेर पडताना दिसणार नाहीत. आता हा बॉक्स बाहेरून सजवा आणि दाखवा आपल्या अनेक मित्र मैत्रिणीला!





# हे मैत्र जीवाचे!

डॉ. आनंद नाडकर्णी

**मित्रांनो,तुमच्या वयात जगातलं सगळ्यात सुंदर नातं वाटत असतं ते 'मैत्री'च! पण त्या नात्याचं सौंदर्य, हळुवारपणा, विशुद्धता ह्या गोष्टी अजाणतेपणी जपल्या जातात तर कधी जाणतेपणाने जपायला लागतात. डॉ आनंद नाडकर्णी हे एक नामवंत मानसोपचारतज्ञ. ते तुमच्याशी करीत आहेत, तुमच्या 'मैत्री' या जिव्हाळ्याच्या विषयाबद्दल–**

लॉरेल-हार्डीचे चित्रपट न बघितलेली मंडळी आपल्यामध्ये खूप कमी असतील. या जाड्या-रड्याचे चित्रपट पहाताना मीही खूप हसायचो..आताही हसतो.त्यांच्या चित्रपटातील तुफान विनोदी प्रसंगांची ते म्हणे कधी 'प्रॅक्टीस' करायचे नाहीत. शूटींग सुरू झाले, की लॉरेल एखादी क्रिया उत्स्फूर्तपणे करायचा...आणि गंमत म्हणजे कोणतीही पूर्वसूचना नसताना हार्डी त्याला अनुरूप प्रतिक्रिया द्यायचा. याला इंग्रजीत म्हणतात 'रिपोर्ट'आणि आपण म्हणतो, वेव्हलेग्न्थ जुळणे किंवा एकच चॅनेल लागणे...हे नात्यांमधले एक अजब रसायन असते. ते जिथे जमते तिथे मैत्रीचे रोप फुलते.

माझ्या कॉलेजात काही मित्रांबरोबर आम्ही मैत्रीचा रौप्यमहोत्सव साजरा करीत आहोत. आमच्या पंचवीस वर्षांच्या छान मैत्रीचे रहस्य काय असावे, असा मी जेव्हा विचार करतो,तेव्हा पहिला जाणवतो तो हा सूर मिळविण्याचा भाग. रविशंकर आणि अल्लारखाँ यांना तुम्ही मैफलीमध्ये समेवर येताना पहा किंवा ...सचिन आणि विनोद एकत्र खेळत असताना (लवकरच परत येवो हा योग) त्यांचे ' रनिंग बिट्विन द विकेटस्'पाहा..पेस भूपतीच्या जोडगोळीचा खेळ पाहा..सलीम जावेदचे यशस्वी सिनेमे आठवा....त्या सगळयांमध्ये ही सूर गवसण्याची,एकमेकांच्या प्रतिसादांचे, अनाहूत आकलन होण्याची प्रक्रिया आहे.

पण फक्त एवढे असणे म्हणजे मैत्री नव्हे...ही निव्वळ मैत्रीची सुरूवात आहे. शाळेतल्या मुलांची शिबिरे घेताना मी त्यांना 'ओळख' आणि 'मैत्री'असे दोन शब्द देऊन त्यातले फरक विचारतो.बहुसंख्य मुले पटकन् सांगतात... ओळखीचे रूपांतर मैत्रीमध्ये व्हायचे असेल तर विश्वास हवा...पण मैत्रीतला हा विश्वास म्हणजे नेमके काय?...

मला जे काही बोलायचे असेल, अगदी मनातले, ते बोलताना मला त्या विशिष्ट व्यक्तीबरोबर खूप सुरक्षित आणि उबदार वाटलं पाहिजे हा त्या विश्वासाचा एक भाग आणि अशीच भावना त्या व्यक्तीचीही आहे असे तिच्या वागण्यातून जाणवले की, मग विश्वासाचे चक्र पूर्ण होते.

अडचणीच्या वेळी मदत करणाच्या गुणाला मी मैत्रीमध्ये फार वरचा क्रमांक देत नाही.कारण निव्वळ सहानुभूती, दया अशा भावनेतूनही अशा तऱ्हेच्या वागण्याचा जन्म होतो. Friend in need is friend indeed हे वाक्य मला 'नियम'म्हणून पटत नाही मित्राने मला मदत केलीच पाहिजे असा माझा अट्टाहास नसावा आणि निव्वळ मदत करण्यासाठी त्याने स्वत:चा विवेक बाजूला न ठेवला तर मला आवडेल. उदाहरणार्थ, परीक्षेत कॉपी करायला मला मदत करणारा मित्र हा माझ्या मैत्रीच्या व्याख्येत बसत नाही.

कधीकधी,''क्या यार...दोस्तीके

खातिर इतना भी नही करेगा क्या!'' असे चक्क 'ब्लॅकमेल' करणारे भेटतात. खऱ्या मैत्रीतल्या मदतीत उत्स्फूर्तता असते. असल्या अटींची जाचकता नसते आणि मैत्रीमध्ये केलेली मदत ही परतफेडीच्या अपेक्षेने केलेली नसते. आपल्याला ज्या क्षणी त्या मित्राला/मैत्रिणीला मदत केल्याचे समाधान मिळते त्या समाधानाबरोबरच 'मी मदत केली आहे' हा विचार अंगाबाहेर काढून टाकायचा असतो.

अनेक वेळा आपण 'ओळखीचे' आणि 'मित्र' यातला फरक विसरतो आणि त्यामुळे निव्वळ 'ओळखीच्या' व्यक्तीकडून 'मैत्री'ची अपेक्षा करतो. मैत्री पारखून घ्यायची असेल तर त्यासाठी खूप काळ जावा लागतो, असे मला वाटत नाही. कधीकधी, मैत्रीच्या पहिल्या पर्वामध्येच इतकी उत्कटता असते की, ती पारखली जाते.

मात्र, वर्षानुवर्षे टिकणारी मैत्री, गडद होत जाते ही गोष्ट खरी आणि सर्व मानवी नात्यांच्या उत्कटतेमध्येही चढउतार असतात. एखादा मित्र किंवा मैत्रीण स्वीकारताना त्याचबरोबर त्या उत्कटतेचे चढउतारही स्वीकारले पाहिजेत. तसेच मैत्रीतली उत्कटता टिकविण्यासाठी त्या पद्धतीच्या कृतीची आवश्यकता असते. ही नेमकी कशी आणि किती वेळा व्हावी? याचे मात्र काही गणित नाही.

बरे, सहवासाने मैत्री वाढते हे खरे असले, तरी सहवास हा मैत्रीचा पाया असतो, असे पण म्हणता येणार नाही. प्रौढ जीवनामध्ये, मित्र-मैत्रिणी आपल्या व्यापांमध्ये अडकतात आणि सहवास कमी होतो.पण मैत्रीचे नाते कमजोर होतेच असे नाही.... वर्ष दोन वर्षांनंतर भेटूनही तुम्ही त्या मित्र मैत्रिणींशी काल आज भेटल्यासारख्या गप्पा करायला सुरूवात करता तेव्हा जाणवते की, रोजच्या सहवासात असलेल्या अनेकांशी आपण इतक्या मोकळेपणी कुठे बोलतो?

हा मैत्रीचा सहवास दोन्ही व्यक्तींना खूप फ्रेश करणारा असतो. प्रत्येकवेळी असा अनुभव येईलच अशी मानसिक मागणी ते दोघेही मित्र करीत नाहीत. माझा एक डॉक्टरमित्र मला वर्ष सहा महिन्यांनंतर भेटतो. पण तरीही आमच्या मैत्रीची उत्कटता काही कमी झाली नाही.

याचे एक कारण असे असते की,दोन्ही मित्रांना एकमेकांच्या क्षमतेबद्दल आदर किंवा अभिमान असतो. मला माझ्या गुणांबद्दल इतरांशी बोलायला व लिहायला आवडते. त्यांच्या गुणवर्णनातून मला समाधान मिळते. खरे मित्र या अर्थाने आपल्या 'आत्मप्रतिमे'चाच भाग बनतात..मध्यंतरी, 'डॉक्टर्स ऑफ महाराष्ट्र' म्हणून एक पुस्तक प्रसिद्ध झाले. महाराष्ट्रातल्या, विविध क्षेत्रांतल्या कर्तृत्ववान स्त्रियांचा तो छायाचित्रात्मक आलेख आहे. माझ्या तीन अगदी जवळच्या मैत्रिणींना त्यांत गौरवपूर्वक स्थान देण्यात आले होते. व्यसनमुक्ती-क्षेत्रांतील डॉ. अनिता अवचट, वैद्यकीय संशोधक व आरोग्य कार्यकर्त्या डॉ. राणी बंग आणि 'मुलगी झाली हो' लिहिणाऱ्या ज्योति म्हापसेकर... आपल्या मित्रमैत्रिणींना सन्मान मिळतात तेव्हा त्यांच्या कर्तृत्वाच्या वाटेवर आपण अगदी जवळून तो प्रवास अनुभवणारे निरीक्षक होतो ही भावनाही सुखावणारी असते.

गुजराथीमध्ये एक म्हण आहे 'ओळखाण जेवी खाण नथी'....इथे 'ओळखाण' हा शब्द 'मैत्री'या अर्थाने घ्यायचा. तर मैत्री ही खरेच एक खाण आहे. मित्रांच्या गुणांमधून आपण खूप काही शिकतो. भाषण कसे करावे याबद्दलच्या माझ्या कल्पना अनेक वर्षे फार 'पारंपरिक' होत्या. वक्तृत्वामध्ये भाषेच्या चमत्कृती, शब्दांची आतषबाजी आणि आरोह-अवरोहाचे चढउतार जवळजवळ नाटकीपणाने आणणारे 'टाळ्याखाऊ' वक्तृत्व मला प्रभावी वाटायचे.

माझ्या एका मित्राला अनेकवेळा भाषण देताना पाहून, त्याच्याशी बोलून मला कळायला लागलं की 'वक्ता' होण्यापेक्षा 'संवादक' होणे जास्त महत्त्वाचे आहे. कलाकुसर महत्वाची नाही तर जे सांगायचे त्यामागची कळकळ महत्त्वाची आहे. पारंपरिक वक्तृत्वगुण नसतानाही या मित्राचा संवाद प्रभावी का होतो? याचे कोडे मला उलगडले.गेल्या दोन-तीन वर्षांमध्ये माझ्या व्यासपीठावरच्या संवादशैलीत, जडावाचे अलंकार नसतात, ओघाने येणाऱ्या काही सजावटीच्या गोष्टी आल्या तर येतात. हे सर्व मैत्रीनेच शिकवले की नाही!

आपल्या भावनांची कसोटी पाहणाऱ्या प्रसंगी, मैत्रीच्या नात्याचा आधार अतिशय मोलाचा असतो. त्यात आधार तर असतोच; पण कळकळीचा सल्लाही असतो. तरीही त्या सल्ल्यामध्ये 'लादलेपण'नसते. मी 'अपसेट' झालो की नेहमी माझ्या काही मित्रमैत्रिणींकडे वळतो. आपल्या आयुष्यात जे काही भलेबुरे घडते ते एखाद्या व्यक्तीशी 'शेअर' करावेसे वाटते. या भागाला मैत्रीमध्ये फार महत्त्वाचे अंग मानतो मी... यामध्ये मित्राने सल्ला द्यायलाच हवा असेसुद्धा अपेक्षित नसते. आपण नुसते त्याच्याशी बोलतो आहोत, ही भावनाही आपल्याला खूप आधार देणारी असते.

म्हणूनच की काय, माणसाच्या साऱ्या उत्क्रांतिमय प्रवासामध्ये 'मैत्री'

नावाचे नाते मला अतिशय मूलभूत वाटते.कुटुंब, समाज, राष्ट्र,विश्व अशा पातळ्यांवर हे नाते व्यापून राहिले आहे...'भूतां परस्परे जडो मैत्र जीवाचे...' ही कल्पना 'मैत्री' चेच विशाल विकसित स्वरूप दाखविते.

त्यामुळे मैत्रीचे नाते जगातल्या इतर कोणत्याही....अक्षरश: कोणत्याही नात्यांमध्ये असू शकते. पतिपत्नी, पालक-मुले, सहकारी, गुरू-शिष्य, प्रियकर प्रेयसी...तुम्ही नाती आठवा म्हणजे तुम्हाला जाणवेल की, या साऱ्या यशस्वी व स्थायी स्वरूपाच्या नात्यांचा आधार 'मैत्री'हाच आहे. माझ्या ओळखीच्या पन्नाशीच्या बाई त्यांच्या यजमानांना, 'दोस्त, अशी हाक मारतात...आणि मग दोघे खळखळून हसतात. एकमेकांमध्ये सूर जुळलेले-पति-पत्नी कालांतराने म्हणे एकदुसऱ्यांसारखे दिसायला लागतात, त्यामागे मैत्रीच असावी.... नाते जेव्हा पिकते, मधुर होते, रसाळ होते, त्या साऱ्याला पक्व करणारी गाढी मैत्रीच असते.

म्हणजे मैत्रीला तसे म्हणाल तर नात्याचे बंधन नाही... वयाचेही नाही... माझे स्वत:चे अनेक मित्र-मैत्रिणी विशीपासून साठीपर्यंतच्या वयाचे आहेत. माझे एक डॉक्टर गुरू आहेत. काही दिवसांपूर्वी ते माझ्या घरी आले. खूप दिवसांनंतर आम्ही चार-पाच तास गप्पा मारल्या, जेवलो, मेडिकल कॉलेज सोडून तर खूप वर्षे झाली...हे सर परत गेल्यावर विचार करत होतो, खूप दिवसांनी गप्पांची मैफल रंगल्यावर इतकं छान आणि हलकं का वाटतंय?... मग जाणवले, हे सर माझे पहिल्यापासूनच जवळचे 'मित्र'आहेत.

'मित्र' आणि 'मैत्रीण' असाही फरक मैत्रीत नसतो,एक खरं की...'मित्र'व 'मैत्रीण'ही दोन्ही नाती त्यांच्यात्यांच्या तऱ्हेने 'एकमेव-अद्वितीय' आहेत... सारखी असूनही त्यांच्यात काही गुणात्मक (Qualitative) फरक आहे. मैत्रीचे नाते नीट कळायचे आणि निभावायचे असेल, तर 'मित्र' व 'मैत्रीण' यातही समतोल हवा.

माझी एक मैत्रीण माझ्याबद्दल खूप 'पझेसीव्ह' आहे; पण हा हक्क जास्त झाला तर मैत्री गुदमरते...'जास्त'आणि 'कमी'ची व्याख्या अर्थात त्या मैत्रीतल्या दोघांनीच ठरवायची.

मैत्रीचे नाते हे जगण्यासाठीचे मूलभूत इंधन आहे याचे आणखी एक कारण सापडते...आपली जर आपल्याशी मैत्री असेल तरच आपण अर्थपूर्ण आयुष्य जगू शकतो. बाहेरची परिस्थिती कितीही खडतर असली, तरी आपली ही मैत्री भक्कम असेल- म्हणजेच स्वत:च्या विचारांशी आणि भावनांशी आपण प्रामाणिक असलो- तर खडतर परिस्थितीलाही तोंड देता येते...नेल्सन मंडेलांचे एक चरित्र आहे,'लाँग वॉक टू फ्रीडम' या शीर्षकाचे वर्षानुवर्ष बंदिवासात राहिल्यानंतरही मंडेला स्वत:चे मनोभान टिकवू शकले. त्यामधला फार मोठा वाटा होता त्यांच्या स्वत:शीच असलेल्या मैत्रीचा...त्यांची ही मैत्री त्या सक्तीच्या, कंटाळवाण्या एकांतवासामुळे तुटावी अशीच अपेक्षा तत्कालीन राज्यकर्त्यांची होती; पण स्वमैत्रीच्या बळावर मंडेला त्यातून बाहेर पडू शकले...तेव्हा या विशाल जगामध्ये आपल्याला किमान एक मित्र तरी असतो आणि तो म्हणजे आपणच...त्याला साद घातली की,एकटेपणा असला तरी एकाकीपणा येत नाही...जगताना कधीही श्वासाचे ओझे होत नाही...माझ्या आयुष्याबद्दल, भविष्याबद्दल मी आशावादी आहे असा जेव्हा मी मन:पूर्वक विचार करतो, तेव्हा माझ्या या मित्राने तात्काळ 'तथास्तु'म्हटलेले असते.

...तर तुम्हा-आम्हा सर्वांची सर्व पातळ्यांवरची मैत्री सतत फुलती-फुलवती राहावी अशी इच्छा व्यक्त करून मीच म्हणतो 'तथास्तु!'

••

**डॉ.आनंद नाडकर्णी**
शिवनेरी नर्सिंग होम, वंदना
सिनेमामागे, ठाणे (प.)

### विरोधी आघाडी

रस्त्यात बरीच गर्दी जमली होती.एक कुंभार गाढवाला काहीतरी शिकवीत होता. लोक उत्सुकतेने पाहत होते. कुंभार गाढवाला मानेने होकार व नकार देण्यास शिकवीत होता. गाढव होकार चटकन देत होते. पण नकाराची मान हलविणे त्याला काही जमत नव्हते.

सर्व परिस्थिती पाहून एक गृहस्थ गाढवाजवळ गेले. त्याच्या कानात काहीतरी पुटपुटले आणि काय आश्चर्य! गाढवाने तत्काळ नकार दिला.

कुंभाराने खूष होऊन त्या गृहस्थाला एकशे एक रुपयाचे बक्षीस जाहीर केले. फक्त बक्षीस स्वीकारण्यापूर्वी गाढवाच्या कानात त्यांनी काय सांगितलं? तेवढं जाहीर करण्याची विनंती केली.


आढेवेढे घेत ते गृहस्थ म्हणाले, ''मी गाढवाला एवढंच विचारलं की सर्व विरोधी पक्षांची एक आघाडी स्थापन झाली तर तो त्या आघाडीच्या वतीने नेतेपद व पंतप्रधानपद स्वीकारील का?''



**आला नव वर्षाचा हा दिन नव्या युगाचा, नव्या जगाचा, नव्या खुल्या आशांचा.**

# जुन्यातून नवे- उपयोग चिंध्यांचा

**विद्या नारळकर**



आपल्या घरी कोणी शिवणकाम करीत असेल तर आपल्याला वेगवेगळ्या रंगांचे, चित्राचे आणि नक्षीचे तुकडे घरातच मिळतात. नाहीतर आपण वापरून जुने झालेले कपडे किंवा त्याच्यातील चांगला भाग वापरात आणून आपण अनेक चांगल्या गोष्टी बनवू शकतो.

**पुठ्ठ्याची फाईल किंवा फोल्डर**

**साहित्य–** जुन्या रजिस्टरचे किंवा वहीचे पुठ्ठे, कापडाच्या चिंध्या, लोकर, मणी, आणि चिकटविण्यासाठी फेव्हीकॉल व रंगीत कागद.

**कृती–** रजिस्टरच्या आकाराप्रमाणे आपल्याकडे असलेल्या चिंध्यांचे मोठ्यात मोठे तुकडे आधी निवडावे. खूप मोठे तुकडे नसल्यास छोटे तुकडे शेजारी शेजारी ठेवून रंगसंगतीचा विचार करून मग तुकडे चिकटवण्यास सुरूवात करावी. पुठ्ठ्याच्या बाहेरील बाजूने आधी चिकटकाम पूर्ण करून घ्यावे. चिंध्या चिकटवताना शक्यतो कडा दुमडून घ्याव्यात म्हणजे धागे निघत नाहीत.वरील बाजू पूर्ण झाल्यानंतर आतील बाजूने दुमडलेल्या चिंध्या झाकल्या जातील हे बघून रंगीत कागद लावावा. त्यानंतर आपल्याकडे ज्या रंगाची लोकर असेल ती वापरून, त्याचे तीन पदर करून वेणी घालून गोफ तयार करावा व त्याला एक मणी गुंफून घेऊन तो गोफ फाईलला मध्यभागी बांधावा (चित्रात दाखवल्याप्रमाणे)

आपल्या मित्र–मैत्रीणींना भेट देण्यासाठी करता येईल.

••

---

# गंमत रंगमंचीय खेळांची, बुद्धीला आव्हान देण्याची!

**प्रा. देवदत्त पाठक**

आपण यापूर्वीच्या लेखातून रंगमंचीय खेळ म्हणजे काय? हे समजून घेतले– ते तुम्हाला नक्कीच आवडले असतील.

आता रंगमंचीय खेळांसाठी सर्वात महत्त्वाच्या तीन गोष्टी म्हणजे उत्साही, ताजंतवानं मन, कल्पक– प्रगल्भ बुद्धी आणि कार्यक्षम शरीर. मन म्हटलं की भावना आल्या. बुद्धी म्हणजे विचार आणि शरीराच्या साहाय्याने हालचाल किंवा कृती करणं या सर्व गोष्टी जास्तीत जास्त अचूक आणि सहजसुंदर व्हायला मदत व्हावी, अगदी आपल्या दैनंदिन जीवनातसुद्धा, म्हणून या रंगमंचीय खेळांची आवश्यकता आहे.

कोणीतीही गोष्ट परिपूर्ण होण्यासाठी सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे ''मनाची एकाग्रता'' किंवा पूर्ण लक्ष असणे. म्हणजे समजा, आपण घरी अभ्यास करीत असलो आणि आत आई बटाटेवडे तळत असेल, तर गरज अभ्यासाची असेल तरी मन मात्र बटाटेवड्याकडे असतं. यावेळी नीट अभ्यास करता यावा किंवा एकाच वेळी घरातले आणि बाहेरचे वेगवेगळे आवाज, शेजारी T.V. वर चाललेली रंगतदार मॅच, गप्पा या सर्वांतूनही जर चांगला अभ्यास करायचा असेल तर मन एकाग्र असणं गरजेचं आहे.

पहिला खेळ मनाच्या एकाग्रतेशीच संबंधित आहे;याचं नावही गमतीशीर आहे. ''कुत्र्या मांजराचा खेळ'' किंवा "Cat Dog Game" हा खेळ खूप जणांनी मिळून खेळता येतो. सर्वांनी एका वर्तुळात बसायचं. एकजण leader असेल.

त्यानं आपल्या शेजारी बसलेल्या एका बाजूला "Cat" हा शब्द सांगायचा. शेजारी बसलेल्या मुलानं त्याच्या शेजारच्या मुलाला हा शब्द pass करायचा. हा शब्द वर्तुळात Pass करायचा. हे चालू असतानाच leader नं "Dog" हा शब्द शेजारी सांगायचा.

मग एकाच वेळी हे दोन्ही शब्द फिरत असताना, दिशा बदलून व "cat" व "Dog" हे शब्दच दुसऱ्या दिशेनं, leader ने pass करायचे हे शब्द फिरत असताना "Camel"- "Tiger" असे आणखीही शब्द pass करता येतात. शब्द ऐकला की शेजारी pass करायचा. हे करताना जो चुकेल किंवा थांबेल तो बाद होईल. साहजिकच ज्याचं लक्ष चांगलं आहे- म्हणजेच ज्याचं मन एकाग्र आहे- तो जिंकेल. हा खेळ खेळून मनाची एकाग्रता निश्चितच होईल. एक मात्र लक्षात ठेवायचं हा खेळ कसा खेळला जातो यासोबतच हा खेळ leader कसा घेतो याला महत्त्व आहे,बरं का! हा leader जितका कल्पक, चतुर अवधानी असेल तितकी खेळात आणखी रंगत येईल. खेळ अधिकाअधिक "Challenging" किंवा आव्हानात्मक होईल. या खेळातून एकाग्रतेसोबतच, श्रवणशक्ती वाढेल. फक्त ऐकणंच नाही तर एकलेलं पुढे pass करणं, एकाच वेळी दोन शब्द आले तर कसे पाठवायचे, एक शब्द साधारण किती वेळानी येतो हे लक्षात ठेवायचं म्हणजे वेळेचा अंदाज घ्यायचा. या गोष्टींवरच सगळी रंगत आहे. याशिवाय जे ऐकतो त्यातल्या योग्य-हव्या त्या गोष्टी घेणं आणि पुढे प्रसारित करणं या शक्तीसुद्धा वाढतात. अगदी रोजच्या आयुष्यात याचा उपयोग म्हणजे वर्गात शिक्षक शिकवत असताना, त्याची टिपणं काढताना कसं-एकाच वेळी ऐकायचं, लक्षात ठेवायचं, महत्त्वाचं ते लिहायचं- लिहित असतानाही पुढचं ऐकायचं- या सगळ्या गोष्टी एकाच वेळी कराव्या लागतात. या खेळातून एकाग्रता- लक्षात ठेवणं, एकाच वेळी एकापेक्षा अधिक गोष्टी करता येणं, या शक्तींची वाढ होतेच.

या खेळात कॅट- डॉग हे फक्त शब्द झाले. रोजच्या जीवनात तर आपण कितीतरी वेगवेगळे आवाज ऐकत असतो. आपला दुसरा खेळ या विविध आवाजांशी संबंधित आहे. हा खेळ एकट्यानंसुद्धा खेळता येईल किंवा एकत्र बसूनसुद्धा खेळता येईल. एका जागी शांत बसायचं आणि आपल्या आजूबाजूनं येणारे आवाज ऐकायचे. सर्वप्रथम दूरचे, रस्त्यावरच्या वाहनांचा- झाडावरच्या पक्ष्यांचा, इमारतीतले असे कितीतरी आवाज ऐकायचे. नुसते ऐकायचे नाहीत, तर ते आवाज काढायचा प्रयत्न करायचा. हे जमलं की आपल्या खोलीतले आवाज, वाऱ्याचा आवाज, ''शांततेचा आवाज'' हे ऐकायचे. यापुढे आपल्या श्वासावर लक्ष देऊन श्वासाचा आवाज ऐकायचा. हे सुद्धा जमलं, तर नाडीच्या ठोक्यांच्या, हृदयाच्या ठोक्यांच्या आवाजावर लक्ष द्यायचं. या खेळामुळे एकाग्रता तर वाढेलच, शिवाय परीक्षेच्या वेळी खूप अभ्यास करून कंटाळा आला, तर या एकाग्रतेच्या खेळाचा Exercise सारखाही उपयोग करता येईल. या Exercise नंतर सगळी मरगळ झटकली जाईल. उत्साही वाटेल आणि पुन्हा अभ्यासाला बसताना एकाग्रता होईलच. कधी खूप ताणतणावाची परिस्थिति असली तर शांत होता येईल. असे हे दोन खेळ- आपल्या रोजच्या जगण्याशी नातं सांगणारे, एकाग्रता वाढवणारे, मजा आणणारे, पहाणार ना खेळून एकाग्रतेने?

••

**देवदत्त पाठक,**
७७ शनिवार पेठ पुणे ३०



**चिकाटी असावी कार्यापाठी, पावित्र्य असावे ध्येयापोटी**
**सातत्य असावे यत्नाकाठी, यशाचे मग शिखरही गाठी.**

# जीवनाची ओढ असणारा यात्रेकरू - आचार्य अत्रे

**प्रा. शैलजा देशमुख**



**१९९७-९८हे आचार्य अत्रे यांच्या जन्मशताब्दीचे वर्ष!कवि,विडंबनकार, शिक्षक, शिक्षणशास्त्रज्ञ, नाटककार, चित्रपटकार, पत्रकार, वक्ता, राजकारणी अशा अनेकविध नात्यांनी उभ्याआडव्या धाग्यांप्रमाणे अत्रे हे नाव मराठी मनात गुंफलेले आहे.जीवनाच्या विविध अंगांना स्पर्श करणारे समृद्ध जीवन अत्रे स्वत: जगले आणि वाङ्मयाच्या, कलेच्या क्षेत्रात त्याचे दर्शन त्यांनी घडविले. आचार्य अत्रे यांच्या अशा अष्टपैलू व्यक्तिमत्वाची थोडक्यात ओळख आपल्याला करून देत आहेत,प्रा.शैलजा देशमुख. या लेखावरून श्री.अत्रे यांचे समग्र वाङ्मय वाचण्याची प्रेरणा तुम्हांला निश्चितच मिळेल!**

**जी**वनाच्या सर्व अंगांना स्पर्श करणारे, त्याचा आस्वाद घेणारे या शतकात महाराष्ट्रात होऊन गेलेले एक बहुढंगी व्यक्तिमत्व म्हणजे श्री. प्र.के. अत्रे! शिक्षक, संस्थाचालक, कवि, विडंबनकार, पत्रकार, शिक्षणतज्ज्ञ, चित्रपटकथालेखक, बोलपटनिर्माता, नाटककार, कादंबरीकार, उत्कृष्ट वक्ता अशा विविध अंगांनी बहरलेल्या श्री.प्र.के.अत्रे यांच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण कशी होती हे जाणायचं असेल, तर त्यांचे साहित्य मुळातून अभ्यासायला हवे. हे वर्ष आचार्य अत्रे यांचे जन्मशताब्दी वर्ष! प्रचंड प्रपातासारखे धुवाधार कोसळणारे हे महाकाय व्यक्तिमत्व! 'कऱ्हेचे पाणी' यात लिहिलेल्या 'अर्घ्य' मध्ये अत्रे लिहितात,

*'मी एक जीवनाचा यात्रेकरू आहे.कसली ना कसली तरी पताका माझ्या खांद्यावर नेहमी असतेच. जन्मापासून माझ्या पायाला एकदा जे चक्र लागले आहे ते एकसारखे फिरतेच आहे. जीवनाची मला विलक्षण जिज्ञासा आहे. सारे मला दिसले पाहिजे, सारे मला आले पाहिजे हीच एक माझ्या जिवाची तडफड असते. जीवन म्हणजे प्रचंड मौज आहे. त्याचा कितीही आस्वाद घ्या, कंटाळा कधी येत नाही आणि तृप्ती होत नाही. जीवनाचा मला लोभ नाही, पण ओढ आहे. चोहोकडून ते मला हाका मारते आहे,बोलावते आहे. अनंत हस्तांनी त्याला मिठी मारून ते आपल्यात सामावून घ्यावे असे वाटते. शाळेतून सुटलेल्या पोरांच्या झुंडींप्रमाणे साऱ्या देहकणांना जीवनाकडे धूम ठोकावीशी वाटते.'*

जीवन उत्कटपणे जगण्याच्या ओढीतच त्यांच्या यशाचे रहस्य आहे.ज्या क्षेत्रात उतरायचे ठरविले तेथे त्यांनी उत्तुंग यश मिळविले. त्यांच्यासाठी पावलागणिक क्षेत्र होते आणि श्वासागणिक कर्तृत्व होते. अत्र्यांच्यामधील माणूस 'कलावंत म्हणून सदैव अतृप्त राहिला म्हणूनच नवनवी क्षेत्रे धुंडाळीत आयुष्यभर फिरला. आयुष्याच्या वाटेवर ते रमतगमत फिरले म्हणूनच अनेक साहित्यकृती जन्माला आल्या.

अत्र्यांचा जन्म सासवड येथे १३ ऑगस्ट १८९८ रोजी झाला. अत्र्यांनी संस्कार घेतले ते घराणे, इतिहास व निसर्ग यांपासून! त्या संस्कारांचा वारसा त्यांनी केवळ सांभाळलाच नाही, तर त्यात भर घातली. तो वाढवला. कारण अत्र्यांचा स्वभाव संस्कारशील तर मन संवेदनशील होते.पाण्यासारखे असलेले त्यांचे मन; दिसेल, भेटेल, आढळेल ते टिपत राहिले. त्यातून त्यांचे जीवन समृद्ध आणि वृत्ती- प्रवृत्ती झुबकेदार बनत गेल्या. नद्या, डोंगर, झाडे, किल्ले, देवळे यांच्या संगतीत ते वाढले. सकाळी अंगावर सोनेरी उन्हे पांघरायची तर रात्र झाली की अंगावर चांदण्याची निळी चादर ओढून अंगणात झोपी जायचे; मध्यरात्री भैरोबाची सनई कानी

पडायची, उशाला अष्टौप्रहर पुरंदर किल्ल्याचा पहारा तर शेजारी सोपानदेवांची भक्तिवीणा सदैव वाजत असायची–सासवडला गेलेल्या या रम्य बालपणात त्यांच्या काव्यात्मक, वृत्तीचे बीज सापडते.

गाण्याची अगदी लहानपणापासून असलेली आवड त्यांच्यातील कवीला पोषक ठरली. सासवडला, अवतीभोवती निसर्ग सदैव फुललेला, त्यातून त्यांची काव्यप्रतिभा जागी झाली. वयाच्या नवव्या वर्षी त्यांनी आपली पहिली कविता केली. ती सीताबाई नावाच्या तिरळ्या स्वयंपाकिणीवर!

*'सीताबाई वर्णू किती तव गुण!*
*डोळा काणा, नाक वाकडे,*
*बधीर असती तव कर्ण!*
*सीताबाई, वर्णू किती तव गुण!*
*एकादशीला उपास करून*
*खाई कांदा लसूण!*
*सीताबाई, वर्णू किती तव गुण'*

एक अर्थपूर्ण योगायोग म्हणजे अत्र्यांचे पहिलेवहिले काव्यही विडंबन काव्य होते. पुढे सामाजिक सोंगाढोंगावर जन्मजात दोषांसकट त्यांनी जे तुफानी हल्ले चढवले त्याचे मूळ बीज या कवितेत सापडते.

या सर्व आठवणी अत्र्यांनी स्वतःच आपल्या 'मी कसा झालो?' व कऱ्हेचे पाणी खंड १ ते ५' या आत्मचरित्रपर पुस्तकातून मांडल्या आहेत. मी कसा झालो? मध्ये बारा प्रकरणांतून अत्र्यांनी आपले वाङ्मयीन आत्मशोधन केले आहे. 'मी कुठे झालो?' या पहिल्याच प्रकरणात अतिशय रसाळ आठवणी ते सांगतात. त्याचे एक छोटेसे उदाहरण द्यायचे तर सासवड सारख्या खेड्यातून पुण्यात प्रथम आल्यावर पाण्याचा नळ पाहून वाटलेले आश्चर्य व्यक्त करताना ते म्हणतात, 'ज्या माणसाने नायगऱ्याचा धबधबा प्रथम पाहिला असेल, त्याला देखील तो बघून जितके आश्चर्य वाटले नसेल तितके आश्चर्य पुण्यामधला तो पाण्याचा नळ पहिल्यांदा बघून मला वाटले.' सासवडहून पुण्याला केलेला प्रवास, पुण्याचे प्रथमदर्शन याचे अतिशय वेधक चित्रण येथे येते. त्यानंतरच्या दहा प्रकरणांतून कवी, विडंबनकार, विनोदी लेखक, शिक्षक, आरोपी, नाटककार, वक्ता, चित्रपटकार, पत्रकार, समाजवादी–कसा झालो! याची संगतवार हकीकत येते. शेवटच्या 'मी कोण आहे?' लेखामधील लेखन अत्यंत हृद्य आहे. रसिक वृत्ती, ओघवती शैली, मांडणीची मराठमोळी पद्धती यामुळे या लेखनाला लालित्याचा स्पर्श झाला आहे. कधीकधी या लेखनात विलक्षण आरसपाणी प्रांजळता दिसते. 'मी विडंबनकार कसा झालो?' मध्ये अत्रे म्हणतात, *'वास्तविक मला जायचे होते दुसऱ्याच मुक्कामाला. मला बालकवी व्हायचे होते. मला गोविंदाग्रज व्हायचे होते. त्यासाठी माझी खटपट चालू होती; पण ते सगळे राहिले बाजूला आणि मी विडंबनकार झालो. देवाच्या आळंदीला पोहोचायच्या ऐवजी मी 'चोरा'च्या आळंदीला पोहोचलो.'* 'कऱ्हेचे पाणी खंड १ ते ५' मध्ये, बालपणापासून तो १९६० पर्यंतचा, म्हणजे मुंबईसह महाराष्ट्र निर्माण होईपर्यंतचा वृत्तांत आला आहे. हे आत्मचरित्र 'मी'चे न राहता महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासपर्वातील एका कालखंडाचे, सार्वजनिक जीवनाचे चित्रण आहे.

आचार्य अत्रे यांनी आपल्या जीवनाची सुरूवात शिक्षक म्हणून केली. वडिलांच्या मृत्यूनंतर मुंबईत 'सँढर्स्ट हायस्कूल', 'न्यू हायस्कूल' व त्यानंतर पुण्यात कॅम्प एज्युकेशन सोसायटीच्या शाळेत त्यांनी अध्यापन केले. ती शाळा सर्वार्थाने सुधारण्यासाठी त्यांनी खूप कष्ट घेतले. मराठीची क्रमिक पुस्तके म्हणून त्यांनी तयार केलेल्या 'नवयुग वाचनमाले'ने, 'अरूण वाचनमाले'ने मराठी भाषेतील उत्तम साहित्य मुलांपुढे आणले. भाषा, साहित्य व शिक्षणशास्त्र यांचा समन्वय

---

**बालपणीचे पहिले 'विनोदी' भाषण!**

मराठी चौथीला असताना अत्र्यांनी सभेमध्ये गोष्ट सांगितली. ती गोष्ट सांगताना जी गंमत घडली ती अत्र्यांनी सांगितली आहे. 'त्यावेळी मी इतका घाबरलो होतो की प्रत्येक वाक्याच्या शेवटी मी घुटका घेऊन 'झाले!' असे म्हणून थांबत असे. पुढे पुढे माझ्या भाषणातील ही 'झाले!'ची लागवड इतक्या झपाट्याने होऊ लागली की, तिच्यातला विनोद वर्गातल्या सर्व मुलांच्या लक्षात आला आणि प्रत्येक 'झाला'! ला हशा पिकू लागला. शेवटी कशीबशी गोष्ट संपवून हास्याच्या कल्लोळात मी खाली बसलो. अशा रीतीने आयुष्यातील पहिले भाषण अपेक्षेपेक्षा विनोदी ठरले.

---

या पुस्तकांत होता. कालांतराने अत्रे पुण्याचे नगरसेवक झाले आणि राजकारणाकडे ते खेचले गेले. त्यातून 'उत्कृष्ट वक्ता' हा अत्र्यांचा पैलू विकसित झाला. महाराष्ट्राशी निष्ठा, भाषेवरील प्रभुत्व, अनुभवसंपन्न जीवन यामुळे अत्र्यांचे भाषण हे सदैव रंगत जाईल. हजरजबाबीपणा, बिनधास्त विधाने आणि विनोदाचा रंग यामुळे अत्र्यांची व्याख्याने श्रोत्यांना रंगवून सोडत. त्यांची भाषणे कीर्तनकाराइतकीच रसाळ असत.

१९४० ते १९६२ या कालखंडात 'नवयुग', 'जयहिंद' हे सायंदैनिक, 'समीक्षक' हे मासिक यातून अत्र्यांच्या पत्रकारितेला सुरूवात झाली, परंतू ''भले तरी देव कासेची लंगोटी, नाठाळाचे माथी देऊ काठी'' या तुकारामांच्या ओळी अग्रलेखाच्या माथ्यावर मिरवत. दि.१५ नोव्हेंबर १९५६ रोजी 'मराठा'जन्माला आला आणि अत्र्यांच्या व्यक्तिमत्वाचे सळसते रूप महाराष्ट्राला दिसले. संयुक्त महाराष्ट्राच्या विराट चळवळीतील अत्र्यांचे अक्राळविक्राळ रूप, महाराष्ट्राच्या प्रखर अभिमान, अन्यायाची चीड, न्यायाची उत्कट आच, इत्यादींनी झळाळून निघाले. 'मराठा'मधून अत्र्यांनी लिहिलेल्या लेखातून त्यांच्या लेखणीला तलवारीची धार चढली तर वाणीला समाजमन हलवून सोडण्याचे सामर्थ्य लाभले. महाराष्ट्राच्या निर्मितीमागे एक समर्थ पत्र उभे राहिले. लोकशक्ती जागी झाली. लेखणी आणि वाणी यांची दुधारी तलवार किती प्रभावी असते हे स्वातंत्र्योत्तर काळात महाराष्ट्राने अत्र्यांच्या रूपाने पाहिले. अत्र्यांनी मराठी वृत्तपत्रसृष्टीची परंपरा वैभवशाली केली यात शंका नाही. अन्यायाविरुद्ध जनतेच्या वतीने प्रतिकाराचा आवाज उठविणे हे वृत्तपत्रांचे काम आहे, ह्या ठाम भूमिकेतून 'मराठा' गर्जत राहिला. मात्र त्यांच्या लेखणीतून उतरलेले अग्रलेख, शब्द अच्युत बळवंत कोल्हटकर काळकर्ते शि.म. परांजपे, लो. टिळक यांच्या लेखणीची आठवण करून देत. अत्र्यांच्या व्यक्तिमत्वातील उत्कटता आणि आवेग इतका तीव्र होता, की टीका करताना अनेकवेळा विवेक सोडून ते हिणकस पातळीवर उतरले. हा दोष गृहीत धरूनही, संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याच्या काळात 'मराठा'मधून व्यक्त झालेली अस्मिता खूप महत्त्वाची आहे. त्यानंतरचे 'मराठा'चे पर्व हळूहळू खाली गर्तेत जाणारे ठरले. मात्र या कालखंडातील 'मराठा गाजला तो त्यामधील मृत्युलेखांनी. *'मी भावनाप्रधान साहित्यिक असल्याने माझे रागलोभ मरणानंतर संपतात. कोणत्याही सार्वजनिक पुरुषाचे वाङ्मयीन श्राद्ध पत्रकाराने 'राम'नीतीने करायला हवे. म्हणूनच 'मृत्युलेख' ही पत्रकाराच्या माणुसकीची आणि लेखनकौशल्याची सर्वात मोठी कसोटी आहे असे मी समजतो'*, असे श्री अत्रे म्हणतात. त्यांच्या मृत्युलेखांचेदेखील मथळे खूप बोलके! साने गुरूजींवरील 'मृत्यूचे चुंबन घेणारा महाकवी', लालबहादुर शास्त्रींच्यावर 'इतका लहान एवढा महान', नेहरूंवर लिहिलेल्या मृत्युलेखाचे 'सूर्यास्त' हे पुस्तक यांसारख्या लेखनातून अतिशय चित्रमय चरित्रे अत्र्यांनी उभी केली. 'मराठी माणसे मराठी मने', 'दुर्वा आणि फुले', 'समाधीवरील अश्रू' यांसारख्या लेखसंग्रहातून त्यांनी अनेक व्यक्तिरेखा अजरामर केल्या. कथा, कादंबरी हे वाङ्मयप्रकारही त्यांनी हाताळून पाहिले.

अध्यापक म्हणून काम करीत असताना अत्रे त्यावेळच्या पुण्याच्या साहित्यविश्वात रमून गेले होते. त्यावेळी पुण्यात 'रविकिरण मंडळ' होते. कवी यशवंतांपासून ते माधव ज्युलियनांपर्यंत अनेक नामवंत कवी या मंडळात होते. अत्यंत कृत्रिम अशी काव्यरचना करणारे अनेक कवी या काळात उदयाला आले.

---

**आचार्य अत्रे यांचे आत्मचिंतन**

गुणांची पूजा करताना एक काळजी घ्यावी. विभूतीपूजक होऊ नये. माझ्यामध्ये तो दोष आहे. मी मूर्तिपूजक आहे, आणि मूर्तिभंजकही आहे. माझ्या 'देवा'ने सदैव माझ्या नवसाला पावावे असा हट्ट असतो. लहानपणी क्रिकेट सामना पाहताना आम्ही एक म्हसोबा तयार करीत असू. विरुद्ध बाजूचा खेळाडू 'आऊट'झाला की आम्ही म्हसोबाच्या डोक्यावर गवत वाहायचो आणि आमच्या बाजूचा खेळाडू 'आऊट झाला की आम्ही त्या म्हसोबांची पूजा बांधायचो. जीवनात असेच माझ्या हातून पुष्कळदा घडले आहे. सदैव पूजा करता येईल असे 'देव' माणसाच्या जगात नसतात असे नव्हे पण ते फार थोडे असतात.

(मी कोण आहे?)

---

**गर्दीचे मानसशास्त्र**

गर्दीच्या सभेपुढे बोलणे हे एका दृष्टीने सोपे आहे आणि अवघडही आहे. मुळामुठेच्या पुरात उडी मारली की, पूर माणसाला अपोआपच पुढे नेतो. हात पाय हलवावे लगत नाहीत. वक्ता गर्दीच्या परिचयाचा असला, म्हणजे बोलणे फारच सोपे. माझी पद्धत ठरलेली असे. अनोळखी गर्दी असली, की ठणठणीत आवाजात पहिले वाक्य बोलायचे. त्यामुळे श्रोतेच एकदम शांत होतात. एवढेच नव्हे तर हा वक्ता घाबरलेला नाही, अशी त्यांची ताबडतोब खात्री होते. ते महत्वाचे आहे पहिल्या दोन-चार वाक्यांत काही विनोद किंवा कोटी करावयाची. एखादा श्रोते खदखदून हसले, की पुढचा मार्ग एकदम मोकळा होतो. मग कसेही तुम्ही पुढे जा.

व्याख्यानाच्या वेळी,कर्नल नायडूंचे बँटिग मी नेहमी डोळ्यांपुढे ठेवीत असे. खेळाला आल्याबरोबर पहिल्या चेंडूला सीमेबाहेर उडवायचे,की क्रीडांगणावर टाळ्यांचा कडकडाट.मग बारीक सारीक कोट्या करून एकामागून एक भरभर धावा घ्यावयाच्या आणि पुन्हा एक टोला सीमेवर मारावयाचा,की फिरून टाळ्यांचा कडकडाट. पहिल्याने एकदा,वक्त्याने, श्रोत्यांना क्लोरोफॉर्म दिला की काम झाले झाले, मग श्रोते निपचीत पडून वक्ता जे सांगेल, ते ऐकून घ्यायला तयार होतात.

**- आचार्य प्र.के.अत्रे (मी वक्ता कसा झालो?)**

त्यांच्या पद्यरचनेतील काही लकबींनी अत्र्यांना विडंबनास प्रवृत्त केले.अत्रे जन्मत: नकला करणारे. आपल्या विडंबनपर कवितांना चांगला प्रतिसाद मिळतो आहे हे ध्यानात आल्यावर त्यांच्यातील 'विडंबनकाराला प्रेरणा मिळाली. रेव्हरंड टिळकांची 'पाखरा येशील कधि परतून' ही सुरेख कविता त्यावेळी लोकप्रिय झाली होती.त्यावर 'परिटा येशील कधि परतून' हे विडंबनकाव्य अत्र्यांनी लिहिले आणि हास्याचे फवारे उडाले.

*'परिटा येशील कधि परतून*
*कोट रेशमी लग्नामधला*
*मानेवर उसवून*
*आणि तिच्या भरजरी पैठणिची*
*मच्छरदाणी करून!'*

तर केशवसुतांच्या 'आम्ही कोण?' या कवितेवर

*'आम्हाला वगळा गत:प्राण*
*होतील साप्ताहिके,*
*आम्हाला वगळा खलास*
*सगळी होतील वा मासिके'*

असे विडंबन अत्र्यांनी केले.

अर्थात यासारख्या विडंबनात्मक कवितेत मूळ कवितांची खिल्ली उडविण्याचा इरादा नसून मुख्य हेतू होता विनोदी अनुकरणाचा. मात्र रविकिरण मंडळातील कवींच्या कवितांची विडंबने करत अत्र्यांनी त्यांची खिल्ली उडवली. कधी रामदासांच्या मनाच्या श्लोकांचेही विडंबन केले. पण त्याचा वापर राजकीय टीकेसाठी, समाजदोषांवर टीका करण्यासाठी केला.

*'कधी मंदिरी जासी वाचावयाला*
*तरी इंग्रजी मासिकी ठेव डोळा*
*कुठे छान चित्रे, कुठे कूपनेही*
*दिसे सर्व ते कापून घेई।'*

किंवा

*'मना सज्जना चार आण्यात फक्त*
*तुम्हा व्हावयाचे असे देशभक्त*
*तरी सांगतो शेवटी युक्ती सोपी*
*खिशामाजी ठेवा सदा गांधी टोपी।'*

ही याचीच उदाहरणे.

'झेंडूची फुले' च्या प्रस्तावनेत प्रा.स.गं. मालशे म्हणतात- विडंबन म्हणजे वाङ्मयीन वेडावणं. मूळ कविता लोकप्रिय हवी व तिचे विडंबनही तितकेच उच्च प्रतीचे हवे.विडंबन हे केवळ बाह्य अभिव्यक्तीचे असत नाही,तर उत्तम विडंबनात वृत्त, शैली,लकबी यांपासून आशयाच्या सूक्ष्म वैशिष्ट्यांपर्यंत सर्व गोष्टीचे अनुकरण असते'.

मराठीतील पहिले परिणामकारक विडंबनकार म्हणून आचार्य अत्रे यांचे नाव इतिहासात अजरामर झाले.त्यांच्यामुळे विडंबनाला स्वतंत्र साहित्य प्रकाराचा दर्जा प्राप्त झाला.उपजत विनोदबुद्धी प्रतिभेची जोड ही 'झेंडूची फुले'ची बलस्थाने तर अतिशयोक्ती व अश्लिलतेकडे झुकणारा विनोद ही काही दोषस्थळे! तरीही विशुद्ध विनोदाचा आनंद देण्याचे सामर्थ्य 'झेंडूची फुले'मधील विडंबनगीतांत आहे.मात्र त्यासाठी मूळ काव्ये अभ्यासली असली तरच त्यांचे सौंदर्य समजू शकेल.

अत्रे जेव्हा चित्रपटांकडे वळले तेव्हा अत्यंत प्रासादिक कविता त्यांनी लिहिल्या. 'ब्रम्हचारी' मधील 'यमुनाजळी खेळू खेळ कन्हैया का'' या गीताने उभ्या महाराष्ट्राला वेड लावले. तर 'पायाच्या दासींमधील 'अंगणात फुलल्या जाईजुई, जवळी ग पति माझा नाही!' हे हृदय गीत

सर्वतोमुखी झाले.

१९३३ साली अत्र्यांचे नाटककार म्हणून रंगभूमीवर आगमन झाले.ते शेवटपर्यंत अनेक नाटकांच्या लेखनाने दुमदुमत राहिले. नाटककार या नात्याने, अत्र्यांच्या यशाची आणि लोकप्रियतेची नौबत झडली ती प्रथम १९३३ मध्ये त्यांचे 'साष्टांग नमस्कार' रंगभूमीवर अवतरल्यावर.'साष्टांग नमस्कार'चे अतिरिक्त वेड असणारे श. ब.शेषाद्री, मनस्वी वेड असणारा सिद्धेश्वर, अशी मोठी अतिशयोक्त व्यक्तिमत्वे अत्र्यांनी या नाटकात रंगवली.फाजील अतिरेकाने, उपकारक गोष्टीही कशा हास्यापद बनतात, हे या नाटकांतून त्यांनी दाखविले. नाटकाचा पडदा वर गेला, की नमस्कार घालणाऱ्या नायक-नायिका दिसल्या,की सर्वत्र हशा उसळतो.

'हे कोण बोलले बोला, राजहंस माझा निजला' या राम गणेशांच्या कवितेचे विडंबन

*'हे कोण बोलले बोला*
*चिंचेवर चंदू चढला.'*

अशा शब्दांत भद्रायूच्या तोंडी आले. त्यात एकीकडे आपले गुरू राम गणेश यांच्या अनुप्रासाची थट्टा होती तर दुसरीकडे विडंबनकार अत्र्यांची प्रतिमा होती. प्रासंगिक विनोद, शाब्दिक विनोद, कोट्यांमधून निर्माण झालेले विनोद हे सारे प्रकार अत्र्यांच्या पहिल्या नाटकापासून दिसतात.

अत्र्यांनी सतरा वर्षांत एकूण २२ नाटके लिहिली. त्यात 'साष्टांग नमस्कार', 'भ्रमाचा भोपळा', 'मोरूची मावशी''लग्नाची बेडी यासारखी विनोदी नाटके; 'घराबाहेर', 'उद्याचा संसाार' 'जग काय म्हणेल?' ही गंभीर नाटके, 'मी उभा आहे','मी मंत्री झालो' सारखी राजकीय नाटके, 'तो मी नव्हेच' 'बुवा तिथे बाया, 'डॉ. लागू' ही सामाजिक दोषांवर प्रकाश टाकणारी नाटके, तर 'प्रीतिसंगम' सारखे पौराणिक नाटक, ही त्यांची विशेष गाजलेली नाटके!

सर्वसाधारणपणे बहुतांशी सगळ्या नाटकाची नस विनोदी आहे. त्याचबरोबर वास्तव घटनांच्या आधारावर ती उभी आहेत. कुठे मानवी स्वभावाचे चित्रण, कुठे सामाजिक गंभीर समस्या, कुठे समाजात बोकाळणाऱ्या विकृतीचे दर्शन, कुठे सामाजिक गुन्हेगारीचे भीषण रूप, असे बहुरंगी अंतरंग त्यांचा नाटकांना लाभले आहे. सर्वस्वी नवे नाट्यतंत्र, नवे विषय,विनोदाची अवगुंठन, यांनी नटलेल्या अत्र्यांच्या नाटकांनी, १९३० च्या सुमारास मराठी रंगभूमीला आलेली मरगळ घालविली.आजही 'मोरूची मावशी', 'लग्नाची बेडी' सारखी सदातरूण असणारी त्यांची नाटके प्रेक्षकांना खळखळून हसवताना दिसतात.

नाट्यलेखन चालू असतानाच आचार्य अत्रे चित्रपटसृष्टीकडे खेचले गेले. या क्षेत्रातही दैदीप्ययमान यश मिळवून एक मानाचा तुरा त्यांनी स्वत:च्या जमेस मिळविला. 'धर्मवीर', 'ब्रँडीची बाटली' 'अर्धांगी' या चित्रपटाचे लेखन अत्र्यांनी केले, तर 'लपंडाव' व 'पायाची दासी'या कलात्मक व अर्थिक यश मिळवून देणाऱ्या चित्रपटांची निर्मिती त्यांनी स्वत:च केली. 'वसंतसेना'च्या अपयशात सर्वस्व गमविण्याची वेळ आली. पण तेव्हाच खचून न जाता 'श्यामची आई'ची निर्मिती करून चित्रपटक्षेत्रात आपल्या कारकिर्दीचे सर्वोच्च शिखर गाठले. कारण या चित्रपटाने उत्कृष्ट चित्रपटाचे पहिले सुवर्णपदक मिळवून दिले. मराठी चित्रपटाला मिळालेले पहिले सुवर्णपदक आणि त्यानंतर इतक्या वर्षात कोणत्याही मराठी चित्रपटाला हे यश प्राप्त झाले नाही.

आचार्य अत्रे यांच्या कार्य-कर्तृत्वाचे, समग्र साहित्याचे दर्शन, एका छोट्या लेखात घडवणे ही फारच अवघड गोष्ट! त्यांचे जीवनसाहित्य हे शतरंगांनी सजलेले आहे. कितीही अपयश आले तरी ते जीवनाच्या वाटचालीत पुढे पुढे जात राहिले. नवीन क्षितिजे धुंडाळीत राहिले. इतिहास आणि निसर्ग यांची सोबत त्यांनी कधीही सोडली नाही. वाङ्मयाचे त्यांचे वेड म्हणजे आनंदाचे निधान. वाङ्मयाचा उगम, सेवेतून व्हावा; वाङ्मयात रंजन तर हवेच; पण त्यात जागृतीही हवी या भावनेने 'जीवनाकरता कला' या तत्वाचा सतत उद्घोष करीत राहिले. अत्रे-फडके, अत्रे- माटे, अत्रे-वेरोर असे वाङ्मयीन वाद महाराष्ट्राच्या सांस्कृतिक रंगभूमीवर गाजले. अत्र्यांचे उभे वाङ्मय हे एक शक्तिशाली आश्वासन आहे. महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनात अत्र्यांच्या वाणी आणि लेखणीने वादळे निर्माण केली. लोकभावना व लोकप्रक्षोभाला त्यांनी शब्दरूप दिले. विनोदाचा लखलखीत चांदण्याचा वर्षाव त्यांनी मराठी मनावर केला.

आयुष्यात अनेक चुका केल्या. त्यांच्या उत्तुंग प्रतिभेला कधी अतिशोयोक्ती, कधी हल्ला चढविण्यातील फाजील उत्साह यामुळे गालबोटही लागले. एकूण महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनातील आचार्य अत्रे हे प्रचंड व्यक्तिमत्व होते.

आचार्य अत्र्यांच्या व्यक्तिमत्वाचे मोठेपण वि. वा. शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांनी अतिशय मार्मिक शब्दांत वर्णन केले आहे. 'अत्र्यांच्या स्वभावात एका बाजूस प्रखर तेज होते, दुसऱ्या बाजूला स्वत: आसवे गाळणारी व इतरांना गाळायला लावणारी आर्द्रता होती. एका बाजूस समर्पणाचा मंत्रघोष होता, तर दुसरीकडे अवखळ हास्याचा गडगडाट करणारी विद्वत्ताही होती आणि रसिकताही होती. रंग होते व ढंग होते, संहार होता आणि साहाय्यताही होती! अशा विविध विरोधी शक्ती ज्याच्या ठिकाणी एकत्रित झाल्या आहेत अशी आचार्य अत्र्यांसारखी व्यक्ती एका शतकात जन्माला येते! आचार्य अत्र्यांच्या भाषेत अतिशयोक्तीचा वापर करायचा झाला तर 'शतकातून एखादाच काय! अहो, गेल्या दहा हजार वर्षात असा चमत्कार घडला नाही!''

••

**प्रा. शैलजा देशमुख**
बी -७/५ गुरूराज सो,
पद्मावती पुणे ३७.

**छात्र प्रबोधनचा पहिला इंग्रजी अंक**
प्रकाशित झाला.
किंमत रु. १५/-
स्थानिक कार्यालयांमध्ये उपलब्ध.

## प्रथमोपचार

दैनंदिन जीवनात लहानमोठे अपघात होत असतात अशावेळी जे तातडीने करायचे उपचार ते प्रथमोपचार! वैद्यकीय मदत मिळविण्याआधीचे उपचार, म्हणूनच सगळ्यांनी लक्षात ठेवण्यासारखे!

१) जखमेतून होणारा रक्तस्त्राव थांबविण्यासाठी जखम झालेला भाग शरीरापेक्षा उंच पातळीवर ठेवावा. स्वच्छ कापडाच्या तुकड्याने अथवा आपल्या हाताने जखमेवर दाब द्यावा.

२) नाकातून अचानक रक्त वाहू लागल्यास स्वस्थ बसून दोन्ही बोटांमध्ये दोन्ही नाकपुड्या रक्त थांबेपर्यंत अधूनमधून दाबून धराव्यात.रक्त येणाऱ्या जागी बर्फाचा खडा लावावा.

३) अचानक चक्कर आल्यास डोके खाली व पाय त्यामानाने वर अशा प्रकारे झोपावे.डोक्यावर दुखापत झाली असल्यास मात्र डोके वर ठेवून अर्धवट बसल्या स्थितीत ठेवावे.

४) हाड मोडल्याची शक्यता वाटल्यास ते हाड आहे त्या स्थितीतच स्थिर ठेवावे. रोग्यास हलविण्यापूर्वी मोडलेल्या हाडाला लाकडाची फळी, पट्टी, पुठ्ठा यासारख्या गोष्टीची आधारफळी बांधावी.मानेला आणि पाठीला दुखापत झाली असल्यास मान व पाठ वाकणार नाही अशा बेताने उचलावे.

**डॉ. कौमुदी गोडबोले.**

## कोड्याच्या अंतरंगात (समस्यांची उत्तरे)

१) प्रथम पाच लिटर दूध असलेले भांडे मोठ्या भाड्यांत रिकामे केले. तीन लिटर दूध असलेले भांडे पाच लिटर दूध मावणाऱ्या भांड्यात रिकामे केले.नंतर तीन लिटरचे भांडे सर्वात मोठ्या भांड्यात भरून घेतले व त्यातील दूध हळूहळू पाच लिटरच्या भांड्यात ओतून ते भांडे भरले, तीन लिटरच्या भांड्यात १ लिटर व सर्वात मोठ्या भांड्यात २ लिटर दूध आहे.

आता पाच लिटरच्या भांड्यातील दूध सर्वात मोठ्या भांड्यात ओतले व तीन लिटरच्या भांड्यातील १ लिटर दूध पाच लिटरच्या भांड्यात ओतले. आता पाच लिटरच्या भांड्यात १ लिटर दूध, सर्वात मोठ्या भांड्यात ७ लिटर दूध तीन लिटरच्या भांड्यात दूध नाही. नंतर तीन लिटरची भांडी सर्वात मोठ्या भांड्यातून दोन वेळा भरून काढून टाकली व राहिलेले एक लिटर दूध तीन लिटरच्या भांड्यात ओतले.

२) सर्व प्रवाशांना सारख्या भाकरी वाटण्यासाठी १५ भाकऱ्यांचे साठ चतकोर केले व प्रत्येकाने १५ चतकोर घेतले. पहिल्याकडून ९ चतकोर, ५ चतकोर दुसऱ्याकडून व १ चतकोर तिसऱ्याकडून घेतल्यामुळे व तीन रूपये वाटावयाचे असल्यामुळे पहिल्या प्रवाशाने १.८० रु, दुसऱ्याने १.०० रुपया व तिसऱ्याने २० पैसे घ्यावे.


३) गणपती ४ आणले, कोनाडे ३ होते.

४) पन्नास रूपये + वीस रुपये + वीस रुपये + पाच रुपये + दोन रुपयाच्या चार नोटा = १०३ रु.व १+२+१+४= एकूण आठ नोटा.


५) दोन नारळ.

# प्रतिघटना

डॉ.संजय ढोले



**महाबळेश्वरच्या आल्हाददायक वातावरणात सर्वच देशातील आमंत्रित प्रमुख शास्त्रज्ञ उपस्थित होते. डॉ.ब्रिसले उभे राहिले व समोरच्या सदस्यांकडे पाहात म्हणाले,''मित्र हो... आपण इथे तत्काळ का जमलो आहोत... हेच मला आपल्याला सांगायचंय. काही दिवसांपूर्वी एक अनाहूत पत्र मला आलं. आपणा सर्वांना भेडसावणाऱ्या समस्येवर काही प्रभावी उत्तर शोधल्याचा पत्रलेखकाचा दावा आहे. आता या क्षणी तो आपल्याला भेटणार आहे.''**
**कोण होता तो पत्रलेखक? सर्वांना भेडसावणारी समस्या कोणती? खरंच तिचं उत्तर मिळालं का?**



**व**र्ष २६७५; पृथ्वीवरील मानवाची प्रगती शिगेला पोहोचलेली. मानवनिर्मत प्रगतीचा प्रचंड व्याप.. तिलाही न पेलवणारा असा. पृथ्वीवरच नव्हे, तर अवकाशातही विविध उपग्रहांची गर्दी. घुसमटून टाकणारी भीड.. आधुनिक युगाचा वारसा चालवणारा मानव अधिकच आळशी, विलासी बनलेला... वैद्यकशास्त्रातील प्रगतीमुळे, प्रजनन संख्येच्या प्रमाणात मरणाची शक्यता हजारपटीने कमी झाली. भूतलावर माणसांची संख्या दिवसेदिवस वाढत चाललेली. सर्वत्र दाटीवाटी... निसर्गाचा असमतोल वाढतोय... या शतकातील शास्त्रज्ञांना लोकसंख्या हा भेडसावणारा मुख्य प्रश्न आहे. यावर तोडगा शोधण्यासाठी बहुसंख्य शास्त्रज्ञ गढलेले आहेत.

याच शतकाच्या मध्यंतरात अनेक राष्ट्रांनी आपल्या अंतराळ सफरी यशस्वी केल्या होत्या. शिवाय सूर्यमालिकेतील सर्वच ग्रहांचा त्यांनी

पाठपुरावाही केला होता.. पण कुठेही पृथ्वीसदृश वातावरण त्यांना आढळलेले नव्हते. पर्याय म्हणून नासाच्या शास्त्रज्ञांनी एक अभिनव कल्पना मांडली होती. ती म्हणजे एका कॅप्सूल आकाराच्या उपग्रहाची निर्मिती करून, तो पृथ्वीवर सोडायचा. त्या कॅप्सूलमध्ये पृथ्वीवरील वातावरणच निर्माण करून शेतीयोग्य जमीन फलित करायची. मानवाला लागणाऱ्या सर्वच सुविधांची उपलब्धता तेथे ठेवायची... पण त्यातही कमतरता होतीच.अशा किती मानवाचं स्थलांतर या उपक्रमाच्या साहाय्याने आपण करू शकणार होतो?- पण मानवही सहजासहजी हटणार नव्हता. तो प्रयत्नांची पराकाष्ठा निश्चितच करणार होता.

दरम्यान त्या दिवशी अमेरिकेतील नासांच्या अध्यक्षांना असंख्य पत्रांच्या गराड्यात ते पत्रंही आलं होतं. सेक्रेटरीने निवडलेल्या पत्रांचा मागोवा घेताना तेही पत्र त्यांच्या हाती आलं. त्यांनी ते सहजपणे वाचायला घेताच त्यातील मजकूराकडे ते आकर्षिले गेले. त्या पत्रातील मजकूर असा होता-

मा.अध्यक्ष,

नासा (NASA)

स.न.

मी कोण आणि काय करतो या फंदात न पडता सरळच विषयाला हात घालतोय, त्याबद्दल क्षमस्व. आज मानवाला भेडसावणाऱ्या प्रश्नाचं मी उत्तर आहे.. माझ्याकडे एक अभिनव कल्पना असून, ती आपणासमोर मांडावी अशी इच्छा आहे. मी सध्या भारतात असून.. भारतातच महाराष्ट्रातील महाबळेश्वर येथे १ दि.१६ नोव्हेंबर २६७५ रोजी हॉटेल सपना येथे आपण जमावे... तेथेच मी माझ्या कल्पना आपल्या प्रमुख शास्त्रज्ञांसमोर मांडीन.

आपला विश्वासू

'अ ब क'

डॉ.ब्रिसलेंना या अनाहूत पत्राबद्दल आश्चर्य व तेवढीच उत्सुकता वाटली होती. त्यांनी पुन्हा पुन्हा ते पत्रं वाचलं होतं..शेवटी विचाराअंती ते निश्चयाने उठले होते.

..डॉ. ब्रिसलेंनी नासातील प्रमुख शास्त्रज्ञांसमोर त्या पत्राचा गोषवारा वाचलाच, सगळ्याच शास्त्रज्ञांना या अनाहूत पत्राचं नवल वाटलं होतं. जगातील सर्वच प्रमुख शास्त्रज्ञ त्यांना माहीत होते...शिवाय या प्रमुख समस्येवर काम करणारे तर सर्वच त्यांना ज्ञात होते... मग ही व्यक्ती कोण होती?... पण शेवटी त्या व्यक्तीला संधी द्यावी अशी सर्वांचीच इच्छा होती. त्यावर सर्वांचे एकमतही झालं होतं...त्यांच्या इच्छित स्थळी व वेळीच ही मीटिंग घ्यावी यावर कुणाचंही दुमत नव्हतं.

त्या अनभिज्ञ 'अ ब क' ने दिलेल्या माहितीनुसार डॉ. ब्रिसलेंनी नासाच्या काही शास्त्रज्ञांव्यतिरिक्त इतर राष्ट्राच्या प्रमुख शास्त्रज्ञांचा समावेश करून घेण्याचा निर्णय घेतला होता.त्यात नासाचेच डॉ. किथ व डॉ. वाइडमन, फ्रान्सचे डॉ. डेव्हीन, जर्मनीचे डॉ. फीचर, इंग्लंडचे डॉ.व्हाईट, चीनचे डॉ.ली वँग, इटलीचे डॉ पोरपाटा, पाकिस्तानचे डॉ. उल्हक यांचा समावेश होता. त्याआधी डॉ. ब्रिसलेंनी भारतातील टी. आय् एफ.आर.(Tata Institute of Fundamental Research) मधील प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. सुरेश तनवर व दिल्ली विद्यापीठातील खगोलभौतिकीची प्रमुख प्रा. सिंग यांच्यावर पुण्याजवळ असलेल्या महाबळेश्वर येथील व्यवस्थेची जबाबदारी टाकली होती. विविध देशांतील ही शास्त्रज्ञमंडळी याच विषयावर संशोधन करीत असल्याने महाबळेश्वरच्या मीटिंगला सर्वांनीच होकार कळविला होता. डॉ. ब्रिसलेंनी ही मीटिंग सार्वजनिकच आहे म्हणून सांगितले होते. या मीटिंगमध्ये आतापर्यंतच्या संशोधनाचा आढावा घेण्यात येईल असेही सूचित करण्यात आले होते. 'अबक' या अनभिज्ञ तथाकथित शास्त्रज्ञाचं नाव, त्याचं पत्र व विषय यांपासून मीटिंगमधील सदस्यांना अनभिज्ञ ठेवण्यात आलं होतं. फक्त भारतातील शास्त्रज्ञांनाच त्याची कल्पना देण्यात आली होती. डॉ. ब्रिसलेंनी त्या व्यक्तींच्या अनाहूत पत्राचा संदर्भ देताच, डॉ. तनवरांनी त्याला कडाडून विरोध दर्शविला होता. तो कदाचित एखादा भोंदूही असू शकेल! अशी पुष्टीही त्यांनी जोडली होती.

डॉ.ब्रिसलेंनी कुणालाही न जुमानता त्याचा ठामपणे पाठपुरावा करीत डॉ. तनवरांवर जबाबदारी टाकली होती, ती घेण्यावाचून डॉ.तनवरांना पर्यायच उरला नव्हता.

डॉ. तनवर व प्रा. सिंग शक्य तेवढी गुप्तता पाळत होते. त्यांनी महाबळेश्वरची व्यवस्था लावून केली होती. स्वत: जातीने हजर राहून, लक्ष घालून सेमिनार रूम व इतर सुविधा उपलब्ध करून घेतल्या होत्या.

मनाविरूद्ध का होईना? त्यांनी ब्रिसलेंचा मान राखला होता.

महाबळेश्वराच्या आल्हाददायक वातावरणात सर्वच देशांतील आमंत्रित प्रमुख शास्त्रज्ञ उपस्थित राहिले होते. डॉ. ब्रिसले घड्याळ्याकडे पाहात उठून उभे राहिले व समोरच्या सदस्यांकडे पाहात म्हणाले....'मित्र हो.... आपण इथे तात्काळ असे का येथे जमलो आहोत, हे मला आपल्याला सांगायचंय. काही दिवसापूर्वीच मला एक अनाहूत पत्र आलं होतं. ते पत्र मी प्रत्येकाच्या फोल्डरमध्ये झेरॉक्स करून ठेवलेलं आहे... आपण ते नंतर कधीही वाचू शकता. त्या पत्राच्या आधारेच मी आपणा सर्वांना निमंत्रणे पाठवलीत. पत्रलेखकाने आपले नाव न देता 'अ ब क' हे अक्षरी नाव दिले आहे... खरे नाव उघडकीस न आणणे हा कदाचित त्याचा प्रकार असू शकेल... तर त्या पत्राचे सार असे की, त्याने सद्यस्थितीत आपल्याला भेडसावणाऱ्या मानवी स्थलांतराचा प्रश्न उपस्थित करून, त्यावर प्रभावी उत्तर शोधले आहे व तेवढीच अभिनव कल्पना त्याच्याजवळ आहे असा त्याचा दावा आहे.. मी आपणा सर्वांना खरे कारण न सांगता येथे बोलावल्याबद्दल माफी मागतो... तर आपण त्याने दिलेल्या वेळेनुसारच उपस्थित झालेलो आहोत.. आता या क्षणाला आपण त्याचीच वाट पाहात आहोत.

...तेवढ्यात सेमिनार रूमचा दरवाजा कर्ररऽऽ आवाज करीत उघडला गेला. आवाजासरशी सर्वांचेच लक्ष त्याच्याकडे वेधले गेले. दारात सत्तरीला एक म्हातारा उभा होता. पांढरीशुभ्र दाढी, पांढरे केस, उभट चेहरा, थोडसं जाड नाक... पण तरतरीत डोळे असलेला, झब्बा घातलेला तो म्हातारा स्मितहास्य करीत, जगातील प्रमुख शास्त्रज्ञांना सामोरा गेला. ओळख करून घेण्याची गरजच त्याला भासली नाही. कारण उपस्थितांची चांगलीच माहिती त्याला असल्याचं, डॉ. ब्रिसले इतरांची ओळख करून देताना जाणवलं. त्यांच्या तोंडून प्रत्येकाचं नाव ऐकून सर्वांनाच आश्चर्य वाटलं होतं. अस्खलित इंग्रजीत म्हातारा सर्वांना उद्देशून म्हणाला.

'अ ब क' या नावाने पत्र लिहिणारा तो मीच. माझं नाव काय? मी कुठला, कुठे राहतो यात वेळ न दवडता सरळ मुद्दाच आपणासमोर मांडतो... मला वाटतं पृथ्वीवरील वाढीव लोकसंख्येने आपण सर्वच त्रस्त आहात. एक दिवस असा येईल की, मानवाला श्वास घ्यावयास जागा राहणार नाही. त्यामुळे वर्षानुवर्षे आपण त्यादृष्टीने संशोधन करीत असून, मानवसदृश वातावरण असणारा ग्रह शोधण्यात आपण गर्क आहात... पण दुर्दैवाने त्यात आपली अजून प्रगती झालेली नसून, ती पुढेही यशस्वी होईल की नाही यात शंकाच आहे. अनुषंगाने दिवस जातील तशी लोकसंख्याही वाढत राहील. मी स्वत: बरेच संशोधन केले आहे... मुलखावेगळे... भारतातील शास्त्रज्ञांना कदाचित वाटेलही...कारण त्यांनी मला कधी पाहिले नाही... पण हे परमसत्य आहे की, मी संशोधनात यशस्वी झालो आहे... आणि तेवढीच अभिनव कल्पना घेऊन मी आपणांसमोर उभा आहे. त्यावर किती विश्वास ठेवायचा आणि किती पाठपुरावा करायचा हे तुम्ही ठरवायचं आहे...'

सेमिनार रूममध्ये काही क्षण शांततेत गेले... म्हाताऱ्याने दोन घोट पाणी प्यायले आणि सभोवार पाहात तो पुढे म्हणाला.

''मित्र हो! माझ्या संशोधनाचा सारांश सांगायचा म्हणजे त्यासाठी काही गोष्टी स्पष्ट कराव्या लागतील.. आपणास ठाऊकच आहे की, जेव्हा आपण एखादं नाणं हवेत उडवतो तेव्हा जमिनीवर पडताना ते एकतर समोरील बाजू (Head) किंवा मागील बाजू (Tail) दर्शविते... दोन्ही बाजू एकाच वेळेस कधीही दिसत नाहीत; पण नाण्याचे पुंजतरंग नेहमीच समोरील व मागील बाजू दर्शविण्याची संधी देतो. मग तरंग सत्यस्थितीचं प्रतिनिधित्व कसं करू शकतं?...याला एकच उत्तर आहे, ते म्हणजे प्रत्येक शक्यतेला (Possibility) जेथे वास्तविक प्रसंग घडतो तेथे समांतर विश्वाचं (parallel Universe) अस्तित्व असतं. यावरून समांतर विश्वाची कल्पना मांडली गेली... म्हणूनच एका विश्वात नाण्याची समोरील बाजू पडली असेल तर त्याच नाण्याची मागील बाजू दुसऱ्या विश्वात असायला हवी. अशीच आपल्या विश्वाचीही समांतर विश्वे अस्तिवात आहेत. याच समांतर विश्वाचा अभ्यास करून मी माझी अभिनव कल्पना मांडली आहे, ती म्हणजे या समांतर विश्वात मानवांचे स्थलांतर करायचे...''

हे ऐकताच सर्वाच्याच चेहऱ्यावर प्रश्न उमटले. अवलोकन करीत म्हाताऱ्याने प्रत्येक प्रश्नाचा रोख ओळखला.. तरीही डॉ फीचर

अतिउत्साहाने उत्तरलेच, ''हे कसं शक्य आहे?... मानवाचं स्थलांतर समांतर विश्वात केलं तर..त्यांच्याशी आपला संपर्कच रहाणार नाही...आणि आताच्या विज्ञानाला तरी ते शक्य नाही. कल्पना म्हणून ठीक आहे.'

म्हातारा गंभीरपणे सर्वांकडे पाहात उत्तरला,

''आपण मला असा प्रश्न विचाराल याची मला अगोदरच कल्पना होती. आपणा सर्वांच्या मनांत हाच गोंधळ चलालाय याची मी पूर्वीच दखल घेतलीय ..तेच तर खरं माझ्या संशोधनाचं गमक आहे... कृष्णविवरे अस्तित्वात आहेत हे आपणास ठाऊक आहे.. किंबहुना बरीच कृष्णविवरे शोधलीही आहेत. कृष्णविवरे म्हणजेच- तेथे प्रचंड गुरूत्वाकर्षण असून प्रकाशही त्यातून बाहेर पडू शकत नाही. म्हणून कृष्णविवरात पडलेल्या वस्तूंचं पुढं काय होतं याची कल्पना आपल्याला नाही. आजपर्यंत सैद्धांतिक विचारच या संदर्भात मांडले गेले आहेत... पण जेथे प्रकाशही बाहेर पडू शकत नाही, अशा कृष्णविवरांमध्ये जाऊन, परत बाहेर येतील असे कण शोधून काढले आहेत. त्यांचा वेग प्रकाशाच्या कोट्यावधी पटीने जास्त आहे... त्यांना 'तकियॉन्स' (Techyons) १ म्हणजेच 'अतिचपलकण' असे म्हणतात. या कणांचा शोध मी माझ्या छोटेखानी प्रयोगशाळेतच घेतला होता. त्यांची निर्मिती विश्वकिरणांच्या (cosmic Rays) परस्परक्रिया (Interaction) मधूनच होते हे मी सिद्ध केले... आणि याच तकियॉन्सचा उपयोग करून समांतर विश्वात असणाऱ्या आपल्या मानवांशी आपल्याला संपर्क साधता येऊ शकेल. ताकियॉन्स हे माहिति नेऊन आणण्याची कामे चांगली करतील. त्यासाठी मी एक उपकरणही तयार केले आहे... त्यात ताकियॉन्सच्या साहाय्याने आपण माहिती पाठवू व श्रवण करू शकू.

सगळेच पुन्हा त्या म्हाताऱ्याकडे अविश्वासाने पाहू लागले.. काही शास्त्रज्ञ तर,हे अशक्यप्राय आहे असे म्हणू लागले. डॉ.तनवरांनी अशी भोंदूगिरी व चमत्कार भारतात अधूनमधून होत असल्याचं सांगितलं.. डॉ उल्हकांनी पाकिस्तानात यापेक्षा वेगळं नसल्याचं नमूद केलं मात्र डॉ. व्हाईट व डॉ.ली वँग यांनी म्हाताऱ्यावर विश्वास दर्शविला होता.. मोजक्या सदस्यांमध्येही उलटसुलट चर्चा होऊ लागली होती. म्हातारा मात्र शांत उभा होता.डॉ.ब्रिसलेंनी मीटिंगचं नियंत्रण आपल्या हाती घेतल्या ते म्हणाले,

मित्र हो शांत व्हा...आपल्या वरिष्ठ भारतीय मित्राने अतिशय तोकड्या सुविधाच्या सहाय्याने व तेवढ्याच स्वकष्टाने केलेल्या संशोधनाचा पाठपुरावा करण्यास काय हरकत आहे? मी हा निर्णय अतिशय विचार करून घेतला आहे.मला वाटतं, नासातील शास्त्रज्ञ यात निश्चित पुढाकार घेऊन सहभागी होतील अशी मला आशा आहे''

म्हाताऱ्याच्या चेहऱ्यावर एक स्मितरेषा झळकून गेली..नासातील एक वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ.किथ म्हाताऱ्याकडे पाहात उत्तरले. ''आम्ही निश्चितपणे पाठपुरावा करू..पण समांतर विश्वात जायचे कसे? हा मोठा प्रश्न आहे'' म्हातारा शांतपणे सर्वांकडे पाहात म्हणाला,

''मला वाटतं, हा सोपा प्रश्न आहे. यासाठी कृष्णविवरांचा योग्यरीतीने वापर करून घेता येईल. जर मानवसदृश यानाने प्रवास करून,कृष्णविवराच्या गाभ्यात न शिरता आतील प्रासंगिक क्षितिज ओलांडताच प्रचंड उलथापालथ होऊन स्थल व काल पुन्हा उलट होऊन विश्व सर्वसाधारण होते. तथापि आपण आपल्याच विश्वात परत येऊ हे सांगता येत नाही. खरं तर आपण आपल्याच विश्वात प्रवास करत असलेलो राहू..आणि हे नवीन विश्व कदाचित आपल्या पूर्वीच्या काळातील (Evolution) असू शकेल..तर या पद्धतीने स्थलांतरित झालेला मानव कुठल्यातरी अनिश्चित विश्वात असेल.. जो कोणीही त्या विश्वात जाईल तेथे माझ्या उपकरणाच्या सहाय्याने आपण त्याच्याशी निश्चित संपर्क साधू शकाल.प्रथम आपण प्रयोग म्हणून मानवसदृश यान पाठवा... आणि संपर्क साधताच अशा समांतर विश्वात मानवाचं स्थलांतर करा..''

म्हाताऱ्याच्या या निवेदनानंतर इटलीचे डॉ.पोरपाटा यांनी पुढील शंका व्यक्त केली.

''एक्सक्यूज मी.. पण प्रयोगासाठी कुणीतरी मानव पाठविणे आवश्यक आहे!''

म्हातारा तत्काळ उत्तरला, ''मी आपणास माझ्या निवेदनातच सांगितले की, मी कुठल्याही पद्धतीचे सहकार्य देण्यास तयार आहे.. मला स्वत:ला जायला आवडेल.. मानवासाठी.''

''या भारतीयांचं निश्चित कौतुक करायला हवं.. प्रतिकूल परिस्थितीतही त्याने बहुमूल्य संशोधन केलं आहे..

त्याचा पाठपुरावा करणे हे आपले कर्तव्य आहे. त्याचा उपयोग निश्चितपणे या प्रकल्पासाठी केला जाईल. येत्या काही महिन्यातच हा प्रयोग सिद्धीस जाईल. पण मला वाटतं, जोपर्यंत प्रयोग यशस्वी होत नाही तोपर्यंत त्याची गुप्तता पाळणे योग्य आहे. डॉ.ब्रिसलेंनी आभार मानून यासाठी सर्वांकडून मदतीची अपेक्षा केली..सर्व सदस्यांकडे पाहात असताना म्हाताऱ्याच्या चेहऱ्यावर नकळत एक छद्मीपणाची लकेर उमटून गेली होती. सेमिनार संपले.

त्यानंतर काही दिवसांनी एक विलक्षण घटना घडली. वाई व पाचगणी दरम्यान असणाऱ्या घाटात एका कारला अपघात झाला होता.. पण घटनास्थळी मात्र कारमधील व्यक्तीचा मृतदेह न आढळल्याने आजूबाजूचे लोक स्तिमित झाले होते..हा काय प्रकार घडला आहे हे ज्या ट्रकवर कार आदळली त्या ट्रकच्या ड्रायव्हरलाही कळले नाही..अचानक ब्रेक फेल व्हावा तशी ती कार हेलकावे खात ट्रकवर आदळली होती; पण या कार अपघातात कुणाचाच मृतदेह न सापडल्याने सारेच चक्रावून गेले होते. चौकशीअंती ती कार एक निवृत्त प्राध्यापक रणछोड गाभेंची असलेली आढळली. प्रा.गाभे हे सत्तरीच्या आसपास असलेले गृहस्थ.. ते अविवाहित होते. त्यांना कुणीही नातलग नसावेत,असे त्यांच्या आजुबाजूला राहणारे रहिवासी म्हणतात. ते मितभाषी असल्याने त्यांचे खास असे संबंधही कुणाशी नव्हते.. ते एक गूढ व्यक्तिमत्व म्हणूनच प्रसिद्ध झाले होते.

अपघाताच्या निमित्ताने त्यांची ही अशी त्रोटक माहिती बाहेर आली होती. ज्या वेळेस अपघात झाला त्या आधी ते स्वत: ड्राईव्ह करीत, घरून निघाल्याचे काही साक्षीदारांनी पोलिसांना सांगितले होते; पण ट्रक ड्रायव्हरला समोरून येणाऱ्या कारमध्ये कुणी आहे किंवा नाही याचे भानच नसल्याने त्याची पुरती भंबेरी उडाल्याचे दिसले होते. तो निश्चित असे काही सांगू शकला नव्हता. त्यामुळे एक गूढ व तेवढीच रहस्यमय केस म्हणून पोलिसांनी ती नोंदवून घेतली होती.

अथक परिश्रमाने नासातील शास्त्रज्ञांनी छोटंसं पण तेवढंच प्रभावी अशा यानाची निर्मिती करून, एका नव्या प्रयोगाची सुरूवात केली होती. त्या म्हाताऱ्याच्या निमित्ताने मानवाचा प्रतिविश्वे, समांतर विश्वात प्रवेश झाला होता. एका महाकाय कृष्णविवरात, त्या म्हाताऱ्याला घेऊन जाणाऱ्या यानानं प्रवेश करताच, त्या विलक्षण प्रयोगाची सांगता झाली होती; पण तेथे उपस्थित असलेले प्रमुख शास्त्रज्ञ डॉ.ब्रिसले यांची ही अर्धीच बाजी होती. तंत्रज्ञांनी चोख काम बजावून यानाचा प्रवास घडवून आणला होता; पण प्रकल्पाची खरी बाजू पुढेच होती. याची सारी भिस्त त्या म्हाताऱ्यावर व त्याने बनविलेल्या उपकरणावर होती. ते उपकरण महाबळेश्वर येथेच ठेवले असल्याने सर्व सदस्य तेथेच जमणार होते आणि त्याच ठिकाणी तो म्हातारा त्याच तकियॉन्समार्फत डॉ.ब्रिसलेंशी संपर्क साधणार होता. तो काळ अनिश्चित होता; पण तेथेच ठाण मांडून बसणे आता अपरिहार्यच होते... साधारण ठरलेल्या कालावधीतच संपर्क साधणे अपेक्षित होते. जर समांतर विश्वातून आपल्या विश्वात संपर्क साधला गेला तर मानवासाठी वेगवेगळ्या विश्वांची दालनेच उघडणार होती. तो खरोखर एक रोमांचकारी अनुभव असेल.

कमिटीतील सर्वच प्रतिनिधी पुन्हा इच्छित कालावधीत हजर झाले होते...पुन्हा एक अर्जंट मीटिंग डॉ. ब्रिसलेंनी बोलावली होती.कदाचित त्यांच्या प्रकल्पांचा परिणाम मिळण्याची आशा असल्याने ही मीटिंग बोलविण्यात आली होती. महाबळेश्वरमध्ये तेच सपना हॉटेल तीच सेमिनार रूम, तेच प्रतिनिधी, तीच गुप्तता सर्व काही जसेच्या तसेच होते.. डॉ.ब्रिसले उठून उभे राहिले..त्यांनी आपला घसा साफ करताच.. पूर्वीप्रमाणेच दाराचा कर्ररऽऽ आवाज होताच, सर्वानीच त्या दिशेने पाहिले व दारात उभ्या असलेल्या व्यक्तीकडे सारेजण पाहातच राहिले..

..सर्वजण थक्क होऊन पाहात होते..समोर दहा दिवसांपूर्वी समांतर विश्वात पाठविण्यात आलेल्या म्हाताऱ्याची प्रतिकृती उभी होती. ते पाहून सारेच चक्रावून गेले होते. काय बोलावं हे कुणालाच कळत नव्हतं. डॉ.ब्रिसलेही सुन्न झाले होते.. वातावरणात शांतता पसरली होती. शेवटी त्या म्हाताऱ्याच्याच अस्खलित इंग्रजी वाणीने सर्वच भानावर आले होते.. म्हातारा सांगू लागला,

''मी रणछोड गाभे.. पाचगणीला राहतो.. भौतिकशास्त्राचा निवृत्त प्राध्यापक. जास्त निवेदन न करता मी सरळ विषयालाच हात घालतो. आज मानवाला भेडसावणाऱ्या प्रश्नाचं मी

उत्तर आहे. माझ्याकडे एक अभिनव कल्पना आहे, तीच आपणासमोर मांडावी अशी माझी इच्छा आहे..''

डॉ.ब्रिसलेंना त्यांना प्रथम मिळालेल्या अनाहूत पत्राचा गोषवारा आठवताच.. ते अविश्वासाने उत्तरले, ''म्हणजे आपणच मला ते पत्र पाठवले होते का?...

''येस्.. ऑफकोर्स.. मीच अ ब क या नावाने ते पाठवले होते. त्याची आपण दखल घेतल्याने मी आपला आभारी आहे.. माझीच कल्पना व संशोधन मी आपणापुढे मांडणार आहे. भारताचे शास्त्रज्ञ डॉ. तनवर गांगरून म्हणाले,

''अहो! पण तुमची कल्पना आपण केव्हाच अमलात आणलीय्.. त्याचाच पाठपुरावा करून नासाने तुम्हाला अंतराळप्रवासात पाठविले..''

''व्हॉट नॉन्सेस.. कसं शक्य आहे? मला पाठवलं?''

रणछोड गाभेंच्या चेहऱ्यावर उद्विग्नता होती.

तेवढ्यात सेमिनार रूममधील त्या उपकरणातून आवाज येताच सर्व प्रतिनिधी उत्सुकतेने बघू लागले. रणछोड गाभेंनीही उपकरणाच्या दिशेने पाहताच ते ओरडले..

''हे मी तयार केलेले उपकरण इथे कसे?'' सर्वजण आश्चर्याने नकळत नेमके काय चालले आहे ते शोधण्याच्या प्रयत्नात असतानाच, उपकरणातून स्पष्टपणे ऐकू आला.

''सभा पुरूष हो.. मी रणछोड गाभे; अर्थातच खोटा गाभे. खरा रणछोड गाभे आपल्यासमोर उभा आहे.. आज मी आपल्याशी संपर्क साधू शकलो ते याच्यामुळेच. खरा मानव तोच.. खऱ्या रणछोड गाभेचा अपघात होताच तोही समांतर विश्वात भटकून आला.. कमी वेळेसाठी.. म्हणूनच त्याच्या स्मृतीत ते नाहीये.. याकामी वेळेतच माझं कार्य व त्याच्या संशोधनाचं फलित हवं होतं. मीही तुमच्यासारखाच एक समांतर विश्वातला समांतर विश्वाशी संपर्क साधण्याच्या प्रयत्नात असलेला; पण आम्ही तुमच्यापेक्षा मागासलेले.. आमची मजल तुमच्यापेक्षा कमीच होती.. शेवटी आपल्या विश्वात प्रवेश करून मी हा महत्त्वाचा प्रयोग यशस्वी करून घेतला..जो प्रश्न तुम्हाला भेडसावीत आहे तो प्रश्न आमच्या विश्वात असल्याने ती एक गंभीर समस्या आमच्यापुढे होती. आता सहजपणे आम्ही आपल्या विश्वात प्रवेश करून, स्थलांतरीत होऊ.. व इतरही विश्वे काबीज करू.. तर मिस्टर, टू रणछोड गाभे आणि कंपनी, गुड बाय्.. डॉ. ब्रिसले व इतर सर्वच रणछोड गाभेंकडे केविलवाणे होऊन पाहात होते.. 'हे सर्व काय झाले?' असाच त्याचा अर्थ होता.

''थांब! मिस्टर तोतया रणछोड गाभे,.. फुशारक्या मारू नकोस.. सर्वच तुझ्या हातात आल्याचं समजू नकोस.. अरे! आम्हीच तुझे आभार मानले पाहिजेत.. आमचा प्रयोग यशस्वी झाला आहे.कुठल्याही मानवाचा बळी न देता...आम्हा मानवांवर विजय मिळविणे तेवढे सोपे नाही... तुझ्यामुळे आम्हालाच खरे तर साऱ्या विश्वाची दालने उघडली गेली... तुला वाटते, हे सर्व तुमच्यासाठी झाले... या भ्रमात राहू नकोस... इथून सर्व नष्ट करण्याची ताकद आमच्यात आहे; पण आम्ही तसे करणार नाही. तुला वाटले, माझ्या स्मृती गेल्याने मला काहीच कळाले नाही; पण अपघाताच्या ठिकाणीच तुझा कुटिल डाव माझ्या लक्षात आल्याने, क्षणातच मी तकीयॉन्सच्या साहाय्याने उपकरणात बदल केला. जेणेकरून त्याचा फायदा तुम्हाला न होता आम्हाला होईल... तुझ्या विश्वात तू सुखरूप गेलास म्हणून आभार मान... तुला वाटले, तू मला वापरले...पण वेड्या! मीच तुला वापरून, माझ्या संशोधनाचे फलित साध्य करून घेतले. आम्हा मानवांसाठी... तू निकामी आहेस... तुझ्याजवळ जे आहे असे तुला वाटते, तसे काहीही नाही... हवं तर खात्री करून घे... कारण काही वेळातच तुझा संपर्क तुटणार आहे... आपोआप...''

पलीकडून रागीट स्वर उमटला. ''नालायक... तू मला फसवलंस... तुम्ही मानव... तेवढ्यात संपर्क तुटला होता... रणछोड गाभे व पर्यायाने डॉ. ब्रिसलेंचा प्रयोग यशस्वी झाला होता. मानवाने त्याला भेडसावणाऱ्या प्रश्नाचं उत्तर शोधलं होतं.. त्या उत्तराने मानवासाठी विश्वाची असंख्य दालने उघडली गेली होती... आता त्या दृष्टीने पावलेही पडणार होती.

''तुम्ही मानव'' हे तोतया गाभेंचं अर्धवट वाक्य खऱ्या रणछोड गाभेंनी पूर्ण केलं... अर्थात त्याला सर्वांनीच दुजोरा दिला. ते म्हणजे...

...आम्ही मानव श्रेष्ठच आहोत!

••

**डॉ. संजय ढोले**
भौतिकशास्त्र विभाग
पुणे विद्यापीठ, पुणे -७

# प्रबोधिनी आपल्या तालुक्यात!

हिंदुस्थान स्वतंत्र होऊन यंदा ५० वर्षे पूर्ण होत आहेत. सुवर्णमहोत्सवाचा आनंद साजरा करतानाच देशासमोरील विविध प्रश्नांमुळे प्रत्येक सुजाण नागरिकाला चिंतेने ग्रासलेले आहे. आपल्या राष्ट्रीय जीवनामध्ये आमूलाग्र बदल घडवायचा असेल, तर विविध क्षेत्रांमध्ये चारित्र्यवान नेतृत्व उभे राहिले पाहिजे, याची प्रकर्षाने जाणीव होते. स्व. आप्पासाहेब पेंडसे यांनी याच मूळ विचाराने ज्ञान प्रबोधिनीची निर्मिती केली. तिला यंदा ३५ वर्षे पूर्ण होत आहेत.

वैशिष्ट्यपूर्ण शिक्षणपद्धतीतून व्यक्तीमधील नेतृत्वगुण वाढविता येतात आणि अशा प्रक्रियेचा लाभ झालेले विद्यार्थी-विद्यार्थिनी आयुष्यात स्वत: जसे कर्तृत्ववान म्हणून चमकतात तसेच ते देशासमोरील प्रश्न सोडविण्यासाठीही आपली कार्यशक्ती वेचतात, असा ज्ञान प्रबोधिनीचा अनुभव आहे.

देशाविषयीच्या दायित्वाची म्हणजेच सामाजिक बांधिलकीची प्रेरणा जागी करण्याचे शिक्षण प्रबोधिनीच्या विविध केंद्रांमधून दिले जाते. इतरांनाही अशा कामासाठी प्रवृत्त करणारे नेतृत्व यातून घडते. पुणे, शिवापूर, निगडी, साळुंब्रे व सोलापूर येथे शिक्षणातील नवनवे प्रयोग प्रबोधिनी करत आहे. त्यांचा महाराष्ट्रात व्यापक प्रमाणावर विस्तार करण्याचा निश्चय ३५ व्या वर्धापन वर्षात करीत आहोत.

५ वर्षांपूर्वी शैक्षणिक उपक्रम संशोधिका व छात्र प्रबोधन या कुमारांच्या मासिकाचा प्रारंभ याच हेतून झाला. २ वर्षांपूर्वी 'प्र' शिक्षक हे शिक्षकांसाठीचे द्वैमासिकही याच हेतूने सुरू झाले. विद्यार्थी-पालक-शिक्षक यांचे मेळावे, प्रशिक्षण शिबिरे, अभ्यासवर्ग योजले जात आहेत. त्या सर्वांमधून गेल्या २-३ वर्षांमध्ये महाराष्ट्रात सुमारे ८ ठिकाणी साप्ताहिक-पाक्षिक कार्यक्रमांना प्रारंभ झाला आहे. या उपक्रमांच्या आयोजनात गावोगावी स्थानिक संयोजक सहभागी होत आहेत.

**येत्या ५ वर्षांत महाराष्ट्राच्या २० जिल्ह्यांमधील १०० तालुक्यांमध्ये प्रबोधिनीचे काम, येथील शैक्षणिक उपक्रम व ही शैक्षणिक चळवळ पोहोचविण्याचा संकल्प प्रबोधिनीने केला आहे.**

**या १०० तालुक्यांमध्ये आपल्या तालुक्याचा समावेश व्हावा असे आपणास वाटते का?** आपण स्वत: यासाठी काही वेळ देऊ शकाल का? अन्य कोणत्या प्रकारचे सहकार्य यासाठी आपण करू शकाल? यासंदर्भात यथाशक्य पत्रव्यवहार करावा.

ज्या शाळा-शैक्षणिक संस्थांना आपल्या शाळांमध्ये प्रबोधिनीचे हे शैक्षणिक उपक्रम राबविण्याची इच्छा असेल त्यांनीही जरूर पत्रव्यवहार करावा.

हसत-खेळत, अनुभवसंपन्न करणारं, आत्मविश्वास वाढवणारं, प्रत्येकाला स्वत:च्या क्षमता ओळखण्याची, विकसित करण्याची, व्यक्त करण्याची अन् प्रसंगोपात्त ताणण्याची संधी देणारं सर्वांगीण विकासाची दिशा व प्रेरणा सर्वांगीण विकासाची दिशा व प्रेरणा देणारं, इतरांसाठी नि:स्वार्थीवृत्तीने काही करण्याची वृत्ती जोपासणारं, अन् निखळ आनंद देणारं, जीवनदायी शिक्षण आपल्या गावातील मुला-मुलींना मिळावं असं आपल्याला अगदी मनापासून वाटतं ना! प्रबोधिनीलाही असेच शिक्षण महाराष्ट्र अन् देशभर पोहोचवायचं आहे. म्हणूनच ही शैक्षणिक चळवळ !

छात्र प्रबोधन हे एक साधन-माध्यम सुद्धा याचसाठी ! ते निव्वळ मासिक नाही. ती विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकसनाची एक चळवळ आहे. ही चळवळ अधिक गतिमान व्हावी यासाठी आपणही यामध्ये सहभागी व्हावं, आवश्यक साहाय्य करावं यासाठीच हे आव्हान !

आपला प्रतिसाद, उत्साह वाढविणारा असेल असा विश्वास बाळगून आहोत.

आपण 'कार्यवाह, ज्ञान प्रबोधिनी' अथवा 'प्राचार्य, ज्ञान प्रबोधिनी प्रशाला' अथवा 'संपादक, छात्र प्रबोधन' यापैकी कोणाशीही याबाबत पत्रव्यवहार करू शकाल. सर्वांचा पत्ता एकच...

**ज्ञान प्रबोधिनी**
५१० सदाशिव पेठ, पुणे ३०

**संयोजक प्रशिक्षण शिबिर**

ज्ञान प्रबोधिनीचे विविध शैक्षणिक प्रयोग स्वयंसेवी वृत्तीने आपल्या गावी सुरू करण्याची इच्छा असलेल्या वय वर्षे २० व पुढील युवक-युवती-पालक-शिक्षक यांच्यासाठी हे शिबिर आहे.

**स्थळ :** पुणे परिसर **कालावधी :** २४ ते २८ डिसेंबर ९७

**शुल्क :** रु. १५०/- (शिबिर काळातील निवास-भोजन इ.सह)

शिबिर निवासी असणार असून शिबिरात पूर्णवेळ व सर्व दिवस सहभागी होणे आवश्यक !

अधिक तपशीलासाठी छात्र प्रबोधनच्या स्थानिक कार्यालयांशी अथवा मुख्य कार्यालयाशी संपर्क करावा.

## डिसेंबरमधील कार्यक्रम

**आपल्या भागातील प्रश्नांवर सर्वेक्षण व यथाशक्य कृति :–** आपण आपल्या भागातील प्रश्न समजावून घेणे, त्याबाबत विविध स्तरांमधील व्यक्तींचा त्या प्रश्नांकडे पाहण्याचा दृष्टिकोन, त्यांच्या उत्तराबाबतची मते जाणून घेणे व त्यावर यथाशक्य कृतिरूप प्रतिसाद देणे म्हणजे खऱ्या अर्थाने समाजाभिमुख होणे. असा दृष्टिकोन विद्यार्थ्यांमध्ये यावा यासाठी हा कार्यक्रम राबवावा. आपल्या गावातील/भागातील प्रश्नांची विद्यार्थ्यांना प्रथम यादी करण्यास सांगावी. त्यासाठी प्रथम आपल्या भागातून एक फेरफटका मारून येण्यास सांगावे. काढलेल्या प्रश्नांपैकी सर्वात महत्त्वाच्या वाटणाऱ्या २–३ प्रश्नांवर तपशीलात चर्चा करावी. त्यातील उपप्रश्न काढावेत. मग शहराचा/गावाचा एखादा भाग निवडून त्याचे छोटे छोटे उपभाग करावेत. २–३ च्या गटाने विद्यार्थ्यांना एकेका उपभागात पाठवून वेगवेगळ्या व्यक्तींशी (गरीब–श्रीमंत, श्रमजीवी–बुद्धिजीवी, सामान्य–पदाधिकारी, विविध व्यवसायांचे, विविध वयोगटातील, स्त्री–पुरुष इ.) त्या प्रश्नांबाबतचे त्यांचे मत, उपाय, अन्य महत्त्वाचे वाटणारे प्रश्न इ. बाबत प्रत्येकी ३–५ मिनिटे चर्चा करावी. त्यांचे म्हणणे ऐकून घ्यावे. अशा किमान १५ व्यक्तींशी चर्चा करून परत यावे. त्यावर एक टिपण करावे. सर्व गटांची टिपणे एकत्र वाचावीत. त्यावर चर्चा करून एखादा महत्त्वाचा प्रश्न व त्यावर जमू शकेल अशी कृती करण्याचे निश्चित करावे. त्याचे योग्य नियोजन करून पुढील ८–१० दिवसांमध्ये एखादा महत्त्वाचा प्रश्न व त्यावर जमू शकेल अशी कृती करण्याचे निश्चित करावे. त्याचे योग्य नियोजन करून पुढील ८–१० दिवसांमध्ये त्याची कार्यवाही व्हावी. शक्य तेथे विद्यार्थ्यांच्या विचाराला–नियोजनाला उत्स्फूर्ततेला प्राधान्य द्यावे. सर्व कार्यक्रमांचे वृत्त पुण्यास पाठवावे.

## 'छात्र प्रबोधन'ची स्थानिक कार्यालये

निगडी : ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालय, पेठ क्र. २५, निगडी ☎ ८४३८०

सोलापूर : ज्ञान प्रबोधिनी बालविकास मंदिर, डफरीन चौक, सोलापूर ☎ २५७८२

सातारा : श्री. सतीश कुलकर्णी, प्लॉट नं. ५१ सर्व्हे नं. ३२७/१अ, अंजली कॉलनी, करंजे तर्फ सातारा. ☎ ५०५०४

सांगली : श्री. शैलेंद्र केळकर, ६९२, गावभाग, खाडिलकर गल्ली, सांगली

कोल्हापूर : डॉ. शुभांगी कुलकर्णी (सोलापूरकर), आशीर्वाद हॉस्पिटल, बिनखांबी गणेश मंदिराजवळ, कोल्हापूर ☎ २१५३४

इचलकरंजी : श्री. विनायक गद्रे, वॉर्ड नं. ५, घर नं. ६७ अ, झेंडा चौक, इचलकरंजी ☎ ४२४००८

नाशिक : सौ. साधना गाडगीळ, रामकृष्ण धाम, श्रीरामवाडी, म. गांधी रस्ता, नाशिक ☎ ५७४८३०

ठाणे : डॉ. अजित दातार, C-20, अहिल्या सोसा. घंटाळी रोड, घंटाळी मंदिराजवळ, ठाणे (प.) ☎ ५३९१०८७

डोंबिवली : सौ. सविता सुनील ढोणसळे, बी–१३ कॉमेटकुंज कौ. हौ. सो., टिळकनगर शाळेजवळ, डोंबिवली (पू.) ☎ ४५४६८८

बोरिवली : सौ. अर्चना अशोक साठे, साठे हाऊस, क्रॉसरोड नं. २, बोरिवली (पू.) ☎ ८०६०२४१

पार्ले : सौ. वसुंधरा भोसले, 'त्रिमूर्ती' प्लॉट नं. ३९, तेजपाल स्कीम, रोड नं. ३, विलेपार्ले (पू.) ☎ ८२०४०७६

अलिबाग : श्री. राम जोशी, १, कृष्णविहार समर्थ नगर, पिंपळघाट, अलिबाग. ☎ २५३०९

रत्नागिरी : सौ. अंजली कार्लेकर, लक्ष्मीबाई लिमये चाळ, जोशी पाळंद, रत्नागिरी. ☎ २०७२४

धुळे : सौ. उषा पाठक, धुळे अर्बन बँक, गरूडबाग, धुळे ☎ २३४८७

परभणी : श्री. दिलीप राके, 'पारस' नाथनगर, परभणी.

लातूर : डॉ. अरुणा देवधर, विद्यानगर, विवेकानंद रुग्णालय, लातूर ☎ ४३६१४

औरंगाबाद : सौ. स्वाती पळसकर, सनी कॉर्नर, दुसरा मजला, पैठण गेट. ☎ ४३३२६

**महाराष्ट्रातील इतर गावांमध्ये छात्र प्रबोधनची स्थानिक कार्यालये स्वयंसेवावृत्तीने सुरू करण्याची इच्छा असलेल्यांनी कार्यालयाशी पत्रव्यवहार करावा.**

या कार्यालयांमध्ये 'छात्र प्रबोधन' या मासिकाची व 'प्र'शिक्षक या द्वैमासिकाची वर्गणी भरून सभासद होता येईल. ज्ञान प्रबोधिनीद्वारा प्रकाशित विविध पुस्तके विक्रीसाठी उपलब्ध असतील. छात्र प्रबोधन वा 'प्र'शिक्षकासाठी आपले लेखन या केंद्रांवर आपण देऊ शकाल. छात्र प्रबोधनद्वारा होणाऱ्या विविध शिबिरांची व उपक्रमांची माहिती येथे उपलब्ध असेल व त्यासाठी नावनोंदणी तेथे करता येईल.

छात्र प्रबोधनच्या लेखक, कवी, चित्रकार, जाहिरातदार, देणगीदार, प्रायोजक,
हितचिंतक व वाचकांना दीपावली व नववर्षाच्या शुभेच्छा ! व त्यांच्या सहकार्याबद्दल
मन:पूर्वक धन्यवाद ! - संपादक मंडळ, छात्र प्रबोधन.

हे मासिक 'ज्ञान प्रबोधिनी' या संस्थेच्या मालकीचे असून सौर आश्विन १८, शके १९१७
१० ऑक्टोबर १९९५ या दिवशी प्रभात प्रिंटिंग प्रेस, येथे छापून ज्ञान प्रबोधिनी, पुणे येथून प्रसिद्ध केले आहे.



The only method of correcting what is false is by supplying him with what is true!